
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्रं. ५२४६.





REFBK-0005859

# भडकत्या ज्वाला

अर्थात्

# आगामी महायुध्द

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध ८३६
REFBK-0005859

लेखक

श्रीकृष्ण रामचंद्र पोतनीस.

एम्. ए. एल्एल्. बी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५६५८

प्रकाशक :

महाराष्ट्र ग्रंथभांडार, कोल्हापूर.

किंमत १॥ रु.

प्रकाशक,
शं. वा. कुलकर्णी,
महाराष्ट्र ग्रन्थ-भांडार, कोल्हापूर

प्रथमावृत्ति
१९३९

मुद्रक,
कृ. ह. सहस्रबुद्धे,
श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

गुरुवर्य डॉ. बाळकृष्ण,

एम्. ए. पीएच्. डी., इ.

प्रिन्सिपॉल, राजाराम कॉलेज,

कोल्हापूर,

यांना

आदरपूर्वक अर्पण.

# अनुक्रमणिका


प्रस्तावना ... ... ... ... ...

१ महायुद्धें कां होतात ? ... ... ... १

२ मृत्यूच्या दलालांचा देशभक्तीचा लिलांव ... ... १०

३ साम्राज्यशाहीचा नंगा नाच ... ... ... २३

४ राष्ट्रसंघाच्या नाट्यगृहांत शस्त्रसंन्यासाचा पोरखेळ ... ३०

५ महायुद्धें थांबतील–पण केव्हां ? ... ... ... ४३

६ महायुद्ध होणार काय ? ... ... ... ५०

७ युरोपच्या राजकारणांतील धागेदोरे ... ... ६५

८ मध्ययुरोपांतील अल्पसंख्याक ... ... ... ८६

९ हतभागी ज्यूंना वाली कोण ? ... ... ... १०५

१० युरोपांतील धिंगाणा ... ... ... ११३

११ भूमध्यसागरांतील पाण सुरुंग ... ... ... १२५

१२ हुकूमशहांचा अपमृत्यु ... ... ... १३४

१३ भडकत्या ज्वाला ... ... ... १५२

१४ अशुभस्य कालहरणम् ... ... ... १५९

१५ आगामी महायुद्ध आणि हिंदुस्थान ... ... १६८

# आभार

प्रस्तुत पुस्तकाचें हस्तलिखित चाळून गु. प्रो. अप्पासाहेब फडके यांनीं अनेक सूचना प्रारंभापासून शेवटपर्यंत दिल्या. हस्तलिखितांत अनेक दुरुस्त्या सुचवून शक्य तों दोषरहित करण्याचें कार्य, माझे स्नेही श्री. तेंडोलकर यांनीं परिश्रमपूर्वक केलें. पुस्तक सर्वांगसुंदर व आकर्षक व्हावें म्हणून, श्री. शंकरराव किर्लोस्कर यांनीं पुस्तकांतील फोटोचे ब्लॉक्स विनामूल्य पुरविले. लोकशक्तीचे श्री. हरीभाऊ जोशी यानींही अनेक नवीन गोष्टी सुचविल्या. कामाच्या ऐन गर्दींत, माझ्यासाठीं वेळांत वेळ काढून श्री. अनंतराव काणेकर यांनीं वेळेवर प्रस्तावना धाडून, पुस्तक वक्तशीर प्रकाशित होण्यास मदत केली.

—या सर्वांचे मीं मनःपूर्वक आभार मानतो.

याशिवाय माझे अनेक स्नेही सोबती इत्यादिकांच्या सहकार्याशिवाय हें पुस्तक निघणें शक्य नव्हतें. पण त्यांच्या ऋणांत राहण्यांतच खरें समाधान नाहीं का ?

कोल्हापूर.<br>ता. २४।२।१९३९

—लेखक.

# प्रस्तावना

आंतरराष्ट्रीय राजकारणावर अद्यावत् माहिती देणारीं पुस्तकें मराठी भाषेंत जवळ जवळ नाहींत असें म्हटलें तरी चालेल. श्री. पोतनीस यांनीं हें पुस्तक लिहून मराठी वाङ्मयांत एक मोलाची भर घातली. आहे इतकेंच नव्हे तर आज सर्व जगाला अत्यंत जिव्हाळ्याचा होऊन बसलेल्या एका प्रश्नावर, मराठी वाचकांसाठीं विदारक प्रकाश पाडून एक राष्ट्रीय कामगिरी केली आहे, असें मला वाटतें. म्हणूनच मराठी वाचकांना या पुस्तकाचा परिचय करून देतांना मला अत्यंत आनंद आणि अभिमान वाटतो.

साहित्यसेवक किंवा लेखक राष्ट्रीय कामगिरी करूं शकतो, किंवा त्याला करण्यासारखी कांहीं राष्ट्रीय कामगिरी आहे, हे शब्द ऐकल्याबरोबर कांहीं लोक चमकल्यासारखे होतात. गेल्या वर्षी मुंबई येथें भरलेल्या साहित्य संमेलनांत साम्राज्यशाही युद्धाला विरोध दर्शविणारा ठराव पुढें करण्यांत आला, तेव्हां महायुद्धाचा आणि आमचा संबंध काय,—ही भलतीच भानगड आमच्या सोंवळ्या साहित्यसंमेलनांत कशाला ? म्हणून सर्व साहित्यिकांनीं एकच गिल्ला केला. फार काय, स्वतःचें उपरणेंहि पेलूं न शकणाऱ्या हाडकुळ्या साहित्यिकांना, लेखण्या टाकून बंदुका खांद्यावर टाकण्याचा वीररसशाली उपदेश करणारे संमेलनाध्यक्ष बॅ. सावरकर हेही त्या ठरावाविरुद्ध उठले ! पण आगामी महायुद्धाची हरतऱ्हेनीं हिंदी जनतेच्या मनांत भीति उत्पन्न करून आपलें साम्राज्य तगविण्याकरतां—जें तगविण्यांत हिंदी जनतेचा काडीइतकाही फायदा नाहीं—युद्धासाठीं द्रव्यबल आणि मनुष्यबल उपटावयाचा साम्राज्यवाद्यांचा डाव आहे, आणि तो हाणून पाडण्याकरतां आपली लेखणी चालविणें ही साहित्यिकांनीं तावडतोब करण्यासारखी राष्ट्रीय कामगिरी आहे, असें जेव्हां सांगण्यांत आलें, तेव्हां तो ठराव एकमतानें पास करण्यांत आला. युद्धविरोध म्हणजे वाटेल त्या युद्धाला,—स्वातंत्र्ययुद्धालासुद्धां—अहिंसात्मक ( Pacifist ) विरोध नव्हे, आणि स्वातंत्र्ययुद्धांत पुढें तलवारी आणि बंदुका

घेऊन साहित्यिकांना लढतां आलें तर त्यांनीं जरूर लढावें. पण तोंपर्यंत विरुद्ध पक्षाचे डाव हाणून पाडणें हाही स्वातंत्र्ययुद्धाचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि हें मोलाचें राष्ट्रीय कार्य साहित्यिकांची लेखणी करूं शकते हें पुष्कळांच्या ध्यानांतच येत नाहीं. लेखणी तलवारीलाहि बोथट करूं शकते, या साहित्यिकांना हरभऱ्याच्या झाडावर चढविण्याकरतां नुसत्या बोलावयाच्या गोष्टी नाहींत. आम्हांला हें पटत नसलें, तरी सर्व जगाला बेचिराख करील अशा महायुद्धाचा डोंब पेटवूं पहाणाऱ्या हिटलर–मुसोलिनींना हें चांगलेंच पटलें आहे. आपल्याविरुद्ध होणारा प्रचार थांबविण्याकरतां लांच म्हणून लाखों लिरा; मुसोलिनीनें कांहीं फ्रेंच वृत्तपत्रांना चारले आहेत, ही अद्‌भुतरम्य कथा श्री. पोतनीस यांच्या या पुस्तकांतच वाचकांना वाचावयाला मिळेल.

या विषयासंबंधीं सामान्य माणसांत अज्ञान असल्यास नवल नाहीं. पण राव सावरकरांसारखे विद्वान् देशभक्तही या बाबतींत कमालीचे ‘अडाणी’ आहेत, ही खरोखरच दुर्दैवाची गोष्ट आहे. ‘अडाणी’ हा शब्द वापरतांना मला दुःख होतें, पण माझा नाइलाज आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणांतल्या साध्या प्राथमिक परिभाषेचेंही राव सावरकरांना ज्ञान नाहीं. रशिया आंतरराष्ट्रीयत्वाच्या गप्पा मारतो, पण त्यांनींही आपल्या राष्ट्रीयत्वांचा अभिमान अजून सोडलेला नाहीं, असा आरोप सोव्हियट रशियावर करतांना U. S. S. R. याचा अर्थ United States of Soviet Russia असा त्यांनीं केला होता. ‘रशिया’ हें नांव त्यांना सोडवत नाहीं; असें त्यांचें म्हणणें होतें. पूर्वींच्या R. S. F. S. R या नांवांत ‘रशिया’ हा शब्द येतो म्हणून लेनिननें मुद्दाम U. S. S. R.—Union of Socialist Soviet Republics—हें नांव घेतलें, हें राव सावरकरांच्या गांवींही नाहीं. आंतरराष्ट्रीय राजकारणाचें हें अचाट ज्ञान आपल्या अमोघ वक्तृत्वानें श्रोत्यांपुढें मांडून, त्यांना ते थरारून टाकीत असतात. पॅलेस्टाईनमधल्या अरबांना ब्रिटिशांविरुद्ध आम्ही काय म्हणून पाठिंबा द्यावयाचा ?—अरब हे मुसलमान आहेत म्हणजेच हिंदु राष्ट्राचे शत्रू आहेत, वगैरे शब्दांची आतषबाजी करून, हिंदू श्रोतृसमुदायाचे डोळे

ते दिपवून टाकतात. अशा वेडगळ विचारांचा प्रसार करून न कळत कां होईना, पण हिंदी स्वातंत्र्याचे पाय आपण मागें ओढतों आहोंत, याची त्यांना कल्पनाहि नाहीं.

हिंदी स्वातंत्र्ययुद्ध यशस्वी करण्याकरतां आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या सूक्ष्म धाग्यादोऱ्यांची इत्थंभूत माहिती पाहिजे. हिंदी राजकारण हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा एक जिवंत भाग आहे. पॅलेस्टाईनला चिमटा बसल्यास, त्याची कळ थोडीबहुत तरी हिंदुस्थानला सोसावी लागणार. हिंदी स्वातंत्र्य म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीचा ऑक्टोपस, पॅलेस्टाइन, इजिप्त, फार काय, स्पेन, झेकोस्लोव्हाकिया या सर्व देशांत तंगड्या रोवून बसलाआहे. हिंदुस्थानांत त्याची एक तंगडी आहेच. पॅलेस्टाइनमधल्या अरबांनीं त्याची एक तंगडी मोडली, तर त्याचा फायदा हिंदुस्थानला मिळाल्याशिवाय राहील काय ? म्हणूनच मी म्हणतों, कीं या गोष्टींसंबंधीं जनतेमध्यें कांहींतरी आचरट प्रचार करणें म्हणजे स्वातंत्र्ययुद्धाच्या गाड्यांत खीळ घालण्यासारखें आहे. उलटपक्षीं आंतरराष्ट्रीय राजकारणाचे धागेदोरे साध्या आणि सुबोध भाषेंत उकलून दाखविणें ही एक मोठी थोरली राष्ट्रीय कामगिरी आहे. निर्विकार मनानें सांगितलेल्या वस्तुस्थितीचा इवलासा किरणही, अडाणीपणाच्या वक्तृत्वपूर्ण आतषबाजीला निष्प्रभ करावयाला समर्थ आहे. हें पुस्तक लिहून; श्री. पोतनीस यांनीं एक राष्ट्रीय कार्य केलें आहे असें मी म्हटलें तें त्यामुळेंच. आंतरराष्ट्रीय आकाशांत महायुद्धाचे ढग भरून आले आहेत. जागतिक आणि राष्ट्रीय राजकारणांत आणीबाणीची वेळ आली आहे. अशा अगदीं योग्य वेळीं हें पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल श्री. पोतनीस यांचें पुनः एकदां मी अभिनंदन करतों; आणि मराठी वाचक या पुस्तकाचें उत्साहानें स्वागत करतील, अशी आशा बाळगतों.

१९ फेब्रुवारी १९३९ —अनंत काणेकर.

———

# आधारभूत ग्रंथ


1. Inside Europe (29th Ed.)—By John Gunther.
2. My Struggle-by A. Hitler. 3. Grey Wolf-by Armstrong.
4. My Autobiography—by Bonito Mussolini.
5. Germany Speaks. 6. Across The Frontiers-by P. Gibbs.
7. Cry Havoc—by Beverley Nicholes.
8. The Brown Book of the Hitler Terror.
9. Democracy After The War--by Hobson.
10. Communism-by H. J. Laski. 11. Democracy-by Hobson.
12. Socialism In Evolution—by G. D. H. Coles.
13. The Whispering Gallary of Europe-by Maj. Temperey.
14. The House That Hitler Built--by Stephen H. Roberts.
15. After Democracy—H. G. Wells
16. Intelligent Man's Review of Europe-by G. D. H. Coles.
17. Nation Minorities In Central Europe--by Chmelar.
18. Europe—War or Peace—by Walter Duranty.
19. Menace of Fascism—by John Strachey.
20. National States And National Minorities—by C. A. Macarthey. 21. Blackmail Or War—by Mme. Tabouis.
22. Europe Between Wars—by Armstrong etc.
23. Science In The Changing World-by Holland-Levy etc.
24. Czechs And Germans—by Elizabeth Whiskmani.
25. Germany Puts The Clock Back—by Edgar Mowrer.
26. Europe And The Czechs—by Grant Duff.
27. Mussolini's Roman Empire—by G. T. Garrat.
28. Searchlight On Spain—by Duchess of Atholel.
29. Air Defence of Britain—by Garrat, Fletcher etc.
30. The Jewish Problem—by Luis Golding.
31. The Great Illusion—now—by Norman Angell.
32. One Man Against Europe—by Konrad Heiden.
33. The Dragon Awakes—by Edgar Mowrer.
34. Germany And Ourselves—by Lored Londonderry.
35. News In brief—( Reports, documents on contemporary Germany. ) 36. Reports of The League of Nations.



———

मराठी ग्रंथ संग्रहालय



व्हर्सालिसच्या अन्यायी तह जर्मनीस दुरुस्त करावयाचा आहे, आणि म्हणूनच आज हिटलर दमदाटीची भाषा बोलत आहे.

—पण एवढ्यावर हिटलरची महत्वाकांक्षा भागल. आहे काय ?



हिटलरची दमदाटीची भाषा चेंबर्लेनसाहेबांना सचिंत करीत आहे.
झेकोस्लोव्हाकिया प्रकरणीं हिटलरच्या गर्जनेनें चेंबर्लेनसाहेबांचा
चेहरा मोठा केविलवाणा झाला.

७८४३ निबंध ६३५
दा. क्र. ५८५८

# महायुद्धें कां होतात ?

'सैनिकांचें मरण खंदकांत आणि सेनापतींचें मरण अंथरुणांत ' असें एका ग्रंथकारानें म्हटलें आहे, तें अक्षरशः खरें. हाल-अपेष्टांचा वारसा जर पुढील पिढीस देतां आला असता, तर पुनरपि युद्ध या जगांत झालेंच नसतें. लोकशाहीच्या निर्वंध संचारासाठीं आणि जगांतून युद्धाची कायमची हकालपट्टी करण्यासाठीं गेलें महायुद्ध लढलें गेलें. पण त्याचा सूड उगवण्यासाठींच कीं काय, लोक–शाहीचा द्वेष्टा असुर झोटिंगशाही आणि महायुद्धाचा भस्मासुर जगभर पुन्हा धिंगाणा घालूं लागणार अशीं चिन्हें अवघ्या पंधरा वर्षांतच दृष्टोत्पत्तीस येऊं लागलीं आहेत. आणि पुन्हां होणारें महायुद्ध चालू संस्कृतीचा बळी घेऊन नष्ट होईल असें भाकित केलेलें वरचेवर ऐकूं येतें. हीं महायुद्धें कां होतात यासंबंधींच्या कारणांचा तात्त्विक दृष्ट्या विचार करून चालू आंतरराष्ट्रीय प्रश्नांचाहि त्या दृष्टीनें विचार करण्याचा यत्न करूं. महायुद्धें या जगांतून नाहींशीं होणें शक्य नाहीं अशी सनातनी वृत्ति उराशीं घट्ट धरून बसलेल्यांच्या मुद्द्यांचा समाचार प्रथम घेऊं.

## निसर्गाचा कोप

या लोकांचा पहिला मुद्दा हा, कीं या जगांत युद्धें माणसें करीत नसून तीं निसर्गानें घडून येतात. + टेनिसननें म्हटल्याप्रमाणें निसर्ग रक्तानें माखलेला आहे, हिंसावादी आहे. महोदधीमध्यें मोठा मासा ज्याप्रमाणें लहान मासे खातो व जगतो, त्याचप्रमाणें 'जीवो जीवस्य जीवनम्!' या न्यायानें मोठीं राष्ट्रें लहान राष्ट्रांचा अपहार करतात; ही गोष्ट निसर्गनिर्मितच असल्यामुळें थांबणें शक्य नाहीं. जगांतील मूलस्थिति किंवा सद्यःस्थिति पालटण्यास ही गोष्ट आवश्यक असून, युद्धें परमेश्वराच्या

---

+ It is not men that make war, but Nature. Nature is red in tooth and claws.

योजनेनुसारच घडून येतात, अतएव तीं अपरिहार्यच आहेत आणि जगाच्या आदिपासून अंतापर्यंत चालत राहणार हेंहि उघड आहे.

पण ही विचारसरणी थोडीशी चुकीची आहे. युद्धें जगाच्या आदिपासून आहेत हें खरें, पण तीं अंतापर्यंत चालू रहाणार हा कयास मात्र तर्कबुद्धीस पटत नाहीं. कारण महायुद्धें म्हणजे धरणीकंप किंवा वादळामुळें उत्पन्न होणारीं प्रचंड भरतीच्या लाटेप्रमाणें निसर्गघटित महासंकटें किंवा आकाशांतील कुऱ्हाड नव्हे, हें आपणां सर्वांना ठाऊक आहे. प्लेग, कॉलरा यांप्रमाणें युद्धेंहि कायमचीं नाहींशीं करतां येतील; कारण महायुद्धें हींहि मनुष्यनिर्मितच आहेत. नरमांसभक्षण ज्याप्रमाणें मनुष्यानें सोडलें, त्याचप्रमाणें युद्धप्रवृत्ति कां नष्ट होऊं नये? कारण मनुष्याची प्रवृत्ति शिक्षणानें आणि संस्कृतीनें कशी वाटेल तशी वळवितां येते आणि राक्षसी किंवा पशुवृत्तीहि माणसाळवितां येते, याचा पुरावा इतिहास देतो. आणि जर प्लेग, कॉलरा यांप्रमाणें युद्ध ही एक सांथच आहे असें म्हणणें असेल, तर त्याला उत्तर असें कीं, मग महायुद्धाचीं स्मारकेंच तेवढीं कां उभारतां? कारण त्याहीपेक्षां शतपटीनें लोकांचा संहार करणाऱ्या सांथीप्रीत्यर्थ स्मारकें कां उभारूं नयेत?

कारण सांथीपेक्षां महायुद्ध दोन दृष्टींनीं वाईट. एक तर महायुद्धामुळें सांथीपेक्षां अधिक विध्वंस होतो; आणि दुसरें म्हणजे युद्ध ही मनुष्यानें स्वखुषीनें ओढवून घेतलेली आपत्ति असते. प्लेग किंवा कॉलरा व्हावा म्हणून कोणी त्या रोगाचे जंतु शरिरांत टोंचून घेत नाहीं; पण महायुद्धरूपी रोगाचे जंतु मुद्दाम टोंचून घेतले जातात. आणि प्रत्येक युद्धस्मारक युद्धप्रवृत्तीस उत्तेजित करण्यास कारणीभूत होतें आणि हींच स्मारकें या जंतूंचे फवारे नेहमीं सोडीत रहातात. महायुद्धरूपी महाविध्वंसक रोगाचा शाप मानवजातीला मिळालेला असून त्या शापाची प्रचीति तिला वरचेवर येत आहे. पण मानवजातीच्या निरंतर हिताच्या दृष्टीनें युद्धाची जगांतून हकालपट्टी होणें आवश्यक आहे हें सर्वांना समजतें, पण उमजत नाहीं एवढेंच काय तें!

## युद्धप्रिय मनुष्यप्रकृति

दुसरा मुद्दा असा, कीं मनुष्यप्रकृतींतच युद्ध ही निसर्गनिर्मित गोष्ट आहे; कारण मनुष्य जात्याच युद्धप्रिय, अविचारी आणि भांडखोर असून

त्याची ही संवय मेल्याशिवाय जात नाहीं. जीवितामध्यें नेहमीं घालमेल किंवा रस्सीखेंच हवी असते आणि म्हणून जीविताची धडपड अखेरपर्यंत कायमच रहाणार. थोडक्यांत, ही मनुष्यप्रकृति बदलणें शक्य नाहीं आणि बदलण्याचा प्रयत्न करणेंहि महामूर्खपणाचें आहे.

याचा विचार करतांना मनुष्यप्रकृति (Human nature) आणि मनुष्यस्वभाव (Human behaviour) यांमधील अंतर आपण चांगलें लक्षांत ठेवलें पाहिजे. मनुष्याच्या युद्धप्रियतेचीं बीजें मनुष्यस्वभावांतच सांपडतात. तेव्हां युद्धें बंद करणें म्हणजे मनुष्यप्रकृति बदलण्यासारखी अशक्य गोष्ट आपण करीत नसून मनुष्यस्वभाव बदलण्याचा आपला यत्न आहे आणि तो यत्नसाध्यहि आहे. कारण मनुष्यस्वभाव हा बाहेरील वातावरणावर बहुतांशीं अवलंबून असून धार्मिक, सामाजिक, राजकीय संस्था, कायदा, संवय, रूढि इत्यादीमुळें तो बदलतां येण्यासारखा आहे. मनुष्य करतो त्या घडामोडींत गैरमेळ झाल्यानें भांडणें उद्भवतात. अर्थात् योग्य अशा काळजीपूर्वक केलेल्या पूर्वयोजनेनें हीं भांडणें टाळतां येतील व अशा रीतीनें उद्भवणारे लढायांचे अनेक प्रसंग टाळण्यांत आल्याचे दाखले इतिहासांत मिळतातच मिळतात. यासाठीं काय करावयास हवें हें आपण पुढें पाहूं.

स्वतःच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याचा उपजत स्वभाव आणि हक्क आपणांस केव्हांहि मान्य केलाच पाहिजे आणि त्यासाठीं युद्ध झालें तर तें अनिवार्यच होय; कारण थिएटरला आग लागली म्हणजे ज्याप्रमाणें प्रेक्षक एकदम दरवाजाकडे धांव घेतो, त्याचप्रमाणें 'स्वातंत्र्यावर घाला' हे शब्द कानीं पडतांच मनुष्य शस्त्र घेऊन शत्रूवर चाल करून जातो. एकंदर समाजाची घटना व्यवस्थित चालण्यासाठीं मनुष्यानें आपल्या उपजत स्वभावास ठिकठिकाणीं मुरड घातलेलीच आढळून येईल. फार काय, अशी मुरड घातल्याशिवाय क्रिकेट–टेनिससारखे सामुदायिक खेळसुद्धां माणसास खेळतां येणार नाहींत; कारण प्रत्येकजण जर आपल्या उपजत स्वभावधर्माप्रमाणें (Natural instinct प्रमाणें) चालण्याचा प्रयत्न करील तर केवढी मोठी बेबंदशाही माजेल याची कल्पनादेखील करवत नाहीं.

## प्राणिशास्त्राचा दाखला

प्राणिशास्त्रदृष्ट्या युद्धाची आवश्यकता आहे असेंहि एक मत आहे. कारण सतत वाढणाऱ्या प्रजेस अन्न मिळविण्यासाठीं युद्धाची जरुरी आहे. म्हणजेच वाढत्या प्रजेचा भूभार हलका करण्यासाठीं महायुद्धें होतात. वाढत्या प्रजेपुढें 'लढाई कीं उपासमार' हें कोडें उभें असतें; अर्थातच उपासमार टाळण्यासाठीं युद्ध करणें क्रमप्राप्तच असतें. या युद्धाच्या समर्थनार्थ नेहमीं अर्थशास्त्रज्ञ माल्थस याचा अर्थशास्त्रांतील लोकसंख्याविषयक सिद्धांत पुढें केला जातो. माल्थसच्या मतें, लोकसंख्येची वाढ आणि उत्पादनाच्या साधनांची वाढ यांमध्यें भयंकर गैरमेळ असून, तो गैरमेळ नाहींसा होण्यासाठीं निसर्गनिर्मित निग्रहामुळें (positive checks) म्हणजे उदाहरणार्थ—लढाया, रोग, सांथी इत्यादींमुळें लोकसंख्या कमी होऊन थोडासा मेळ बसतो. पण एवढ्यानें भागत नाहीं. माणसानेंहि संतति-नियमनासारख्या साधनांनीं लोकसंख्या मर्यादित करणेंसुद्धां जरूर आहे.

माल्थसचा सिद्धांत इतिहासानेंच खोटा ठरविला आहे. भयंकर गैरमेळाची भाषा म्हणजे एक भडक स्वरूप देण्यासारखें आहे. गैरमेळ आहे हें मान्य, पण तो कां आहे हा विचारार्ह प्रश्न आहे. वाढत्या लोक-संख्येस पुरेशी जागा नाहीं किंवा पुरेंसें अन्न नाहीं हे दोन्हीहि आक्षेप निराधार आहेत. कारण ऑस्ट्रेलिया, आफ्रिका खंडासारखे प्रांत बहुतांशीं रिकामेच आहेत. कॉफी स्वस्त होऊं नये म्हणून ब्राझील ती जाळतो, तर कॅनडा गहूं जाळतो. पण दोघेहि दुसऱ्यांचा इतर माल विकत घेऊन आपापले मजूर जगवीत नाहींत. आणि ते मजूर कॉफी आणि गहूं यांशिवाय तडफडत आहेत. तेव्हां सहकार्य आणि समप्रमाणांत विभागणी ( World co-ordination and co-operation) यांचाच या जगांत अभाव आहे. आणि म्हणून चालू हलाखीसारख्या आपत्ति येतात. प्लेग, कॉलरा यांसारखे रोग माणसानें हटविले, तर मग आर्थिक हालाखीच्या सांथीवर औषधयोजना म्हणजेच जगाची पुनर्घटना करणें शक्य होणार नाहीं असें मानणेंच मुळीं चूक आहे. पण ती पुनर्घटना कशी करावयाची हें आपण पुढें पाहूं.

७८९३


## स्वार्थत्याग आणि शौर्य

निबंध ६.३.६

युद्धामुळें माणसाच्या अंगीं स्वार्थत्याग, शौर्य निर्माण होतें आणि युद्धामुळेंच ते सद्‌गुण माणसामध्यें जिवंत राहिले आहेत, असा एक मुद्दा नेहमीं पुढें मांडण्यांत येतो. कारण युद्धावर जाणें म्हणजे केवढा मोठा आणि अतर्क्य स्वार्थत्याग! कारण मनुष्याचें स्वतःच्या प्राणावर आत्यंतिक प्रेम असतें, त्याचीसुद्धां आहुती रणांगणावर देण्यासाठीं लागणारा स्वार्थत्याग तसाच अमूल्य नाहीं काय? तसेंच मनुष्यांच्या अंगच्या शूरत्वाची कसोटी रणांगणावरच लागत नाहीं काय? रस्किननें म्हटलें आहे, कीं युद्धामध्यें मनुष्याचे मोठाले गुण उदयाला येतात, तेंच खरें. कारण संपूर्ण आणि निरंतर शांततेमुळें जगांत स्थिरता अगर गांत-शून्यत्व आणि कल्पनाशून्यत्व यांचें साम्राज्य पसरेल आणि आध्यात्मिक खून पडेल अशी त्यांना साधार भीति वाटते. ( Stagnation, sterility and psychic suicide ) आणि याचसाठीं मनुष्यामध्यें धैर्य आणि शौर्य हे सद्‌गुण कायम राहण्यासाठीं तरी युद्ध जरुरीचें आहे.

पण ही विचारसरणी अत्यंत चुकीची आहे, एवढेंच नव्हे तर पाप-मार्गास व दुष्ट विचारांना प्रवृत्त करणारी आहे. तेव्हां तिचा विचार अधिक काळजीपूर्वक केला पाहिजे. निरंतर शांततेमुळें मनुष्य शेळपट बनेल हा आक्षेपच मुळीं तर्कशास्त्राला धरून नाहीं. पण यदाकदाचित् तो मान्य केला तरी कोठें बिघडलें? सर्व माणसें शेळपट बनलीं म्हणून असा काय जगा-वर अनर्थ कोसळणार आहे? शिवाय या शेळपट समाजांत वाघसिंहादि हिंस्र प्राणी नाहींसे झालें तर परचक्रांचें भय नाहींसें होईल. बरें, एखाद्यानें तसें हिंसात्मक स्वरूप धारण केलेंच, तर सर्व समाजाच्या विरुद्ध त्याचा कितपत निभाव लागेल?

हल्लींच्या युद्धपद्धतींत माणसाच्या अंगच्या शौर्यास कितपत वाव मिळतो हाहि प्रश्न विचारार्ह आहे. आणि त्याचें उत्तर ‘मिळत नाहीं’ असेंच द्यावें लागेल. हातघाईची लढाई तर आतां मागें पडलीच; पण शत्रूबरोबर समोरासमोर सामना देणें ही दिवसेंदिवस मागासलेली विद्या ठरूं लागली आहे. शत्रु समोर आहे असें कल्पून शस्त्रास्त्रें सोडणें एवढाच

भाग सैनिकांना हल्लींच्या युद्धांत मिळतो. हीं शस्त्रास्त्रें उपयोगांत आणण्यासाठीं माणसें हीं जिवंत शस्त्रें म्हणूनच आजकाल युद्धांत घेतलीं जातात.

पण दिवसेंदिवस आधिभौतिक शास्त्राच्या प्रगतीबरोबर माणसाचा युद्धांतील भाग कमी कमीच होत आहे; कारण जिवंत माणसांपेक्षांहि कृत्रिम ( यांत्रिक ) माणसेंच अधिक युद्धोपयोगीं ठरत असून कदाचित् असाहि एखादा दिवस उजाडेल, कीं जिवंत माणसांचा युद्धांतील बाकी सर्व भाग नाहींसा होऊन, निव्वळ कृत्रिम यांत्रिक पण निर्जीव माणसांनींच सोडलेल्या शस्त्रास्त्रांना बळी पडणें एवढाच मानवांचा भाग शिल्लक उरेल.

ज्या वेळीं समाज बनविला गेला, त्या वेळीं शांततेसाठीं व लोकांच्या हक्कसंरक्षणासाठीं कायदे बनविले गेले. त्या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठीं न्यायकोर्टें स्थापन झालीं आणि लोकांचे हक्क बुडविणाऱ्यांना शिक्षा होऊं लागली. पण ही व्यवस्था होण्यापूर्वी मनुष्य स्वतःच्या हक्कांचें संरक्षण आणि त्यांच्यावर घाला घालणाऱ्यांचें पारिपत्य स्वतःच्या अंगच्या शक्तीवर करीत होता; पण या नवीन समाजरचनेंत त्याचे हे अधिकार नाहींसे झाले आणि त्यानें स्वखुषीनें हे अधिकार समाजाच्या हितार्थ राज्यसंस्थेकडे शासनार्थ सोंपविले. म्हणजेच पूर्वी ज्याप्रमाणें त्याला स्वतःच्या संरक्षणार्थ वरचेवर धडपड वा द्वंद्वयुद्ध करणें भाग पडत होतें तें आतां लुप्त झाल्यामुळें कांहीं माणसांमधील शूरत्व किंवा मर्दुमकी कमी झाली असें समजावयाचें काय ? ज्याप्रमाणें कायदा आणि न्यायकोर्टें यामुळें हातांत कायदा घेण्यापासून मनुष्यास परावृत्त करणें शक्य झालें, त्याचप्रमाणें आंतरराष्ट्रीय कायदे आणि न्यायकोर्टें किंवा लवादमंडळें यांच्यामुळें हातांत कायदा घेण्यापासून—म्हणजेच युद्ध करण्यापासून राष्ट्रांना परावृत्त करणें शक्य होणार नाहीं, असें मानणेंच मुळीं धाष्ट्यांचें होईल. कारण शौर्य आणि धाडस हे सद्‌गुण निरनिराळ्या चपळाईच्या खेळांच्या द्वारें माणसामध्यें जिवंत ठेवणें आणि निर्माण करणें शक्य आहे असें अनुभवानें सिद्ध झालें आहे.

घटकाभर आपण कबूल करूं, कीं स्वार्थत्याग आणि शौर्य हे सद्‌गुण युद्धामुळें कसोटीस उतरतात. पण तेवढ्यानें युद्ध करणें, म्हणजेच दुसऱ्या

माणसाचा प्राण घेणें, समर्थनीय ठरत नाहीं. कारण देवीच्या रोगापासून माणसाचा असाच फायदा होतो. काळ्या प्लेगपासून मनुष्याच्या शरीरास बरेच फायदे होतात असें वैद्यकशास्त्र म्हणतें व त्याचा दाखलाहि पटतो. पण मनुष्यानें अनुभवांतीं ठरवून टाकलेंच कीं नाहीं त्याविरुद्ध ? आणि त्यांची हकालपट्टीहि जगांतून कायमची केलीच कीं नाहीं ? लष्करी तज्ञांचीं धोरणेंहि अशींच अनिश्चित असतात. आज ते म्हणतील, कीं 'शांततेसाठीं शस्त्रसंभार वाढवा ' व उद्यां लगेच तीच भाषा फिरवून म्हणतील, कीं 'लढाईसाठीं शस्त्रसंभार वाढवा,' किंवा याहि पुढें जाऊन 'युद्धें जगांतून कायमचीं नाहींशीं करण्यासाठीं एवढें हें महायुद्ध लढा!' एकूण बोटावरची थुंकी फिरवून पोरांना फसविण्याचे त्यांचे हे सिद्धांत सर्व जगाला गेलीं हजारों वर्षें फसवीत आले आहेत आणि किती वर्षें फसवीत रहाणार याचाहि कयास बांधणें आज अशक्य आहे. एकूण, कोणत्याहि दृष्टीनें ही विचारसरणी मानवी तर्कबुद्धीस पटणारी नाहीं आणि निरंतरची शांतता जगतांत गतिहीनत्व आणि कल्पनाशून्यत्व निर्माण करील हें अशक्य आणि असंभवनीय वाटतें.

## राष्ट्रीयत्वाचें थैमान

राष्ट्राची संकीर्ण राज्यसत्ता म्हणजे प्रतिपरमेश्वर आणि राष्ट्रीयत्व म्हणजेच धर्म अशा खोट्या भावना आणि आकांक्षा हल्लीं उत्पन्न झालेल्या आहेत. म्हणून आंतरराष्ट्रीय सहकार्यापासून होणारे फायदे मनुष्य दूर लोटीत आहे. राष्ट्राच्या स्वतंत्र राजसत्तेचा सिद्धांत आंतरराष्ट्रीय दृष्ट्या केव्हांहि मानवी हितास घातकच आहे, हें प्रो. लास्कीचें अनुमान + बरोबर आहे.

'माझी मायभूमि,' मग ती चूक असो वा बरोबर असो, हीच वृत्ति बळावते आणि राष्ट्रीय स्वाभिमान व स्वार्थी देशभक्तीचा उमाळा माणसांना पिसाळलेल्या कुत्र्याचें स्वरूप देतात.

---

\+ The notion of an independent sovereign state is, on the international side, fatal to the well-being of humanity.

—Laski.

महायुद्धें थांबण्यासाठीं देशाच्या स्वतंत्र राजसत्तेस मुरड घालावी लागेल हें म्हणणें अगदीं चूक आहे. कारण अगदीं स्वतंत्र, अनियंत्रित संचार करणारी राजसत्ता या पृथ्वीतलावर सांपडणेंच दुर्मिळ आहे. त्या राजसत्तेला अंतर्गत कारभारावर ज्याप्रमाणें लोकांच्या इच्छाशक्तीचें बंधन असतें, त्याचप्रमाणें त्या सत्तेच्या बहिर्गत हालचालींवर मानवी हिताच्या दृष्टीनें आंतरराष्ट्रीय बंधनें पूर्वींपासून थोडीं बहुत मान्य करण्यांत आलीं आहेत आणि दिवसेंदिवस तीं बंधनें अधिकाधिक मान्य केलीं जात आहेत. कारण आमच्या जीविताच्या आणि संपत्तीच्या संरक्षणार्थ आपल्या अंगच्या सामर्थ्यावरच एकमेव अवलंबून राहण्यापेक्षां सामुदायिक सामर्थ्य कमावणें अधिक बरें, अशी विचारसरणी दिवसेंदिवस बळावत आहे, यांत शंका नाहीं.

## युद्धाचें ध्येय

मि. एच्. जी. वेल्स यांचें एक तऱ्हेवाईक म्हणणें आहे, कीं संहाराचीं शस्त्रास्त्रें ज्या प्रमाणांत वाढत आहेत, त्याच प्रमाणांत त्यांपासून संरक्षण करणारे मार्गहि उपलब्ध होत आहेत; म्हणून मानवजातीनें आपल्या भवितव्याविषयीं फारसें सचिंत राहण्याचें कारण नाहीं. पण हल्लींच्या युद्धसाधनांचें थोडेसें परीक्षण केलें तर या म्हणण्याचा फोलपणा ध्यानीं येईल. हल्लींचीं आयुधें संहारांत इतकीं भयंकर आहेत कीं त्यांची कल्पनाहि करितां येत नाहीं. एवढेंच नव्हे, तर मानवी संहाराबरोबर दुसऱ्याचे प्रांत विध्वंस करण्याचें शास्त्र तर पुढें गेलें आहे. दुसरा प्रांत निव्वळ जिंकणें एवढेंच ध्येय हल्लींच्या युद्धांचें नाहीं, तर दुसऱ्याचा प्रांत उध्वस्त करणें, बेचिराख करणें, हेंच त्यांचें युद्धनीतींतील मुख्य सूत्र आहे. या दृष्टीनेंच अधिभौतिक शास्त्र नवीन आसुरी आणि संहारी शस्त्रास्त्रांची भर या जगांत करीत आहे. म्हणून एका ग्रंथकारानें हल्लींच्या युद्धांना 'निरुपद्रवी लोकांची अमानुष कत्तल' अशी संज्ञा दिली आणि ती सार्थहि आहे. महायुद्धाला हा प्रतिशब्द बराचसा अवजड आहे हें खरें, पण तो अगदीं सार्थ आहे. आणि तो चांगल्या लोकांच्या संभावित भाषेंतून 'महायुद्ध' या फसव्या शब्दाची हकालपट्टी एक दिवस करीलच करील.

यावरून एक गोष्ट चांगली आठवते. गेल्या महायुद्धांत इंग्लिश लोक जर्मन लोकांना सर्व प्रकारचीं दूषणें देतच आणि म्हणत—'जर्मन लोक सदगृहस्था-प्रमाणें संभावित मार्गानें लढाई देतील अशी आमची कल्पना होती, पण व्यर्थ !' याला एका विनोदी ग्रंथकारानें खासें उत्तर दिलें आहे—'एखाद्या सद्गृहस्थाच्या छातींत संभावित मार्गानें कसा खंजीर मारायचा हें, महा-राज, सांगाल काय?'

एकंदरींत हल्लींच्या राजकारणांतील अंतस्थ धोरणें अत्यंत गढूळ झालेलीं आहेत. राजकारणांत कोणतीच गोष्ट दुष्ट आणि वाईट नाहीं. या जगाच्या रस्सीखेंचींत प्रत्येक गोष्टीचा न्यायअन्याय अखेर शक्तीच्या सामन्यानें ठरत असतो. आणि विजय हा त्यांमधील अंतिम हेतु. अतएव त्याप्रीत्यर्थ कोठलाहि योजलेला मार्ग क्षम्यच ठरतो, अशा विचारसरणीस जोराची चालना मिळालेली आहे. पण ती अत्यंत चुकीची आणि हानि-कारक आहे. कारण विजय मिळविणें हें अंतिम ध्येय मानणें चूक आहे. मानवी हित हेंच प्रत्येक गोष्टींत अंतिम ध्येय मानलें पाहिजे—मानवी हित कुजवून किंवा नासवून विजय संपादन होत असेल तर पराजयच परवडला, अशी मनोरचना त्या जागीं आली पाहिजे. कारण युद्धामुळें न्यायअन्याय ठरत नाहीं किंवा कोण चूक आणि कोण बरोबर हेंहि ठरत नाहीं! युद्धामुळें कोण अधिक सामर्थ्यवान याचा मात्र निर्णय लागतो. तरवारींचा धाक दाखवून दुसऱ्याची मुस्कटदाबी कांहीं काल करतां येईल हें खरें, पण न्यायान्यायाचा निर्णय करण्याचें युद्ध हें अत्यंत निर्दय आणि अमानुष शस्त्र आहे हें केव्हांहि विसरतां कामा नये. थोडक्यांत म्हणजे, युद्ध ही एक सूड उगवण्याची कला आहे; फक्त त्यावर पावित्र्याचें शिक्कामोर्तब आपण केलें आहे आणि म्हणूनच आपण त्याचें समर्थन नेहमीं करीत आहोंत. याशिवाय त्यास दुसरें कोणतेंच कारण नाहीं.+

---

+ War is nothing but a law of retaliation clothed in with holy sanction.

———

# मृत्यूच्या दलालांचा देशभक्तीचा लिलांव

शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांना मृत्यूच्या साधनसामुग्रीचे कारखाने असें म्हणणें अधिक संयुक्तिक होईल. या कारखान्यांचे मालक उर्फ मृत्यूचे दलाल या साधनांचा जगड्व्याळ व्यापार करीत असतात. तिरकामठ्यापासून माणसानें विषारी वायूपर्यंत मजल मारली. पोलादाचा उपयोग तलवारीपासून ते तहत् अजस्त्र तोफा आणि जहाजें एथपर्यंत होऊं लागला.

युरोपची सारी मदार ऊर्फ शक्ति मृत्यूवर आधारलेली आहे. अगदीं थोडक्या वेळांत सहस्रावधी लोकांचा निःपात करणेची साधनें ज्यांचेजवळ, तेच खरे स्वतंत्र म्हणून जगण्यास लायख. युरोपांतील प्रत्येक राष्ट्र आपलें शक्तिसर्वस्व या साधनसामुग्रींत घालून काय मिळवित आहे ?–तर मानवी संहार, बेचिराख प्रदेश आणि संस्कृतीचें वाटोळें. लोक बुद्धिवान आहेत खरे, पण सारी बुद्धी उलटी लागलेली. आपल्याच जातिबांधवांना चुटकी-सारखें, अचुक आणि हजारोंनीं मृत्यूच्या द्वारीं धाडतां येईल कसें या संशोधनांतच त्यांनीं आपली बुद्धि, पैसा आणि श्रम खर्चले आहेत. ह्याच गोष्टी जर त्यांनीं मानवी जीवन सुखमय आणि सौंदर्यपूर्ण करण्यांत खर्च केल्या तर–जगाचें नंदनवन नाहीं का व्हावयाचें ? पण मनुष्याच्या मनांत एवढी अजब क्रांती होणें शक्य आहे काय ?

पैशांच्या लालसेनें हे मृत्यूचे दलाल देशभक्तीचाहि लिलांव प्रसंगीं पुकारतात; व शत्रुपक्षालाहि ही साधनसामुग्री पुरवितात. दलाली करून कोट्यावधी रुपये कमावणें एवढेंच त्यांचें ध्येय ! दुसऱ्या राष्ट्रांचे शास्त्रीय शोध लांचलुचपतीनें पळविणें, युद्धाचें वातावरण निर्माण करून सर्व राष्ट्रांना दारूगोळा वाढविण्यास भाग पाडणें, या यांच्या नित्यशःच्या कारवाया. निःशस्त्रीकरण परिषद् भरली तेव्हां यांचे पोटांत धस्स झालें; व

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
०८४३
निबंध-८३८

त्यांनीं ती परिषद अयशस्वी व्हावी म्हणून अविरत प्रयत्न केले. वृत्तपत्रांना पैसे चारून राष्ट्राराष्ट्रांत वैमनस्यें वाढवितात व प्रसंगविशेषीं युद्धें व्हावींत म्हणून परमेश्वराची प्रार्थना करितात. एरव्हीं यांची पोळी कशी पिकावी ? थोडक्यांत मृत्यूवर आपलें वैभव साजरें करणारीं हीं गिधाडें होत हें म्हणणेंच बरें. १९१४ पूर्वी असें म्हणत कीं युरोपचें राजकारण व भवितव्य व्हिकर्स, क्रूप आणि स्त्रीडर या तीन शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांच्या हातीं आहे आणि तें अक्षरश खरें झालें.

## व्हिकर्स

एकोणिसाव्या शतकांत जर्मनीच्या क्रूप कारखान्यांत व्हिकर्स ही अजब विद्या शिकला व त्यानें इंग्लंडांत येऊन बस्तान ठोकलें. रेल्वेचीं चाकें घडवितां घडवितां बंदुकीच्या नळ्या वगैरेहि तो करूं लागला. लहानाचा मोठा कारखाना झाला व जगभर त्याचा व्यापार चालू झाला. बोअर युद्धांत स्वदेशाविरुद्ध यांनीं बोअर लोकांना दारूगोळा पुरविला. या कारखान्याच्या बोर्डावर अनेक लष्करी अधिकारी, राष्ट्राचे पुढारी एवढेंच नव्हे धर्मगुरुहि होते. या सर्व मंडळींनीं युद्धाची भुमका उठवून सरकारला आरमार वाढविणें भाग पाडलें. १९१४ च्या महायुद्धापूर्वीं जर्मन आरमार अत्यंत बलिष्ठ आहे, इंग्लंडचें साम्राज्य व वैभव रसातळाला जाणार असा प्रचार त्यांनींच सुरूं केला.

महायुद्धापूर्वीं कानडाचा प्रधान इंग्लंडला आला त्याप्रसंगीं व्हिकर्स कंपनीनें त्याचें यथोचित स्वागत केलें; पण शेवटीं रडगाणें ऐकविलें. "अहो, गेल्या अनेक वर्षांत युद्ध नाहीं, आम्ही काय पोटांत कांटे भरावेत ! युद्धाच्या अभावीं साम्राज्य लयाला जाणार. सर्वांत खेदाची गोष्ट कीं युद्धाचा संभवहि कोठें दिसेना ! आम्ही आतां करावें तरी काय ?"

१९१० सालीं जपानी आरमारमंत्री फुजी यास पैशांचा मलिदा चारून, मोठाल्या मागण्या मिळविल्या. युद्धोत्तर कालांत यांचा शस्त्रास्त्रांचा व्यापार साहजिकच मंदावला म्हणून ते आगगाडीचे डबे, विजेचीं इंजिनें इ. करण्याच्या मार्गास लागले. पण मूळ स्वभाव कोठें जाईल ? पोलंडमध्यें कारखान्याची शाखा उघडली, बाल्टिक समुद्रांत गोद्या बांधल्या, स्पेन-

मधील खाणी खरेदी केल्या इ. गोष्टी त्यांनीं करून आपलें आसन स्थिर केलें. त्यांत विमानांचें युग आलें. त्यांचींहि कंत्राटें पुरीं करण्याचें काम हल्लीं हीच कंपनी लाटीत असते. आर्म्स व्हॅली नामक दुसऱ्या एका प्रचंड कारखान्यानें निरनिराळ्या चौदा राष्ट्रांना एकाच वेळीं शस्त्रास्त्रें पुरवून जगावर मोठेच उपकार करून ठेविले आहेत. त्यापैकीं दोन राष्ट्रांत (ग्रीस आणि तुर्कस्थान) तर प्रत्यक्ष लढाई त्यावेळीं चालू होती. चीन–जपान व रूसो–जपानी युद्धांत या कारखान्यांनीं अशीच चंगळ केली. जगांतील लहानमोठ्या सर्व देशांत यांच्या शाखा जारीनें काम करीत असलेल्या दिसतील. जगभर नीटनेटका व्यापार थाटून बसलेली कंपनी युद्धाची मार्गप्रतिक्षा करीत बसली असल्यास कांहींच आश्चर्य नाहीं.

## क्रूप

जर्मनीच्या कैसर बादशहापेक्षांहि क्रूपचा धाक लोकांना एकवेळ भेडसावित होता. चार पिढ्यांची तपश्चर्या खर्ची घालून मानवी संस्कृतिवरचीं शस्त्रास्त्रें यांनीं शोधून काढलीं; शास्त्रीय ज्ञानाची परिसीमा गांठली. एकोणिसाव्या शतकांत लोहाराच्या दुकानापासून प्रारंभ करून, हल्लींचें हें जगड्व्याळ स्वरूप त्यांनीं प्राप्त करून घेतलें आहे. यावरून त्यांच्या कर्तबगारीची कल्पना करावी. उत्तम प्रकारचें टिकाऊ व कणखर पोलाद प्रथम शोधून काढून, त्यांनीं १८४२मध्यें त्याची तोफ बनविली पण त्याला गिऱ्हाईक मिळेना. अनेक प्रदर्शनांत ती ठेवूं लागले. लंडन प्रदर्शनांत तिला सर्वश्रेष्ठ बक्षिस मिळालें. यानंतर मात्र त्यांचें दैव उघडलें. इजिप्तच्या कंत्राटानंतर, फ्रेंचांची मोठी मागणी आली. एकदां प्रशियाच्या राजपुत्रानें यांच्या कारखान्यास भेट दिली. त्यांनीं बनविलेल्या प्रचंड हातोड्यावर तो बेहद्द खूष झाला व यामुळें त्याला स्वदेशांत सरकारी मान्यता मिळाली. तेथपासून त्यांच्या भरभराटीस प्रारंभ झाला. क्रूपचा कारखाना म्हणजे जगाचें केंद्र बनला. तरी पण स्वदेशांत सरकारी आश्रय मिळेना, म्हणून त्यांना आपल्या मालाचा उठाव बाहेरच करावा लागला. १८७० सालीं फ्रान्स व प्रशिया यांच्या युद्धांत क्रूपच्या तोफांचा प्रताप खरा दिसला. किंबहुना युद्ध क्रूपनेंच जिंकलें असें जग बोलूं लागलें. कारण जर्मनीनें त्या

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

तोफांच्या जोरावरच फ्रेंचांचा नक्षा उतरला. या परिक्षेंत यश लाभल्यामुळें मात्र जर्मनी म्हणजे क्रूप व क्रूप म्हणजे जर्मनी अशी अवस्था प्राप्त झाली. १८९० पासून त्यानें आरमारकडे लक्ष पुरवून, उत्कृष्ट चिलखती पत्रा कमावला कीं ज्याचा लौकिक जगभर झाला. सर्व जगांतील राष्ट्रें आपापल्या जहाजांना हाच पत्रा वापरूं लागलीं. १९०३ सालापासून या कारखान्यांत पाणबुड्याहि तयार होऊं लागल्या व त्याप्रीत्यर्थ जर्मन सरकारनें तीस लाखांची देणगी कारखान्यास दिली.

तरी पण आपला व परका असा भेदभाव न पाळण्याचें विश्वबंधुत्वाचें धोरण यांनीं सोडलें नाहीं. आपल्या कट्टर शत्रूचा म्हणजे फ्रान्सचा स्नेही रशियास यांनीं सर्वथैव मदत केली. बाल्टिक समुद्रांत आरमार बांधून दिलें, दारूगोळ्याचे कारखाने काढून दिले व त्यांचा लष्करी दर्जा वाढविला. जर्मन लष्करांतील अधिकाऱ्यांना वर्षासनें तर दिलींच, पण स्वतःच्या मालकीचीं तीन वर्तमानपत्रेंहि त्यांनीं केलीं. विषारी वायू बनविण्यांत जसा यांचा लौकिक आहे तसाच विमानें बांधविण्यांतहि हातखंडा म्हणून प्रसिद्धी आहे. हिटलरच्या उदयानंतर पुन्हां एकवार या कारखान्यास भाग्याचे दिवस लाभले. कारण व्हर्सायच्या तहाचें सुतक एकदां कायमचें संपलें.

## स्त्रीडर

फ्रान्समधील स्त्रीडर कंपनीचा इतिहासहि असाच मनोरंजक आहे. नेपोलियनच्या राज्यक्रांतीनंतर यानें आपलें डोकें वर काढलें. फ्रान्स–जर्मनी युद्धांत ( १८७० ) जरी फ्रान्सनें मार खाल्ला, तरी पण या कारखान्याच्या कपाळावरील भाग्याच्या रेषा चांगल्याच उमटल्या. कारण त्यामध्यें पुष्कळच पैका त्यानें कमावला.

गेल्या महायुद्धापूर्वींपर्यंत युरोपच्या राजकारणांत क्रूप आणि स्त्रीडर यांच्या चुरशीच्या चढाओढीनें अनेक विलक्षण घडामोडी घडवून आणल्या आहेत. स्वतःच्या पोटाची खळगी भरण्यासाठीं यांनीं नानातऱ्हेचे उपद्व्याप केले, एकमेकाविरुद्ध खोट्यानाट्या बातम्या पिकवून आपला स्वार्थ साधला. १९०२ सालीं ब्राझील सरकारला कांहीं तोफा घ्यावयाच्या

होत्या म्हणून त्यांनीं या दोघांची परीक्षा घेण्याचें योजिलें. क्रूपला आपला माल खपवावयाचा होता. परीक्षेच्या दिवशीं स्त्रीडरच्या कारखान्यास आग लागून सारे नमुने अग्निसात् झाले. हें कारस्थान जर्मनीनेंच केलें असा आरोप स्त्रीडरनें केला. क्रूपनें चोराच्या उलटया बोंबा या न्यायानें, स्त्रीडरनेंच आपल्या मालाची अब्रू बचावण्यासाठीं स्वतःच्या कारखान्यास स्वतःच आग लावली असें उठविलें. पुढील वर्षी पुनः स्त्रीडर ब्राझीलकडे खटपट करूं लागला, तेव्हां क्रूपनें ब्राझीलचा शत्रू—पेरूस स्त्रीडर शस्त्रास्त्रें पुरवितो अशी गप्प उठवून, त्यांचें कंत्राट आपणच पुनः लाटलें. चिली देशाच्या कंत्राटाबाबतहि स्त्रीडर असाच फसला गेला. पण यानंतर महायुद्ध पेटल्यानें, यांची चांगलीच चंगळ उडाली. रशियाच्या राज्यक्रांतींतहि झारशाहीस शस्त्रास्त्रांची मदत कर्जाच्या रूपानें पुरवून आपला हात ओला करून घेतला. युरोपमधील क्रूपच्या कारखान्याच्या वचस्वास खालीं ओढण्यासाठीं नानातऱ्हेच्या क्लृप्त्या यांनी योजिल्या.

फ्रान्सचा लौकिक शस्त्रास्त्र—वाढींत फारच चांगला आहे. जगांत त्यांचा नंबर दुसरा लागतो. खुद्द फ्रान्सची लष्करी तयारी स्त्रीडरनें मजबूत केलीच. पण पोलंडलाहि सशस्त्र व सामर्थ्यवान बनविलें. फ्रान्सची सारी भिस्त याच कारखान्यावर आहे. फ्रान्सच्या सरहद्दीवरील जमिनींतील किल्ल्यांची तटबंदी यांनीं मूर्तस्वरूपांत आणली. खुद्द पॅरीसवर बॉंबवर्षाव झाला तर नागरिकांनीं तळघरांतून वास्तव्य करून जीव रक्षण करावा हीहि योजना यांनींच यशस्वी करून दाखविली. पण या साऱ्या उलाढालींत अगणित पैसा स्त्रीडरला मिळत आहे, ही गोष्ट मात्र निर्विवाद.

सरकारी वशिल्यांचे डायरेक्टरच्या करवीं दरबारी संबंध राखणें, बँका हातीं ठेवणें, वृत्तपत्रें संभाळणें, लांचेचा मलिदा सर्रास देणें, युद्धाचा आभास उत्पन्न करणें, दुसऱ्या शस्त्रास्त्रांच्या कंपन्या गारद करणें या यांच्या नित्यशः चाललेल्या गोष्टी! प्रसंगविशेषीं शत्रुपक्षालाहि आपलीं गुप्त रहस्यें व शस्त्रास्त्रें पुरविणें हा यांचा हातचा मळ! गेल्या महायुद्धांत यांनीं जगांतील तीन कोटी लोकांचा पुरा निःपात केला व तितक्याच

लोकांना अंध, पंगू इत्यादि करून दुःखांच्या खाईत लोटलें. विविध महासुरी मारक-यंत्रें जगाला पुरवून भूभार हलका करण्याचें पवित्र कार्य केलें; निरनिराळ्या साठ तऱ्हेचीं रासायनिक द्रव्यें शोधून चुटकीसरशीं मनुष्य-संहार करण्याची आश्चर्यजनक कल्पना सत्यसृष्टींत आणली. वापरलेल्य बंदुका, तोफांचाहि सवलतीच्या दरानें सौदा करून, अफगाणिस्थान, इराण, चीन इ. मागासलेल्या राष्ट्रांना त्यांचा पुरवठा करून सुसंस्कृत (!) बनविलें.

शस्त्रास्त्रांच्या निर्गतीचा व्यापार केवढा मोठा असतो याची थोडीशी कल्पना देण्यासाठीं कांहीं थोडे आंकडे देतो आणि तेहि आर्थिक हलाखींत जग गटंगळ्या खात असलेल्या म्हणजे १९३१ सालचे! या सालीं इंग्लंड, फ्रान्स, झेकोस्लोव्हाकिया व अमेरिका इ. राष्ट्रांनीं साठ कोटी रुपयांची युद्ध-सामुग्री निर्गत केली. त्यांत फ्रान्स १८ कोटी, इंग्लंड १२ कोटी, झेकोस्लो-व्हाकिया ९ कोटी व अमेरिका ४॥ कोटी व बाकी जर्मनी व इटली वगैरे. १९३१ सालचा साऱ्या राष्ट्रांचा युद्धविषयक खर्च शंभर कोटी पौंडांवर होता. आपल्याच संहाराकरितां आपण स्वतः किती प्रचंड खर्च करून, पाण्यासारखा पैसा व्यर्थ वांया घालवित आहोंत याचे हे आंकडे-शास्त्रानें उत्तर झालें. प्रत्यक्ष शस्त्रास्त्रांची भयंकर व भेसूर स्वरूपें माणसाच्या अंगावर रोमांच उभे करणारीं आहेत, हें काय सांगावयास हवें ?

### उपद्व्यापी बाळांच्या लीला.

मि. बिव्हर्ले निकोल्स या सुप्रसिद्ध ग्रंथकारानें "Cry Havoc" या ग्रंथांत अशा कारखान्यासंबंधीं बरीच उद्बोधक माहिती दिली आहे, त्यांतील ठळक गोष्टी थोडक्यांत देतों. ही कारखान्यांचीं बाळें देशांत काय काय उपद्व्याप करितात याचीं चार सूत्रें त्यानें सांगितलीं आहेत तीं अशीः—

१ शस्त्रास्त्रांचे कारखाने महायुद्धाची वृथा भीति निर्माण करितात.

२ सरकारी अधिकाऱ्यांना लांचलुचपत चारून गप्प बसवितात.

३ परदेशांतील प्रचंड लष्करी हालचाली आणि सैन्य, आरमार वगैरेविषयीं खोट्यानाट्या बातम्या पिकवून, स्वतःच्या सरकारला शस्त्र-संभार वाढविण्यास भाग पाडतात.

४ वर्तमानपत्रांच्या द्वारें लोकमतहि. युद्धास अनुकूल ठेवण्याचा प्रयत्न करितात.

वरील प्रत्येक सूत्राच्या समर्थनार्थ ग्रंथकारानें भरपूर पुरावा उद्धृत करून, हे शस्त्रास्त्रांचे कारखानेच युद्धांना जबाबदार आहेत असा तर्कशुद्ध निष्कर्ष काढला आहे. या कारखान्यांना " The Bloody International Death Ltd. " असें संबोधून, प्रत्यक्ष यमदरबारचे हे दलाल मृत्यूचा व्यापार करितात असें म्हटलें आहे. कारण हे कारखाने खासगी भांडवलदारांच्या मालकीचे असल्यानें अधिक व्यापार करून नफा लुटावा या तत्त्वानेंच व्यापार करितात. अर्थात् पुष्कळ लोकांचा संहार म्हणजेच पुष्कळ नफा, अनेक लोकांची कत्तल म्हणजेच फायद्याची लयलूट ( More deaths-more devidends. More blood-more bounses ) या शुद्ध (!) हेतूनें शस्त्रास्त्रांचा धंदा करितात. आणि अशा या खासगी अवाढव्य कारखान्यांना मृत्यूच्या साधनांची प्रचंड उलाढाल करण्यास सरकार पूर्ण मुभा देतें. याचें कारण ते अत्यंत डोईजड झालेले आहेत. प्रचंड भांडवलाचा गड्डा म्हणून तर महत्व आहेच; पण त्याहिपेक्षां स्वतःच्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याची गुरुकिल्ली यांच्या हातीं असते. गांवांत एखादी सांथ जोरांत उपस्थित झाली म्हणजे ज्याप्रमाणें डॉक्टर लोकांची पोळी पिकते त्याप्रमाणें लढाया जुंपल्या, पुष्कळ लोक मृत्युमुखीं पडूं लागले, लाखों लोक पंगू होऊं लागले किंवा प्रचंड संहार सुरू झाला म्हणजे या कारखानदारांना चांगलेंच फावतें; आणि तशा संधीची ते नेहमीं टपून वाट पहात असतात. त्यांना आपपरभाव तो कसलाच माहीत असत नाहीं. बाकी आपलीं शस्त्रास्त्रें कोणाविरुद्ध कशीं उपयोगांत आणण्यांत येणार आहेत याचा विचार या व्यापाऱ्यांनीं कां करावा म्हणा ! काड्याची पेटी विकणारा व्यापारी गिऱ्हाईकाच्या हेतूची चिकित्सा कधीं करतो का ? त्याच काड्याच्या पेटीनें दुसऱ्याच्या घरांना गिऱ्हाईकानें आग लावली तर त्यांत व्यापाऱ्याचा काय दोष ? पण काड्याची पेटी विकणें आणि शस्त्रास्त्रें विकणें सारखेंच काय असा प्रश्न त्यावर टाकला तर काय उत्तर देणार ?

फ्रान्समधील राजकारणाचीं सूत्रें अक्षरशः कॉमटे डे फॉर्जेस् (Compte-des-Forges) या कारखान्याकडून हालविलीं जातात. या लोखंडी कारखान्याचें दुष्ट वर्चस्व देशाला विषवत् आहे. कारण तें अनिष्ट तर आहेच पण शिवाय गुपचुपीचें असल्यानें भयानक आहे. फार काय, फ्रान्समधील बहुतेक सर्व वर्तमानपत्रेंसुद्धां याच्या हातांतील बाहुलींच असून, स्वतः-विरुद्ध होणारी टीका ते दडपून टाकतात.

गेल्या महायुद्धांत या कारखान्यानें केलेल्या एका गुप्त कटाचा सुगावा फ्रेंच मुत्सद्यांना नुकताच लागला आहे. फ्रेंच डेप्युटी मि. बार्थे यानें या कारखान्यावर जाहीर रीत्या आरोप केल्याचें मँचेस्टर गार्डियन पत्रांत प्रसिद्ध झालें आहे. त्याचा इत्यर्थ असा, कीं या कारखान्यानें १९१४ मध्यें जर्मनींतील ब्राये व्हॅली नामक शस्त्रास्त्रांच्या कारखान्यास कच्चा माल पुरविला, आणि आपलें फायदेशीर गिऱ्हाईक बुडूं नये म्हणून स्वार्थी बुद्धीनें या (जर्मनींतील) कारखान्यावर बॉंबचा हल्ला करूं नये अशी सक्त ताकीद फ्रेंच विमानांना व लष्कराला सेनापतीकडून देवविली. पुढें या प्रकरणाच्या चौकशीस प्रारंभ होणार असें दिसतांच न्यायमंदिरांत लांचलुचपतीची खिरापत वाटून ही चौकशीची टूम कायमची निकालांत काढविली. अशा रीतीनें कोठल्याहि हल्ल्यापासून निर्भय झालेल्या कारखान्यानें जर्मन लष्करास अति भयंकर शस्त्रास्त्रें पुरवून, फ्रेंच आणि इंग्लिश सैनिकांचा धुव्वा उडविला. १९१५ मध्येंच जर का या कारखान्याचा बॉंबनें विध्वंस झाला असता, तर लष्करी तज्ञांच्या मतें, जर्मनीस शत्रुपक्षास शरण गेल्यावांचून गत्यंतरच नव्हतें.

या एकाच उदाहरणावरून या उपद्व्यापी बाळांच्या लीलांची कल्पना येईल. आणखी एक उदाहरण ग्रंथकारानें उद्धृत केलें आहे तें असें:—सर्वसामान्य रीत्या आंतरराष्ट्रीय देणें घेणें सुवर्णाच्या स्वरूपांत त्या त्या देशांतील मध्यवर्ति पेढ्यांमार्फतच व्हावें लागतें. पण दोन राष्ट्रांनीं ही देवाण घेवाण मालाच्या स्वरूपांत मध्यवर्ति पेढ्यांच्या दखलगिरीशिवाय केली. अर्थात् ही देवघेव दुसरी कसलीहि नसून मृत्यूच्या साधनांची होय, हें काय निराळें सांगावयास पाहिजे?

शस्त्रास्त्रें जुनीं पुराणीं होऊन निकामी होऊं नयेत म्हणून, कोणत्याहि देशांतील सरकार शस्त्रास्त्रांच्या बाबतींत मागासलेले राहूं नये म्हणून, विमानें, तोफा इ. निकामी राहून गंजू नयेत म्हणून इ. अनेक स्तुत्य हेतूनें (!) प्रेरित होऊन, प्रत्येक सरकारला आपापल्या शस्त्रास्त्रांचीं कोठारें सुसज्ज ठेवण्याचा शहाणपणाचा मार्ग दाखवितात; आणि म्हणूनच प्रचंड प्रमाणावर शस्त्रास्त्रांची पैदास चालू ठेवतात. आणि ज्यावेळीं आपल्या देशास त्याची फारशी आवश्यकता नसते, त्यावेळीं म्हणजेच त्यांच्या दृष्टीनें शांततेच्या वेळीं या शस्त्रास्त्रांच्या प्रचंड निर्गतीचा धंदा करून जीव रक्षण करितात. ही गोष्ट झाली शस्त्रास्त्रांच्यासंबंधी. त्यापासून निवारण करणाऱ्या संरक्षक साधनांकडे आतां थोडेसें वळूं.

## विषारी वायूंचा प्रताप

आगामी महायुद्ध म्हणजे रासायनिक पदार्थांची लढत होऊन, त्यामध्यें माणसांचे मुडदे मात्र निष्कारण पडणार असा रंग दिसूं लागला आहे. गेल्या महायुद्धांत ही नवीन संहारक कल्पना जर्मनीच्या अजब मेंदूतून निघून कसा हाहाःकार उडाला हें सर्वश्रुतच आहे. पण तेथपासून या नवीन शास्त्रांत शास्त्रज्ञांनीं केलेली संशोधनात्मक कामगिरी अपूर्व आहे. संशोधकांच्या डोक्यांतून ही मृत्यूच्या भयंकर साधनाची कल्पना निघाली म्हणून त्यांचें कौतुक करावें का हा नवीन भेसूर मृत्यु मनुष्याच्या नशिबीं आणला म्हणून त्यांचा निषेध करावा हेंच कळेनासें झालें आहे. पुढील महायुद्धांत उपयोगांत येणाऱ्या विषारी वायूपासून आपला बचाव कसा करून घ्यावा हाच प्रश्न सध्यां सर्व नागरिकांना बेचैन करीत आहे. आणि विषारी वायू–प्रतिबंधक मुखवस्त्यानीं आपला निभाव लागेल अशा भोळ्या समजुतीनें सर्व पछाडलेले आहेत. एवढेंच नव्हे तर शाळेंतील अजाणत्या लहान बालकांना या मुखवस्त्यांचें सांघिक शिक्षण देण्याचे प्रयोग त्यांनीं सर्रास सुरू केले आहेत. जगांत नव्यानेंच पाऊल टाकणाऱ्या बालकांच्या कोंवळ्या बुद्धीला काय हें भयंकर आणि भीषण शिक्षण !

उपलब्ध असलेल्या विषारी वायूचे चार प्रकार आहेत. त्यांतील पहिला म्हणजे श्वासोश्वासाच्या वाटें फुप्फुसांत जाऊन बिघाड कर-

णारे क्लोरिन व फॉस्जेन नांवाचे वायू. यावर शास्त्रज्ञांनीं तयार केलेले मुखवटे खास उपयोगी पडतात असा अनुभव आहे. दुसऱ्या प्रकारचे अश्रूत्पादक वायू पुष्कळच बरे आणि दयाळू म्हणावयाचे. साधारणपणें बेकायदेशीर मोठा जमाव मोडावयाचा झाला म्हणजे गोळीबार किंवा लाठीहल्ला न करितां, या नवीन वायूचा उपयोग सर्व सुधारलेल्या देशांत करितात. हाच वायू पुष्कळसा तिखट व विषारी केला म्हणजे साधारणपणें तात्पुरतें अंधत्व माणसास येतें, एकदोन दिवस चांगलाच त्रास होतो, आणि दोन दिवस डोळ्यांची सडकून आग होऊन रडून अश्रूधारा वाहावाव्या लागतात. असल्या रडक्या वायूचा युद्धांत उपयोग करणारा कनवाळु शत्रू वांटणीस येण्यास देवाला नवसच केला पाहिजें.

तिसरा प्रकार सोमलासारख्या भयंकर विषाच्या धुराचा; यास लेविसाईट वायू असें म्हणतात. अद्यापपावेतों या वायूचा प्रयोग लढाईतून कोणीहि करून पाहिलेला नाहीं; पण शास्त्रज्ञांच्या मतें अजून या वायूपासून हमखास बचाव करणारे मुखवटे उपलब्ध नाहींत एवढें मात्र खरें. जगद्विख्यात एडिसन याचे मतें या वायूचा थोडासा प्रचारसुद्धां मोठाल्या शहरांना गारद करील. लंडनसारख्या मोठ्या शहरांतील सर्व प्रजा, शत्रुपक्षानें मनांत आणलेंच तर या वायूच्या सहाय्यानें अवघ्या तीन तासांत गुदमरून टांचा घासूं लागेल. नाकातोंडांत पाणी गेल्यामुळें गुदमरून जीव ज्याप्रमाणें घाबरा होतो तीच अवस्था यानें होईल. डोक्यांत अशी कांहीं तिडीक व अस्वस्थता निर्माण होते कीं त्यांतून जिवंत राहणारे निम्मे लोक खास वेडेच होतील. कदाचित् पुढील महायुद्धांत मानवजातीला याहि भयंकर प्रसंगाच्या अनुभवांतून जावें लागेल आणि त्याची स्मृति नित्यशः त्यांना भेडसावील.

यानंतर चौथा प्रकार म्हणजे थोडासा मनुष्याला उदारपणें वागविणाऱ्या मस्टर्ड वायूचा. या वायूची थोडक्यांत कल्पनाच द्यावयाची झाली तर अशी देतां येईल. याच्या प्रवाही पदार्थाचे थोडेसे थेंब अंगावरील कपड्यावर सांडा, थोड्याच वेळांत त्यांचा प्रसार होऊन कापडाला भोकें पडून तुमची कातडी जळून मोठाले फोड उठल्याविना राहणार नाहींत.

सर्व अंगाची लाही उडून, त्राहि भगवान् करून सोडील असा याचा प्रताप आहे. या विषारी वायूचा शोध सर्व राष्ट्रांना अवगत असून, त्या वायूचे प्रचंड बॉम्बसहि प्रत्येक राष्ट्रानें तयार करून कोठारें सुसज्ज केलीं आहेत. गेल्या सर्व महायुद्धांत एकंदर ३८० टन वजनाचे बॉम्ब लंडनवर टाकले गेले, तेवढे बॉम्ब आतां अवघ्या बारा तासांत विमानांतून टाकतां येतील एवढी प्रगति झालेली आहे. प्रो. लँगेव्हिन यांचे मतें पॅरिसवर जर असल्या वायूचे एक टन वजनाचे बॉम्ब घेऊन एका वेळीं शंभर विमानें हल्ला करितील, तर सर्व पॅरिस शहर धुरांनीं व वायूनीं अदृश्य होईल. आणि ही सर्व अपूर्व कामगिरी अवघ्या एका तासाच्या अवधींत घडवून आणतां येईल. या विषारी वायूंच्या घनदाट धुक्यांतून मानवी संस्कृति सहीसलामत बाहेर पडेल काय ?

विमानांवर डागणाऱ्या तोफांविषयींहि अशीच भ्रमात्मक माहिती नेहमीं प्रसिद्ध होते. फार उंचीवरून जाणाऱ्या वेगवान विमानांना अचूक नेमानें पाडणें बरेचसें अवघड आहे हें उघडच आहे. पण दिवसा कांहींतरी करून मनुष्य आपला बचाव करील. पण रात्रीची वाट काय ? उदाहरणार्थ लंडन शहराचा अनुभव असा आलेला आहे, कीं रात्रीच्या वेळीं घिरट्या घालणाऱ्या २५० विमानापैकीं फक्त पांचपन्नासासच झग-झगीत प्रकाशाच्या झोतांनीं दिसूं शकलीं, कीं ज्यांच्यावर या तोफा डागतां आल्या. पण बाकीच्या विमानांच्या धुमाकुळींतून मानवजात जिवंत कशी राहणार, याचा कोणी कधीं विचार केला आहे काय ?

एकंदरींत बॉम्बच्या हल्ल्यापासून मोठ्या शहराचा बचाव होईल ही आशाच मुळीं फोल आहे. विषारी वायूला बेकायदेशीर ठरवून त्याची हकाल-पट्टी करण्याचा प्रयत्नहि पण असाच निरर्थक ठरला आहे. सर्व राष्ट्रांनीं शस्त्रसंन्यास परिषदेंत एकमुखानें विषारी वायूचा तिरस्कार केला, त्याचा उपयोग न करणेच्या शपथाहि वाहिल्या. पण स्पेन, ॲबिसिनिया आणि चीनमध्यें विषारी वायूचा सर्रास उपयोग आक्रमशील राष्ट्रांनीं केलाच कीं नाहीं ? राष्ट्रसंघानें नियंत्रण लादलें म्हणून त्या राष्ट्रांतील गरीब बिचारी जनता विषारी वायूनें प्राणांतिक वेदना सहन करून तडफडून मरावयाची थोडीच राहिली !

मुखवटे हें बचावाचें खात्रीलायक साधन म्हणून त्यांवर विसंबून रहातां येत नाहीं. मुखवटे चढविल्यावर खाणें, पिणें व बोलणें, हें तर सर्व बंदच पडतें. विषारी वायू सर्वत्र पसरला गेल्यावर याच्या मानसिक व्यथेनेंच मनुष्य अर्धामेला होतो. खुद्द कारखान्यांत प्रत्येक मुखवट्याची परीक्षा घेतात ते त्यावेळच्या करुणास्पद स्थितीवरूनच याची कल्पना येईल. एका लहानश्या खोलींत माणसास हा मुखवटा अडकवून नेतात व विषारी वायू सोडतात. त्यावेळीं तीं माणसें पगारी असली तरीं मोठ्या नाखुषीनें तें काम करितात. मेंढरांना कत्तलखान्याकडे नेतांना ज्याप्रमाणें अगोदरच तीं ब्यॉं ब्यॉं अशीं ओरडून जीव घाबरा करून घेतात, त्याचप्रमाणें विषारी वायूंत वावरावयाचें ही भेसूर कल्पनाच त्यांचें मन क्षुब्ध करिते. त्या खोलींतील थोड्या काळचाच अनुभव तर स्मृतिपटलावर कायमचाच कोरण्यासारखा असतो. सर्व जग फिरतें आहे आणि आपल्या डोक्यांतला मेंदूहि फिरतो आहे असा अनुभव मिळतो. त्या खोलींत कोठून तरी दूरच्या अंतरावरून थोडीफार हवा मिळून आपला जीव रक्षण होत आहे असें पदोपदीं वाटतें. खोलीच्या बाहेर पडल्यावर बाहेरच्या मोकळ्या हवेची खुमासदार लज्जत वर्णन करून सांगतां यावयाची नाहीं. पण बाहेर पडल्यावर त्या माणसाचा चेहरा मृत माणसाप्रमाणें पांढरा फटफटित, निस्तेज व डोळे खोल गेलेला असा भेसूर दिसतो. थोड्या काळचा वायूतील प्रवास माणसास ही प्रेताची कळा आणतो, तर तासन् तास अशा भयंकर वातावरणांत काढण्याचें मनुष्याचे कपाळीं पुढील युद्धांत लिहिलेलें आहे; तेव्हां मनुष्य काय करणार ?

ग्रंथ संग्रहालय

## राष्ट्रसंघानें हात जोडले

अशा प्रकारें संहारक विषारी वायूचे बॉम्ब आणि त्यापासून बचाव करणारे मुखवटे सर्व जगाला पुरविण्याचीं मोठालीं कंत्राटें शस्त्रास्त्रांचे कारखानदार उपटून पैसा लुटीत असतात. या कारखानदारांच्या हालचाली आणि पुरवठा यांची माहिती जाहीरपणें प्रसिद्ध व्हावी यासाठीं एक स्वतंत्र समिति नेमावी असा ठराव राष्ट्रसंघापुढें आला असतां प्रचंड बहुमतानें तो फेंटाळला गेला. त्याप्रसंगीं ब्रिटिश प्रतिनिधीनें काढलेले उद्गार मात्र

मोठे मननीय आहेत. ते म्हणाले "या शस्त्रास्त्रांच्या कारखानदारांना त्यांच्या उत्पादनाची माहिती देण्यास भाग पाडणें आम्हास शक्य नाहीं. एवढेंच नव्हे तर फारच थोडीं सरकार ही गोष्ट करण्याचें धार्ष्ट्य दाखवितील" ×

देशांतील सरकारचीहि सत्ता या कारखानदारांवर नसावी ना! म्हणजे या कारखान्यांचें केवढें मोठें वर्चस्व देशामध्यें असलें पाहिजे, याची कल्पना करावी हेंच बरें. तोफेंतून दारूचे आणि लोखंडाचे गोळे उडत नाहींत तर ते सोन्याच्या मोलाचे असतात. अशा सोन्याची शस्त्रसामुग्री उत्पादन करणाऱ्या कारखान्यांचें भांडवल केवढें प्रचंड असेल बरें!

वरील सर्व इतिहास पाहिला म्हणजे जग ज्वालामुखीच्या तोंडावर बसलें आहे असें दिसतें. यामुळें दुर्बल राष्ट्रें स्वतंत्र होण्याची आशा मात्र दुरावते. राष्ट्रांची सर्व शक्ति, बुद्धि आणि पैसा आपल्या स्वतःच्या संहाराकरितांच अनाठायी खर्च होत असल्याचें दृष्य दृष्टीस पडतें. पूर्वकालीन युद्धांत मनुष्यसंहार इतका होत नसे; पण यापुढील युद्ध फारच भीषण होणार. युद्धाची पार्श्वभूमि हे मृत्यूचे दलालच स्वतःचें पोट जाळण्याकरितां निर्माण करीत राहातात; आणि या मृत्यूच्या साधनांच्या किफायतशीर धंद्यावर, प्रसंगीं देशभक्तीचा लिलांव करून वाटेल तितकी संपत्ति मिळवून, गबर होतात.

---

× "We have no power to compel the manufactureres to give this information and very few Governments would have the courage to make them so."

# साम्राज्यशाहीचा नंगा नाच

## शस्त्रास्त्रें व युद्धप्रवृत्ति

जगांतील युद्धें थांबविणें अशक्य, ही विचारसरणी कशी चुकीची आहे हें आपण मागें पाहिलें. त्यासंबंधींची सनातनी वृत्ति कशी निराधार आणि चुकीची आहे हेंहि आपल्या निदर्शनास आलें आहे. लढाईच्या निरनिराळ्या कारणांचा आपण विचार केला, पण खऱ्या कारणाचा सुगावा मात्र त्यांत लागला नाहीं. लढाईमुळें असंख्य लोकांचा संहार होतो, व इतर माणसांना अतुल हालअपेष्टा आणि अनर्थांचा कहर सहन करावा लागतो. या हालअपेष्टांचा वारसा जर पुढील पिढीला देतां आला असता, तर या जगांत पुनरपि लढाई मुळीं झालीच नसती. मग या युद्धप्रवृत्तीचें बीज कोठेंतरी अज्ञात आहे असेंच नव्हे का? त्याशिवाय पुनःपुन्हा महायुद्धाच्या होमकुंडांत मानवजातीनें कां उडी घेतली असती?

मानवजातीच्या प्रगतीच्या कोणत्याहि कालांत मनुष्यानें हिंसात्मक वृत्ति सोडलेली दिसत नाहीं. कारण शुद्ध निसर्गांत वावरणाऱ्या रानटी अवस्थेंत लढाई होतीच होती; पण संस्कृतीनें आणि सुशिक्षणानें सुधारलेल्या राष्ट्रांतहि ती प्रवृत्ति कायम राहिलेली आहे. माणूस सुधारला, पण त्याचबरोबर युद्धनीति आणि युद्धकलाहि सुधारल्या. निव्वळ माणसांतील निर्दयतेचें प्रतीक म्हणजे युद्ध नव्हे. जगतांत प्रभुत्व गाजविण्यासाठीं मनुष्याची ही केव्हांहि अतृप्त रहाणारी राक्षसी तृष्णा, त्याच्याकडून असलीं आसुरी, अमानुष, रक्तांकित कृत्यें घडवून आणते. याचें रूपांतर म्हणजेच केव्हां केव्हां स्वतःचा सूड उगविण्यासाठींहि मनुष्य या साधनांचा अवलंब करतो. मग त्यास तो ‘धर्मयुद्ध’ असें धार्मिक आणि सोंवळें नांव देवो कीं आपली खरी अघोरी इच्छा प्रगट करो. पुष्कळदां ते सर्व जगाला तत्त्वज्ञान शिकवतील, कीं रणांगणावरील देवता शौर्य गाजविण्यास स्फूर्ति देतात वगैरे. पण त्या देवतांची प्रेरणा झाली म्हणून एकानें दुसऱ्याच्या प्राणावर

उठावें हें कसें समर्थनीय ठरणार ? चोरसुद्धां चोरी करण्याच्या स्वारीवर निघण्यापूर्वी आपापल्या इष्टदेवतांचें स्मरण करतात, प्रार्थना करतात; म्हणून त्यांचें कृत्य धार्मिक आणि सुष्ट ठरतें काय ?

देशाच्या तिजोरींतील पैशाच्या बऱ्याच मोठ्या भागावर डल्ला मारणारें शस्त्रास्त्रांचें खातें आहे आणि त्यांत प्रतिवर्षी अधिभौतिक शास्त्र नवनवीन संहारक शस्त्रास्त्रांची भर घालीत आहे. 'आतां या अधिभौतिक शास्त्रांची प्रगति थांबीव' अशी प्रार्थना करण्याची पाळी मनुष्यजातीला आली आहे. कारण उपलब्ध शस्त्रास्त्रें मानवजातीच्या संपूर्ण नाशास खात्रीनें पुरेशीं आहेत.

अशी जरी परिस्थिति आहे, तथापि प्रत्येक राष्ट्र शस्त्रसंभार वाढवीत आहे; लष्कर, आरमार, वैमानिक दल इत्यादींची प्रतिदिन वाढ करून परचक्राचें निवारण करण्यासाठीं तटबंदी करीत आहे. सर्व राष्ट्रें तोंडानें शांतिपाठ म्हणत आहेत आणि आम्ही स्वसंरक्षणासाठीं तटबंदी करीत आहोंत असा आविर्भावहि करीत असतात. पण स्वसंरक्षणाचीं हत्यारें दुसऱ्यावर चढाई करण्याच्या कामीं उपयोगीं पडण्यास एक क्षणाचाहि विलंब लागत नाहीं ही गोष्ट आपणांस चांगलीच अवगत आहे. शिवाय पुष्कळसा शस्त्रसंभार व लष्कर यांपासून राष्ट्रांमध्यें स्वसामर्थ्याची घमेंड उत्पन्न होते व ती घमेंड बेजबाबदार कृत्यें करण्यास राष्ट्रास प्रवृत्त करते. दारू पुष्कळशी प्याल्यानें कैफ येत नाहीं म्हणणें आणि पुष्कळसें लष्कर आणि शस्त्रास्त्रें ठेवून निशा येत नाहीं म्हणणें—दोन्हींही सारखींच अविश्वसनीय ! कारण, रस्त्यावरील शेंबडें पोरसुद्धां तालमीच्या आखाड्यांत चार दिवस जाऊं लागलें कीं रस्त्यावरून पैलवानी थाटानें चालणें, प्रसंगविशेषीं दुसऱ्यास कोंपरखळी देणें, या विद्या शिकतें; मग पुष्कळसें सामर्थ्य कमावलेल्या पैलवानाची कथा दूरच राहिली. शिवाय हें लष्कर जर बराच काल उपयोगांत आणलें नाहीं, तर त्याचे अनिष्ट परिणाम स्वतःच्या देशांतच होतात. कोंकणांत अशी म्हण आहे, कीं बाळगलेलें चेटूक बारा वर्षांनीं पाळणाऱ्याच्याच अंगावर उलटतें ! यासाठीं तरी निदान युद्धाच्या कुरापती मुद्दाम काढाव्या लागतात. आज

जपानमध्यें सर्व राज्ययंत्र लष्करी लोकांच्या ताब्यांत आहे, प्रधानमंडळसुद्धां त्यांच्या हातांतील खेळणेंच आहे आणि त्यांनीं चीनची खाजवून खरूज काढून युद्धास प्रारंभ केला आहे; या सर्वांचें रहस्य वर सांगितलेल्या गोष्टींतच आहे. शांतता निर्माण करण्याच्या मार्गांचा विचार करण्यापूर्वी युद्धाच्या खऱ्या कारणांचा थोडासा ऊहापोह करूं.

## सत्तेसाठीं स्पर्धा

युद्धाचे बुडाशीं आपणास दोन हेतू दिसून देतात. अधिक सत्तेची हांव हा मूळ हेतू आणि दुसरा त्याच्या अनुषंगिक म्हणजे निरनिराळ्या राजसत्तांमध्यें समतोलपणा राखणें हा होय. सर्व जगाचा इतिहास या दोन हेतूंभोंवतीं गिरक्या घेत असल्याचें आपणास आढळून येईल. प्रत्येक राष्ट्र हांवरेपणानें या जगांत अधिक प्रांत किंवा वसाहती उपटण्यासाठीं आणि आपलें वर्चस्व स्थापन करण्यासाठीं आपलें युद्धविषयक सामर्थ्य वाढवीत असल्याचें दृश्य आपणास दिसेल. जणूं कांहीं या राष्ट्रांमध्यें वर्चस्वासाठीं स्पर्धाच लागलेली आहे. पुष्कळशा वसाहती मिळवाव्या, लष्कर वाढवावें, शस्त्रास्त्रांचीं कोठारें तुडुंब भरून ठेवावीं याच महत्वाकांक्षेनें प्रत्येक राष्ट्राला पछाडलें आहे.

पण जीं राष्ट्रें अगोदरच वसाहती लाटून गलेलठ्ठ बनलीं आहेत, लष्कर आणि शस्त्रास्त्रें यांच्या जोरावर ज्यांनीं ऐश्वर्य आणि संपत्ति पुरेपूर मिळवून ठेविली आहे, तीं राष्ट्रें स्वतःच्या हितसंरक्षणार्थ म्हणजेच आपला गलेलठ्ठपणा निरंतर राखण्यास, डोळ्यांत तेल घालून रात्रंदिवस विवंचनेंत असल्याचें आपणास दिसेल. अर्थात् त्यांचें धोरण अधिक मिळविण्याचें नसून, मिळविलें आहे तें राखण्याचें आहे. यासाठींच इतर राष्ट्रांनीं आपापसांत नेहमीं भांडत राहावें म्हणजे आपण कमावलेल्या वसाहतींकडे चुकूनसुद्धां त्यांचा डोळा फिरकणार नाहीं या हेतूनें ही साम्राज्यवाही राष्ट्रें इतरांना एकमेकाविरुद्ध छूः घालण्याचा खेळ खेळतात. त्यापैकीं कोठल्याहि एका राष्ट्रानें इतरांपेक्षां बलिष्ठ होऊन आपल्याशीं टक्कर देण्यास प्रवृत्त होऊं नये हीच काय ती त्यांच्या गुरुविद्येची किल्ली! यालाच राष्ट्राराष्ट्रांमध्यें समबलत्व राखणें अशी संभावित संज्ञा आहे. फोडा आणि झोडा

या नीतीचा अवलंब करून निरनिराळ्या राष्ट्रांमध्यें वैमनस्याच्या कुरापती काढून, एकमेकांविरुद्ध युद्धास प्रवृत्त करणें हीच यांची राजनीति.

ब्रिटिशांच्या राजकारणांतील सद्‌गुरूची मेख म्हणजे ही विद्या ! युरोपमध्यें कोणत्याहि एका राष्ट्रानें दुसऱ्यापेक्षां बलवान् होऊं नये आणि त्यानें शांततेचा भंग करूं नये हा यांचा राजकारणांतील दंडक. खुद्द युरोपखंडांत इंग्लंडचे हितसंबंध प्रत्यक्ष गुंतलेले आहेत अशांतला भाग नाहीं. सातासमुद्रांत आपल्या हितसंबंधाचें जाळें त्यांनीं विणलेलें आहे हें खरें. पण ते हितसंबंध अबाधित राहण्यास आणि शांततेनें उपभोगण्यास युरोपखंडांत समबलत्व राखणें इंग्लंडला भाग आहे. अर्थात् युरोपखंड अनेक चिमुकल्या राष्ट्रांच्या तुकड्यांनीं विभागलेलें राहिलें आणि ते तुकडे एकमेकांविरुद्ध वैमनस्यांनीं धुमसत राहिलें तरच इंग्लंडच्या बाहेरील साम्राज्याचें स्थैर्य टिकणार. असा हा समबलत्व राखण्यासाठीं विस्तवाशीं खेळ इंग्लंड नेहमीं खेळत असतें. मात्र केव्हांकेव्हां त्यांत त्यांचेहि हात पोळतातच.

## साम्राज्यशाहीचा नंगा नाच

पण युद्धाचें खरें बीज आर्थिक क्षेत्रांत सांपडतें. प्रत्येक राष्ट्र संपत्तीच्या शोधांत नेहमींच निमग्न असतें. दुसऱ्याची सनदशीर लूट कशी करितां येईल याच विवंचनेंत तें रात्रंदिवस असतें. जोंवर ही लुटारू वृत्ति राष्ट्रांमध्यें कायम आहे तोंवर लढाया करणें हें राजशास्त्रांतील एक धोरण म्हणून अनिवार्यच आहे. प्रो. लास्कींच्या मतें या लढाईचीं बीजें चालू भांडवलशाहींतच आहेत.* पुष्कळ नफा मिळविणें हेंच भांडवलशाहीचें मुख्य धोरण. अंतर्गत व्यापारांत चढाओढीमुळें नफ्याचें प्रमाण कमी आलें म्हणजे हेच भांडवलवाले नफ्याच्या शोधार्थ परदेशाची वाट धरतात. परदेशांत या नाहीं त्या उपायांनीं मुबलक नफ्यांची क्षेत्रें निर्माण करतात. ती नफ्याचीं क्षेत्रें कायम रहावींत, आपण कमावलेल्या विशेष सवलती शाश्वत रहाव्यात म्हणजेच थोडक्यांत, दुसऱ्याची कायदेशीर लूट करण्याचा

---

* The seeds of war are inherent in the present capitalistic society.
—Laski

आपला हक्क अबाधित राहावा म्हणून त्यांचा प्रयत्न सुरू होतो. यांतच वसाहती मिळविणें आणि प्रसंगविशेषीं त्यांच्या संरक्षणार्थ लष्करी हालचाली करीत राहणें हें साम्राज्यशाहीचें धोरण अंमलांत येतें. पण हा साम्राज्याचा लोभ नाहीं कोणास ? आपलीं नातवंडें आणि परतवंडें यांची सोय लागावी म्हणून अशा प्रकारचीं हक्काचीं चराऊ कुरणें सर्वांनाच हवीं असतात. अर्थात् साम्राज्याचा लोभ प्रत्येकास सुटतो. ज्याप्रमाणें धर्मशाळेंतील कुत्रीं आपापसांत भांडून, प्रवाशाचें लक्ष्य वेधतात आणि मग हळूच भाकऱ्या पळवितात, त्याचप्रमाणें मागासलेलीं राष्ट्रें गिळंकृत करण्यासाठीं केव्हां केव्हां या साम्राज्यलोभी राष्ट्रांत मारामारी झाल्याचा देखावा दिसतो. यामुळेंच प्रत्येक राष्ट्र दुसऱ्यापेक्षां अधिक सामर्थ्यवान होण्याच्या प्रयत्नास लागतें आणि याचें अखेर पर्यवसान अपेक्षेप्रमाणें एक दिवस महायुद्धांत होतें.

बाहेरील देशांत भांडवल पेरल्यानें साम्राज्यशाही निर्माण होते, साम्राज्यशाहीच्या रक्षणार्थ लष्करशाही बाळगावी लागते आणि अखेर लष्करशाहीच युद्धास प्रवृत्त करिते, अशी ही पायरी पायरीनें राष्ट्रांना युद्धाभिमुख बनविण्याचे मार्ग आहेत. + हेच उद्गार चीन, आफ्रिका, हिंदुस्थान इत्यादि देशांच्या बाबतींत खरे ठरले नाहींत का ?

प्रो. लॅस्कींच्या मतें यांत्रिक युगांत भांडवलशाही सुखासमाधानानें नांदणें मुळीं शक्यच नाहीं. कारण या अधिभौतिक शास्त्रांच्या प्रगतीनें प्रत्येक देशाची उत्पादनशक्ति यंत्राच्या सहाय्यामुळें अमर्याद वाढली. आपण उत्पादिलेला माल आपल्याच देशांत सर्वच्या सर्व न पचवितां आल्यामुळें, तो माल बाहेर पाठविणें, भांडवल पेरणें आणि बाहेरच्या बाजारपेठा काबीज करणें हें ओघानें आलेंच. बाहेरून मिळवून आणलेल्या नफ्याच्या लुटीवरच राष्ट्राचा उदरनिर्वाह अवलंबून राहिल्यानें, काबीज केलेल्या बाजारपेठा अबाधित राखणें अपरिहार्यच झालें. जसजशी व्यापारांतील स्पर्धा अधिकाधिक तीव्र होऊं लागली तसतसा आपल्या

---

+ "Foreign investment begets imperialism, imperialism begets militarism and militarism begets war"—*Laski*.

देशांतील मालाचा उठाव होण्यासाठीं परदेशी बाजारपेठा जिंकण्याशिवाय अन्य मार्गच राहिला नाहीं. कारण देशांतील बहुसंख्य लोकांचें जीवितच त्यांवर अवलंबून राहिलें. आणि स्पर्धेच्या शर्यतींत मागें पडणें म्हणजे स्वतःचे हातपाय स्वतःच कापून घेणें किंवा स्वतःची उपासमार स्वतःच करून घेणें असें होऊं लागलें. यालाच आर्थिक साम्राज्यशाहीचें युग असें म्हणतात. ( Economic Imperialism ) भांडवलशाहीनेंच ही परिस्थिती निर्माण केली. यांत्रिक युगांत मालाच्या भयंकर उत्पादनाबरोबरच अमर्याद भांडवलाचा सांठाहि एकत्रित होऊं लागतो, आणि हेंच भांडवल अखेर बाहेर पेरणें राष्ट्रांना भाग पडतें. बाहेर जी स्थिती, तीच अंतर्गत कारभारांत. कारण अंतर्गत कारभारांत भांडवलवाल्यांनीं बहुतेक सर्व संपत्ति हातीं ठेवल्यानें बहुजनसमाजाची पिळणूक होऊन उपासमार होऊं लागते. या धोरणामुळेंच "वर्चस्व, प्रतिष्ठा, जिव्हाळ्याचा हितसंबंध" इत्यादि अनेक महत्वाचे प्रश्न उद्‌भवून त्यापायीं राष्ट्रें युद्धाच्या वणव्यांत वारंवार पडतात. लष्कर आणि आरमार हीं या भांडवलशाहीच्या रक्षणाचीं अमोघ साधनें होत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे या महायुद्धाच्या बुडाशीं साम्राज्याची तृष्णाच आहे हें आपणास स्पष्ट दिसून येतें. भांडवलशाहीचें हें नागडें पण सत्य स्वरूप असून, तिचा नंगा नाच जगभर महायुद्धाच्या स्वरूपांत कसा धुमाकूळ घालित आहे, हें आपण पाहिलेंच.

## समाजसत्तावाद्यांची कल्पना.

समाजसत्तावाद्यांची भूमिका वर वर्णिल्याप्रमाणेंच आहे. साम्राज्यशाहीच युद्धांना जबाबदार आहे असें त्यांचें ठाम मत आहे. स्टॅलिन म्हणतो कीं जगांतील प्रांतांची पुनर्विभागणी होण्यास, बाजारपेठांची घालमेल होण्यास आणि भांडवल व कच्चा माल यांच्या उत्पत्तिस्थानांची उजळणी करण्यास साम्राज्यवाद्यांना महायुद्धें खाशीं उपयोगी पडतात. साम्राज्यशाही म्हणजे भांडवलशाहीचें नवीन रुपांतर असून, या भांडवलशाहीच्या परदेशांतील उद्योगांतूनच महायुद्धें ओढवतात *

* War is necessary for the imperialists, for it is the only means of bringing about redistribution .of the world and markets, sources of raw material and capital. Imperialism

१९१९ मध्यें लेनिननें असें म्हटलें आहे कीं समाजसत्तावाद्यांना महायुद्धांचा तिटकाराच आहे. त्यांना लढाया हव्या आहेत, पण कोणत्या? तर अंतर्गत बंडाळ्या ( Civil War ). मालकांच्या जुलूमजबरदस्तीविरुद्ध गुलामांच्या, भांडवलवाल्यांच्या पिळवणुकीविरुद्ध मजुरांच्या, जुलमी राजसत्तेविरुद्ध नागरिकांच्या, अशा प्रकारच्या लढाया होऊन, भांडवलशाहीचा बळी घेऊन, नवीन समाजरचना बनावी अशी त्यांची उत्कट इच्छा आहे. या दृष्टीनें प्रत्येक देशांतील क्रांतिकारक सामाजिक चळवळींना त्यांची सहानुभूति नव्हे सहाय्यहि नेहमीं मिळतें. प्रसंगीं अंतस्थ फूसहि ते देतात. रशियाच्या लालडगलेवाल्यांच्या पलटणीचें ( Red Army) हृद्गत या ठिकाणीं आपल्या ध्यानीं येईल. तिला लष्कराच्या जोरावर परप्रांत पादाक्रांत करावयाचे नसून, तिचें खरें कार्यक्षेत्र स्वसंरक्षणापुरतेंच मर्यादित आहे. भांडवलवाल्यांविरुद्ध हत्यार उपसणें एवढेंच त्यांचें ब्रीदवाक्य. देशांतील मजुरांचें संरक्षण आणि मालमत्ता नसलेल्या गरिबांचें संगोपन हेंच या पलटणीचें मुख्य कर्तव्य.

याच तऱ्हेच्या आचारविचाराचा प्रचार जगभर करणें, सर्व राष्ट्रांतील भांडवलशाहीचा नायनाट झाला म्हणजे सर्व राष्ट्रांचें एकच एक सामुदायिक राष्ट्र अगर फेडरेशन स्थापणें, समाजसत्तावादाच्या मूलभूत तत्त्वाप्रमाणें समाजातील आर्थिक विषमता नष्ट करून पुनर्रचना करणें, आणि भांडवलवाल्यांच्या नफ्याच्या उर्फ लुटीच्या धोरणापासून संपूर्ण अलिप्त राहून राष्ट्राची सर्वांगीण उन्नती साधणें इत्यादि नवोदित कल्पनांचें साम्राज्य जगापुढें नव्यानेंच समाजसत्तावाद्यांनी विचारार्थ मांडलें आहे. तें सत्यसृष्टींत उतरणें कितपत शक्य आहे तें ठरविण्यास एक काळच समर्थ आहे !

---

is nothing but an innovated form of capitalism, and arises out of its out side activities, when there is too much internal congestion. —Stalin

———

# राष्ट्रसंघाच्या नाट्यगृहांत
# शस्त्रसंन्यासाचा पोरखेळ !

एका राजानें औरस संतति नसल्यामुळें मरतेसमयीं दत्तक घेण्यासाठीं दहापांच पोरें त्यांच्या आईबापांसह पाळलीं होतीं. राजाचा प्राण घोंटाळला तेव्हां त्यानें प्रथम एका मुलाचें नांव घेतांच त्याचे आई-बाप त्यास धुंडाळूं लागले. बालस्वभावास अनुसरून तें पोर दडून बसलें. तें पोर सांपडत नाहीं असें म्हणतांच राजानें दुसरा मुलगा दत्तक घेऊन प्राण सोडला. सर्व विधि पार पडल्यावर तें दडलेलें पोर बाहेर येऊन बापास हिणवून म्हणालें "बाबा बाबा, कसें फसविलें एका माणसाला ?"

बाप हताश होऊन म्हणाला "बाब्या, मला कसलें फसविलेंस ? तूंच लेका कपाळकरंटा, तुझें तूं स्वतःलाच फसविलेंस झालें !"

अगदीं याचप्रमाणें शस्त्रसंन्यासाचा पोरखेळ खेळून, महान् राष्ट्रांनीं जगाला—नव्हे स्वतःलाच—फसविलें; असें म्हणणें भाग पडतें.

१९१८ सालीं महायुद्धानंतर, जगांतील युद्धाचें उच्चाटन व्हावें, आणि राष्ट्राराष्ट्रांतील मतभेद व भांडणें सलोख्यानें व एका विचारानें मिटावींत, या उच्च हेतूनें राष्ट्रसंघ स्थापन झाला. पण आतां खुद्द त्याच्या हेतूचासुद्धां विपर्यास झालेला दिसून येतो. राष्ट्रसंघाच्या घटनेंतील दोष तर जगजाहीरच आहेत.

राष्ट्रसंघानें शैक्षणिक, आरोग्यविषयक इत्यादि बाबतींत केलेल्या कामगिरीबद्दल योग्य तो आदर व कृतज्ञता व्यक्त केल्यावर, त्याच्या मूळ कार्यक्षेत्रावर टीका करण्याचा मोह अनावर होतो. कांहीं गोष्टींत तर राष्ट्रसंघाचें कार्य निराशाजनकच नव्हे तर निषेधार्ह आहे. जर्मनीवर सक्तीचा शस्त्रसंन्यास लादला, व्हर्सेलिसच्या अपमानकारक तहाचें लोढणें त्याच्या गळ्यांत बांधलें, वसाहती बळजबरीनें काढून घेतल्या आणि त्यास हतबल आणि निष्प्रभ बन-

विलें. जर्मनीवर पुरा सूड उगविला! बगळ्यांनीं माशाला अहिंसेचा उपदेश करावा, तद्वत् इतर राष्ट्रांनीं शस्त्रसंन्यासाची महति जर्मनीपुढें गायली. एवढेंच नव्हे तर त्यास सक्तीनें त्याची दीक्षाहि पण दिली.

निःशस्त्रीकरण परिषदेचा गारुडी खेळ गेलीं पंधरावीस वर्षें खेळून, जगाला जादूचे प्रयोग करून दाखविले. पहिल्या अधिवेशनांतील सर्वांचा उत्साह मोठा अवर्णनीय होता. त्यावेळचीं लांबलचक भाषणें श्रवणीय झालीं.

फ्रान्सचे मि. ब्रियांद म्हणाले " युद्धाचें अरिष्ट टाळतां येणें शक्य नाहीं, ही भावनाच मुळीं मागें पडली. युद्ध हा आमचा जुनापुराणा शत्रू असून लढाईपासून होणाऱ्या संहारास आणि विध्वंसनास आम्ही पूर्ण विटलों आहोंत. किंबहुना फ्रान्स म्हणजे अशा संहाराचें एक होमकुंडच गेलीं अनेक शतकें बनलें आहे. म्हणूनच आम्ही शस्त्रसंन्यासास राजी असून आम्हीं आमचा लष्करी खर्च निम्यानें कमी केला आहे. "

दुसरे एक प्रतिनिधी म्हणाले, " युद्ध करणेंच आपण अशक्य करूं, म्हणजे युद्धें थांबविण्यास निराळें कांहीं करावयास नको. मानवजात एकदांची युद्धरूपी भस्मासुराच्या तडाख्यांतून सुटली ह्याबद्दल मला अभिमान वाटतो. " असें म्हणूण मेलेल्या आत्म्यांबद्दल भर सभेंत त्यांनीं नक्राश्रू ढाळले.

ग्रीसचे मि. पॉलिटीस उद्गारले " चढाईची कोणतीहि लढाई इतःपर सहन केली जाणार नाहीं किंवा क्षम्य मानली जाणार नाहीं. परचक्रापासून स्वतःचें संरक्षण करण्यापुरताच लढाई करण्याचा हक्क येथून पुढें मान्य करण्यात येईल. याशिवाय इतर प्रकारचीं युद्धें आंतरराष्ट्रीय गुन्हे समजण्यांत येऊन, गुन्हेगारांना योग्य तें शासनच मिळेल. "

ही पहिल्या प्रथमची पोकळ बढाईची भाषा संपल्यावर, प्रत्यक्ष निःशस्त्रीकरणाचा विचार सुरू झाला तेव्हां त्यांतील खऱ्या अडचणी दिसूं लागल्या. निष्फळ आवेशयुक्त भाषणांनीं जर महायुद्धें टळून लोकशाही निर्वेध करितां आली असती तर तें कार्य मात्र राष्ट्रसंघाकडून खात्रीनें झालें असतें.

## निःशस्त्रीकरणाचा इतिहास

या परिषदेच्या कार्यांत प्रथमपासूनच अमेरिका आणि रशिया गळल्यामुळें गौणत्व प्राप्त झालें. युरोपियन राजकारणांतील या बोटावरची थुंकी त्या बोटावर करणाऱ्या मुत्सद्यांचे बोल कितपत खरे ठरतील याची खात्री अमेरिकेस असल्यामुळें, तिनें त्यांतून आपलें अंग प्रथमपासूनच काढून घेतलें. रशियास मात्र मुद्दाम बहिष्कृत ठेवलें. त्यांच्या कम्युनिझमच्या तत्त्वांचे वावडें युरोपिअन मुत्सद्यांना होतें हें एक कारण झालें. शिवाय दुष्काळ आणि दारिद्र्य यानें उपासमारीच्या अवस्थेस पोचलेला जर्मनी कम्युनिझमचे तत्त्वज्ञानानें भारून, तीं दोन राष्ट्रें एकत्रित होऊन युरोपची शांतता बिघडेल हेंहि दुसरें भय त्यांचे पोटांत होतें. असो.

१९२० सालीं शस्त्रसंन्यास कसा करावा याच्या विचारविनिमयास प्रारंभ झाला. १९२२ सालीं एकमेकांच्या संरक्षणाची हमी देणारे तहनामे करायला सुरवात झाली. १९२४ सालीं सक्तीनें न्यायनिवाडा देणाऱ्या संस्थांच्या घटनांचा विचार सुरू झाला. वाशिंग्टन नाविक तह याच वेळीं झाला. अखेर हो ना करितां करितां १९२५ सालीं शस्त्रसंन्यास करण्याचा ठराव सर्वानुमतें पसार झाला. पण त्यास राष्ट्रीय स्वातंत्र्याचें रक्षण, परस्परांतील भांडणतंट्यांचा आंतरराष्ट्रीय न्यायकोर्टामार्फत निवाडा मिळण्याची शक्यता, अशीं संरक्षक बंधनें घालण्यांत आलीं.

असें म्हणतात कीं शहाण्यानें तत्त्वांचा वाद फ्रेंच माणसाजवळ कधींहि करूं नये. कारण त्या तत्त्वांचा विचार करितांना, ते विचारांचा इतका कीस पाडतील किंवा अपवादरूपी नाजुक पापुद्रे इतके सोलून काढतील कीं त्यांत मूळ तत्त्व कोठच्या कोठें नाहींसें होऊन जाईल. उदाहरणार्थ, वरील ठरावांत राष्ट्रीय स्वातंत्र्याचें रक्षण म्हणतांच त्या राष्ट्राची भौगोलिक परिस्थिति, लोक, साम्राज्यविस्तार, सरहद्दीवरील भानगडी वगैरे अनेक गोष्टींच्या विचारांना त्यांनीं चालना दिली. तसेंच शस्त्रास्त्रें कमी करावीं असें ठरतांच, शस्त्रास्त्रें म्हणजे काय, शस्त्रास्त्रांत काय काय गोष्टी ढकलावयाच्या, आक्रमक व संरक्षक शस्त्रास्त्रें कोणतीं अशा प्राथमिक व्याख्यांचाच त्यांनीं सावळागोंधळ घालण्यास आरंभ केला.

म्हणावयास हरकत नाहीं. आंतरराष्ट्रीय लष्करी विमानांचा एक ताफा ठेवावा अशीहि एक नवीन कल्पना निघाली.

१९३२ सालीं जर्मनीनें इतर राष्ट्रांबरोबरीच्या दर्जाची जोरांत मागणी केली व अखेर ती त्यास बहाल करण्यांत आली. पण त्याला त्याप्रीत्यर्थ बारा वर्षें झगडावें लागलें. यानंतर अमेरिकन मसुदा नव्यानेंच विचारास आला. त्यावेळीं राष्ट्राजवळ असलेल्या शस्त्रास्त्रांचा $\frac{1}{3}$ संभार कमी व्हावा अशी योजना अमेरिकेनें सुचविली. पाणबुड्या, मोठ्या तोफा, बॉम्ब टाकणारीं विमानें इत्यादिकांत $\frac{1}{3}$ काट आणि विनाशिका, लष्करी जहाजें इ. $\frac{1}{4}$ काट, असा करणें. पण निरनिराळ्या राष्ट्रांची शस्त्रास्त्रविषयक सामर्थ्यें त्यावेळीं होतीं त्याप्रमाणांतच ठेवणें. अशा रीतीनें निःशस्त्रीकरणाचा रेंगाळत पडलेला प्रश्न एकदांचा निकालांत काढावा असें त्यांनीं आग्रहानें सुचविलें. पण यास जर्मनीनें फारच जोराचा विरोध केला. इंग्लंडहि त्या सूचनेवर नाराज होतें. निःशस्त्रीकरण परिषद यशस्वी होणार या विश्वासावर जीं राष्ट्रें शस्त्रास्त्राच्या निर्मितींत मागासलीं त्यांनीं त्याच अवस्थेंत रहावें, आणि ती अयशस्वी होणार हें अगाऊ नक्की जाणून, शस्त्रसंभार ज्या राष्ट्रांनीं अपरिमित वाढविला त्यांनीं त्याच वरचढ अवस्थेंत राहावें, हा मोठा अन्याय नव्हे का ?

## जर्मनीचा बहिष्कार

यापुढील परिषदेस इतिहास असा फारसा नाहींच. जर्मनीनें या परिषदेंतील प्रमुख राष्ट्रांचा कावा जाणला, व त्याविरुद्ध तोंड फोडण्यासाठीं अचानकपणें त्या परिषदेतून आपले प्रतिनिधी परत बोलावले; व जाहिर रीत्या बहिष्कार घातला. मग मात्र सर्व राष्ट्रें खडबडून जागीं झालीं. जर्मनीस परत परिषदेंत आणण्यासाठीं खासगी प्रयत्नांची शिकस्त झाली. सर्व राष्ट्रांनीं विनाकारण दिरंगाई लावून निःशस्त्रीकरणाच्या बाबतींत अक्षम्य विलंब चालविला आहे, अर्थात् सर्व राष्ट्रांचा निःशस्त्रीकरण अवलंबण्याचा खरा हेतूच नाहीं असा आरोप हेर हिटलरनें केला. शस्त्रसंभारानें लठ्ठ झालेल्या राष्ट्रांनीं खरा आणि पुष्कळ प्रमाणांत स्वार्थत्याग करावयास तयार होऊन, ताबडतोब शस्त्रसंन्यास करावा आणि जर्मनीला समान दर्जानें वागविण्यांत यावें अशी हिटलरनें मागणी केली.

वरील गोष्टी तांतडीनें आणि स्वार्थत्यागपूर्वक करण्यास राष्ट्रसंघांतील घटक तयार असतील तरच जर्मनी पुनःश्च परिषदेंत भाग घेईल असा रोखठोक जबाब त्यानें दिला. गेलीं पंधरा वर्षें निःशस्त्रीकरणाचा खेळखंडोबा करून सर्व जगाला झुलविलें आणि जर्मनीला फसविलें. इतःपर तुम्हाला जगाला झुलविण्याचें पवित्र कार्य चालू ठेवावयाचें झाल्यास खुशाल चालू द्या; पण जर्मनी मात्र या गंमज्यांनीं फसला जाणार नाहीं असा निर्वाणीचा संदेश दिला. पण इतक्या त्यागास राष्ट्रें तयार होतीं कोठें? जर्मनीला वगळून परिषदेचा गाडा चालविणें सुरक्षितपणाचें नव्हतेंच, शिवाय हास्यास्पदहि होतें.

जर्मनीनें परिषदेंतून उठून जाऊन तिचें कंबरडेंच मोडलें असें म्हणावयास हरकत नाहीं. यानंतरचा काल युरोपमध्यें मोठ्या आणिबाणीचा आला. आंतरराष्ट्रीय राजकारणांत रस्सीखेंचीचा समय आला. निःशस्त्रीकरण परिषद यशस्वी करण्यास हीच शेवटची आणि निर्वाणीची संधी होती, पण तीही वाया गेली. यानंतरचा काल जागतिक न्याय, नीति झुगारून देऊन, राजकारणांत बेबंदशाही माजविण्याचा आला. नवोदित जर्मनी पुनः एकवार साम्राज्यलोभानें धुंद होणार अशीं पूर्वचिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. एकमुखी राजवटीचा धिंगाणा, ज्यू व लोकशाहीचे पुरस्कर्ते यांच्या छळाची परिसीमा आणि शस्त्रास्त्रांच्या वाढींत अहमहमिका, हींच या काळचीं प्रमुख लक्षणें होत. जपाननें राष्ट्रसंघाच्या निषेधास भीक न घालतां मॉंचुरिया पचविला व इटली ॲबिसिनियावर चढाई करणार असा रंग दिसूं लागला. एकोणिसाव्या शतकांत साम्राज्यवादी राष्ट्रांच्या धाकानें व वजनानें सर्व कांहीं स्थिरस्थावर होत असे, पण आतां तें वर्चस्व व तो धाक उपयोगी पडेना. शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज झाल्याविना आपला धाक पूर्ववत् बसेल असें जेव्हां दिसेना, तेव्हा हीं मोठालीं राष्ट्रें शस्त्रास्त्रांच्या शर्यतींतही भाग घेऊं लागलीं.

## निःशस्त्रीकरणाची फलनिष्पत्ति

निःशस्त्रीकरण परिषदेची फलनिष्पत्ति फार थोडी झाली. बऱ्याच शब्दांच्या व्याख्या ठरविण्याचा घोळच अनेक दिवस चालला होता. सुरक्षितपणाची हमी, शस्त्रास्त्रांचें वर्गीकरण, लवादकोर्टें व त्यांची कार्यक्षमता,

चढाईखोर, यांची पुरती व्यवस्था करण्याऐवजीं, त्या शब्दांच्या व्याख्या ठरविण्यांतच बराच कालक्षेप झाला. वॉशिंग्टन आरमारी तह, केलॉग पॅक्ट, लासानेचा तह अशा थोड्याफार महत्वाच्या गोष्टींचा उल्लेख करतां येईल. विस्तारभयास्तव मी अधिक त्याविषयीं येथें लिहित नाहीं; पण त्या सर्वांची प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र फारच अल्प प्रमाणांत झाली एवढें निश्चित.

निःशस्त्रीकरणाच्या बाबतींत असलेला पहिला उत्साह पुढें मावळला. युद्धाविषयीं प्राप्त झालेलें वैराग्य स्मशानवैराग्य ठरलें. अनेक परिषदा, समित्या झाल्या, कागदी ठरावांची भेंडोळीं निर्माण झालीं; पण प्रत्यक्ष कार्यनिष्पत्ति काडीचीहि झाली नाहीं.

निःशस्त्रीकरणाची परिषद यशस्वी झाली नाहीं याला अनेक कारणें आहेत. निःशस्त्रीकरणाचा खरा आणि प्रामाणिक हेतू फारच थोड्या राष्ट्रांचा होता. जर्मनीस कायमचा दुबळा ठेवण्यासाठीं हा गारुडी खेळ चालू ठेविला होता. निदान फ्रान्सचें तरी धोरण प्रथमपासून हेंच होतें. निरनिराळ्या राष्ट्रांतून अनेक शहाणे व मुत्सद्दी एकत्रित करूनहि हा प्रश्न सुटला नाहीं, याचें कारण त्यांच्या अधिक शहाण्या बुद्धीस फुटलेले फाटेच कारणीभूत झाले. महान् मुत्सद्दीहि जागतिक शांततेकरितां राष्ट्राभिमान थोडा वेळदेखील विसरूं शकत नाहींत याचें हें उत्तम उदाहरण होय. एका विनोदी लेखकानें या परिषदेस अनुलक्षून असें गमतीचे उद्गार काढले, कीं ही परिषद म्हणजे शाकाहारी लोकांचा आहार कसा असावा, याची नियमबद्ध योजना तयार करण्यासाठीं बसलेली खाटिकांची समिति. हे उद्गार अत्यंत सार्थ नाहींत का ?

सुरक्षितपणाची हमी, सक्तीचा न्यायनिवाडा व निःशस्त्रीकरण या तीन गोष्टींत सर्वांची मनें घोटाळलीं. निःशस्त्रीकरणाच्या मार्गांत मुख्य अडचण अशी आली कीं, सुरक्षितपणाची हमी मिळाल्याखेरीज निरनिराळीं राष्ट्रें शस्त्रसंभार कमी करण्यास राजी होईनात व शस्त्रसंन्यास केल्याविना सर्व राष्ट्रांना सुरक्षितपणा लाभेना, असें हें कोडे होतें. +पोहावयास आल्या-

---

+ No arbitration or security without disarmament and no disarmament without arbitration and security.

शिवाय पाण्यांत उतरावयाचें नाहीं आणि पाण्यांत उतरल्याखेरीज पोहावयास यावयाचें नाहीं, हें कोडें उलगडण्यांत कालक्षेप करणाऱ्या इसमाला ज्याप्रमाणें जन्मभर पोहावयास येत नाहीं, त्याचप्रमाणें शस्त्रसंन्यास अगोदर, का सुरक्षितपणा अगोदर याविषयीं हुजत घालणारीं राष्ट्रें दोहींलाहि मुकावयाचीं, हें त्याचे साधें व सुटसुटित उत्तर आहे.

संस्कृतीचें रक्षण व राष्ट्राराष्ट्रांतील भांडणतंटे एकमेकांच्या जीवावर उठून, रक्तपात केल्याविना मिटविण्याचा अन्य मार्ग शोधून काढण्यास तीं राष्ट्रें असमर्थ ठरलीं, एवढा मात्र निष्कर्ष यावरून काढतां येईल.

## राष्ट्रसंघाचें यशापयश

राष्ट्रसंघानें गेल्या वीस वर्षांच्या कारकीर्दींत पुढील भांडणें मध्यस्थीनें मिटविलीं. (१) १९२१ मध्यें स्वीडन आणि फिनलँडमधील ऑलँड बेटाबद्दल वाद (२) १९२१ मध्यें जर्मनी आणि पोलंडमधील सायलेशियन सरहद्दीचा प्रश्न. (३) १९२३ मध्यें ग्रीस व इटली यांचें भांडण. (४) १९२४ मध्यें जर्मनी आणि लिथुआनिया यांचा मेमेल प्रांताबद्दलचा तंटा. (५) १९२४ मध्यें तुर्कस्थान व इराक यांच्यामधील भांडण. (६) १९२५ मध्यें ग्रीसची बल्गेरियावरील स्वारी व त्यामध्यें लवाद. (७) १९२८ मध्यें बोलिव्हिया व पेराग्वे यांचें "छाको" प्रांताबद्दलचें भांडण. (८) १९३३ मध्यें पेरू व कोलंबियामधील जुंपलेली लढाई. (९) १९३३ मध्यें इंग्लंड आणि इराण यांमधील तेलाच्या सवलतीसंबंधींचा वाद.

पण खालील गोष्टींत राष्ट्रसंघानें आपल्या पदरीं अपयशच बांधून घेतलें:-(१) १९२० मध्यें पोलिश सैनिकांनीं लिथुआनियावर स्वारी करून व्हिल्ना शहर जिंकलें, तें अद्याप अन्यायानें त्यांच्याच हातीं आहे. (२) व्हर्सेलिसच्या तहाची अंमलबजावणीकरितां हातांत कायदा घेऊन, फ्रान्सनें जर्मनीच्या रूर प्रांतावर केलेली स्वारी. (३) १९३१ मधील चीन जपान लढा व जपाननें तोडलेला मॉंचुरिया प्रांताचा लचका. राष्ट्रसंघानें लिटन कमिशन नेमून सर्व दोषांचें व अन्यायांचें खापर जपानच्या डोक्यावर फोडलें. पण व्यर्थ. अखेर काय-? (४) १९३५ सालीं इटलीची ॲबिसिनियावरील स्वारी व त्याचें स्वातंत्र्यहरण. या बाबतींतहि राष्ट्रसंघानें शिकस्त केली; पण

शस्त्रसंन्यास परिषदेच्या कोठल्याहि कामांत प्रत्येक ठिकाणीं फ्रान्स आडवा पडलेला दिसून येईल. म्हणूनच मी म्हणतों कीं राष्ट्रसंघाचा खरा चुथडा फ्रान्सनेंच केला. अर्थात् इतर मोठे संभावित होते असें मला म्हणावयाचें नाहीं यावरून. पण त्यांतल्या त्यांत फ्रान्सचा विरोध प्रामुख्यानें नडला ही गोष्ट मात्र दृष्टिआड करिता येत नाहीं. याचें कारण त्यांचे मुख्य धोरण असें होतें कीं आपल्या लष्करी सामर्थ्यास यत्किंचितहि धक्का न बसतां, जर्मनी मात्र नेहमीं हतबल रहावा. आणि या धोरणामुळें निःशस्त्रीकरणाचा प्रयत्न फोल ठरला; इतकेंच नव्हे, तर हिटलरच्या उदयानंतर जर्मनी चिडून आणि चवताळून उठला याचेंहि मूळ फ्रान्सच्या धोरणांतच आहे.

सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा विचार सुरू झाला त्यावेळीं फ्रान्स आणि इतर छोटीं राष्ट्रें अशींच आडवी आलीं. किंबहुना लोकशाही राष्ट्रांचें शक्तिसर्वस्व सक्तीच्या लष्करी शिक्षणांतच आहे असें प्रतिपादण्या-पर्यंत मजल गेली. आपल्याजवळ मनुष्यबल थोडें अशी साधार भीती फ्रान्सला आणि छोट्या राष्ट्रांना नेहमीं वाटते आणि त्यांत सक्तीचें लष्करी शिक्षण बंद केल्यावर संपलाच त्यांचा कारभार ! प्रत्येक राष्ट्रानें आपल्या शस्त्रास्त्रांची यादी राष्ट्रसंघास सादर करावी असा बूट निघाला. शस्त्रास्त्रांची गुप्तता राखल्यामुळें राष्ट्राची दुर्बलता दडून राहील हें खरें, पण त्याचप्रमाणें अतुल सामर्थ्यहि दडून राहील आणि त्यामुळें एक दिवस घोंटाळा होणार नाहीं कां, असें त्यांना वाटूं लागलें. पण आपलीं शस्त्रास्त्रें दुसऱ्यांनीं तपासावीत ही कल्पनाच फ्रान्सला पटेना. पण जर्मनीचीं शस्त्रास्त्रें तपासण्याचा हक्क मात्र त्यांना हवा होता. कां, तर गुप्तपणें शस्त्रास्त्रें वाढवून पुनःश्च जर्मनी शिरजोर झाला तर ? पण फ्रान्स मात्र शस्त्रास्त्रांची वाढ गुप्त ठेवून जागतिक शांततेचें रक्षण करणार होतें नाहीं का ?

यावर प्रत्येक राष्ट्रानें आपला लष्करी खर्च मर्यादित करावा अशी कल्पना पुढें आली. पण यांतहि अनेक अडचणींचे डोंगर उभे राहिले. अशा तऱ्हेनें रेंगाळत चाललेल्या कामांत थोडीफार आश्चर्यजनक घटना घडवून आणावी असा फ्रान्सनें व्यूह रचिला. अर्थात् आपल्या देशास

आंतरराष्ट्रीय राजकारणांत थोडेंफार महत्व प्राप्त करून द्यावें, आणि तेंहि विनाश्रम व विनामूल्य, असाहि उद्देश फ्रान्सचे मि. ब्रियांद यांचा होताच. या दृष्टीनें त्यांनीं त्यावेळचे अमेरिकन वकील मि. केलॉग यांना हाताशीं धरून एक परिषद् बोलावली; आणि एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करूं नये असा ठराव पसार करण्याचें श्रेय पदरांत पाडून घेतलें. या ठरावान्वयेंच आक्रमणशील युद्धाच्या धोरणाचा निषेध व्यक्त करण्यांत आला आणि राष्ट्राराष्ट्रांतील भांडणतंटे सर्वांनीं शांततेनें सोडवून घ्यावेत अशी शिफारस करण्यांत आली. यालाच केलॉग पॅक्ट असें म्हणतात. ठरावाचा उद्देश ठीक आहे, पण आक्रमणशील राष्ट्रावर वचक बसविण्यास व शांततेनें भांडणतंटे मिटविण्यास आवश्यक असलेल्या संस्थेसंबंधीं कांहींच निश्चिय योजना त्यांनीं ठरविली नाहीं. आणि यामुळें हा ठराव नुसता दप्तरीं पडून राहिला.

ही झाली १९२८ सालची कथा. १९२९ सालीं सोव्हियट रशियानें आपला नवीन मसुदा पुढें आणला. सर्व राष्ट्रांचें वर्गीकरण तीन वर्गांत करून, गणितशास्त्रानें त्या त्या वर्गाच्या शस्त्रास्त्रांची मर्यादा ठरवून, त्यांना आपापला शस्त्रसंग्रह कमी करण्यास भाग पाडावयाचें अशा तऱ्हेची रशियाची योजना होती. योजना दिसायला अत्यंत साधी, सुबोध व सुटसुटीत खरी, पण राष्ट्रांचें वर्गीकरण कसें करावयाचें ही गोम शिल्लक राहिलीच कीं! वर्गीकरणाच्या यादींत दुसऱ्या वा तिसऱ्या वर्गांत जाऊन बसण्यास कोणतें स्वाभिमानी राष्ट्र आपणहून तयार होणार?

अशा परिस्थितींत १९३० सालीं लंडन येथें नाविक परिषद् भरली आणि नाविक दलाचें प्रमाण जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं कसें ठेवावें याच्या विचारविनिमयास प्रारंभ झाला. आणि त्यामध्यें थोडेफार निश्चित यशहि लाभलें असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं.

## निःशस्त्रीकरणाचा खुला तमाशा

१९३१ साल उजाडलें, आर्थिक हलाखीच्या प्रलयांत जगांतील लहानमोठीं राष्ट्रें सांपडलीं. प्रत्येक राष्ट्राचें सर्वच बजेट आंतबट्ट्याचें झालें, अर्थात् त्या प्रमाणांत लष्करी खर्चासहि थोडाफार काट बसला. १९३२

सालीं जगांतील साठ राष्ट्रांची जंगी परिषद भरून, निःशस्त्रीकरणाच्या प्रश्नाचा विचार जाहीर रित्या सुरू झाला. परिषदेच्या उद्‌घाटन वेळीं इकडे पौर्वात्य गोलांत जपाननें मांँचुरिया गिळण्यासाठीं, चीनवर स्वारी चढविली. परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगीं मुत्सद्यांचें यथोचित स्वागत जपाननें शांघायवर तोफेचा भडिमार करून केलें! आणि ह्याच अपशकून या निःशस्त्रीकरण परिषदेच्या यशाच्या आड आला.

निःशस्त्रीकरण शस्त्रास्त्रांच्या गुणावगुणावर ठरवावें का शस्त्रास्त्रांच्या परिमाणावर ठरवावें अशा घोटाळ्याच्या प्रश्नानें परिषदेच्या कामकाजाला प्रारंभ झाला. ( Qualitative and Quantitative Disarmament ) आणि या दोन्ही महत्वाच्या प्रश्नांना बगल देऊन, चढाईखोर, सामुदायिक संरक्षण, सक्तीचा लवाद, शस्त्रसंभार कमी करण्याचे आपसांतील तहनामे या प्राथमिक व्याख्यांचाच सांवळागोंधळ सुरूं झाला. परिषदेचें कामकाज कोठेंतरी वहात चाललें होतें. त्यांत कोणाचेंहि मार्गदर्शिकत्व नसल्यानें आणि कामकाजाची निश्चित योजनाहि नसल्यानें, तात्विक बाबींच्याच घोंटाळ्यांत, परिषदेचें तारू धुक्यांत सांपडून अगतिक झालें. पण सर्व मुत्सद्यांनीं मात्र कायदेशीर व्याख्यांचा गोंधळ घालणाऱ्या तज्ञांच्या नांवानें खडे फोडण्यास प्रारंभ केला. आणि सर्वत्र असा आभास उत्पन्न केला कीं जणूं कांहीं निशःस्त्रीकरणाच्या मार्गांत हे तात्विक आणि कायदेशीर तज्ञच कालापव्यय करून, निःशस्त्रीकरणास विलंब लावित आहेत. " संकुचित विषयाचें अगडबंब अध्ययन " करणारा म्हणजे तज्ञ अशी त्यांची हेटाळणी करण्यास प्रारंभ झाला. त्यांतच चढाईचीं आयुद्धें कोणतीं आणि स्वसंरक्षणाचीं कोणतीं असा घोंटाळ्याचा प्रश्न या तज्ञांच्या समितीकडे आला. तेव्हां तज्ञांच्या चिकित्सक बुद्धीला चांगलेंच खाद्य मिळालें!

स्वतःच्या आवडीच्या संहारक आयुधास 'संरक्षक' ही खूणचिठ्ठी लावण्यासाठीं, पण दुसऱ्याच्या आयुधास मात्र " चढाईचें " हें लेबल डकविण्यास प्रत्येक राष्ट्र धडपडूं लागलें. आपणास व्हर्सालसच्या तहानें संपूर्ण निःशस्त्र केल्याची ओरड जर्मनीनें जोरांत सुरूं केली. लष्करी जहाजें आणि विनाशिका यांचा कैवार घेऊन, पाणबुड्यांच्या बाबतींत

मात्र इंग्लंडनें जोराच्या तक्रारीस प्रारंभ केला. जपानला पाणबुड्यांचा पुळका आला व त्यानें बॉम्ब फेकणाऱ्या विमानांचा मात्र तिरस्कार व्यक्त केला. जर्मनीनें निदान आपणास दहाहजार टन वजनाची छोटीशीं लष्करी जहाजें (Pocket) बांधण्यास परवानगी मिळावी म्हणून खटपट सुरू केली. इटली आणि फ्रान्स यांना पाणबुड्यांवर कोणतेंच नियंत्रण नको होतें. जपाननें सत्तर टनाच्या खालच्या रणगाड्या आणि ९॥ इंचाच्या बंदुका स्वसंरक्षक ठरवाव्यात म्हणून हट्ट धरला. रणगाड्यांचा नायनाट करावा असें फ्रान्स प्रतिपादूं लागलें. असें म्हणतात कीं या परिषदेंत फ्रेंच आणि जपानी लोकांनीं आपापसांत सौदा ठरविला. जपानला मॉंचुरियांत मोकाट रान हवें होतें तें देऊन, निःशस्त्रीकरणाच्या विरुद्ध शक्य तीं सर्व विघ्नें उत्पन्न करून जपाननें फ्रेंचांना सहाय्य करावें असा करार करून परिषदेच्या कामांत भाग घ्यावयास सुरवात केली. कां नाहीं परिषदेचें तारूं अडचणींच्या खडकावर फुटून तुकडे उडणार ? प्रत्येक राष्ट्र आपलें शस्त्र शाबूद ठेवून दुसऱ्याच्या शस्त्रास मात्र प्रतिबंध करण्यास उत्सुक होतें. प्रत्येक राष्ट्राच्या लष्करी अंदाजपत्रकांत वरकांती जरी थोडासाच खर्च दाखविलेला असला तरी अनेक मार्गांनीं लष्करवाढीवर पाण्यासारखा पैसा बहुतेक सर्व राष्ट्रें खर्च करीत होतीं. त्यांना कायदेशीर लगाम कोणी व कसा घालायचा, हीच अडचण नडूं लागली. विमानांतून बॉम्ब टाकल्यामुळें होणारी अपरिमित जीविताची आणि वित्ताची हानि थांबवावी असा टाहो सर्व राष्ट्रांतील नागरिक फोडित होते; कारण त्या बॉम्बचा रोख नागरिकांच्या जीवावर असल्यानें, त्याच्या नुसत्या कल्पनेनेंहि त्यांना धडकी भरत होती. म्हणून परिषदेंत त्याचा निषेध करणारा ठराव पास करून लोकांना थोडें फार संतुष्ट केलें; पण ठरावांतील शब्दरचना इतकी विचित्र व संदिग्ध बनविली होती, कीं त्याचा लवचिक अर्थ कोणीहि वेडावाकडा हवा तसा करावा. पहिली गोष्ट म्हणजे हवेंतील बॉंबवर्षावाच्या प्रश्नास, राष्ट्रांनीं केलेल्या आपसांतील करारनाम्यांची पुस्ती जोडण्यांत आली. शिवाय, हा युद्धप्रकार राष्ट्रसंघांतील घटकांनीं एकमेकांविरुद्ध उपयोगांत आणूं नये असें ठरावांत म्हटल्यानें, त्याचा उपयोग रानटी टोळ्या, आफ्रिडी, पठाण लोक यांच्या विरुद्ध सर्रास करण्याचा परवानाच सर्व राष्ट्रांना मिळाला, असें

मनुष्य सुखासुखी तयार होईल ही गोष्टच मुळीं अशक्य आणि असंभाव्य आहे. शिवाय त्यामुळें जगांतील गेल्या दोन शतकांत वाढलेली प्रजा कमी होऊन पूर्वस्थळावर नको का जावयास ? पुनः दुष्काळ आणि सांथीच्या खाईत त्यानें आपणहून उडी टाकली पाहिजे.

म्हणूनच हा मार्ग सोपा असूनहि पटत नाहीं. तात्त्विक दृष्ट्या वाद घालून एखादी सभा जिंकण्यास त्याचा उपयोग चांगला होईल; पण प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्या वेळीं हा मार्ग अव्यवहार्य म्हणून निरुपयोगीच ठरेल.

## शास्त्र का संस्कृति ?

मग दुसरा मार्ग कोणता ? ज्या शास्त्रामुळें सध्यांची बिकट स्थिती निर्माण झाली आहे त्याच शास्त्रांत अधिक संशोधन करून, यावर उतारा काढावयास हवा. यंत्राच्या सहाय्यानें मनुष्यानें सांघिक उत्पादन शक्ति परमोच्च कोटीस पोचविली, त्याचीं गोड फळेंहि त्यानें मनमुराद चाखलीं. पण त्या यांत्रिक युगामुळें निर्माण झालेल्या राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनास आवश्यक असे नियम मात्र त्यानें शोधून काढले नाहींत. तीच अवघड कामगिरी शास्त्रीय शोधांनीं त्यानें नको का करावयास ? योग्य वाटल्यास नवीन समाजरचना करून, व अधिभौतिक शास्त्रांवर नियंत्रणें लादून, या बिघडलेल्या तराजूचा समतोलपणा सांवरण्याचा योग्य मार्ग धुंडाळल्याखेरीज आतां गत्यंतर नाहीं.

अधिभौतिक शास्त्र पुढारलें, पण त्या मानानें मानवी संस्कृति मात्र मागसलेली राहिली आणि या विसंगतीमुळेंच सध्यांच्या अडचणींचा डोंगर पुढें आला. अर्थात् शास्त्र आणि संस्कृति हीं मानवी हितार्थ झटणारे भागीदार बनून, हातांत हात घालून बरोबरीनें चालतील तेव्हांच खरी प्रगति होणार आहे. दोघांच्या एकोप्यावर आणि सहकार्यावरच प्रगति—नव्हे मानवी जीवन—आतां अवलंबून राहिलें आहे. म्हणजेच शास्त्रीय प्रगति समाजाच्या हितसंवर्धनाच्या कामीं खरी उपयोगी पडेल.

पृथ्वीगोलावर एकमेकांच्या सहकार्यानें अखिल मानवजात बंधुभावानें एकत्रित राहणें हीच खरी आधुनिक संस्कृति. एका समाजाविरुद्ध

दुसरा अगर एका राष्ट्राविरुद्ध दुसरें असें एकमेकापासून फटकून शत्रुत्वानें राहण्यापासून खऱ्या संस्कृतीची वाढ कशी होणार? सर्वांनीं आपल्या ज्ञानाची अदलाबदल करणें, एकत्रित करणें व उपाययोजनाहि समायिकरीत्या अंमलांत आणून मानवजातीचे जे खरे शत्रू आहेत त्यांविरुद्ध लढा देण्यास तयार राहणें, यांतच आधुनिक संस्कृतीचें गमक सांठविलेलें आहे. व्यक्ति, समाज आणि राष्ट्र हीं एकमेकाविरुद्ध उठतात याचें खरें कारण हल्लींची दूषित संस्कृति. आधिभौतिक शास्त्राचा परिणाम तो खास नव्हे. आमच्या चालू संस्कृतींतच दुष्ट वासनांना भरपूर वांव आहे आणि एकमेकांचा नाश करावयास हरघडी संधी मिळत आहे, तोंपर्यंत निव्वळ शास्त्रांची सुधारणा भयंकर बेजबाबदार कृत्यें करण्यास मनुष्याला प्रवृत्त करणार, हें काय निराळें सांगावयास हवें? दुष्ट लोकांच्या हाती दुसऱ्यांची घरें जाळण्यास पेटलेले पलिते देण्याप्रमाणें नाहीं का हें? "लोभमूलानि पापनि" याप्रमाणें दुष्ट लोकांच्या आसुरी हत्यारांत आधिभौतिक शास्त्रानें भरच घातली आहे.

## नवें युग, नवी संस्कृति

आधिभौतिक शास्त्रानें स्थळ आणि काल संकुचित केले. एकमेकापासून कितीहि अंतरावर असलेले जगांतील सर्व विभाग त्यामुळें जवळ जवळ आले. याचा परिणाम असा झाला कीं एकाच्या कृत्याचा परिणाम दुसऱ्यावर होऊं लागला. यामुळें आर्थिक दृष्ट्यासुद्धां जग परस्परावलंबी बनलें आणि म्हणूनच मनुष्यानें अधिक संघटित होणें जरूरीचें झालें. पण तो उलट फटकून वागूं लागला तर अशा आपत्ती येणारच.

या नवीन युगास आवश्यक असलेली ही नवीन संस्कृति आत्मसात् करण्यापूर्वी एकवार मनुष्याला महान् दुःखाच्या दिव्यांतून जावें लागणार हें स्पष्ट दिसतें. झोटिंगशाहीस चटावलेल्या मनुष्याच्या हातीं या शास्त्रानें दिलेल्या आयुधांनीं त्याच्यावर पुरा सूड उगवल्याखेरीज तो नव्या संस्कृतीकडे ढुंकूनदेखील पहाणार नाहीं.

रानटी अवस्थेंत सभ्यांचा समाज उगम पावला. समाजाची घडी नीट बसविण्यासाठीं ज्याप्रमाणें कायदे आणि न्यायकोर्टें स्थापन झालीं

स्थळ प्रत
सं. ........ नं.

व त्यामुळें समाज सुव्यवस्थित व शांततेनें कालक्रमणा करूं लागला, त्याच-प्रमाणें सर्वसामान्य वागणुकीसाठीं नियम व कायदे सर्वांनीं मिळून तयार करून त्यांची आंतरराष्ट्रीय न्यायकोर्टामार्फत अंमलबजावणी ताबडतोब झाली पाहिजे. असे बरेच नियम आज आंतरराष्ट्रीय म्हणून मान्य होऊन लागूहि झालेले आहेत. उदाहरणार्थ, रस्त्यावरून वाहनें विशिष्ट बाजूनें हांकणें हा नियम अनुभवानें बिनधोक आणि हितकारक वाटला, म्हणून सर्वांनीं स्वीकारलाच कीं नाहीं ? तर मग युद्धानें इतके वेळां हात पोळल्या-नंतरहि, अशा प्रकारचे नियम करून ते पाळण्याचा शहाणपणा माणसानें कां करूं नये ?

पण ही परिस्थिति निर्माण होण्यापूर्वी, देशांतील भांडवलशाही आणि त्यायोगें निर्माण होणारी साम्राज्यशाही नाहींशी झाली पाहिजे. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याची लोभमूलक कल्पना समूळ नष्ट झाली पाहिजे. म्हणजेच इतर प्रांतांचा व वसाहतींचा अभिलाष राष्ट्रांनीं सोडला पाहिजे. देशांतील भांडवलशाहीमार्फत होणारी बहुजनसमाजाची आर्थिक पिळणूक बंद पडली, म्हणजे प्रत्येक राष्ट्रास संपूर्ण स्वायत्तता आणि स्वतंत्रता यांचा मनमुराद आस्वाद घेतां येईल.

सामुदायिक संरक्षणहि सर्वांना लाभेल. प्रत्येक राष्ट्रास पूर्ण विश्वास उत्पन्न होण्यास त्याच्या स्वातंत्र्याची हमी सर्वांकडून मिळावयास हवी. भांडवलशाहीच नष्ट झाली म्हणजे असा विश्वास उत्पन्न (pooled security) होण्यास निराळें कांहीं करावयास नको.

## जागतिक फेडरेशन

पण यासाठीं शक्य तर सर्व जगाचें एक राष्ट्र संयुक्त राज्यघटनेच्या तत्वावर ( फेडरेशन ) स्थापन होणें इष्ट आहे. म्हणजेच निरनिराळ्या राष्ट्रांचे हितसंबंध एकमेकांच्या आड येणार नाहींत. यदाकदाचित् थोडे-फार आलेच तर सामुदायिक विचारानें त्यांतून मार्ग काढतां येईल. थोड-क्यांत म्हणजे सिसरोच्या मताप्रमाणें सर्व मानव जातीचा एक विश्वसमाज स्थापन होणें अगत्याचें आहे. *

---

* Universal society of the human race. —*Cicero*

कारण राष्ट्राराष्ट्रांचे हितसंबंध जरी वेगवेगळे व प्रसंगविशेषीं विरोधाचे असले, तरी अखिल विश्वांतील मानवजातीच्या गरजा, प्रश्न आणि हितसंबंध हे केव्हांहि एकच आहेत व पुढेंहि असणार. आणि अखिल मानवजातीच्या कल्याणासाठीं प्रत्येक राष्ट्रानें आपल्या हितसंबंधांचा जरूर पडल्यास थोडाबहुत स्वार्थत्याग करण्यास शिकले पाहिजे. युद्धें व्हावींत; पण ती अज्ञानी, जुलमी, मागसलेल्या राजसत्तेविरुद्ध मर्यादित स्वरूपाचीं असावींत. याहिपेक्षां जागतिक सहकार्यानें मनुष्यावर ज्या नैसर्गिक आपत्ती येत आहेत त्यांविरुद्ध लढा अवश्य लढवावा. अशा प्रकारच्या सहकार्यानेंच जगांतील देवी, प्लेग, कॉलरा इ. सांथी कांहीं अंशीं निर्मूलन करण्याचें श्रेय नाहीं का पदरांत पडलें ? अशा रीतीनें अनेक रोगराई व सांथी इत्यादिकांच्या विरुद्ध झगडून मानवीजीवन सुखमय करण्यांत प्रत्येक मनुष्य आपलें आयुष्य वेंचील तर काय होणार नाहीं या जगांत ? आर्थिक हलाखीसारख्या आपत्तींतून मानवजात वांचून, सर्वत्र समता आणि स्थैर्य नाहीं का प्रस्थापित होणार ?

## हिंसात्मक प्रवृत्ति

हें नवीन समाजरचनेचें शास्त्र मनुष्यजातीस वैद्याप्रमाणें उपकारक ठरेल. वैद्य अधिक निष्णात असला तर रोगी बचावेल हें खरें. पण रोग्याच्या खालावलेल्या प्रकृतींत खरी सुधारणा आंतूनच झाली पाहिजे. म्हणजे पथ्य संभाळून निसर्गाच्या नियमाप्रमाणें राहण्याचा प्रयत्न रोग्यानें स्वतः केला पाहिजे. वैद्याचें कर्तव्य रोग्याच्या अंगांतील प्रतिकारशक्तीस मदत करणें एवढेंच आहे. रोग्याच्या अंगांत त्राण राहिलें नसेल तर वैद्याच्या नुसत्या औषधोपचारांवर रोगी बरा होईल काय ? खरी प्रकृती व जीवन शरीरांतूनच मिळावयास हवें. शास्त्रशुद्ध पायावर समाजाची रचना निष्णात लोक करितील एक वेळ, पण ती न बिघडतां सदैव स्थिर राहण्यास समाजाच्या अंगींच कांहीं विशिष्ट गुण यावयास हवेत. मानवी जीवनाचें खरें ध्येय जाणून, अखिल मानवजातीच्या हिताच्या दृष्टीनें वागणारा समजुतदार समाजाच नको का यासाठीं ? म्हणजेच समाजांतील हिंसात्मक प्रवृत्ति कांहीं प्रमाणांत नष्ट व्हावयास हवी.

अपमान सोसून हात चोळीत स्वस्थच बसावें लागलें. (५) आणि यापुढील इटली, जर्मनी, जपान यांच्या कृत्यांचा पाढा वाचायचा म्हटलें तर त एक महापुराण होईल. तरी पण व्हर्सेलिसचा अपमानकारक तह भिरकावून देणारें जर्मनीचें कृत्य, इटली–ॲबिसिनिया युद्धाचे वेळीं राष्ट्रसंघाची इटलीनें केलेली किंमत आणि जपाननें वेळोवेळीं बांधलेली पूजा वगैरे उदाहरणांनीं राष्ट्रसंघाचे धिंडवडे निघाले आहेत. आतां राष्ट्रसंघ म्हणजे अरण्यरूदनासाठीं राखून ठेवलेली एक हक्काची जागा, एवढाच त्याचा नांवलौकिक कायम राहील असें दिसतें.

जिनिव्हाचा राष्ट्रसंघ मृगजलाप्रमाणें निष्फळ भ्रम आणि आशा उत्पन्न करणारा ठरला. पण त्या बिचाऱ्या राष्ट्रसंघाचा काय दोष ? राष्ट्रसंघाचें कार्य अधिक यशस्वी आणि प्रभावी करण्याचा जर का मुत्सद्यांनीं कृतनिश्चय केला असता तर तसें झालें नसतें असें नाहीं.* पण जगाच्या आणि मानवजातीच्या दुर्दैवानें ती गोष्ट घडली नाहीं. जगाचा प्रलयकाळ आणि मानवजातीचें हत्याकांड पुनः एकवार उघडल्याविना, ही गोष्ट निकरानें व निश्चयानें पार पाडण्यास मुत्सद्दी तयार होणार नाहींत इतकें मात्र ठरलें. जिनिव्हाचें ठिकाण सृष्टिसौंदर्याचें माहेरघर म्हणून प्रसिद्धी पावलेलें आहे. तेथील नैसर्गिक वातावरणांतील हिरवेगार गालिचे पसरलेले डोंगर, रानटी फुलांचें हास्य आणि त्यांतून वहाणाऱ्या लहान लहान खेळकर झऱ्यांचें संगीत, यामध्येंच मुत्सद्दी पूर्णपणें रंगले. मानवजातीला अवश्य असलेल्या किंबहुना मानवजातीचें जीवितच ज्यावर अवलंबून अशा प्रश्नाकडे म्हणजे राष्ट्रसंघाच्या मूळ कार्याकडे प्रसंगविशेषीं दुर्लक्ष करून, डोंगरमाथ्यावर मजेच्या सफरी, शिकारी, होड्या वल्हविणें, गोल्फ खेळणें, हॉटेलमध्यें खाणेपिणें; नाचरंग इत्यादि तमाशांत त्यांनीं कालापव्यय केला; त्याचें प्रायश्चित नको त्यांना मिळावयास ?

यावर एका प्रख्यात लेखकानें मोठे उद्बोधक पण विनोदी उद्गार काढले आहेत, ते खरोखरीच मननीय आहेत. " मनुष्याचे खरे गुणधर्म तो जें जें कांहीं खातो, पितो आणि श्वासोश्वास करतो त्यावर अवलंबून

---

* The Leage is what we choose to make it.

आहेत. जिनिव्हामध्यें खाण्यापिण्याचा अतिरेक व श्वासोश्वासास फारच अपुरी हवा असें प्रमाण आढळतें. (कारण बराचसा काल हॉटेलमधील मांसाहारी खाणें आणि दारू पिणें यांत जातो आणि खुद्द राष्ट्रसंघाच्या बैठकींत सिगारेटस्च्या धुरांनीं वातावरण कोंदट होतें.) अर्थात् इतर ठिकाणच्या राजकीय वातावरणांत यापेक्षां निराळा देखावा असतो असें मला म्हणावयाचें नाहीं. पण जिनिव्हांत मात्र तें सर्रास आढळतें एवढें खरें. शस्त्रसंन्यास परिषदेस थोडा काल भेट देणाऱ्याचा ग्रह असाच होतो कीं, या परिषदेचें कामकाज शाकाहारी लोकांनीं आणि तेंहि खुल्या व मोकळ्या वातावरणांत केल्याविना यशस्वी होऊन, या जगांत शांतता प्रस्थापित होणें कदापिहि शक्य नाहीं."+ हॉटेल्समध्यें मुत्सद्यांनीं ठरविलेले आपसांतील गुप्त करारमदार यांनींच शस्त्रसंन्यास परिषदेचें कार्य नासून टाकलें आहे असें आपणास आढळून येईल.

राष्ट्रसंघ गेली अनेक वर्षें वादविवाद करून थकला आहे, भागला आहे. पण राष्ट्रसंघास वादविवादसंघाचें खरें स्वरूप पण नाहीं; कारण अशा संघांत निदान आयत्या वेळीं स्वयंस्फूर्तीनें वक्ते तरी बोलतात. पण या राष्ट्र-संघाच्या बैठकींत अगाऊ बरेच दिवस सेक्रेटरीनीं तयार करून छापवून ठेवलेलीं भाषणें, निरनिराळ्या राष्ट्रांचें प्रतिनिधी मोठ्यानें वाचून दाखवितात. तेव्हां त्यास वाचनमंदिर ( Reader's Club ) हीच संज्ञा अधिक शोभते.

---

+ "Man is what he eats and drinks and breathes. There is too much eating and drinking and too little breathing at Geneva. I doubt if Genva errs in this respect any more than any other great political centre. Its record is probably rather better. But even the shortest sojourn at a disarmament conference makes one feel that the world will never know peace, until it is run by vegetarians and until its businenss is conducted in the open air."

—*Cry Havoc.*

# महायुद्धें थांबतील—
# पण केव्हां ?

ग्रंथ संग्रहालय.
ता.
ठाणे.

मनुष्याचा खरा प्रतिस्पर्धी निसर्ग. दुष्काळ, रोग, सांथी, इत्यादींशीं झुंझून मनुष्यानें निसर्गावर विजय मिळविला. मात्र दैवाचा डाव असा उलटा पडला कीं ज्या कला आणि शास्त्र यांच्या जोरावर त्यानें निसर्ग जिंकला, त्याच गोष्टी त्यांच्या निर्मात्यावर पूर्णपणें उलटल्या. वाळला दुष्काळ गेला अन् ओला दुष्काळ आला. म्हणून कांहीं मनुष्याची उपासमार टळत नाहीं ती नाहींच. यालाच म्हणतात आर्थिक हलाखी. पण ही आणली कोणी ? मनुष्यानेंच ना ! आधिभौतिक शास्त्रामुळें जगांत यांत्रिक युग अवतरलें आणि त्यामुळें कच्च्या पक्क्या मालाचे उत्पादन अमर्याद वाढवून ही आपत्ती मनुष्यानेंच ओढवून घेतली. रोगराई व सांथी इत्यादिकांच्या तडाख्यांतून मनुष्य बचावला. पण त्याहिपेक्षां सहस्रपटीनें त्याचें चंदन उडविणाऱ्या महायुद्धाच्या सपाट्यांत तो चांगलाच सांपडला.

पण मी म्हणतो या सर्वांचें खापर आधिभौतिक शास्त्राच्या डोक्यावर फोडण्यांत काय हंशील आहे ? वाटल्यास माणसानें आपल्या कर्मास बोल लावावा. आधिभौतिकशास्त्र काय बिचारें नैतिकदृष्ट्या अकर्मकच ( Neutral ) आहे. ज्याप्रमाणें त्याचा बरावाईट उपयोग माणसानें करून घ्यावा त्याप्रमाणें त्याचें फल त्यास मिळणार. त्याच शास्त्राच्या आधारावर मनुष्यानें आपलें जीवन सुखमय, सौंदर्यपूर्ण आणि कलात्मक करून घेतलें ना ! शास्त्रांतील प्रत्येक नवीन शोधामुळें निसर्गांतील रहस्यें त्याला समजलीं; आणि त्याबरोबर त्याच्या हातांत अधिक सत्ताहि आली. पण त्या सत्तेचा दुरुपयोग करून मनुष्यानें आपलें जीवन कष्टप्रद व दुःखमय करून घेतलें तर त्या बिचाऱ्या शास्त्रानें काय रडावें ? तरीपण आधिभौतिक शास्त्रानें युद्धविषयक शास्त्रांत अजब व अतर्क्य अशी क्रांती करून सोडली आहे हें मात्र निर्विवाद. किंबहुना

सध्यांच्या युद्धांतून सैनिक अगर जीवावर उदार होऊन लढणाऱ्या स्वयंसेवकांपेक्षांहि, नवनवीन आसुरी शस्त्रास्त्रें निर्माण करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या प्रतिभेवरच यशापयश बहुतांशीं अवलंबून राहिलें आहे. भावी महायुद्ध मनुष्यजातीचा मोठ्या प्रमाणावर निव्वळ संहार करून थांबणार नसून, तें संस्कृतीचाहि बळी घेणार इतकें स्पष्ट दिसूं लागलें आहे.

पण यांत खरी चूक माणसाचीच आहे. आधिभौतिक शास्त्रास दास बनवून त्याच्याकडून सेवाचाकरी करून घेण्याऐवजीं, त्याला सिंहासनावर बसवून माणसानें त्याचें दास्यत्व पत्करलें, तर ही अवस्था का नाहीं येणार? मनुष्य आणि यंत्र यांमधील हा सत्तेकरितां लढा आहे. यांत्रिक साधनांचें आपल्या जीवितामधील निश्चित स्थान कोणतें, हें मनुष्यानें न जाणल्यामुळेंच हा घोंटाळा उत्पन्न झाला आहे. प्रत्येक नवीन यंत्राचा मनुष्याच्या जीवनावर थोडाबहुत बरावाईट परिणाम होणार हें खरें. यंत्रामुळें मनुष्याच्या अनिर्बंध हालचालींवर नियंत्रण बसणार हेंहि मान्य. पण त्यामुळें मालक व चाकर यांच्या कार्यांची अदलाबदल होतां कामा नये! मनुष्यानें धनीपणा गाजविण्याचें सोडलें आणि तो यंत्राच्या हवालीं केला यांतच या सर्व अनिष्टाचें मूळ सांपडतें. कारण मानवी हित हेंच आधिभौतिक सुधारणांचें ध्येय राहिलें म्हणजे हें कोडें उलगडणार. मानवी हित कुजवून नासवून टाकणाऱ्या सुधारणा मनुष्यानें दूर फेकूनच दिल्या पाहिजेत.

## निसर्गाकडे चला

पण याला आतां उपाय काय हा प्रश्न राहिलाच! ज्याअर्थी या शास्त्रानें मनुष्यावर अनर्थपरंपरा आणली त्याअर्थी त्याचा सर्वस्वी त्याग करून पुनः निसर्गाशीं मिळतें घेणें हा एक मार्ग. निसर्गावस्थेंतील साधें, सोपें व सात्विक जीवन स्वीकारणें हाच एक तरणोपाय. या शिकवणीचे भोक्ते टॉलस्टॉय आणि म. गांधी हे दोन वंदनीय महापुरुष जगप्रसिद्धच आहेत. "निसर्गाकडे चला" हा उपदेश ठीक आहे. दिसायलाहि सोपा व गोंडस आहे. पण आचरण्यास मात्र असिधाराव्रताप्रमाणें कष्टप्रद आहे. नवीन युगांतील सर्व सुखसोई, सौंदर्य व कलात्मक दृष्टी या सर्वांचा त्याग करण्यास

ही दिव्य दृष्टी लाभल्यावर खालील गोष्टी घडून येण्यास कितीसा वेळ लागेल?

(१) अधिभौतिक शास्त्राच्या प्रगतीस खीळ बसणें. (मृत्युचीं नवीन हत्यारें शोधून काढणाऱ्यांना हल्लीं जें उत्तजेन मिळतें तें बंद झालें पाहिजे.)

(२) राष्ट्रांतील युद्धखातें बंद होऊन त्याजागीं संरक्षण खातें निर्माण होणें.

(३) स्वसंरक्षणास जरूर तेवढेंच सैन्य आणि शस्त्रास्त्रें प्रत्येक राष्ट्रानें बाळगणें.

(४) शक्य तर सैन्याचें उच्चाटन होऊन त्याजागीं पोलिसांची योजना होणें. सैनिक आणि पोलिस यांच्या कार्यक्षेत्रांत महदंतर आहे. हातांत कायदा घेणाऱ्यांना सैन्य मदत करतें, पण पोलिस हातांत कायदा घेणाऱ्यांना शिक्षा करतात. अशा तऱ्हेच्या पोलिसांच्या सहाय्यानें आंतरराष्ट्रीय कायद्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे.

(५) युद्धास प्रवृत्त करणारा चालू शिक्षणांतील भाग सर्वस्वीं गाळून अशा प्रकारची नवीन दृष्टी व वळण तरुण पिढीस मिळण्याची सोय शिक्षणद्वारें व्हावयास पाहिजे.

\+ + +

पण मानवजातीनें ही युद्धप्रवृत्ति सोडली नाहीं, आणि युद्धाची हकालपट्टी जगांतून केली नाहीं तर एक दिवस जगावर प्रलयकाल ओढवेल आणि मानवजातीचा त्यामुळें समूळ नाश झाल्याशिवाय रहाणार नाहीं.* मग तो दिवस आणखी एखादें महायुद्ध पेटून येवो वा हल्लीं चाललेल्या स्पॅनिश लढ्याप्रमाणें अगर चीन–जपान लढाईप्रमाणें लहान लहान लढाया होऊन येवो.

———

* If humanity does not end war, war will end mankind.

## महायुद्ध होणार काय ?

१९३८ सप्टेंबर महिन्याच्या २८ कीं २९ तारखेची गोष्ट. मी पुण्याला आगगाडीनें निघालों होतों. सातारा स्टेशनवर आमच्या डब्यांत एका उतारूनें प्रवेश केला. या दिवशींचें वातावरण सर्वांच्या परिचयाचें आहे. जर्मनीनें पांच दिवसांची मुदत देणारा निर्वाणीच खलिता झेकोस्लोव्हाकियास धाडल्यामुळें सर्व जगभर एकच खळबळ माजून राहिली होती. चोहोंकडून वादळी हवा पडावी, काळ्याकुट्ट ढगांनीं आकाश वेढलें जावें, चम्चम् विजा लखलखाव्यात आणि थोड्याच वेळांत सोसाट्याचा वारा सुटून मुसळधार पाऊस पडणार या भयानें अखिल प्राणिमात्र संत्रस्त व्हावा, त्याप्रमाणें हें महायुद्धाचें होमकुंड कोणत्या क्षणाला पेटून, मानवजातीवर प्रलयकाल ओढवणार या एकाच विवंचनेंत प्रत्येकजण होता. मोठमोठ्या मुत्सद्यांची धांवपळीनें तारांबळ उडाली होती. मग सामान्य माणसाचें मन युद्धविषयक विचारांनीं बेचैन झालें तर त्यांत काय आश्चर्य ?

त्या प्रवाशानें बराच वेळ माझ्याकडे टक लावून पाहिल्यावर एकदम उठून तो माझ्याजवळ आला, बसला आणि मला ओळखल्यासारखा आविर्भाव चेहऱ्यावर आणून म्हणाला, " काय हो, युद्ध सुरू होणार काय ? "

हा वेळपावेतों हातांतील वर्तमानपत्र वाचित असल्याचें सोंग करून त्या प्रवाशाची हालचाल मी बारकाईनें निरीक्षण करीत होतों. त्याच्या या प्रश्नाच्या धक्क्यानें मात्र मी चकितच झालों ! तरी पण तेंच सोंग कायम ठेवून उत्तर केलें, " हें पाहा, युद्ध करणारे मुत्सद्दी निराळे आहेत. त्यांच्या मनांतलें जाणणारा मी कांहीं मनवडा नाहीं. अन् शिवाय युद्ध होणं वा न होणं माझ्या मतावर थोडंच अवलंबून आहे ! "

दा. क्र. ५८५८
५१

"तें असू द्या हो. तुम्ही थोडा या विषयाचा अभ्यास केला आहे म्हणून आपला विचारतों. माफ करा तसदीबद्दल. एकंदर कुंडलींतील सध्यांचा योग तरी काय हें सांगाल का?" त्यानें पुन्हा प्रश्न टाकला.

वर्तमानपत्र एका बाजूस फेंकून मी म्हणालों, "मी कांहीं ज्योतिषी नाहीं. शिवाय कुंडली आड धरून एखादं होणारं लग्न फार तर मोडतां येईल; पण होणारं युद्ध मात्र टाळतां येणार नाहीं. कारण युद्ध करणारीं राष्ट्रें आपापल्या कुंडलींतील ग्रहमान पाहून पाऊल टाकीत नाहींत. तथापि या भूमितलावरील ग्रहाप्रमाणं बलवान, पराक्रमी आणि तेजस्वी मुत्सद्द्यांच्या हालचालींवरून आणि त्यांच्या सामर्थ्याविषयीं मीं बांधलेल्या अंदाजावरून थोडंफार भविष्य वर्तवितां येईल. आपली ऐकण्याची इच्छा असल्यास सांगतों."

"हो हो, सांगा कीं! अवश्य सांगा."

"हें पाहा, सध्यां युद्ध होत नाहीं." हें एकच वाक्य निश्चयात्मक स्वरांत बोललों.

तो आ वांसून माझ्याकडे पाहातच राहिला! युद्ध होणार असेंच मी नक्की सांगणार अशी त्याची कल्पना. कारण सर्व जगभर युद्धास अनुकूल असा सूर वाहत असतांना माझ्यासारख्या महात्म्यानें तें होणारच नाहीं असें निश्चयात्मक सांगितलें तर कां नाहीं त्याला आश्चर्य वाटणार?

"अहो, असं आश्चर्यानं काय पाहातां माझ्याकडे! आपणाला माझं मत बरंचसं चमत्कारिक वाटेल खरं; पण त्याला माझा नाइलाज आहे. माझ्या म्हणण्याचा इत्यर्थ इतकाच, कीं या झेकोस्लोव्हाकियाच्या प्रकरणीं सध्यां तरी युद्ध होत नाहीं, असं माझं ठाम मत आहे."

"या मताच्या पुष्टयर्थ आपण कांहीं कारणं सांगू शकाल काय?" त्यानें मला पुन्हां डिवचलें.

"हो, पण थोडक्यांत बरं का. काय वाटेल तें करून हें युद्ध टाळण्याचा प्रयत्न इंग्लंड खात्रीनें करणार. कारण सध्यां इंग्लंडची युद्धाची तयारीच मुळीं नाहीं. जगाच्या कुठल्याहि कोपऱ्यांत खुस् झाल्याबरोबर गुरगुरणारा सिंह, शेपटी कितीहि मुरगळली तरी स्तब्ध कां आहे? आतां

फक्त ती शेपटी तोडण्याच्या बेतानंच कोणी अंगावर चालून आला तर मात्र नियम सांगवत नाहीं. म्हणून मला असं वाटतं, कीं कसल्याहीं अपमानास्पद स्थितींत इंग्लंड निर्लज्जपणें तडजोड घडवून आणवील. प्रसंगविशेषीं झेकोस्लोव्हाकियाच्या स्वातंत्र्याचा होमसुद्धां त्यापायीं करील, पण युद्ध टाळील. मग युद्ध टळेल कीं नाहीं तुम्हीच सांगा ! ”

“ हो, खात्रीनं टळेल. ” असें म्हणून तो हंसला आणि पुन्हा म्हणाला, “ मग काय हो, जर्मनीच्या चढेल वर्तनाला कोणींच कसा लगाम घालूं शकत नाहीं ? ”

“ त्याचं असं आहे, कीं जर्मनीचं वर्तन चढेलपणाचं वाटतं याचं कारण तुमची दृष्टी थोडीशी पूर्वग्रहदूषित आहे. व्हर्सायलचा तह हा एक मोठा न्यायाच्या पायावर जगाची केलेली विभागणी व सर्व जातींच्या लोकांच्या स्वातंत्र्याची न्याय्य मागणी परिपूर्ण करणारा करारनामा, असं तुम्ही गृहित धरून चालतां हेंच मुळीं चुकीचं आहे. व्हर्सायलचा तह म्हणजे न्याय्याचे धिंडवडे आणि लुटीप्रमाणं अन्यायानं युरोपांतील साम्राज्यवादी राष्ट्रांनीं पराभूत राष्ट्रांची स्वार्थी हेतूनं केलेली चिरफाड होय. ह्याच अन्यायी तह जर्मनीला दुरुस्त करायचा आहे. आपल्या रक्त-मांसाचे केलेले तुकडे जर्मनी एकत्रित करूं इच्छितो, यांत काय चूक बुवा ?

“ अन्यायाचं परिमार्जन करण्यास एखादं राष्ट्र जिवावर उदार होऊन सरसावलं म्हणजे स्वार्थी कावळ्यांनीं कावकाव करून आकाश दण-दणून सोडावं त्यांतलाच सध्यांचा न्याय, लोकशाही, शांतता इत्यादि गंभीर, उदात्त शब्दांचा कोलाहल तुम्हांस ऐकूं येत आहे आणि म्हणून खरं-खोटं, स्वार्थी-निःस्वार्थी, न्यायान्याय इत्यादिविषयीं सर्वांची मति कुंठित झाली आहे. शिवाय चालू प्रकारापासून जर्मनी फार डोईजड होऊन; युरोपांतील राष्ट्राराष्ट्रांतील समबलत्वाचा तराजू फारसा बिघडेल, असंहि इंग्लंडला वाटत नाहीं. जर्मनीची सध्यांची चढाईची भाषा दमदाटीची आहे आणि त्यामागं खरं अवसान तितकंसं नाहीं हेंहि सर्वांना पुरेपुर माहीत आहे. पण या आंतरराष्ट्रीय दांडगाईला पद्धतशीर आळा एकोप्यानं कसा घालावा, हेंच कोणास सुचेनासं झालं आहे. सांधीच्या रोगामुळं शुक् शुकाट झालेल्या

गांवामध्यें ज्याप्रमाणं चोरांनीं व दरवडेखोरांनीं धुमाकूळ घालावा, त्याप्रमाणं सध्यांच्या अशांततेच्या आणि असंरक्षितपणाच्या वातावरणांत जर्मनीची ही पुंडाई चालू आहे आणि या परिस्थितीचाहि त्यास थोडाफार फायदा मिळत आहे. तेव्हां त्याला प्रतिबंध कसा करायचा हाच पेंच सध्यां सर्वांना पडला आहे! चोरांचा आणि दरवडेखोरांचा सळसुळाट झाला म्हणून ज्याप्रमाणं देशांतील राज्ययंत्र कोलमडून पडत नाहीं, त्याचप्रमाणं जागतिक शांतता एवढ्याच कारणावरून बिघडेल, असं अनुमान काढण्याला सध्यां तरी सबळ पुरावा खास दिसत नाहीं!" माझें लांबलचक पुराण मीं आवरतें घेतलें.

"पण काय हो, इंग्लंडनं या वेळीं थोडासा जोर धरून जर्मनीच्या मागणीला खडसावलं किंवा धुडकावलं, तर हें युद्ध टळून जर्मनी कांहीं काल तरी थंड बसेल असं नाहीं का तुम्हाला वाटत?" पुन्हा प्रश्न आलाच.

"या बाबतींत निश्चयात्मक सांगणं कठीण आहे बुवा! बहुतकरून अशा कठोर उत्तरामुळं जर्मनी थोडासा थंडावेल हें खरं, पण विषाची परीक्षा पाहायची कशी आणि कोणी? न जाणो, हा डाव हुकलाच तर स्वतःचं अंग नाहीं का होरपळून निघायचं? आणि हाच भयानक देखावा इंग्लंडला सध्यां भेडसावीत आहे आणि निर्लज्जपणा व लाचारपणा करण्यास भाग पाडीत आहे. शिवाय चालू परिस्थितींत जर्मनीबरोबर युद्ध पुकारून त्याचा पराभव करण्यापासून काय मिळणार आहे? सुरवंटाला मारल्याचंच श्रेय म्हणाना! ना मांस ना रक्त, ना हाडं ना कातडं! हाताला कुसळं बोचून अंगाची आग मात्र व्हावयाची! त्याप्रमाणं जर्मनीच्या पराभवापासून तथ्यांश कांहींसुद्धां व्हायचा नाहीं. १९१४ चं महायुद्ध इंग्लंडनं केलं याचं मुख्य कारण जर्मनीची व्यापारांतील स्पर्धा मारक होऊं लागली हें होय. आतां त्याची जागा जपाननं घेतली आहे. जर्मनीच्या स्पर्धेमुळं इंग्लंडची उपासमार होईल ही भीती बाळगण्याचं मुळींच कारण नाहीं. आणि इंग्लंड प्रथमतः आपल्या व्यापाराच्या स्थैर्याकडे मुख्यतः पाहणार!" मीं आपलें चऱ्हाट आटोपलें.

" तुमचं मत जरी थोडंफार बरोबर वाटत असलं; तथापि आपणाला नाहीं बुवा नीटसं पटत! मला तर निश्चित वाटतं, कीं इंग्लंडनं कितीहि मनधरणी केली; तरी जर्मनी युद्धाला अत्यंत उत्सुक आहे. तो कांहीं केल्या आपल्या डागलेल्या तोफा माघारीं घेणार नाहीं. " तो सचिंत चेहरा करून म्हणाला.

" मला नाहीं तसं वाटत. " मी पुन्हा ठासून म्हणालों.

" मग काय मारतां का पैज ? पाहा..." तोहि ठसकेबाज स्वरांत बोलला.

" हें पाहा, पैजेची भाषा कांहीं बोलूं नका! कारण कोणत्याहि पैजेंत मी अद्यापपावेतों यशस्वी झालों नाहीं. जुगारीला सर्वस्वीं प्रतिकूल असे ग्रह आहेत माझ्या कुंडलींत; त्याला मी काय करूं ? पण माझं आपलं एक सामान्य माणसाचं मत म्हणून मीं सांगितलं आहे; अन् वाटल्यास पाहा प्रचीति! मत कोणतंहि का असेना, बरोबर येतं कीं नाहीं हेंच महत्त्वाचं असतं, नाहीं का ? अर्थात् तुमचा अट्टाहासच असेल तर तुम्ही मनांत वाटेल तितक्याचीं पैज लावा आणि मीं जिंकली तर कृपा करून माझ्या पत्त्यावर ती रक्कम पाठवा. आणि मी हरलोंच तर पैज लावली नव्हती असं समजा अन् हात चोळीत बसा!" असें म्हणून मीं माझें पत्त्याचें कार्ड काढून त्याच्या हातावर ठेवलें. इतक्यांत पुढील स्टेशन आल्यामुळें तो लगबगीनें उठला अन् नमस्कार करून, आभार मानून खालीं उतरला.

यानंतर मला या प्रश्नोत्तरांचा पूर्णपणें विसर पडला. १ आक्टोबरला युद्ध टळल्याचें आणि शांततेनें व सामोपचारानें मिटल्याचें वृत्त वाचून मनाला थोडें बरें वाटलें; कारण माझ्या अटकळीप्रमाणें घडलें.

पण तीन तारखेला पाहतों तों पोस्टमन दहा रुपयांचीं मनिऑर्डर आणि एक लांबलचक माझ्या नांवाचा बंदिस्त लखोटा घेऊन आला. त्या सर्व प्रकारानं पुन्हा एकवार मला त्या दिवसाच्या संवादाची आठवण झाली. त्या इसमानें महायुद्धाच्या भीतीमुळें कडाडलेल्या बाजारांत सौदा करण्याचे चारपांच दिवस तहकूब केल्यामुळें हजार दोन हजार रुपयांच्या गंडांतरांतून आपली सुटका कशी झाली, याचें साद्यंत वर्णन केलें होतें आणि

दक्षिणा म्हणा वा पैजेची रक्कम म्हणा म्हणून, ही मनिऑर्डर पाठविली असल्याचें लिहिलें होतें.

यानंतर मात्र महायुद्ध होणार कीं न होणार या विचारचक्रास चांगलीच चालना मिळाली आणि जों जों मी त्याविषयीं विचार करूं लागलों तों तों मन क्षुब्ध होऊं लागलें, गुंगागुंतींत सांपडूं लागलें आणि विचारशक्ति कांहींएक विवक्षित मर्यादेपुढें कुंठित झाल्यासारखें वाटूं लागलें. महायुद्ध होणार काय? होणार असेल तर केव्हां आणि कोणां-कोणांमध्यें? या प्रश्नांच्या विचारमालिकेंत निश्चित असें मत बनविणें कसें शक्य नाहीं व त्या दिवशीं आपण अजाणतां ठोकून दिलेलें मत सुदैवानें वा दुर्दैवानें बरोबर ठरलें असलें तरी त्यामध्यें किती अनिश्चितपणा होता हें दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें. अजाणतां ठोकून दिलेलीं मतें आणि अचानक भावनावशतेनें केलेलीं बेफाम कृत्यें केव्हां केव्हां योग्य, बरोबर आणि शूर-त्वाचीं ठरतात असा नाहीं का अनुभव येत माणसांना? म्हणजे त्यांत अभिमान वाटण्यासारखें काय आहे? थोड्याशा विचाराच्या किरणांनीं गर्वाचें धुकें तेव्हांच नाहींसें होते!

तरीपण वरील प्रश्नांना साद्यंत उत्तर देण्याचें धाडस मी पुन्हा कर-णार आहे. महायुद्ध होणार काय आणि होणार असेल तर केव्हां, हा या प्रश्नाचा पूर्वार्ध आणि युद्ध झालेंच तर तें कोणाकोणामध्यें, त्यामध्यें जय-पराजय कोणाचा होणें संभवनीय आहे यांसंबंधींचा थोडाफार अदमास, हा या प्रश्नाचा उत्तरार्ध. वरील प्रश्नांविषयींचें कुतूहल हल्लीं समाजामध्यें फार उत्पन्न झालें आहे. कारण महायुद्धाच्या तात्त्विक कारणमीमांसेपेक्षां, महायुद्ध-विषयक वरील प्रश्नमालिकेविषयींच अधिक जिज्ञासा मनुष्यास असते. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या थोड्याफार व्यासंगाच्या जोरावरच हें सर्व भविष्य वर्तविण्याचा प्रयत्न मी करणार आहें.

महायुद्ध होणार काय? हा पहिला प्रश्न. याचें उत्तर थोडक्यांत असें, कीं चालू परिस्थितींत हा प्रश्नच मुळीं येऊं शकत नाहीं. कारण सुमारें चार वर्षांपूर्वीं युद्ध पुनश्च होणार नाहीं असा जो प्रवाह वाहत होता

तो आज साफ आटून गेला आहे. कारण गेल्या महायुद्धानें लोकशाहीच्या निर्वेध संचारासाठीं निर्माण केलेल्या जमिनींत पुन्हा सर्वसत्ताधिकाऱ्यांचीं काटेरी झाडें जोरानें फोंफावूं लागलीं. एवढेंच नव्हे, तर जगांतून युद्धांची हकालपट्टी करण्याच्या उदात्त हेतूचीहि पूर्ण विटंबना झाली आहे. हल्लींच्या परिस्थितींत युद्ध पुन्हां होणार नाहीं असा निर्वाळा देणारा शांततेचा उपासक एकहि राहिला नाहीं ही गोष्ट अगदीं निश्चित. शस्त्रसंन्यास, राष्ट्र-संघ, शांततेचे तह, सामुदायिक संरक्षण इत्यादि प्रयत्नांचा फोलपणा सर्वांच्या प्रत्ययास आला आहे.

तरीपण कांहीं महात्मे युद्धाची अशक्यता प्रतिपादन करितांना दिस-तात; त्यांची मात्र कींव करावीशी वाटते. त्यांचें त्या पुष्ट्यर्थ आवडतें कारण असें आहे, कीं गेल्या महायुद्धांत होरपळून निघालेल्या भावना अद्यापि बऱ्या झालेल्या नाहींत, युद्धांत झालेली सर्व प्रकारची हानि भरून निघालेली नाहीं, त्यांतच आर्थिक हलाखीच्या तडाख्यानें सगळेच विव्हळत आहेत.

अर्थात् युरोपचें स्वामित्व बळकावण्यास महायुद्धाचा जुगार खेळ-ण्याचें त्राण कोणत्याच राष्ट्रांत नाहीं.महायुद्धें फुकाचीं नसतात.तोफांतून आणि विमानांतून टाकावयाचे गोळे लोखंडाइतक्या हलक्या किंमतीचे नसतात, तर ते सोन्यापेक्षांहि अधिक मोलाचे असतात. आज चढाईचा आव दाखविणाऱ्या राष्ट्रांत तर सुवर्णाचा दुष्काळच आहे.

सर्वसत्ताधिकाऱ्यांच्या उदयानंतर राष्ट्रीय स्वयंपूर्णतेच्या नादीं लागून त्या राष्ट्रांनीं आपला परदेशचा व्यापार घटवून, बाहेरून सुवर्ण येण्याचा मार्ग कायमचा बंद केला आहे. राष्ट्रीय कर्जाचे डोंगर अगोदर दुप्पट-तिप्पट वाढल्यामुळें आणि मागील कर्जफेडीच्या वेळीं खांका वर केल्यामुळें, युद्धाच्या अडचणीच्या वेळीं दुसऱ्या राष्ट्रांकडून कर्ज मिळविण्याची भाषाच बोलावयास नको. अंतर्गत कारभारांतहि त्यांनीं राष्ट्रीय करांची परिसीमा गांठल्यानें, हीं सर्वसत्ताधिकारी राष्ट्रें सध्यां नादान नादारीच्या अवस्थेंत आहेत आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांत त्यांची कवडीचीहि पत राहिलेली नाहीं. अतएव, तीं राष्ट्रें महायुद्ध पुकारून स्वतःचेंच मरण स्वतःच्या हातांनीं ओढवून घेतील ही गोष्टच मुळीं अशक्य आणि असंभवनीय.

या म्हणण्यांत थोडाफार सत्यांश आहे हें खरें; पण दारिद्र्यामुळें आपापसांतील भांडणतंटे मिटले आहेत असें कधीं झालें आहे काय? लढाई सुरू करण्यास व चालू ठेवण्यास पैशांचा पाऊस पाडावा लागेल हे खरें; पण निराश आणि हताश झालेले आणि दारिद्र्यानें गांजलेले देश जर जिवावर उदार होऊन; शेजारच्या श्रीमंत राष्ट्रावर झडप घालूं लागले तर मग काय करणार? कधींहि न संपणाऱ्या नैराश्य आणि दारिद्र्य यांच्या डोंबांत निरंतर कुचंबण्यापेक्षां एकदांच सोक्षमोक्ष करून घेतलेला काय वाईट? शिवाय दरिद्री राष्ट्रांचें महायुद्धामुळें अधिक नुकसान तें काय होणार? झाला तर फायदा, नाहींतर दारिद्र्य आहेच आपल्या नशिबीं कायमचें! थोडक्यांत, पैसा नाहीं म्हणून राष्ट्रें युद्ध करण्याचें टाळतील हा सिद्धान्तच चुकीचा आहे.

दुसरा आक्षेप असा, कीं महायुद्धापूर्वी मालांनीं कोठारें भरगच्च भरून ठेवावीं लागतात. वसाहती काढून घेतल्यामुळें कच्चा माल राष्ट्रीय गरजासुद्धां भागविण्यास पुरेसा नाहीं हें मात्र खोटें. राष्ट्रीय स्वयंपूर्णतेच्या तत्त्वानें राष्ट्रांतील हरएक कच्च्या मालाचें उत्पादन भयंकर प्रमाणांत वाढलें असल्यानें, वसाहतींच्या मदतीच्या अभावीं अडण्याचें कारण नाहीं. १९१४ सालच्या युद्धांत लढाऊ राष्ट्रांनीं चार वर्षें तग धरलीच ना? तितकीं तयारी सध्यांहि खास आहे. ॲबिसीनिया-वरील स्वारीपूर्वी व नंतर इटलीच्या आर्थिक परिस्थितीच्या हलाखीविषयीं वर्तमानपत्रें फुकटच वेळींअवेळीं डांगोरा पिटत असत, पण काय झालें? ॲबिसिनिया सर्वच्या सर्व गिळंकृत करण्याच्या आड इटलीची हलाखी यत्किंचित्हि आली नाहीं.

तिसरा आक्षेप असा कीं राष्ट्राराष्ट्रांतील शांतता पाळण्याचे करारनामे युद्धाच्या आड येतील. एवढेंच नव्हे, तर खुद्द सर्वसत्ताधिकाऱ्यांच्या राष्ट्रांत आंतून युद्धविरोधी वातावरण प्रसृत झालेलें आहे. जुलमामुळें कामकरी वर्ग सर्वस्वी नाराज आहे. आंतरराष्ट्रीय करारनाम्यांना कागदांच्या चिटोऱ्याइतपतच महत्त्व सध्यां प्राप्त झालें आहे; तरी त्यामुळें लढाई थांबण्याचें कारण नाहीं. राष्ट्रांतील लोकांच्या विरोधाचा बागुलबुवाहि एका

क्षणांत नाहींसा करतां येण्यासारखा आहे. उत्तान, भावनोत्पादक आणि देशभक्तिपूर्वक दणकेबाज लेख-व्याख्यानांच्या प्रचारामुळें, कोठलीहि गोष्ट-फार काय मृत्यूसुद्धां लोकप्रिय करतां येण्यासारखा आहे. अर्थात् महायुद्ध होणार नाहीं ही विचारसरणीच मुळीं वेडगळपणाची आहे. ती सोडून देणें भाग आहे किंवा भाग पडेल.

याच्या उलट युद्धास अनुकूल अशा खालील गोष्टी आपल्या निदर्शनास प्रामुख्यानें येऊं लागल्या आहेत. निरनिराळ्या राष्ट्राभिमानाच्या लढ्यास पुन्हां एकदा ऊत आला आहे. मुसोलिनी आपल्या जुन्या रोमन साम्राज्याचें स्वप्न पुन्हा भूमितलावर स्थापन करण्यांत गर्क झाला आहे. तर जर्मनी उच्च आर्यन रक्ताची जात व संस्कृति यांचें अधिराज्य पृथ्वीवर स्थापण्याच्या महत्वाकांक्षेनें प्रेरित होऊन मध्ययुरोपांत धुमाकूळ घालीत आहे. बदमाष लोकांचा शेवटचा आधार म्हणजे देशभक्ति. त्याप्रमाणें हे सर्वसत्ताधिकारी डाकू देशभक्तीच्या उदात्त नांवाखालीं जगाचा नकाशा रोज बदलीत आहेत. जगाचा नकाशा एकदांचा बदलाबदली होऊन स्थिरावला म्हणजेच तो विकत घ्यावा, या एका स्कॉटिश माणसाच्या हास्योत्पादक उद्‌गारांचें कौतुक करावेसें वाटतें तें अशा वेळीं.

आर्थिक हलाखींतून डोकें वर काढण्यास याशिवाय त्यांना दुसरा मार्गच दिसत नाहीं. कच्च्या मालाच्या वसाहती पुन्हां एकवार पैदा करून सामाज्य स्थापावें; या गोंडस कल्पनेनें स्फुरण पावलेले सर्वसत्ताधिकारी, आज ना उद्यां महायुद्धाचें होमकुंड पेटाविणार यांत मुळींच संदेह वाटत नाहीं. कांहीं राष्ट्रांतील लोकांच्या मानसिक ठेवणीवरून; लोकशाहीचें राज्ययंत्र चालविण्यास अनुकूल परिस्थिति व लोकांची इच्छा त्या ठिकाणीं नाहीं हेंहि दिसूं लागलें आहे.

राष्ट्राराष्ट्रांतून उत्पन्न होणाऱ्या बंडाळ्यांना मर्यादित स्वरूप देणें दिवसेंदिवस कठीण होत चाललें आहे. उदाहरणार्थ, स्पॅनिश लढ्यांचा वणवा युरोपखंडांत इतरत्र लागूं नये म्हणून दोस्त राष्ट्रें अहर्निश झटत असतांनाहि; तो लढा त्या विविक्षित मर्यादेपुरताच चालूं देणें कसें अशक्य झालें आहे, हें पूर्णपणें अनुभवास येत आहे.

प्रत्येक राष्ट्र शस्त्रसंभार वाढविण्यांत अहोरात्र गुंतलें आहे. हीं शस्त्रास्त्रांचीं कोठारें तुडुंब भरलीं असतांना, कोणतें राष्ट्र त्यांच्या जोरावर दुसऱ्या राष्ट्रांवर चढाई करण्याची महत्त्वाकांक्षा धरणार नाहीं? कोठल्याहि राष्ट्राचें अंदाजपत्रक चाळून पाहा, तुम्हाला १९१४ च्या महायुद्धापूर्वीं होत असलेल्या लष्करी खर्चाची वाढ, दुपटीतिपटीनें स्वसंरक्षणाच्या भल्या नांवाखालीं; राजरोसपणें चाललेली आढळून येईल. हीं परजलेलीं शस्त्रास्त्रें एक दिवस मानवजातीचा कत्तलखाना उघडल्यावांचून कशीं राहतील?

\+ + +

अर्थात् जगांत पुनरपि महायुद्ध होणार हें नाकबूल करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. आतां प्रश्न इतकाच उरला, कीं तें महायुद्ध जर होणार आहे, तर तें केव्हां? यासंबंधीं मात्र विशिष्ट कालमर्यादा सांगणें कोणालाहि शक्य नाहीं. आणि तसें सांगून स्वतःची फजिती कोणीहि करून घेऊं नये असें माझें प्रांजल मत आहे.

पण तें उद्यांच सुरू होणार हें म्हणणें आतताईपणाचें आहे म्हणून मला पटत नाहीं. महायुद्ध होणार खरें पण तो दिवस यायला अजून पुष्कळ कालावधी आहे, कारण गेल्या महायुद्धांत भाजून निघालेलें अंग अद्याप बरें झालेलें नाहीं, झालेलें नुकसानहि भरून निघालेलें नाहीं, हें म्हणणेंहि मला पटत नाहीं. कारण हें म्हणणें फार दिरंगाईपणाचें वाटतें. म्हणजे थोडक्यांत, महायुद्ध उद्यांच होणार इतकें तें जवळ नाहीं, किंवा परवांच्या दिवशीं होणार इतकें तें दूरहि पण नाहीं. म्हणजेच उद्यां व परवां या दोन दिवसांच्या संधिकालावर महायुद्ध हटकून ओढवणार, हा त्याचा मथितार्थ.

यावर कांहीं वाचक त्रासून मला विचारतील, कीं हें काय प्रश्नाचें उत्तर देतां आहांत कीं आपली चेष्टा करीत आहांत! पण वाचकांनीं अशी गैरसमजूत करून घेऊं नये. कारण प्रश्नाची चेष्टा करण्याइतका तो पोरकट खास नाहीं; अन् वाचकांना रुष्ट करण्याची तर माझी मुळींच इच्छा नाहीं. वाचकांना वरील उत्तर विक्षिप्त वाटतें याचें कारण, त्यांचें लक्ष शब्दार्थाकडेच प्रामुख्यानें जात असून, भावार्थाकडे त्यांचा पूर्णपणें कानाडोळा

होत आहे. माझ्या दृष्टीनें वरील उत्तर योग्य, बरोबर आणि पुरेसें असेंच आहे. तें कसें हें मी आतां थोडक्यांत स्पष्ट करून सांगतों.

उद्यां व परवां या दोन दिवसांची जी कालमर्यादा मानवी आयुष्यांत मानली जाते, त्या मानानें राष्ट्रांच्या आयुष्यक्रमांत ती कालमर्यादा निदान वर्षांनीं तरी मोजावयास हवी; आणि वरील उत्तरांत दिवसाचें वर्ष झालें तर तें भविष्य वाचकांना पटलेंच पाहिजे.

\+ \+ \+

कांहीं लोकांच्या मतें महायुद्ध आजच चालू आहे. कारण महायुद्ध-रूपी सांथीचा फैलाव आजला फक्त चीन आणि स्पेन या एवढ्या दोन देशांपुरताच मर्यादित झालेला असला, तथापि जगांतील लहानथोर राष्ट्रें त्यामध्यें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या अहमहमिकेनें भाग घेत आहेत. यापेक्षां महायुद्धाला आणखी काय निराळीं शिंगें असतात ? कारण चालू दोन्हीहि लढ्यांत जागतिक राष्ट्रें कोणत्या ना कोणत्या तरी दृष्टीनें गुंतलीं असून, त्यांतील जयापजयावरच भावी गोष्टी बऱ्याच अंशानें अवलंबून आहेत.

पण चीनच्या व स्पेनच्या चालू लढ्यांना आंतरराष्ट्रीय भडक स्वरूप देण्यास माझें मन धजत नाहीं. कारण चालू लढ्यांत जर्मनी, इटली, रशिया यांसारखीं राष्ट्रें आपुलकीनें भाग घेत आहेत, याचें कारण, निव्वळ स्वतःच्या तत्त्वांचा ऊर्फ फॅसिझमचा किंवा कम्युनिझमचा पुरस्कार करावा हें नाहीं. फॅसिझम आणि कम्युनिझम या दोन तत्त्वांमध्यें जरी सध्यां लढा जुंपलेला असला, तथापि केवळ या दोन तत्त्वांनीं प्रेरित होऊन तीं राष्ट्रें चालू लढ्यांत भाग घेत आहेत, हें म्हणणें तितकेंसें पटत नाहीं. साम्राज्यलोभानें धुंद झालेल्या राष्ट्रांचा हा खरा नंगानाच आहे. त्या त्या राष्ट्रांतील जनते-कडून राज्यसत्तेविरुद्ध असंतोषाचें विष पसरवून बंडाळी निर्माण करणें, बंडवाल्यांच्यातर्फे पण फॅसिझमच्या पुरस्कारासाठीं आणि लोक-शाहीच्या नरडीस नख लावण्यासाठीं सैनिक, शस्त्रास्त्रें, दारूगोळा इत्यादि पद्धतशीर पुरवून तें राज्ययंत्र कोलमडून पाडणें आणि तो प्रदेश आपल्या घशाखालीं कायदेशीर पद्धतीनें उतरविणें, हाच त्यांचा उद्देश आपणास

दिसून येईल. न जाणों, अपयश आलेंच तर निदान आपापले नवनवीन संहारक शास्त्रीय शोध कसास लावून पाहण्याची संधी तरी ते पदरांत पाडून घेत आहेत.

आपलीं अभिनव संहारक शस्त्रास्त्रें कशीं काय परिणामकारक होतात हें परस्पर ' हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ' या न्यायानें दुसऱ्या लोकांवर चालवून पाहण्याचा सध्यांचा त्यांचा यत्न आहे. उदाहरणार्थ, कांहीं विषारी वायूंचे परिणाम काय काय व कितपत होतात हें पाहण्यासाठीं वरील युद्ध-भूमीवर त्यांच्या उपयोगानें होणाऱ्या दुष्परिणामांची यादी तयार करण्याची स्तुत्य (?) कामगिरी वरील चढाऊ राष्ट्रांतील संशोधक करीत आहेत आणि युद्धभूमीवरून त्या हवेच्या बाटल्या भरून, संशोधनार्थ रवाना होत आहेत.

कांहीं लोकांच्या मतें जागतिक महायुद्धाच्या डांबरी सुरुंगास एका बाजूनें स्पेन व दुसऱ्या बाजूनें चीन, अशा दोन वातीच्या टोकांना अग्नि लागला असून, या सर्वांचा स्फोट दारूनें ठेंचून भरलेल्या मध्य–युरोपांत होणार आहे. पण हेंहि म्हणणें तितकेंसें पटण्यासारखें नाहीं. कारण स्पेन-मधील वात युरोपच्या कोठारास भडाग्नि न देतां, जवळ जवळ संपूर्ण जळून विझत आली आहे. त्यामध्यें लढण्याची हौस दोनतीन राष्ट्रांनीं फेडून घेतली हें खरें; पण या पलीकडे त्या लढ्याचा प्रसार इतर देशांत होईल, असें सध्यां तरी दिसत नाहीं. चीनचा जवळ जवळ जपाननें ॲबिसिनिया केलाच आहे. पण हा लढा मात्र काय करील हें सांगवत नाहीं. कदाचित् जागतिक युद्धाला तो चालना देईल असें वरचेवर वाटतें खरें.

म्हणूनच म्हणतों, कीं चालू परिस्थितींत अमुकच वेळांत महायुद्ध होईल असें सांगणें धाष्टर्याचें आहे. आंतरराष्ट्रीय राजकारण सध्यां इतकें गढूळ झालें आहे, कीं चांगल्या मी मी म्हणणाऱ्या मुत्सद्द्यांनाहि तें सारखें भांबावून सोडीत आहे, त्यांनादेखील पुढील मार्ग दिसेनासा झाला आहे, मग इतरांचा त्यापुढें काय पाड ?

पण अशा काळ्याकभिन्न काळोखांतून इंग्लंडनें मात्र थोडासा मार्ग काढला आहे. ' अशुभस्य कालहरणम् ' या दृष्टीनें इंग्लंडनें आजचें मरण

उद्यांवर ढकललें असें पुष्कळ लोक म्हणतात व तें खरेंहि आहे. मध्य-युरोपच्या भानगडींत फारसें लक्ष घालवयाचें नाहीं हेंच त्याच्या राजकारणांतील सूत्र. पण त्यामुळें जगभर, विशेषतः ब्रिटिश साम्राज्यांत आणि त्याहूनहि इंग्लंडांत, उद्यांच महायुद्धाचा यज्ञ सुरू होणार म्हणून जो दुर्दम संदेह वाटत होता तो मात्र दूर झाला. ऑस्ट्रिया गिळंकृत करण्यास इंग्लंडची मान्यता आणि झेकोस्लोव्हाकियाच्या गिळंकृत प्रसंगीं आगाऊ जाहीर केलेली इंग्लंडची मुग्धता, हाच हेतु दर्शवितात.

तरी पण हा हुकूमशहाबरोबरीचा तह फार काल टिकेल असें कोणीहि समजूं नये. कारण वसाहतीच्या बाबतींत आतांच इंग्लंडबरोबर कुरघोडीचें बोलणें जर्मनीनें सुरू केलें असून, इंग्लंडला एक वसाहती तरी देणें भाग आहे किंवा दुसरें त्या वसाहतीच्या लोभानें, मध्ययुरोपांत जर्मनीस धांगडधिंगा घालण्यास पूर्ण मुभा तरी देणें भाग आहे; हें स्पष्ट दिसतें. आणि यांपैकीं दुसरें धोरण इंग्लंड स्वीकारील असें अनुमान काढण्यास बरीच जागा आहे.

आजला इंग्लंडची दुसऱ्यासाठीं लढण्याची इच्छा नाहीं आणि लढण्याचें सामर्थ्यहि नाहीं. याच दोन्ही गोष्टी थोड्याफार प्रमाणांत इतर सर्व प्रबळ राष्ट्रांना लागूं आहेत. दुसऱ्याकरितां आपल्या जातबांधवांचें रक्त सांडण्यास, दुसऱ्यासाठीं महायुद्धाच्या होमकुंडांत पडून बळेंच सर्वांग होरपळून घेण्यास आणि आपला प्रान्त बेचिराख आणि निर्जन करून घेण्यास, कोणतेंहि शहाणें राष्ट्र येथून पुढें तयार होणार नाहीं. प्रत्यक्ष आपल्या जिवावर बेतल्याशिवाय किंवा तसें बेतेल इतकें नक्की दिसल्याशिवाय, दुसऱ्यासाठीं आपला प्राण धोक्यांत घालण्यास इतःपर कोणीहि सज्ज होणार नाहीं. इंग्लंडचे मुख्य प्रधान चेंबर्लेनसाहेब स्पष्टपणें एकदां म्हणाले आहेत, कीं आधीं संरक्षण मायभूमीचें, नंतर वसाहतींतून कच्चा माल आणणाऱ्या वाहतुकीच्या साधनांचें आणि शेवटीं वसाहतींचें. हा जो क्रम त्यांनीं दिला आहे तो त्यांचें धोरण स्पष्टपणें दाखवितो. एवढेंच नव्हे, तर स्वराष्ट्रसंरक्षणाच्या दृष्टीनें तें इष्ट व बरोबरहि आहे.

अर्थात् वरील सर्व धोरण सध्यांच्या अनिश्चिततेच्या कालांत आणि युद्धानुकूल तयारीच्या अपूर्णावस्थेंत आंखण्यांत आलेलें आहे. प्रत्येक राष्ट्र

आपलें लढाऊ सामर्थ्य भयंकर व बेसुमार वाढवीत आहे. त्यामुळें आणखी थोड्या दिवसांनीं जगांतील प्रमुख राष्ट्रें युद्धोपयोगी शस्त्रसंभारानें प्रबल झालीं कीं मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय आक्रमणास प्रारंभ होण्यास मुळींच हरकत पडणार नाहीं.

हुकूमशहांना आपलें चढाईचें धोरण सोडून देणें शक्य नाहीं. एरवीं हुकूमशहांची राज्यसत्ता स्थिरत्व पावणार नाहीं. सत्ता टिकविण्यास त्यांना नेहमीं हालचाल करणें भाग आहे. अशा हालचालीमुळें त्यांचें राष्ट्रांतील वर्चस्वाचें बूड स्थिर राहूं शकतें आणि याकरितांच ते आपल्या राष्ट्राचा जीव धोक्यांत घालतील असा रंग दिसतो. या हुकूमशहांच्या गट्टीविरुद्ध युरोपांतील इतर लोकशाहीप्रधान राष्ट्रांची एक सामर्थ्यवान फळी निर्माण होत असून, त्या दोघांमध्यें होणारा झगडा जागतिक कलहाचें स्वरूप घेईल असें वाटतें. शिवाय हुकूमशहांच्या अमदानींत होणाऱ्या अनन्वित छळामुळें प्रत्यक्ष स्वदेशांतच त्यांच्या अप्रियतेस प्रारंभ झाला आहे. फुलपांखरांना पकडून त्यांचे पंख उपटून त्यांना मारण्याचें दुष्ट व्यसन ज्याप्रमाणें कांहीं मुलांना असतें, त्याचप्रमाणें या हुकूमशहांना परदेशांतीलच नव्हेत, तर स्वदेशांतील स्वकीय बायका, पोरें, वृद्ध इत्यादींनाच नव्हे, तर तरुणांनासुद्धां ठार मारण्याचें व्यसनच लागलेलें असतें. कारण यांना स्वतःच्या जीविताविषयीं तर शंका असतेच; शिवाय राष्ट्रामध्यें स्वतःच्या सत्तेविरुद्ध दुसरा पक्ष ठेवावयाचा नाहीं असा त्यांनीं विडा उचललेला असतो.

युरोपांतील खरा लढा रशियाच्या तत्त्वज्ञानाभोंवती घोंटाळत आहे. कम्युनिझमचा बागुलबोवा भांडवलशाही राष्ट्रांना भेडसावीत आहे. या कम्युनिझमला आळा घालण्यासाठीं हुकूमशहा अवतरले पण त्यांनीं कम्युनिझम बरा म्हणावयाची पाळी आणली आहे. हल्लीं कम्युनिझमचा प्रसार थोडाकाल स्थिरावलेला दिसत आहे आणि त्यामुळेंच हुकूमशाहीचा अंमल वाढूं लागला आहे. अर्थशास्त्रांतील नाण्यासंबंधींच्या सुप्रसिद्ध ग्रेशम्सच्या नियमाप्रमाणें–समाजांत चांगलीं व वाईट नाणीं चालू असलीं कीं वाईट नाणींच प्रचारांत राहून, चांगलीं नाणीं प्रत्येकजण गंगाजळींत

ठेवितो, त्याप्रमाणें–वाईट व जुलमी हुकूमशाहींचीं राज्ययंत्रें, चांगल्या सुव्यवस्थित लोकशाही राज्ययंत्राची हकालपट्टी करून; त्यांची जागा घेत आहेत, असा देखावा सध्यां दिसत आहे. किंबहुना ज्या लोकशाहीस स्वतःच्या अस्तित्वाचें संरक्षण करतां येत नाहीं, त्यास मुळीं या जगतांत जगण्याचाच अधिकार नाहीं, त्यांची हकालपट्टी करा, अशीही बेपर्वाईची भाषा सध्यां ऐकूं येऊं लागली आहे.

इंग्लंडचे राजकारणांतील वर्चस्व व धाक हीं तर पार लयास गेलीं आहेत. परवांच्या झेकोस्लोव्हाकियाच्या प्रकरणापासून इंग्लंडची अब्रूहि नाहींशी झाली असें लॉइड जॉर्जसारख्या प्रसिद्ध मुत्सद्यानें उद्गार काढले आहेत. कारण त्यामुळें युरोपांतील लहान लहान राष्ट्रें स्वसंरणार्थ इंग्लंड–फ्रान्स–रशिया यांच्या कमकुवत फळीस सोडून रोम–बर्लिन–ॲक्सिसशीं आपलीं नातीं जुळवूं लागलीं आहेत. त्यामुळें हुकूमशाही राजवटींना भलतेंच महत्त्व प्राप्त झालें असून, युरोपच्या भवितव्याविषयीं प्रत्येक इसम साशंक झाला आहे.

तरीपण ही चालू परिस्थिति फार काळ अशीच राहील, आंतरराष्ट्रीय गाडा त्याच दिशेनें पुढेंहि चालेल असें मात्र वाटत नाहीं. त्यामध्यें एकदम विलक्षण फेरबदल होणार हें उघड दिसत आहे. एका बाजूनें हुकूमशहांच्या विरुद्ध बाहेरील राष्ट्रांच्या सामर्थ्यवान फळीचा शह आणि अंतस्थ त्यांच्या अप्रियतेचा कळस, या संधिकालावर महायुद्ध व अंतस्थ बंडाळीं हीं दोन्हीहि एकाच वेळीं पेटून, युरोपची राखरांगोळी उडणार असें दिसूं लागलें आहे. आणि माझ्या वरील उत्तरांत; उद्यां आणि परवां यांचा जो संधिकाल मीं सांगितला तो हाच, कीं ज्या दिवशीं या हुकूमशहांना आपल्या पापांचा झाडा, सुवर्ण आणि तोफा या स्वरूपांतच द्यावा लागेल.

———

# युरोपच्या–
# राजकारणांतील धागेदोरे

युरोपांतील असंतोष धुमसत होता, तो आतां पेटूं लागला आहे. अपथ्यकारक गोष्टींनीं इतिहासास अत्यंत वेगवान अशी अप्रिय कलाटणी लवकर मिळणार, असें स्पष्ट दिसूं लागलें आहे. फॅसिझम एका टोंकास आणि कम्युनिझम दुसऱ्या टोंकास; या दोहोंच्या ओढाताणीमध्यें युरोपचा नकाशा चिरकणार, फाटणार, आणि कदाचित् त्याच्या चिंधड्याहि उडणार असा रंग आला आहे.

जागतिक शांततेच्या सोज्वळ नांवाखालीं हल्लीं चाललेले राष्ट्रा-राष्ट्रांतील करारनामे, प्रांतांची पुनर्विभागणी आणि शस्त्रास्त्रांची कडेकोट, तयारी यांवर किती काळ जनता फसली जाईल ! आंतरराष्ट्रीय भित्रेपणाला आणि ढोंगीपणाला कांहीं एक मर्यादा आहेच. सर्व राष्ट्रें महायुद्धाचा काल दर क्षणाला जवळ आणीत आहेत हें सत्य एखादें शेंबडें पोरहि सांगेल ! मग तें मुत्सद्दीगिरीच्या भाषेनें कसें लपलें जाणार ?

### अपेशी राष्ट्रसंघ

राष्ट्रसंघाची अवस्था म्हणजे काठी घेऊन बसलेल्या पांगळ्या पहारे-वाल्याप्रमाणें झाली आहे. 'आलों बघ' म्हणण्याच्या म्हणजेच सामाजिक; आर्थिक बहिष्काराच्यामागें असलेला पांगळेपणा सर्वांना समजून चुकला आहे. ब्रिटिश साम्राज्याप्रमाणें राष्ट्रसंघाची स्थिति शेळीच्या शेपटी-प्रमाणें शोचनीय झाली आहे. अंगावर बसलेल्या माशा तर त्याला झाडतां येत नाहींतच, पण स्वतःच्या लज्जेचेंहि रक्षण त्यास करतां येईना घडपणें ! दुबळ्या राष्ट्रावरील आक्रमणशील राष्ट्रांनीं त्याचे इतके वाभाडे काढले कीं, त्याचे हाल कुत्रे खाईना !

युरोपियन राष्ट्रांत साम्राज्यतृष्णा ही जन्मजातच आहे. असें म्हण-तात कीं, मनुष्याचें हृदय कोठें आहे हें फक्त सराईत बदमाष खुनी

इसमास बरोबर माहीत असतें. त्याप्रमाणें साम्राज्यवृद्धीस अनुकूल अशीं पृथ्वीवरील ठिकाणें शोधून काढून; त्यावर झडप घालून स्वाहाकार करण्याची विद्या, त्यांना कोणीं शिकवावयास नको. त्या चराऊ कुरणावर आपलें राष्ट्र पोसावयाचें ही त्यांची खरी राजनीति. मग अशा स्वार्थ-लंपट राष्ट्रांचा संघ अपेशी ठरूं नये; तर काय होईल ?

राष्ट्रांच्या नैसर्गिक कायदेशीर हक्कांना संरक्षण मिळावें, आपापसांतील तंटेबखेडे तलवारीच्या उपयोगाशिवाय मध्यस्थीनें मिटावे, लोकांच्या संस्कृतिवर्धक आकांक्षा पुऱ्या होऊन, चिरकाल शांततेनें जगाचें नंदनवन व्हावें, या उदात्त हेतूनें प्रस्थापित झालेल्या राष्ट्रसंघांतील राष्ट्रेंच जर एकमेकांचा प्राण घ्यावयास उठलीं, तर वरील उदात्त तत्त्वांची होळी करून त्यांची राख अंगास फांसण्याशिवाय मुळीं गत्यंतरच नाहीं. त्यांत बसणारीं राष्ट्रें तत्त्वानें समान ठरलीं, तरी त्यांचा आकार, संस्कृति, शिक्षण, परंपरा, लोक, भौगोलिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती यामध्यें सारखेपणा असणें शक्य नाहीं. आणि त्याहिपेक्षां अगोदरच साम्राज्यें बळकावून बसलेलीं राष्ट्रें आपल्या राष्ट्राचें व साम्राज्याचें ऐश्वर्य व वर्चस्व कायम राखण्याचा आपमतलबी प्रयत्न राष्ट्रसंघाच्या आड राहून करूं लागलीं, तर कसें चालावें ? त्यांत ज्या राष्ट्रांची गेल्या महायुद्धांत अपरिमित हानि झाली, वसाहती गेल्या, प्रदेश व लोक यांची चिरफाड झाली व त्यामुळें हतबल व निर्वीर्य झालीं, तीं राष्ट्रें त्यांतच किती काळ कुजत पडणार ? आणि त्या खाईत त्यांना कुजत ठेवण्याचा इतरांचा प्रयत्न, जागतिक शांततेच्या नांवाखालीं कसा लपला जाणार ? त्यास कोण ना कोण केव्हां तरी तोंड फोडणारच. मग तें इटली जर्मनी यांनीं फोडलें तर त्यांच्या नांवानें आरडाओरड करण्यांत काय हंशील ? गेल्या महायुद्धांत बाकीच्या दोस्त राष्ट्रांनीं आपापल्या लुटीचा भाग पदरांत पाडून घेतला, पण दोस्त राष्ट्रांच्या बरोबरीनें लढून स्वतःचें अपरिमित नुकसान सोसून घेतलेल्या इटलीस मात्र वांटा मिळाला नाहीं. म्हणून असंतुष्ट होऊन त्यानें ॲबिसिनियावर डोळा ठेवतांच जागतिक शांतता ढांसळलीच या साम्राज्य-वादी राष्ट्रांच्या मतें ! जर्मनीनें आपल्या रक्तामांसाचे अन्यायानें केलेले तुकडे एकत्रित करण्याचें धोरण जाहीर करतांच, जागतिक शांतता संपुष्टांत

[library stamp]

आणल्याचें खापर त्याच्या डोक्यावर! जपाननें चीनचा लचका तोडतांच, आलाच या साम्राज्यवादी राष्ट्रांना कळवळा!

## साम्राज्यवादी साधुसंत

पण मी म्हणतों या दीन दुर्बल राष्ट्रांचा पुळका येण्यापूर्वी या साम्राज्यवादी राष्ट्रांनीं; आपल्या पायाखालीं काय जळतें आहे याचा विचार कधीं केला आहे काय? त्यांनीं साम्राज्यें कमावलीं; पण तीं दोन शतकांपूर्वी म्हणून ते साधुसंत ठरले काय? इतर राष्ट्रांवर आक्रमण न करतां, साम्राज्य-लोभ यत्किंचित् न बाळगतां, थोडीशीहि क्रूरता न दाखवितां, आपसुखच तीं यांना लाभलीं असतील नाहीं का! या राष्ट्रांच्या साम्राज्यवृद्धीचा इतिहास जरासा चाळला तर आपली खात्री पटेल कीं,आज न्याय, शांतता, संरक्षण, इत्यादि गंभीर, गोड शब्दांची जपमाळ ओढीत बसणाऱ्यांचा हा इतिहास, मनुष्यजातीस काळिमा आणील अशा काळ्याकुट्ट कृत्यांनींच भरलेला आहे. त्या काळीं जी क्रूरता दाखविणें शक्य होतें तितकी त्यांनीं उपयोगिली. नाना तऱ्हेचे राजकीय लपंडाव ऊर्फ बदमाषगिरी करून, दुसऱ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याच्या नरडीचा घोट त्यांनीं घेतला आणि आर्थिक चरकांतून त्यांना अगदीं पिळवटून काढलें. आतांच ॲबिसिनिया, चीन, ऑस्ट्रिया यांचें स्वातंत्र्य नष्ट झालें म्हणून साम्राज्यलोभ वाढत चालला, जागतिक महायुद्धाचा भस्मासुर अवतरला असा टाहो फोडण्यापूर्वी, आपण दोन शतकांपूर्वी केलेल्या संभावित न्यायाचीं कृत्यें जरा त्यांनीं आठवावींत; म्हणजे ही भाषा तेव्हांच बंद पडेल.

ऑस्ट्रेलिया किंवा आफ्रिका या द्विखंडांत खनिज व वनस्पतिजन्य पदार्थांचा सांठा विपुल, आणि प्रदेश इतका विस्तृत कीं ज्यामध्यें कोट्यावधि लोकांची सोय लावतां येईल, तो मुलूख तुम्ही आपल्या पोराबाळांच्या कल्याणाकरितां राखून ठेवणार? तेथें इतरांना पूर्ण मज्जाव! मग इतर राष्ट्रांना साम्राज्यलोभ सुटून, आपल्या पोराबाळांची तरतूद करण्यासाठीं म्हणून कच्चा मालाचीं कुरणें हवींशीं व्हावींत, यांत त्यांचा काय दोष? आणि त्या निमित्तानें त्यांनीं छोट्या राष्ट्रांवर स्वारी केली कीं तुम्हांस छोट्या राष्ट्रांची कींव येते व चढाईखोर राष्ट्रांची चीड येते; नाहीं कां? सुडेटन लोकांवरील अन्याय तुम्हांस जाणवला, दुसऱ्यांच्या

डोळ्यांतील तें कुसळ जणूं तुम्हच्याच डोळ्यांत खुपल्याप्रमाणें अकांडतांडव तुम्हीं केलें, मग तुम्हच्या डोळ्यांतील मुसळें दुसऱ्यांनीं दाखविलीं; तर तुम्हांस चीड कां यावी ? आपण गलेलठ्ठ आहोंतच मात्र इतरांनीं चढाओढीनें गलेलठ्ठ होतां कामा नये, कां ? तर शांतता बिघडते म्हणे ! ठीक, मग तुम्ही आमच्याप्रमाणें किरकोळ व कृश व्हा, असा इतरांनीं आग्रह धरला तर त्यांत गैर काय ? उठल्यासुटल्या छोट्या राष्ट्रांचा कैवार घेण्याच्या सोंगावर परवां हिटलरनें चांगलाच ठोसला हाणला. छोट्या राष्ट्रांनाच तेवढे न्याय्य हक्कसंबंध आहेत. पण मोठ्या राष्ट्रांच्या न्याय्य हक्कांची वाट काय ? असा त्यानें सवाल टाकला, त्याचेंहि मर्म हेंच. लहान लहान माशांनीं जगावें हें ठीक. त्यांच्या जीवरक्षणाची तुम्ही काळजी वाहतां, पण यामुळें त्यांवर जगणाऱ्या मोठ्या माशांची अगर बगळ्यांची तुम्ही उपासमार करतां याची वाट काय ? छोटीं राष्ट्रें गिळंकृत करणें हा मोठ्या राष्ट्रांचा जन्मसिद्ध हक्क आहे. जपाननें आशिया हा आशियांत राहणाऱ्या लोकांकरितां आहे, त्यांत पाश्चात्यांनीं लुडबुड करूं नये असें म्हणतांच यांच्या नाकाला मिरच्या झोंबल्या. ॲबिसिनिया कच्चा खावा कां भाजून पक्का खावा असा इटलीचा विचार दिसतांच; या साम्राज्यवाद्यांना हृद्रोगच झाला. हिटलरनें, मध्ययुरोपांत इंग्लंडनें नाक खुपसूं नये; कारण त्याचें कोणतेंच हित अनहित तेथें नाहीं, उगीच लुडबुड केल्यास आम्ही जुमानणार नाहीं, असें म्हणतांच यांना स्वतःच्या नाकाचा शेंडा झडल्यासारखा अपमान वाटला. पण मी म्हणतों थोडासा विचार केला तर आक्रमणशील राष्ट्रांच्या या म्हणण्यांत बराच तथ्यांश नाहीं का ?

वरील विचारसरणी बरोबर वाटो वा चुकीची वाटो, एवढें खास कीं राष्ट्रसंघ आंतरराष्ट्रीय आक्रमणांना पायबंद घालण्याच्या कामीं मात्र पूर्णपणें कुचकामाचा ठरला. मांचुरियावरील जपानच्या स्वारीच्या वेळीं वाटलें कीं हा युरोपियन गोऱ्या लोकांचा संघ पिवळ्या लोकांच्या बाबतींत पक्षपात करीत आहे. शिवाय आशियासारख्या दूरच्या प्रदेशांत या संघास आपला प्रभाव गाजवितां आला नाहीं तर तें फारसें आक्षेपार्ह नाहीं. त्यावर पाळी आली ॲबिसिनियाची. ॲबिसिनियन लोक तर बोलून चालून काळे व रानटी ! दुसऱ्याचे गुलाम बनून जन्मभर राबण्याचा त्यांचा जन्मजात

हक्क. या हक्काचा संपूर्ण उपभोग घेण्याची संधी इटालीनें दिली असतां, ॲबिसिनियानें ती लाथाडून; दुसऱ्याच्या शिकवणीनें स्वतःचें नुकसान करून घेतलें. काय हा अविचार ! इटली व ॲबिसिनिया यांमधील युद्धाच्या वेळीं पुरी खात्री पटली कीं राष्ट्रसंघ युरोपखंडाबाहेरील हालचाली नियंत्रित करावयास समर्थ नाहीं. खुद्द युरोपमध्यें स्पेनमधील बंडाळीनें राष्ट्रसंघाचा तोहि दुबळेपणा पूर्णपणें उघडकीस आणला. स्पेनमधील बंडाळीच्या ज्वाला इतरत्र पसरूं नयेत म्हणून युरोपियन राष्ट्रांनीं त्याभोंवतीं तटबंदीचें काटेरीं कुंपण घातलें. तटस्थतेच्या बुजगावण्याखालीं आक्रमणशील राष्ट्रांचा नंगा नाच दिसूं नये, म्हणून या राष्ट्रांनीं आपल्या डोळ्यांवर मुद्दाम कातडें ओढून घेतलें. यावेळींसुद्धां असें वाटलें कीं स्पॅनिश लोक तांबडें असल्यामुळें हा अन्यायी पक्षपात त्यांना सहन करावा लागत असेल. पण जर्मनीनें ऑस्ट्रिया व झेकोस्लोव्हाकिया सफाईदार रीतीनें घशाखालीं घातला, तेव्हां मात्र संशय फिटून पक्की खात्री होऊन चुकली कीं, हा पक्षपात कातडीच्या दोषामुळें होत नसून, त्यास राष्ट्रसंघाची दुर्बलताच कारणीभूत आहे. एवढेंच नव्हे तर राष्ट्रसंघावर विसंबून राहणें, म्हणजे आत्मघात करून घेण्यासारखें आहे. स्वतःच्या अंगीं सामर्थ्य व बळ यांची वाढ करणें हाच एकमेव स्वसंरक्षणाचा खात्रीचा मार्ग आहे. आणि म्हणून पुनः एकवार जगांतील परावलंबी राष्ट्रांच्या विचारसरणीस कायमची कलाटणी मिळून, पुनःश्च समरांगणाकडे देशाच्या नशिबाचीं चक्रें फिरूं लागलीं. आणि प्रत्येक राष्ट्र पुढें होणाऱ्या प्रचंड लढ्यांत स्वसंरक्षण करतां यावें, म्हणून आपलें शक्तीसर्वस्व पराकाष्ठेनें वाढवूं लागलें.

भावी महायुद्धाचा आराखडा वाचकांना सादर करण्यापूर्वीं, जगांतील प्रमुख राष्ट्रांचें व राष्ट्रगटांचें सध्यांचें धोरण काय आहे तें पाहून, नंतर त्यांच्या तयारींचा अदमास घेऊं. युरोपच्या शांततेस सुरुंग लावणाऱ्या दोन प्रमुख हुकुमशहांच्या आकांक्षा, हालचाली, सामर्थ्य आणि भावी धोरण यांची संगति प्रथमतः लावल्यावर, बाकीच्या राष्ट्रांकडे वळूं.

### व्हर्सेलिसचा तह का जर्मनीचा खून ?

हिटलरच्या हुकुमशाहीचें बीज १९१८ च्या व्हर्सेलिसच्या तहाचेवेळीं पेरण्यांत आलें. जर्मन लोक जात्या स्वतःच्या उज्ज्वल इतिहासाचे आणि संस्कृ-

तीचे कट्टर अभिमानी असल्यामुळें, व्हर्सलिसच्या अपमानकारक तहानें आपल्या उज्ज्वल शीलपरंपरेला व अभिजात पराक्रमाला जें पराभवाचें गालबोट लागलें, तें त्यांच्या जिव्हारीं झोंबणें अगदीं स्वाभाविक होते. तो नामुष्कीचा तह कालमानाकडे पाहून त्यांनीं जरी आपल्या डोक्यावर लादून घेतला, तरी काळ बदलतांच तें स्वाभिमानी राष्ट्र त्या तहाच्या चिंधड्या उडविण्यास तयार होणार ही गोष्ट सूर्यप्रकाशा इतकी स्पष्ट होती. जित राष्ट्र म्हणवून घ्यावयास कोणतें स्वाभिमानी राष्ट्र आनंदानें तयार झालें असतें?

त्याचप्रमाणें जर्मन राष्ट्रानें प्रथमपासून पूर्ण स्वातंत्र्य उपभोगलेलें आहे. स्वतःच्या संस्कृतीबद्दल इतकी आस्था बाळगणारें राष्ट्र केव्हांहि एकंतत्री राजवटीचे उपासक असायचें हें ठरल्याप्रमाणें आहे. कारण त्याशिवाय तो अभिमान राष्ट्राच्या नसानसांतून खेळत नाहीं, आणि त्याची उन्नतिहि होत नाहीं. व्हर्सलिसच्या तहानें लोकशाहीची धोंड जर्मन लोकांच्या डोक्यावर लादली, तरी पण ती त्या ठिकाणीं फार काळ सुखासमाधानानें टिकणें शक्य नव्हतें. कारण लोकशाहीची राजवट नेहमीं राष्ट्रांत दुबळेपणा उत्पन्न करते. राष्ट्रांची शक्ति कृतीपेक्षां बोलण्यांतच विनाकारण खर्च होते. कृतींत कोणतीहि गोष्ट उतरावयाची; म्हणजे इंजिनास लागेल इतकीं प्रचंड तोंडच्या वाफेचा स्रोत निर्माण करावा लागतो. त्या वाफेच्या शक्तीपैकीं निम्मी अधिक शक्ती, विरुद्ध पक्षाच्या तोंडच्या वाफेस प्रतिकार करण्यांत खर्ची घालावी लागते.

व्हर्सलिसचा तह म्हणजे मनुष्यजातीच्या सदसद्विवेकबुद्धीचा जाणूनबुजून केलेला पद्धतशीर खून. महायुद्धाच्या दोषांचें सर्व खापर एकट्या जर्मनीच्या डोक्यावर फोडण्यांत आलें. कैसरचा इनसाफ करण्याच्या भुलावणीवर, दोस्त राष्ट्रांतील मुत्सद्यांनीं निवडणुका जिंकून, आपल्या पोळीवर भरपूर तूप ओतून घेतलें. खंडणी नव्हे, पण नुकसानभरपाईची गलेलठ्ठ रक्कम जर्मनीच्या डोईवर चढविण्यांत आली. त्याला अगोदर पूर्णपणें निःशस्त्र बनविलें व आपणहि लवकरच शस्त्रसंन्यास घेणार अशी मुत्सद्दी भाषा वर्षानुवर्षें सुरू ठेविली. जर्मन रक्तामांसाचे लचके तोडून निरनिराळ्या राष्ट्रांना वांटून दिले. झेकोस्लोव्हाकिया तर काय बोलून चालून महायुद्धां-

तून उगविलेलें अठरा धान्यांचें कोडबोळें. स्वयंनिर्णयाच्या तत्त्वांचीं थट्टा केली या महान् मुत्सद्यांनीं ! उपासमारीच्या अवस्थेस पोहोंचलेलें ऑस्ट्रिया वेगळें करण्यांत आलें. त्यामुळें हंगेरी आपोआपच निराळा पडला. असे ऑस्ट्रिया हंगेरीचे तुकडे तुकडे झालें. अडीच लाख जर्मन लोकांचा टायरोल प्रांत, पण त्याचा तोबरा इटालीच्या तोंडांत दिला. तीस लक्ष जर्मन सुडेटन, झेकोस्लोव्हाकियाच्या वांटणीस गेले. पोलंडला समुद्रकिनारा मिळावा, म्हणून पूर्वेकडील प्रशियन लोकांचा पोलिश कारिडॉर त्याला दिला. उत्तर सायलेशिया पोलंडनें आपल्या अंगच्या जोरावर लाटला, आणि लोखंड व कोळसा यांचा सांठा हस्तगत केला. फ्रान्सनें ऱ्हूर प्रांतावर स्वारी करून तो प्रांत बळकावला. युपेन मेमेल्डी बेलजियमला नुकसानभरपाई म्हणून बहाल केला. आतां वसाहतींचें काय करावें अशी काळजी दोस्तांना पडली. पण जनरल स्मट्स यांनीं ‘ मॅंडेट ’ हा नवीन शब्दप्रयोग हुडकून काढून, तीहि काळजी दूर केली आणि दोस्त राष्ट्रांनीं जर्मनीच्या वसाहती आपापसांत वांटून घेतल्या.

जिवंत माणसाचे हातपाय, नाकतोंड कापण्यासारखा हा प्रयत्न होता. जर्मनीस कायमचा दुबळा ठेवण्याची अपूर्व कामगिरी या तहानें साधली. पण एवढ्यावरच जर्मनीचें नष्टचर्य संपलें नाहीं. युद्धानंतरच्या कालांत जर्मनींत दारिद्र्यानें कहर उडवून दिला. युद्धापूर्वीं असलेली जर्मनीच्या व्यापाराची घडी विस्कटली. तशा विस्कळीत स्थितींत दोस्तांचीं पुष्कळ नियंत्रणें उरल्या सुरल्या व्यापारावर बसलीं. त्यामुळें बाहेरून येणारा संपत्तीचा ओघ अजिबात बंद झाला. कारण लढाईच्या कालांत बाजारपेठेंत जपाननें आपलें बस्तान यथास्थित ठोकलें. महायुद्धांत झालेली जर्मनीच्या वित्ताची व जीवाची हानि तर अभूतपूर्व होती. देशांतील उद्योगधंदे बंद पडल्यामुळें व लढाईचा उद्योगहि संपल्यामुळें, बेकारीचा रुद्रावतार भेडसावूं लागला. दुसऱ्या राष्ट्रांचे नुकसानभरपाईचे हप्ते भरतां-भरतां देशांतील सुवर्णनिधी केव्हांच खलास झाला. अशा वेळीं दोस्त राष्ट्रांनीं हळुहळू अंतर्गत राज्यकारभार, व्यापार, उद्योगधंदे यांवर आपला पगडा बसवावा यांत कांहींच नवल नाहीं. जर्मनीस सुवर्णपरिमाण

लवकरच सोडावें लागलें. देशांतील कागदी चलनाची भरभसाट वाढ झाल्यामुळें, जर्मनीचें कागदी चलन नांवाप्रमाणें कागदी ठरलें. एका सुवर्ण मार्कांची किंमत, एका कोऱ्या कागदी मार्कांबरोबर झाली. ट्रॅमचें तिकीट काढण्याकरितां पेपरमार्कस्चें पुडकें देण्याची पाळी लोकांवर आली. नुकसानभरपाई मालाच्या स्वरूपांत घेण्याचें दोस्तराष्ट्रांनीं नाकारल्यामुळें व सुवर्णसांठा अगोदरच संपुष्टांत आल्यामुळें, जर्मनीस दिवाळखोर बनावें लागलें. खरोखर त्यानें अशा स्थितींत खांका वर केल्या नसत्या तरच आश्चर्य! त्यांत लोकशाहीच्या वादविवादात्मक व पक्षभेदांनीं बुजबुजलेल्या राजवटीनें डोकें वर निघण्याऐवजीं, जर्मन राष्ट्र अधोगतीच्या खोल गर्तेंत जाऊं लागलें. देशांत अनीतिचा सुळसुळाट झाला. स्वैराचार इतका माजला कीं एकाएका आठवड्यापुरतींची लग्नें होऊं लागलीं. याचा परिणाम म्हणजे गर्भपातासारखे भयंकर गुन्हे मोठमोठाले डॉक्टरलोक सर्रास करून, पैसा लुटूं लागले. लैंगिक व्यवहाराला कसलेंच बंधन राहिलें नाहीं. समाजाचा विध्वंस करणाऱ्या अशा गोष्टींतून समाज अनिर्बंधपणें वहात चालला.

## जर्मन रक्त उसळलें.

दुष्काळ, दारिद्र्य आणि समाजाची अधोगति या त्रिपुटीच्या पोटीं हिटलरच्या हुकुमशाहीचा जन्म झाला. पुनः एकवार संस्कृति व रक्त यांचा अभिमान जागृत होऊन, कधींहि न संपणाऱ्या दुःखाच्या डोंबांत जळत जळत नामशेष होण्यापेक्षां, एकदांच आपला सोक्षमोक्ष करून घेतलेला बरा ही वृत्ति बळावली. आपल्या रक्तामांसाचे, जातीचे आणि भाषाभिमानी राष्ट्राचे तुकडे एकत्रित करून, पुनः एकवार एकवंशीय लोकांचें एक राष्ट्र स्थापावें ही मनीषा उत्पन्न झाली. जर्मन जात्याभिमान इतका तीव्र व कडवा आहे कीं, ते स्वतःच्या जातीला मनुष्य प्राण्याची शेवटची परिणत अवस्था असें मानतात. अर्थात् असे देवाचे लाडके लोक गुलाम म्हणून जगतावर जगण्यासाठीं खास जन्मलेले नाहींत. व्हर्सेलिसचा तह पायाखालीं तुडविणें, रक्ताचा अभिमान पद्धतशीर प्रज्ज्वलित करणें आणि त्याआड येणाऱ्यांना युद्धाच्या धमकावणीनें गप्प बसविणें, हे मार्ग त्यांनीं अनुसरावे हें उचितच आहे.

अर्थातच लोकशाहीच्या कमकुवत राजवटीला जर्मनीनें मुठमाती दिली, आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी त्यांनीं स्वतःच्या हातांनीं करून घेतली, लोकशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांच्या मोहक मोहिनीची पकड जर्मन लोकांच्या मनावर बसली तर नाहींच, उलट त्याच्याविषयीं तिरस्कार उत्पन्न झाला. लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य या तत्वांचा नायनाट होऊन, एकजूट, शिस्त, आणि संघटना हीं नवीन तत्त्वें उदयास आलीं. महायुद्धांत जर्मनी समरांगणावर कोणत्याहि लढाईत पराजय पावलेला नाहीं, तर त्याच्या पाठींत कट्यारीचा वार झाला असें हिटलर म्हणतो, तें खरें नाहीं कां ? यापुढें हिटलरशाहीच्या कारकीर्दीस सुरवात झाली. प्रथम ज्यू लोकांच्या हकालपट्टीस प्रारंभ झाला. इतिहासास आणि परिस्थितीस अचानक कलाटणारें हिंसा हेंच अमोघ शस्त्र आहे, ही मनोवृत्ती प्रबल झाली. जर्मनी म्हणजे एक भौगोलिक किंवा प्रादेशिक शब्दरचना नसून; तें राष्ट्र आहे, ते एका जातीचे एका संस्कृतीचे आणि एका रक्ताचे असून, तसें आर्य लोक जिथें जिथें असतील, तेथून ते एकत्रित करणें हें उद्दिष्ट ठरलें. जर्मन राष्ट्र सर्व जगाचा मध्यबिंदु असल्यानें, त्या कमकुवत मध्यबिंदूविना, जगत् अस्तित्वांत राहणेंच शक्य नाहीं. जर्मनराष्ट्र म्हणजे खरोखरीं देवांचें माहेरघर आहे असें ते समजतात.

## जादुगार हिटलर

अर्थात् जर्मन राष्ट्र जर नाश पावावयाचें असेल तर, आम्ही सर्व युरोपचा नाश आम्हांबरोबर ओढवून घेऊं आणि मगच आम्ही या जगांतून कायमचा निरोप घेऊं, ही ईर्षा उत्पन्न झाली. युरोपच्या स्वामित्वासाठीं शक्तीच्या सामन्यांत पुन्हां एकवार जुगार खेळण्याची इच्छा झाली आणि, या दृष्टीनें हिटलरचें पाऊल जसजसें पुढें पडूं लागलें, तसतसा आपल्या उज्ज्वल भवितव्याविषयीं जर्मनीचा आत्मविश्वास वाढूं लागला. हिटलरच्या पांच वर्षांच्या कामगिरीनें सर्वांचे डोळे दिपले. लोकशाहीचा अंत करून हुकुमशाहीच्या राजवटीस लोकांनीं अंतःकरणापासून उचलून धरलें. राष्ट्रसंघाचा त्याग, चॅन्सलर आणि प्रेसिडेंट या दोन जागांचे एकीकरण, र्‍हाईन प्रांतावरील स्वारी, सार प्रांतांतील मतनोंदणी या बाबतींत

राष्ट्रानें एकदिलानें दिलेला कौल हेंच दाखवितो. त्यानंतर लोकमताच्या नाडीवर एक हात ठेवून धन्वंतरीप्रमाणें, जर्मनीच्या मर्मस्थानीं बसलेलीं अपमानशल्यें शस्त्रक्रियेनें एका मागून एक काढून टाकण्याची जोखीम, त्यानें पार पाडली. हिटलरचा आत्मविश्वास ऱ्हाईनलँड-वरील स्वारीच्या वेळीं चांगला प्रत्ययास आला. त्या वेळीं त्यानें सेनापतीस सक्तीचे हुकूम दिले. पण सेनापती महायुद्धाचे भयानें कांकू करूं लागला असतां, त्यानें स्पष्ट सांगितलें कीं "या स्वारीमुळें फ्रान्स आपल्या जाग्याहून एक इंचभरही हलणार नाहीं. बंदुकीची एक गोळीसुद्धां तुम्हांस खर्च करावी लागणार नाहीं. न जाणो फ्रान्सनें प्रतिकारासाठीं हत्यार उपसलेंच, तर मी स्वतः आत्महत्या करून घेईन आणि मग तुम्हांस परत फिरण्यास मुळींच हरकत पडणार नाहीं." परिस्थितीचे यथास्वरूप आकलन आणि आपल्या निश्चित योजनेबद्दलचा आत्मविश्वास,या उद्गारांवरून नाहीं का आपणास दिसत ? निदान पन्नास वर्षें तरी जें राष्ट्र डोकें वर काढणार नाहीं अशी अपेक्षा–नव्हे खात्री होती, तेंच राष्ट्र अवघ्या पांच वर्षांत दैदीप्यमान् होऊन, सगळ्या जगाचें लक्ष त्याच्याकडे खेचावें, ही जादुगिरी हिटलर शिवाय कोणास साधणार ?

राष्ट्रीय संपूर्णतेच्या तत्त्वानें देशांतील उत्पादन वाढविलें.कम्युनिझमच्या तत्वज्ञानामुळें असंतुष्ट झालेल्या कामगार लोकांच्या चळवळीस पायबंद घातला, युद्धोपयोगी उत्पादनामुळें देशांतील बेकारी नष्ट झाली, राष्ट्रीय कर्जाचे डोंगर उभारून देशांतील लोक आणि उद्योगधंदे तारले, आक्रमणशील धोरणाचा अवलंब करून जर्मन राष्ट्र पुष्ट होऊं लागलें, जुनीं राष्ट्रें साम्राज्यांत सामील करून आणि जवळच्या राष्ट्रांबरोबर तहनामे करून आपलें प्रस्थ वाढविलें. थोडक्यांत रोम–बर्लिन झेंड्याखालीं मध्य–युरोपचें पुढारीपण पत्करून, ऑस्ट्रियन् साम्राज्याची मुहूर्तमेढ रोविली.हिटलरनें आत्मचरित्रांत ही गोष्ट स्पष्ट केली आहे कीं, दूरवर असणाऱ्या वसाहतींच्या अवाढव्य साम्राज्यापेक्षां एकत्रित व एकजिनसी साम्राज्य संरक्षणाच्या दृष्टीनें इष्ट असतें. यावरून मध्य–युरोपांत ऑस्ट्रियन् साम्राज्याचा पुनःश्च हरिःओम् झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. या दृष्टीनेंच हिटलरच्या सध्यांच्या हालचाली चालू आहेत.

पण मध्य-युरोपांतील साम्राज्यस्थापनेची कल्पना कितपत फलद्रूप होईल हा प्रश्न थोडासा गुंतागुंतीचा असल्यामुळें व त्याच्याशीं इतर राष्ट्रांचे हितसंबंध निगडित असल्यामुळें, त्याचा विचार विस्तारानें पुढें करूं.

## रोमन साम्राज्याची मुहूर्तमेढ

रोमन साम्राज्य लयाला गेल्यावर, युरोपांतील इटलीचें स्थान दुय्यम दर्जाचें झालें. महायुद्धांत दोस्त राष्ट्रांच्या बाजूनें लढल्यामुळें इटली विजयाचा वांटेकरी झाला हें खरें; पण विजयी राष्ट्रांना पराजित जर्मनी-इतकाच स्वार्थत्याग करावा लागला. मुसोलिनीनें राष्ट्राची प्रजा वाढविण्याचें ठरवून आपल्या कार्यास प्रारंभ केला, पण वाढत्या प्रजेची सोय अगाऊ लावण्यासाठीं वसाहती मिळवणें, हाहि तितक्याच महत्वाचा प्रश्न त्याच्यापुढें होता. खनिज पदार्थांचा व कच्च्या मालाचा भासणारा तुटवडा कसा दूर करावा ही अडचण त्याच्यासमोर होती. जी स्थिती विस्तारानें जर्मनीची वर्णिली तीच हुबेहुब इटलीची.

जुन्या रोमन साम्राज्याचें स्वप्न सत्यसृष्टींत उतरविण्यासाठीं कंबर बांधून सुसज्ज झालेल्या मुसोलिनीनें पहिला हल्ला ॲबिसिनीयावर चढविला.चोहोंकडून भूमध्य समुद्रानें वेढलेला असतांना राजकारणांत इटलीस कसलेंहि स्थान नसावें ही गोष्ट शल्यासारखी त्यास बोचूं लागली.ज्या समुद्रावर आपलें परड्यांतील सरोवर म्हणून स्वामित्व गाजविण्याचा हक्क, त्या समुद्रावर परक्यांचें वर्चस्व असावें आणि त्यामुळें स्वतःच्या राष्ट्राची गळचेपी व्हावी, याची मुसोलिनीस चीड येऊं लागली. पण या समुद्राच्या एका टोकास जिब्राल्टर आणि दुसऱ्या टोकास सुवेझचा कालवा, हे दोन बाहेर पडण्याचे एकमेव मार्ग, त्यावर परक्यांचें नियंत्रण असल्यामुळें इटलीची कुचंबणा व्हावी हें उघड आहे. या दृष्टीनें आफ्रिकेंतील तद्देशीय लोकांचे एकुलतें एक स्वतंत्र राज्य ॲबिसिनीया-इटलीनें जर्मनीच्या सहाय्यानें जिंकला. यावेळीं जर्मनीनें केलेल्या बहुमोल मदतीमुळें या दोन हुकुमशहांची गट्टी जमली; आणि या दोघां धूर्तांनीं आळीपाळीनें हुलकावणी दाखवून, आपापले कार्य-भाग इतरांच्या विरोधाची झळ न लागूं देतां साधले.

ॲबिसिनियन् युद्धाचे वेळीं इटलीविरुद्ध जारी केलेलीं बहिष्कारांचीं आयुधें जोरांत असतांना, जर्मनीनें सर्वथैव मदत केली म्हणून निभावलें. ॲबिसिनिया जिंकला जाऊं नये अशी खरी इच्छा इंग्लिशांची होती, कारण आफ्रिकेंत एक नवीन बलवान् साम्राज्य पसरणें त्यांच्या दृष्टीनें अनिष्ट होतें. भूमध्य सागरांतील राजकारणांत त्यामुळें ढवळाढवळ झाली ती त्यांना अधिक वावडी होती. ॲबिसिनियानंतर ही धाड इजिप्तवर येणार हें त्यांना स्पष्ट दिसत होतें. या दृष्टीनें इटलीस पेट्रोलच्या अभावीं उपाशी पाडून, त्याचें अर्धांग लुळें पाडण्याची कल्पना प्रथम इंग्लंडनें काढली. पण इकडे इटली व फ्रान्स यांची जिवलग दोस्ती असल्यामुळें,युद्धाच्या वेळच्या मदतीदाखल ही वसाहत इटलीस बहाल करून संतुष्ट राखण्याचें कारस्थान फ्रान्सनें केलें. म्हणून तेलांचे नियंत्रण लागू करण्यास फ्रान्स विलंब लावित होता. पण जास्त विलंबामुळें दोस्त-राष्ट्रांची नाचक्की होण्याची वेळ जवळ येत चालली, व इटलीच्या क्रूरपणा-विरुद्ध निषेधाचा पारा अनिवार चढूं लागला. अर्थात फ्रान्स इटलीविरुद्ध दोस्तराष्ट्रांच्या कटांत सामील होणार असा रंग दिसतांच, जर्मनीनें ऱ्हूर प्रांतावर चढाई करून तो हस्तगत केला. जागतिक तेढीमध्यें या नवीन युक्तीनें शत्रुपक्षाचें लक्ष निराळ्या गोष्टीकडे अचानक वेधलें. या वेळीं फ्रान्सची इच्छा कांहींतरी हालचाल करावी अशी होती; पण ॲबिसिनियाच्या बाबतींत फ्रान्सच्या धोरणाचें उट्टें काढण्यासाठीं, इंग्लंडनें जर्मनीस अंतस्थ रितीनें फूस दिली.

तसेंच ऑस्ट्रियावरील आक्रमणाच्या विरुद्ध फ्रान्स तर होताच; पण इटलीसुद्धां तहानें बांधला गेला होता. दोन अनिष्ट ग्रहांच्या सरहद्दी एकमेकांस भिडणें केव्हांही अनिष्ट होतें. त्या दोघांमध्यें हें पाचर असणें हितावह होतें. पण ॲबिसिनियावरील आपल्या स्वामित्वास जर्मनीनें जी मान्यता दिली, तिची ही किंमत म्हणून इटलीस मूग गिळून बसावें लागलें.

यानंतर दोघांनीं स्पेनच्या बंडाळींत बंडवाल्यांचेतर्फे भाग घेऊन स्पेनची वाटणीसुद्धां अगाऊ करून ठेविली. भूमध्य समुद्रांत इटलीस धुमाकूळ घालण्यास मोकळीक देऊन, मध्य-युरोपचें कुरण स्वतःकरितां

राखून ठेविलें. झेकोस्लोव्हाकियाच्या प्रकरणांत इंग्लंड आणि फ्रान्स यांच्याबरोबर जर्मनीच्या बाजूनें इटलीनें कसाईपणांत भाग घेऊन, जर्मनीचें सर्व ऋण फेडून टाकलें.

इंग्लंड आणि फ्रान्स यांना आळीपाळीनें हुलकावणी देऊन, जर्मनी व इटली यांनीं स्वार्थ साधला. इटली आणि जर्मनी यांची जोडी फोडण्याचे इंग्लंड–फ्रान्स यांनीं भगीरथ प्रयत्न केले. त्यापायीं दोघांना प्रांतांची लांच देऊनहि पाहिलें, दोघांना एकमेकांविरुद्ध 'छूः' घालून पाहिलें; पण त्यांचीं कार्यक्षेत्रें वेगवेगळीं असल्यामुळें दोघांची गट्टी फोडणें अवघड झालें. पण उलट इंग्लंड आणि फ्रान्स यांचीच गट्टी फोडण्याचें जर्मनी आणि इटली यांनीं प्रयत्न सुरू केले. इंग्लंड आणि फ्रान्स यांच्या कमकुवत किंवा अंगचोर ऐक्याचा पुरा पुरा फायदा त्यानीं घेतला. मुसोलिनीचें सूत्र असें आहे कीं, "मी चढाई केली तर माझे अनुयायी म्हणून मागाहून चला, मी पराभव पावलों तर माझा खून करा, आणि मी माझ्या कार्यार्थ धारातीर्थी देह ठेवला; तर माझा सूड उगवा "× या शब्दांत त्याचें सर्वस्व सांठविलेलें आहे.

## जपानचें पौर्वात्य साम्राज्य.

पण एवढ्यावर भागलें नाहीं. आपल्या जोडीस पौर्वात्य देशांतील प्रबळ जपानला निमंत्रून, कम्युनिझम विरोधी कराराच्या निमित्तानें जग पादाक्रांत करण्याची योजना, जर्मनी–इटली यांनीं आंखली. पूर्वेकडील गोलार्धांत साम्राज्य स्थापनेच्या कल्पनेनें भारून जाऊन जपाननें चीनवर पहिला मोहरा चढविला रुसो जपानी लढाईतील विजयापासून ही एक नवीन बलवान् सत्ता पूर्वेकडील प्रदेशांत उत्पन्न झाली असून, गेल्या लढाईत दोस्त राष्ट्रांच्या निव्वळ हाताला हात लावण्याचें धोरण ठेवून, जगांतील बाजार पेठेंत आपले हात पाय पसरले. युद्धांत गुंतल्यामुळें जर्मनीची व्यापारी चढाओढ थांबली होती. पण अत्यंत स्वस्त अशा जपानी मालाची चढाओढ इतर राष्ट्रांना मारक झाली. युद्धपूर्व व्यापार

---

× If I advance, follow me; if I retreat, kill me; if I die avenge me —*Mussolini*.

सांवरण्यास मुळीं कोणास संधीच मिळेना. पौर्वात्य राष्ट्रांत जपानचा उदय झाला त्याप्रमाणें इंग्लंडच्या राजकारणांत दोन महत्वाची केंद्रे निर्माण झाली. पैकीं एक जिब्राल्टर आणि दुसरें सिंगापूर. दोन ठिकाणचें राजकारण हांकण्याची अवघड कामगिरी आतां ब्रिटिश मुत्सद्यावर पडली आहे. विशेषतः ज्या पूर्वेकडील प्रचंड साम्राज्याविषयीं निःशंकपणा आणि निर्धास्तपणा वावरत होता, तो मात्र पार नाहींसा झाला.

पूर्वेकडे चीन संपूर्ण घशांत टाकल्यावर सयाम, इंडोचायना, ईस्ट इंडीज, ऑस्ट्रेलिया, हिंदुस्थान, असें देशांचे क्रम जपाननें आंखले असून, युरोपांत युद्धाची धामधूम उसळली कीं, इकडे पॅसिफिक महासागरांत चांचेगिरी करून साम्राज्य लाटणेसाठीं जपान रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून वाट पहात बसलेला आहे. युरोपांतील राजकारणाची नाडी परिक्षा केल्यावर चीनवर आक्रमण करण्याचे धार्ष्ट्य त्यांनें दाखविले. अर्थात् या पायीं इंग्लंड, अमेरिका, डच, इत्यादि राष्ट्रांशीं एक दिवस सामना देणें भाग आहे, हें तो जाणून आहें. पण ती राष्ट्रें अशा अडचणीत किंवा खिंडीत गांठून जपान आपला हेतू साधण्याच्या कल्पनेंत दंग आहे. इंग्लंडलाहि दोन ठिकाणीं युद्ध चालविणें अशक्य आहे. एक युरोपमध्यें अगर दुसरें पौर्वात्य देशामध्यें, एकीकडे कोठेंतरी सैल सोडणें भाग आहे. अर्थात् या तीन धूर्तांपैकीं कोणाचा तरी फायदा नक्की होणार आणि याचसाठीं या तिघां हुकुमशाहीं राष्ट्रानीं करारानें एकमेकास बांधून घेतलेलें आहे.

## रशियाची जगाला गवसणी

रशियाच्या स्टॅलिनएवढा महापुरुष आणि सत्ताधिकारी जगांत दुसरा कोणीहि नाहीं. रशियासारख्या अफाट खंडाचा तो हुकुमशहा आहेच, त्याबरोबर सर्व जगांतल्या कानाकोपऱ्यांत ज्या कम्युनिझमच्या शाखा पसरलेल्या आहेत, त्यांचाहि तो मुख्य पुढारी आहे. रशियाच्या सर्वांगीण प्रगतीबरोबर, जगांत आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार कसा जारीनें होईल याच्या काळजींत तो अहर्निश आहे. युरोपच्या सध्यांच्या राजकारणांतील सर्व धागेदोरे रशियाशीं निगडित झालेले दिसून येतील. कम्युनिझमला आळा घालण्यासाठीं तर हुकुमशहा बोलून चालून अवतर-

लेले. पण इंग्लंड—फ्रान्ससारखीं लोकशाहीच्या नांवाचा टिळा लावलेलीं राष्ट्रेंहि कम्युनिझमच्या भयानें गांगरून गेलीं आहेत.

कम्युनिझमचें वावडें सर्वांना आहे. पण त्याबरोबर रशिया-सारखा नजिकचा प्रदेश, कच्च्या व खनिज पदार्थांचा विपुल सांठा कोणास नको झाला आहे ? जर्मनी आणि जपान हे याचे खरे शत्रू. उलट रशियाच्या प्रादेशिक आकांक्षाहि कांहीं सामान्य स्वरूपाच्या नाहींत. पण त्या साम्राज्यलोभानें मलीन झालेल्या नाहींत. सर्व जगांत खऱ्या लोकशाहीच्या अंतिम तत्त्वांचा प्रसार होऊन, जगाचें नंदनवन बनावें ही त्यांची प्रामाणिक इच्छा. भांडवलशाहीच्या मुळावर आलेलें हें अपत्य, जगांतील सर्व राष्ट्रांना नावडतेंच नव्हे, तर तिरस्करणीय वाटावें यांत कांहींच नवल नाहीं.

जगभर आपल्या तत्त्वांचा फैलाव होऊन सर्व राष्ट्रांतून भांडवल-शाहीविरुद्ध क्रांतीची उठावणी व्हावी म्हणून; यांनीं प्रथम प्रचंड योजना आंखली. पण त्यांच्या प्रयत्नांना प्रथम इंग्लंड—फ्रान्स यांनीं पायबंद घातला. खुद्द युरोपांत तो बहिष्कृत ठरला. त्यांच्या वाङ्मयावर कडक पहारा बसविला आणि आपल्या देशांतील भाईंची गळचेपी केली. तथापि कम्युनिझमचीं तत्त्वें असल्या गळचेपींतूनहि वाट काढीत, जगभर फैलावलींच.

समाजाच्या अंगावरील विषमतेची लहानमोठीं टेंगळें नष्ट करून, प्रस्थापित केलेली समाजघटना व प्रदेश यांचें रक्षण करणें, हें त्यांनीं पहिलें कर्तव्य ठरविलें आहे. शक्यतों भावी महायुद्धाच्या वणव्यापासून दूर राहून, शांततेच्या कालांत समाजघटना पूर्णत्वास नेणें हेंच त्यांचें उद्दिष्ट. जगांतील आदर्श समाजघटना कशी असावी हें त्यांना स्वतःच्या उदाहरणानें दाखवावयाचें आहे.

शक्य तों जपान—जर्मनीशीं वितुष्ट वाढवावयाचें नाहीं अशी त्यांची प्रामाणिक इच्छा; म्हणूनच त्यांनीं मांचुरियांतील रेल्वेवरील आपला हक्क अगदीं अल्प किंमतीस जपानला विकला. पण जपानच्या अधिराज्यांत चीन सामील होऊन जपान बलिष्ट होणें ही गोष्ट त्यांना बाधक आहे. म्हणून जपानच्या सध्यांच्या आक्रमणांत, चीनचा पाठीराखा रशिया बनला आहे. चीनच्या प्रचंड मनुष्यबलास शस्त्रास्त्रें पुरवून त्याच्या

करवीं शक्य तर जपानची खोड मोडावी, या उद्देशानें अमेरिका, इंग्लंड व रशिया शस्त्रास्त्रांची मदत चीनला पुरवित आहे. कदाचित् चीनकरवीं ही गोष्ट शक्य न झाल्यास, युद्ध खेळून दमलेल्या भागलेल्या जपानबरोबर सामाना देण्यास रशिया युद्धाच्या आखाड्यांत उतरेल, असें वाटतें व त्यावेळीं अमेरिका व इंग्लंड हींहि त्यास सर्वथैव मदत करतील.

जर्मनीबरोबर तर रशियाचें हाडवैर आहे. दोघांमध्यें पोलंडचे पाचर आहे म्हणून बरें, नाहींतर एव्हांना दोघांची केव्हांच जुंपली असती. वरचेवर कुरापती काढण्याचे उपद्व्याप जर्मनी करीत असतो. युक्रेन या सधन प्रांतावर जर्मनीचा डोळा असून, त्या प्रांतांत त्यानें स्वतंत्रतेच्या चळवळीस नुकतीच चिथावणी दिली आहे. गेल्या महायुद्धानंतर जर्मनींत सामाजिक क्रांति होऊन कम्युनिझमचा फैलाव होईल असें रशियास फार वाटत होतें. तसें झालें असतें तर कम्युनिझमचा रोग मध्य–युरोपांतच झाल्यानें, त्याची बाधा सर्व युरोपला झाली असती. याचसाठीं साम्राज्यशाही राष्ट्रांनीं राष्ट्रसंघांत रशियास बहिष्कृत केलें. जर्मनी व रशिया यांचा एकोपा होऊं नये म्हणून प्रयत्नांची शिकस्त केली. त्यांची फॅसिझमला अंतस्थ सहानुभूति आहे ती याच कारणास्तव. दोस्त राष्ट्रांच्या प्रयत्नास यश लाभलें. युरोपांत कम्युनिझमच्या प्रचाराला आयताच चांगला पायबंद बसला व कम्युनिझमचें भय निदान आणखी कांहीं वर्षें दूर लोटलें गेलें. पण तोच फॅसिझमचा राक्षस; कम्युनिझमचा फडशा उडविल्यावर लोकशाहीच्या गळ्याला नख लावण्यास उठला, तेव्हां इंग्लंड आणि फ्रान्स यांना रशिया परवडला, पण हे हुकूमशहा नकोत असें झालें. दूध पाजून पाळलेला साप एक दिवस अंगावर उलटल्याविना कसा राहील ?

## रशियाचें अंतरंग

पंचवार्षिक कार्यक्रम आंखून देशाची सर्वदृष्टीनें उन्नति करण्याचें ध्येय स्टॅलिनचें आहे. लष्करी दृष्ट्याहि प्रचंड मनुष्यबल व तें आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज असें असल्यानें, भावी युद्धांत रशिया बरीच मोठी कामगिरी करणार, असा दुर्दम विश्वास वाटतो. पण रशियाच्या लष्करी सामर्थ्याचा अदमास मात्र कोणास सांगतां येणार नाहीं. कम्युनिझम राजवटीविरुद्ध

निबंध ६७५

बंड वा कट केल्याच्या आरोपावरून देहान्त शिक्षेचा होम, अहोरात्र तेथें चालू आहे. रशियाच्या अनेक अनुभवी, वाकबदार, व कुशल सेनापतींची आहुती त्या होमांत पडली आहे. यामुळें त्यांच्या लष्करी हालचाली कितपत मुत्सद्दीपणाच्या व प्रसंगावधानी होतील याबद्दल शंका वाटते. तूर्तास इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यांशीं सख्यत्व राखून, योग्य वेळेची मार्गप्रतिक्षा तो करीत आहे.

रशियास इंग्लंड फ्रान्स इत्यादि लोकशाहीच्या पुरस्कर्त्या राष्ट्रांच्या पंक्तीस बसविण्यास अनेकांचा विरोध आहे. याचीं कारणें त्या देशांत होणारी लोकांची मुस्कटदाबी, कडक शिस्त आणि मतस्वातंत्र्य यांची कत्तल हीं होत. असल्या अरेरावी हुकूमशाहीच्या राजवटीस लोकशाहीची निर्भेळ राजवट म्हणण्यास मन कचरतें हें खरें आणि म्हणूनच लोकशाही राष्ट्रांत त्यांचा नामनिर्देश करणें कठीण पडतें. पण जगांतील इतर सर्व लोकशाही राष्ट्रांहून, रशियाच्या लोकशाहीचें स्वरूप अत्यंत वेगळें आहे हें केव्हांहि विसरतां कामा नये.

## फ्रान्स–इंग्लंडची गट्टी

महायुद्धापासून ही गट्टी दिवसेंदिवस अधिक घट्ट होत चालली आहे. पण फ्रान्समध्यें युद्धाच्या पूर्वीची ताकद आणि मुत्सद्दीपणा यांचा अभाव झाल्यामुळें, इंग्लंडच्या ओंजळीनें पाणी पिण्याची पाळी त्यावर आली आहे. पण इंग्लंड अधिक धूर्त असल्यानें याचा पुरा फायदा घेत आहे. या परस्परविरोधी मनोवृत्तींचा आणि अंगचोर धोरणाचा उपयोग; हुकूमशहा आपल्या कामीं करून घेत आहेत.

फ्रान्सचें खरें शत्रुत्व जर्मनीशीं आहे. १९१८ च्या पराभवाचें उट्टें केव्हांना केव्हां तरी जर्मनी आपणावर काढणार ही धास्ती त्याना भेडसावित आहे. जर्मन सरहद्दीवर जगांत अपूर्व अशी कडेकोट तटबंदी, मॅजिनॉट-लाइन उभारून फ्रान्सनें केली.पण जर्मनीच्या आक्रमक धोरणामुळें, फ्रान्सचा मुलूख जर्मन सरहद्दीस अधिकाधिक भिडत आहे. आणि सर्वत्र अशीच तटबंदी उभारून स्वसंरक्षण करणें अशक्य झाल्यामुळें फ्रान्स बेचैन आहे. इंग्लंडप्रमाणें या साम्राज्यवादी राष्ट्राचे हातपाय आफ्रिकेंत पसरलेले

असल्यामुळें, त्यांच्या संरक्षणाच्या अहर्निश काळजीनें फ्रान्स झुरणीस लागला आहे.

एका प्रसिद्ध ग्रंथकारानें असे विनोदी उद्गार काढले आहेत कीं, फ्रान्सचें खरें अरिष्ट म्हणजे घटत चाललेली जननसंख्या. राष्ट्रांतील लोकसंख्या घटून त्यामुळें आपलें मनुष्यबल कमी होईल अशी रास्त धास्ती त्यांना वाटते. सव्वाचार कोटी फ्रेंच लोकांना साडेसहा कोटी जर्मन लोकांच्या आक्रमणाचें भय वाटतें. या दृष्टीनें दीड कोट जर्मन लोकांची जननशक्ती खची केली कीं, जर्मन-फ्रेंच प्रश्न सुलभतेनें सुटण्यास हरकत नाहीं.

त्यांत युद्धोत्तर कालांत फ्रान्सच्या राजकारणांत पक्षोपक्षांची गर्दी नव्हे तर चिवडा झाल्यानें, अमुक एक निश्चित धोरण ठरविणें मुत्सद्यांना कठिण झालें आहे. अर्थात् इंग्लंडच्या हाताला धरून जाणें किंवा इंग्लंडच्या मदतीशिवाय परराष्ट्रीय राजकारणांत एक पाऊलहि न टाकणें, हेंच त्यांचें धोरण म्हणून सूत्ररूपानें सांगतां येईल. तसेंच पॅरिसचीं प्रमुख वर्तमानपत्रें, कीं ज्यांचे कर्तव्य जनमत तयार करणें आणि राजकारणांत विशिष्ट धोरणाचा पुरस्कार करणें–तीं परक्या राष्ट्रांकडून लांच खाऊन मिंधी झाल्यामुळें, परराष्ट्रावर कडक टीकास्त्र सोडण्याची नेहमींच टाळाटाळी करीत असतात. यासाठीं १९३५ मध्यें इटलीनें लांचेकरितां म्हणून ६५ दशलक्ष फ्रँक्स खर्च केल्याचा दाखला आढळतो. यावरून परराष्ट्राकडून किती लांच पैदा होत असेल व त्यापायीं किती पैसा ओतला जात असेल याची कल्पना येईल.

## लंडन जळणार !

इंग्लंड आणि फ्रान्स यांना सर्वांत मोठें भय वाटत असेल तर तें हें कीं, आपली राजधानीचीं मोठालीं शहरें यांचा बचाव कसा करावा. इंग्लंडची एकंदर लोकवस्ती सव्वाचार कोटी; त्यांतील एक कोटी सधन, सुशिक्षित जनता एकट्या लंडनमध्येंच राहते. पॅरिसचीहि तीच अवस्था. जगाचे आणि प्रामुख्याने साम्राज्याचे कर्णधार या ठिकाणींच राहतात. जगांतील व्यापार आणि पैशांच्या देवघेवी यांचें केंद्र म्हणून त्यांचा लौकिक ! त्यांत इंग्लंडवर धुकें आणि ढग यांची नेहमींच कृपा ! बाराहि महिने क्रिकेटसारखे खेळ खेळण्यास कदाचित् ही कृपा उपयुक्त

ठरेल, पण सध्यांच्या वैमानिक हल्ल्याच्या युगांत ती अवकृपाच. कारण शत्रुपक्षास विमानांतून बॉंब टाकून, उध्वस्त करण्यास सुवर्णसंधीच म्हणाना! दिवसाचा बचाव कसा तरी करतां येईल, पण रात्रीं काय करणार! विजेचे सर्व दिवे मालविले तरी थेम्स नदीची रुपेरी रेषा चकाकून परक्या राष्ट्रांना वाट दाखविणार! ती नदी कांहीं बुजवितां येत नाहीं किंवा प्रसंगविशेषीं आच्छादून ठेवितां येत नाहीं. त्याशिवाय पेट्रोलच्चीं मोठालीं टांकीं याच शहरांत! अर्थात् बॉंबवर्षाव झाला तर लंडन जळून बेचिराख होण्यास, क्षणाचाहि विलंब लागणार नाहीं. असें म्हणतात कीं परवां चेंबरलेनसाहेबांना हिटलरच्या लंडनमधील वकिलांनीं हीच तंबी दिली, तेव्हां ही स्वारी सुतकी चेहरा करून जर्मनीची मनधरणी—नव्हे तर पायधरणी करण्यासाठीं विमानांतून उड्डाण करून पळाली. तें खरें असो वा काल्पनिक असो, हा देखावा इंग्लंडला भय दाखवित आहे हें खास! ब्रिटिश साम्राज्याचें नाक बंद केल्यावर साम्राज्याचा प्राण जाण्यास कितीसा वेळ लागणार!

फ्रान्सच्या रक्षणाची हीच दशा. इंग्लंडचें सैन्य फ्रान्सच्या सरहद्दीवर येण्यास ब्रिटिश खाडी ओलांडावी लागते; पण त्या खाडींत जहाजांवर विमानांतून अग्निवर्षाव झाला, तर फ्रान्सच्या किनाऱ्यावर पोंचण्यापूर्वीं ब्रिटिश खाडींत ब्रिटिश सैन्याला फुकट मरावें लागेल? त्यांतून कांहीं सैन्य निभावून आलें तर सरहद्दीवर पोंचण्यास कितीतरी विलंब लागणार? तोंवर पॅरीस जाग्यावर राहिलें तर ना युद्ध पुढें चालवावयाचें? विमानांतून बॉंब टाकल्यामुळें आणि विषारी धूर सोडल्यामुळें ब्रिटिश खाडीचा मार्ग एका क्षणांत धोक्याचा आणि असुरक्षितपणाचा होईल. अर्थात ब्रिटिश खाडीखालून जर कां बोगदा खणतां आला, तर मात्र तो सुरक्षित मार्ग खुला राहून, इंग्लंडचें सैन्य फ्रान्सच्या रक्षणाकरिता धांवू शकेल; असा लष्करी अंदाज आहे. यामुळें हीं दोन राष्ट्रें प्रथम आपल्या स्वतःच्या काळजींत सध्यां चूर होऊन गेलीं असून, युद्धाच्या वणव्यांत पाय टाकण्यापूर्वीं हीं राजधानीचीं शहरें आकस्मिक वैमानिक हल्लयापासून कशीं वांचवावीं, या प्रयत्नांत आहेत. हीं शहरें शाबूत राहिलीं नाहींत तर राष्ट्र लयाला जाणार.

शिवाय साम्राज्याची हृदयक्रिया बंद पडून तेंहि गतप्राण होणार हें निश्चित आहे.

यानंतर व्यापारी मार्गांचें संरक्षण करणें ही दुसरी महत्वाची बाब. कारण इंग्लंडला नेहमीं बाहेरून अन्नपुरवठा झाला, तर तें जगणार आणि कच्चा माल मिळाला तर तें तरणार. तिसरें कारण म्हणजे या दोघांनीं जो जगभर आपल्या साम्राज्याचा भरभसाट पसारा मांडून ठेविला आहे, त्यांचें रक्षण करण्याची जबाबदारी यांच्या शिरावर आहे. या वसाहतीमुळें देशांतील जनता धनाढ्य झाली आणि त्या लुटीवरच कित्येक शतकें, यांचीं पोरेंबाळें नातवंडें परतवंडें पोसलीं जावयाचीं आहेत.

## इंग्लिश दोस्तीचा शाप

या तीन गोष्टीमुळें हीं दोन राष्ट्रें महायुद्धास कचरत आहेत. आपलें वैभव, ऐश्वर्य आणि संपन्नता कायम राखण्याकरितां, जगांत आहे हीच परिस्थिति कायम ठेवणें व जगाची तब्बेत लढाईच्या दुखण्यामुळें बिघडूं न देणें, हें या दोघांच्या फायद्याचें आहे. एका ग्रंथकारानें असें म्हटलें आहे कीं, इंग्लंड समुद्रावरील आपलें स्वामित्व अबाधित राखण्यासाठीं, भूमितलावर भांडणांची कुलंगडीं उपस्थित करून, निरनिराळ्या राष्ट्रांना आपापसांत लढून हतबल करीत असते. इंग्लिश लोकांची दोस्ती म्हणजे देवानें पाठविलेला शाप समजला पाहिजे. कारण स्वार्थासाठीं दुसऱ्याचा विश्वासघात करून; ते केव्हां गळा कापतील याचा पत्ता लागावयाचा नाहीं. ज्यावेळीं इंग्लंड एका हातांत बायबल आणि दुसऱ्या हातांत राष्ट्रसंघाच्या तत्त्वांचीं पुराणें, करारनामे, न्यायाचा उदात्त हेतू इ., असा दुर्बल राष्ट्रांचा पक्ष घेऊन भांडण्यास उद्युक्त होतात, तेव्हां नक्की समजावें कीं, त्यामध्यें इंग्लंडचा कांहींतरी स्वार्थी डाव खास आहे.*

* England's policy consists of troubling the earth, so that she can rule the seas. I think, English friendship is the most cruel present, the Gods can· ever give to a people. When I see England with the Bible in one hand, League of Nations covenents in the other, upholding the cause of the weak or righteous, I cannot but believe, she has her own reasons. *–Gringoire.*

ॲबिसिनियन लढाईच्या वेळीं इजिप्तच्या नरडीला नख लागूं नये, म्हणूनच इंग्लंडनें आकांडतांडव केलें. भूमध्यसमुद्रांतील इटलीच्या चांचेगिरीला मोठ्या युक्तीनें निऑन पॅक्टानें आळा घातला. झेकोस्लोव्हाकियाचा बळी समरदेवतेस देऊन आपल्यावरील अरिष्ट कांहीं काळ दूर लोटलें.

पण जर्मनीस ही गोष्ट पक्की माहित आहे कीं मध्ययुरोपांत इंग्लंडचे हितसंबंध नसल्यामुळें; जर्मनीनें कितीहि धुमाकूळ घातला, तरी तिकडे इंग्लंड ढुंकूनहि पहाणार नाहीं. एवढेंच नव्हे तर जर्मनीस फूस देऊन, रशियाच्या आक्रमक कम्युनिझमला पायबंद घालावा आणि फ्रान्सच्या पोटांत भितीचा गोळा उठवून त्यास आपल्या गळीं पडायला लावावें, हेंच इंग्लंडचें कारस्थान. लंडनच्या व्यापाऱ्यांनीं आपल्या प्रचंड रकमा जर्मनींत गुंतविल्या आहेत, हें एक कारण आहे; शिवाय फ्रेंच आणि इंग्लिश यांचें जात्याच हाडवैर आहे, हेंहि या धोरणास कारणीभूत आहे. फ्रान्सच्या भिडेकरितां इंग्लंडनें जर्मनीच्या उलट प्रसंगविशेषीं भाषा वापरली, तरी ती केव्हांहि गुळमुळीतपणाची असते ती या कारणामुळें.

व्हर्सलिसचा तह निरर्थक असून, तो कायम ठेवण्याकरितां आपल्या रक्ताचा सडा पाडणें इष्ट नाहीं हें दोघांनाहि पटतें. शिवाय त्यामुळें कम्युनिझमपासून परस्पर निवारण होतें तें निराळेंच. आणखी इंग्लंडमधील वर्तमानपत्रें व्यापारी धोरणानें चालतात. युद्धाची अवश्यकता वा अनवश्यकता व्यापारी धोरणानें ठरवून, ती लोकमत बनविण्याचा प्रयत्न करणार.

———

# मध्य-युरोपांतील अल्पसंख्यांक.

“धरलें तर चावतें आणि सोडलें तर पळतें” या म्हणीप्रमाणें अल्पसंख्यांकांना वागविणें व वागवून घेणें सध्यां तारेवरील नाचासारखें कौशल्याचें झालें आहे. कारण त्यांना दाबांत ठेवून आपल्यांत मिसळून घेण्याचा उद्योग करावा, तर अनन्वित छळाच्या भपकेदार वर्णनांनीं इतर राष्ट्रांचीं मनें कलुषित होतात. सौजन्यानें वागवावें तर अल्पसंख्यांकांच्या मागण्यांना व आकांक्षांना मुळीं अंतच नाहीं. प्रत्यक्ष ब्रह्मदेवालासुद्धां त्यांना संतुष्ट करता येणार नाहीं. एकूण दोन्हींचाहि परिणाम एकच. तो हा कीं, बाहेरच्या राष्ट्रांच्या उत्तेजनावरून देशांत बखेडा माजवावयाचा, आपल्या जातिबांधव-राष्ट्रास हात घालण्यास संधि द्यावयाची आणि एक दिवस त्यांनाच जाऊन मिळावयाचें ! हाच देखावा नाहीं कां झेकोस्लोव्हाकिया प्रकरणीं दिसला ? सुडेटन जर्मनांच्या छळाची काय ती करुण कहाणी आणि त्याचा बेंडबाजा ! एखाद्यास दया येऊन वाटावें “ अरेरे ! जर्मन लोकांचें काय हें दुर्दैव ? परमेश्वरा, वांचीव बरें त्यांना !” लहान पोरांच्या-कां मोठ्याच्यासुद्धां-पायांतील कांटा काढायचा झाला कीं, इतरांनीं खूप मोठा आरडा व दंगल करावी, म्हणजे दुःख सोसणाऱ्यास मोठ्यानें ओरडण्यास मुळीं अवसान रहात नाहीं—निदान-त्याचा आरडा ऐकूं तरी येत नाहीं. त्याप्रमाणें जर्मनीनें झेकोस्लोव्हाकिया विरुद्ध एकच काहूर उठवून त्यास गप्प बसविलें व सफाईदार रीतीनें त्याचा लचका तोडला. त्याच्याच पावलावर पाऊल टाकून हंगेरी व पोलंड यांनींहि आपले भाग पळविले.

भाषावैचित्र्य, जाति-पोटजातींची खिचडी आणि राष्ट्रवादांची मारामारी, युरोपखंडाइतपत अन्यत्र सांपडणें कठीण आहे. अनेक शतकें

निरनिराळ्या जातींच्या लोकांच्या हालचालीमुळें, जाति, रक्त व संस्कृति यांचा इतका संकर झाला आहे कीं, त्यांचे वेगवेगळे गट व त्याबरहुकूम प्रांत बनविणें अशक्य कोटींतलें आहे. तरीसुद्धां या जाति आपलें रक्त व संस्कृतीबद्दल असलेला अभिमान सोडूं शकत नाहींत, असेंच इतिहास सांगतो. यांतून युरोपखंडांतील अल्पसंख्यांकांचा नाजुक प्रश्न उगम पावला असून, पुनः एकवार तो धसास लागण्याची वेळ सध्यां प्राप्त झाली आहे.

तसें पाहिलें तर फार पूर्वीपासून अल्पसंख्यांकांचा प्रश्न युरोपियन राष्ट्रांना नडवित आला आहे. सन १९१८ सालचें स्वयंनिर्णयाचें तत्त्व बाहेर पडण्यापूर्वी, या प्रश्नाचें स्वरूप बरेचसें अंतस्थ असें होतें. त्या तत्वाच्या अंमलबजावणीसाठीं युरोपचा नकाशा वेड्यावांकड्या सरहद्दीच्या रेषांनीं चिताडण्यांत आला व इतकेंहि करून जे थोडेफार अल्पसंख्यांक म्हणून राहिले, त्यांना आंतरराष्ट्रीय करारनाम्यांनीं संरक्षण देण्यांत आलें. यामुळें या प्रश्नाचें अंतर्गत स्वरूप नष्ट होऊन, तो सर्वांच्या जिव्हाळ्याचा होऊन बसला. एका दृष्टीनें महायुद्धापूर्वीचा मध्ययुरोपचा नकाशा सोपा व सुटसुटीत होता असें म्हणावें लागतें. कारण त्यामध्यें जर्मनी, ऑस्ट्रिया–हंगेरीचें प्रचंड साम्राज्य मध्यावर, पूर्वेकडे रशियाचें साम्राज्य, दक्षिणेस इटली व चार छोटीं बाल्कन राष्ट्रें एवढींच होतीं. पण युद्धानंतर तो अधिक गुंतागुंतीचा झाला. झेकोस्लोव्हाकिया; पोलंड; ऑस्ट्रिया–हंगेरी; जर्मनी हीं राष्ट्रें मध्यावर, त्याच्याखालीं रुमानिया; युगोस्लाव्हिया; दक्षिणेस बाल्कन राष्ट्रांचा खुर्दा, आणि डोक्यावर फिनलँड; इस्टोनिया; लॅटाव्हिया; लिथुआनिया, इत्यादि छोट्या राष्ट्रांची खिचडी—असा हा गर्दीचा देखावा आला. ज्या जातींना स्वतंत्र प्रांत देणें शक्य होतें त्यांचें एकेक स्वतंत्र राष्ट्र बनविण्यांत आलें. पण एवढ्यानेंहि भागेना. म्हणून दुसऱ्या राष्ट्रांच्या अंमलाखालील अल्पसंख्यांकांना कायदेशीर संरक्षण बहाल करण्यांत आलें. महायुद्धापूर्वी परकीय राष्ट्रांतील अल्पसंख्यांकांचा आंकडा सहा कोटी होता ! पण या नवीन व्यवस्थेमुळें युद्धानंतरहि दोन कोटी अल्पसंख्यांक आत्मे परक्यांचे दास अतएव असंतुष्ट राहिले. या असंतुष्ट

आत्म्यांनीं पुनः एकवार उचल खाल्ली असून, स्वतंत्रतेसाठीं धडपड चालू केली आहे. पण या दोन कोट अल्पसंख्यांकांत निदान वीस जातींचे तरी नमुने खास आहेत आणि ते इतर राष्ट्रांतून असें पेरले गेले आहेत कीं, त्यांना स्वतंत्रता द्यावयाची झाल्यास, इतर बहुसंख्यावाल्यांना दुसऱ्यांचे अल्पसंख्यांक बनविणें भाग पडेल. अर्थात् सरहद्दीच्या रेघा अधिक गिजबट करून हा प्रश्न सुटण्यासरखा नाहीं.

पण यांत मध्ययुरोपांत हिटलरच्या रक्तमिमांसेनें पुनः एकवार जगाचें लक्ष्य वेधलें आहे. आपल्या हाडामांसांचे गोळे एकत्रित करण्याच्या त्याच्या रणदुंदुभीबरोबर, मध्ययुरोपांतील जर्मन रक्ताचे अवशेष थडग्यांतूनसुद्धजागे होऊन, सर्वत्र धिंगाणा घालूं लागल्याचें दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें आहे. हिटलरनें झेकोस्लोव्हाकियाचा पहिला लचका तोडून आपली रक्तपिपासा तात्पुरती कां होईना थंड केली. जर्मन अल्पसंख्यांकांवर होणारा अन्याय व त्यांचा अनन्वित छळ नाहींसा करण्याच्या उदात्त हेतूनें, ही मोहीम हिटलरनें काढली. पण याचे परिणाम फार दूरवर पोचणार आहेत हें उघड आहे. किंबहुना त्यामागें हिटलरचा खरा हेतु दुसराच आहे, असें मानण्यास भरपूर पुरावा आहे. मध्ययुरोपांतील राजकारणांत आपल्या रक्ताचा व संस्कृतीचा जाज्वल्य अभिमान प्रज्वलित करून, धांगडधिंगा घालणें, दुसरीं राष्ट्रें सफाईदार रितीनें घशाखालीं उतरून पुनः जर्मन साम्राज्याची स्थापना करणें, हीच त्याची महत्त्वाकांक्षा दिसून येत आहे. अल्पसंख्यांकांचें तुणतुणें वाजवीत साम्राज्याचे पोवाडे गाण्याचा त्यांचा हा प्रयत्न आहे.

पण जर्मन अल्पसंख्यांकांचा विचार करितांना इतर अल्पसंख्यांक व राष्ट्रांचे हितसंबंध यांकडे दुर्लक्ष्य करून चालणार नाहीं. सर्वांचा एकसमयावच्छेदेंकरून विचार करावयाचा म्हणजे, युरोपांतील प्रत्येक राष्ट्रांतील अंतस्थ परिस्थितीकडे थोडेंफार पाहणें जरूर आहे. या दृष्टीनें प्रत्येक राष्ट्राकडे थोडीफार नजर टाकून झाल्यावर, शेवटीं झेकोस्लोव्हाकिया व जर्मन अल्पसंख्यांक यांचा साकल्येंकरून विचार करूं.

अल्पसंख्यांक यांची व्याख्या बनवावयाची झाली तर अशी करितां येईल कीं, राष्ट्रांतील बहुसंख्य जातीपेक्षां निराळ्या जातीचे; भाषेचे;

धर्मांचे व संस्कृतीचे लोक, कीं ज्यांना कांहीं थोडाफार पूर्वीचा इतिहास आहे असे. अल्पसंख्यांकांना राजकीय हें पालुपद मागें लावून द्यावयाचें असल्यास, त्यांना स्वतंत्र राजकीय आकांक्षा हव्यात. देशाच्या राजकारणांत आपणांस निश्चित स्थान व प्रतिनिधित्व मिळावें आणि आपल्या हितसंबंधांचें नीट संरक्षण व्हावें, अशी आकांक्षा त्यांना उत्पन्न झाली, कीं बहुसंख्याकवाल्यांचा विरोध यांना थोडाफार सहन करावा लागतो. म्हणून अशा जातींना 'राष्ट्रीय अल्पसंख्यांक' असें संबोधतात. १९१८ नंतर अशा अल्पसंख्यांकांना वंश, भाषा, संस्कृति व धर्म इत्यादि बाबतींत सवलती देऊन त्यांना संतुष्ट राखण्याकरतां राष्ट्रसंघामार्फत, निरनिराळ्या राष्ट्रांनीं आपापसांत करारमदार केले आहेत. त्यांची अंमलबजावणी कशी होते तें आपण पुढें पाहूं. प्रथम प्रत्येक राष्ट्रांतील अल्पसंख्यांक व त्यांना मिळणारें स्वातंत्र्य यांचा थोडासा विचार करूं.

## पोलंड

इ. स. १७९५ पूर्वी हें राष्ट्र रशिया, प्रशिया व ऑस्ट्रिया–हंगेरी या तिघांत विभागलेलें होतें, त्यानंतर तें स्वतंत्र झालें पण महायुद्धानंतर त्यांत कांहीं जर्मन लोकहि आले. पोलंडमधील अल्पसंख्यांकांचें एकंदर लोकसंख्येशीं प्रमाण शेंकडा ३०·९ पडतें. त्यामध्यें युक्रेनिअन लोक पाऊणेतीन दशलक्ष असल्यानें, त्यांचें प्रमाण मोठें आहे. १९३१ मध्यें त्यांचें बळ ४२,००,००० इतकें झालें आहे. यानंतर गोरे रशियन येतात. विल्नो व पोलेसी या प्रांतांत त्यांची निम्मी संख्या आहे. निदान १५ लाख तरी ते असावेत. जर्मन अल्पसंख्यांकांचें एकंदर लोकसंख्येशीं शेंकडा ३·९ प्रमाण असून, त्यांची संख्या निदान सात लाख असावी. जर्मनीच्या मतें, निदान १७ लाख जर्मन लोक पोलंडमध्यें असावेत. लिथुआनिअन लोक ऐंशी हजार आहेत. यांशिवाय, झेक, ज्यू, रशियन इ. अल्प प्रमाणांत आहेत.

सन १९३५ जूनपासून मतदान संकुचित करण्यांत आलें असून; कायदेमंडळाची निवडणूक अप्रत्यक्ष रीत्या ठरविल्यामुळें, अल्पसंख्यांकांना योग्य प्रमाणांत प्रतिनिधित्व मिळत नाहीं अशी जोराची तक्रार आहे.

उदाहरणार्थ, अल्पसंख्यांकांना कनिष्ट कायदेमंडळांत २०० पैकीं निदान ६६ तरी जागा मिळावयास हव्यात, तिथें त्यांना अवघ्या २४ मिळाल्या. वरिष्ठ कायदेमंडळांतील ९६ पैकीं अवघ्या १० च जागा मिळाल्या. अर्थात ही ओरड दिवसेंदिवस वाढती आहे. युक्रेनिअन्सचें प्रचंड बळ एकत्रित असूनहि त्यांचें कांहीं चालत नाहीं; तिथें जर्मन अल्पसंख्यांकांचा काय पाड ! स्वभाषेंतून व्यवहार करण्याची मुभा सर्वांना आहे. प्राथमिक शिक्षण प्रत्येक जिल्ह्याच्या परिस्थितीवर अवलंबून आहे. शेंकडा २५ अल्पसंख्यांक ज्या जिल्ह्यांत असतील, तिथें त्या भाषेचें शिक्षण दिलें जातें. खासगी शाळा चालविण्यास पूर्ण मुभा आहे; पण हल्लीं त्यांवर बरेंच नियंत्रण बसलें आहे. १९३५ मध्यें, युक्रेनियन ४५७, गोरे रशियन १६, जर्मन ४७ अशा शाळा होत्या. पण दोन भाषा शिकविणाऱ्या शाळांचें प्रमाण मोठें आहे. कारण त्यांना सरकार उत्तेजन देतें. संस्कृतीचा फैलाव करणाऱ्या व आपल्या जातिबांधवांची आर्थिक स्थिति सुधारणाऱ्या अनेक संस्था देशांत प्रचलित आहेत. तरी पण हिटलरच्या शिकवणीवरून, जर्मन लोक अधिक हक्क मिळावेत म्हणून धडपडत आहेतच. जर्मन साम्राज्याच्या वाढीस हा प्रदेश योग्य आहे, अशी हिटलरची कल्पना असल्यामुळें, प्रयत्न चालू आहेत. पण त्याबरोबर युक्रेनिअन लोकांतहि राजकीय महत्त्वाकांक्षा निर्माण झाली असून, आपलें राष्ट्र स्वतंत्र व्हावें, अशी इच्छा प्रसृत झाली आहे. पोलंडमधील अल्पसंख्यांकांचा प्रश्न बराच महत्त्वाचा असून, कदाचित् त्यापायीं युरोपांत प्रांताचीं पुनर्विभागणी होण्याचा संभव आहे.

## रुमानिया

महायुद्धानंतर लुटीच्या वांट्यानें फुगलेलें हें राष्ट्र आहे. यांतील अल्पसंख्यांकांचें एकंदर लोकसंख्येशीं प्रमाण शेंकडा २५ पडत असून, ४०-४५ लाख लोक या सदरांत आहेत. मग्यार लोक सुमारें चौदा लाख ( शेंकडा ७·६८ ), जमर्न आठ लाख ( शें. ४·२९ ), ज्यू आठ लाख ( शें. ४·५९ ), रुथेनियन पांच लाख ( शें. २ ), बल्गर्स तीन लाख, असें प्रमाण आहे. पण या अल्पसंख्यांकांच्या खिचडीमुळें त्यांचे स्वतंत्र प्रांत

बनविणें अवघड झालें आहे व त्याहिपेक्षां ते मातृभूमीपासून फार अलग झाले असल्यानें, त्यांना जोडणें कठीण आहे. सर्वत्र अल्पसंख्यांकांना भरपूर प्रतिनिधित्व मिळालेलें असून, पुरेसें संरक्षणहि पण आहे. मातृभाषेच्या बाबतींत त्यांना पूर्ण स्वातंत्र्य आहे. प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या बाबतींत योग्य त्या सवलती आहेत. संस्कृतिपोषक व आर्थिक परिस्थिति सुधारणाऱ्या संस्थांना भरपूर वाव आहे. उदाहरणार्थ, वर्तमानपत्रांत मग्यार लोकांचीं ३१२, जर्मन ११९, ज्यू ३० अशीं स्वतःच्या जातीकरितां निघणारीं पत्रें आहेत. आर्थिक परिस्थितीच्या बाबतींत अल्पसंख्यांक सुधारलेले असल्यानें सधन आहेत. भांडवलवाले तेच आहेत. यामुळें देशाच्या राजकारणांतील त्यांचें प्रभावी मत इतर बहुसंख्य प्रजाजनांना पाहवत नाहीं. पूर्वीच्या हंगेरी साम्राज्यांतील आपलें वर्चस्व मग्यार लोक अद्याप विसरलेले नाहींत व त्यांचाच आंकडा मोठा असल्यानें, केव्हां केव्हां जुन्या आठवणी त्यांना महत्त्वाकांक्षेची जाणीव करून देतात, व क्वचित् प्रसंगीं त्यामुळें दंगलहि माजते. तथापि सर्वांना सारखें वागविण्याच्या धोरणाबद्दल खरोखरी रुमानियाचें कौतुक करणें भाग आहे.

## युगोस्लाव्हिया.

यामध्यें सर्बस्, क्रोटस् आणि स्लोव्हाकस् या लोकांची मुख्यतः भरती आहे. महायुद्धानंतर अधिक प्रांत बळकावलेलें हें राष्ट्र आहे. अल्पसंख्यांकांत, जर्मन पांच लाख (शें. ३·६० ), मग्यार साडेचार लाख (शें. ३·३६), अल्बानियन्स साडेतीन लाख (शें. २·५), रुमानियन्स साठ हजार, झेक्स पाउणे दोन लाख (शें. १·३ ), तुर्की एक लाख तीस हजार (शें. १·१ ) व इतर. सार्वत्रिक, प्रत्यक्ष आणि समप्रमाणांतील मतदानपद्धतीमुळें सर्व जातींना पुरेसें संरक्षण व प्रतिनिधित्व लाभलें आहे. स्थानिक संस्थांपासून ते तहत कायदेमंडळापर्यंत सर्व लहानसहान जमातींना प्रतिनिधित्व मिळतें, त्यामुळें कोणीहि असंतुष्ट रहात नाहीं. मातृभाषेबाबतहि भरपूर स्वातंत्र्य आहे. तरी पण हिटलरच्या नवीन शिकवणीवरून जर्मन जातींतील तरुण पिढींत रक्ताचा अभिमान जागृत होऊन, देशाच्या राजकारणाचा खेळखंडोबा होऊं लागला, म्हणून सरकारला त्याच्यावर नियं-

त्रण घालणें भाग पडलें. सर्बस् आणि क्रोटस् या दोन पक्षांमध्यें मारामारी लावून त्याचा फायदा घ्यावा, यासाठीं जर्मनी व हंगेरी नेहमीं टपून बसलेले आहेत. विशेषतः सर्बस् लोकांत जास्त भरणा मग्यार लोकांचा असल्यानें, त्यांचा ओढा हंगेरीकडे असणें स्वाभाविक आहे. तरी पण सरकाऱ्च्या उदार व समानतेच्या धोरणामुळें, असंतुष्टतेचें वातावरण देशांत नसल्यानें, जातिवादाचीं बीजें तेथें रुजूं शकत नाहींत; हें मात्र खरें.

## हंगेरी.

अल्पसंख्यांकांची संख्या एकंदर लोकसंख्येंत शेंकडा आठ एवढीच आहे. त्यामध्यें जर्मन चार लाख सत्तर हजार (शें. ५), स्लोव्हाक्स एक लाख चाळीस हजार, थोडेफार सर्बस् व क्रोटस्, रुमानियन्स, इत्यादि असे आहेत. मग्यार लोकांचें अविभाज्य स्वतंत्र असें हें एकुलतें एक राष्ट्र आहे. महायुद्धानंतर याचीं अनेक शकलें उडालीं असल्यानें, जर्मनीच्या बाजूनें व्हर्सलिसचा तह दुरुस्त करून घेण्याच्या कटांत तो सामील आहे. इतरत्र पसरलेले मग्यार जातिबांधव एकत्रित करून, एकवंशीय राष्ट्र स्थापन व्हावें ही त्यांची प्रामाणिक इच्छा आहे. अर्थात, राष्ट्रांत अगोदर अल्पसंख्यांक थोडे असल्यानें व शिवाय ते एकदेशीय व एकवंशीय राज्यस्थापनेस अडथळा आणणारे असल्यानें, त्यांनीं देश सोडून निघून जावें, अशी त्यांची खरी इच्छा. म्हणून त्यांना प्रतिनिधित्व तर नाहींच; पण स्वभाषा, संस्कृति इत्यादि बाबतींतहि पुरेसें स्वातंत्र्य नाहीं. प्राथमिक शाळा थोड्याफार या जातींच्याकरितां आहेत हें खरें; पण मग्यार संस्कृति व भाषा वाढावी म्हणून त्यांची नेहमीं खटपट चालू असते. म्हणून प्राथमिक शाळेव्यतिरिक्त संस्कृति व आर्थिक परिस्थिति सुधारणाऱ्या संस्था स्थापण्याचें स्वातंत्र्य अल्पसंख्यांकांना मुळींच नाहीं. फक्त जर्मन लोकांशीं विशेष स्नेहसंबंध म्हणून त्यांची फक्त एकच संस्कृतिपोषक संस्था या देशांत आहे. नाहीं म्हणायला या जातींचीं वेगवेगळीं वर्तमानपत्रें मात्र प्रचलित असून, तीं तें कार्य थोड्याबहुत प्रमाणांत करीत आहेत. आर्थिक क्षेत्रांत मग्यार लोक पुढारलेले असल्यानें, अल्पसंख्यांकांची चोहोंकडून मोठी कुचंबणा झालेली आहे. थोडक्यांत अल्पसंख्यांकांना स्वतंत्र अस्तित्व असें फारसें नाहीं.

त्यामध्यें जर्मन लोकांचेंच बहुमत असल्यानें, पण जर्मनीस हंगेरीच्या स्नेहाची अत्यंत अवश्यक असल्यानें, त्या प्रश्नापायीं राजकीय घोटाळे मात्र निर्माण झालेले दिसत नाहींत. शिवाय हंगेरियन लोकांवर इतरत्र इतका अन्याय होत आहे कीं त्या राष्ट्रांची अन्यायाविरुद्ध तोंडांतून 'ब्र' काढण्याची छाती नाहीं.

## ऑस्ट्रिया.

निव्वळ एकच वंश व एकच रक्त अशा लोकांचें राष्ट्र म्हणून युरोपांत ऑस्ट्रियाची प्रसिद्धी आहे. अर्थात् अल्पसंख्यांकांचा प्रश्नच मुळीं इथें उद्भवत नाहीं; तरी पण जर्मन भाषेशिवाय इतर भाषा बोलणारे एक लक्ष सत्तर हजार लोक येथें आहेत. युगोस्लाव्हिअन ४२ हजार, झेकस् ८० हजार, मग्यार २५ हजार आणि थोडेफार ज्यू, असे लोक ऑस्ट्रियांत राहतात; पण ते अत्यंत अल्प असल्यानें, त्यांना अल्पसंख्यांक म्हणून संबोधणें कठीण पडतें. कारण, एकंदर लोकसंख्येशीं त्यांचें प्रमाण अत्यंत अल्प आहे, म्हणून राजकारणांत त्यांना कसलेंच स्थान नाहीं. वरील थोडेसे लोक विस्कळित अवस्थेंत आहेत हेंहि त्यास एक कारण आहे. अर्थात् त्यांना कसलेंहि स्वातंत्र्य नाहीं, हें निराळें सांगावयास नकोच. जर्मनीनें ऑस्ट्रियास गिळंकृत केल्यापासून, हे पाश अधिक घट्ट आवळण्यांत आले असल्यास नवल नाहीं. कांहीं थोड्या प्राथमिक शाळांमधून अल्पसंख्यांकांना त्यांच्या मातृभाषेचें शिक्षण देतात हें भाग्य समजावयाचें. थोड्याफार असलेल्या अल्पसंख्यांकांवर वरवंटा फिरवून, सर्वांना संपूर्ण जर्मनी बनाविण्याची नवीन स्तुत्य ( ! ) कामगिरी हिटलरनें नुकतीच सुरू केली आहे.

## इटली

महायुद्धानंतर, इटॅलियन लोकांची शेंकडा ४२ वस्ती असलेला जर्मन प्रांत–टायरोल–इटलीस जोडला गेला. त्यामुळें त्या प्रांतांतील शेंकडा ५० जर्मन लोक मात्र इटलीचे अल्पसंख्यांक झाले. इटलींत, स्लोव्हाक्स व क्रोटस् पांच लक्ष पंचवीसहजार असून, टायरोलमधील जर्मन; दोन लाख साठ हजार आहेत. हेच महत्त्वाचे अल्पसंख्यांक. इटलीचें धोरण अत्यंत अनुदारपणाचें असून, या अल्पसंख्यांकांना संपूर्ण इटॅलियन करण्याचें

धोरण मुसोलिनीनें आंखलें आहे. देशांत हुकूमशहाची राजवट चालू असल्यानें, या अल्पसंख्यांकांना तोंड दाबून बुक्क्यांचा मार मिळत आहे. अल्पसंख्यांकांना मातृभाषेचें मुळींसुद्धां शिक्षण नाहीं. रोमन लिपीचा स्वीकार करण्यास भाग पडलें आहे. अल्पसंख्यांकांनीं व्यापलेल्या प्रदेशांतीलसुद्धां सर्व नांवें रोमन भाषेंतून घेतलीं असून, मारूनमुटकून त्यांना इटॅलियन करण्याचा अट्टाहास चालू आहे. टायरोल प्रांतांतसुद्धां जर्मन भाषेची गळचेपी करून, प्राथमिक शाळांतून रोमन लिपीचा प्रचार सक्तीनें चालविला आहे. मातृभाषा शिकविण्याच्या खासगी शाळाच काय पण खासगी शिकवण्यांनासुद्धां कायद्यानें बंदी केली असून, त्याबद्दल शिक्षासत्र फार जोरांत आहे. १९३४ सालीं ऑस्ट्रियाचा डॉल्फस व मुसोलिनी यांची भेट होऊन स्नेह जमल्यापासून, जर्मन लोकांना उगीच थोडीशी सवलत मिळाली आहे. चर्चमध्येंसुद्धां प्रार्थना इत्यादि रोमन भाषेंत झाल्या पाहिजेत असा कडक निर्बंध आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, औद्योगिक व आर्थिक बाबतींत अल्पसंख्यांक फार मागें पडले आहेत. त्यांचीं स्वतंत्र वर्तमानपत्रें नाहींत; एवढेंच नव्हे, टायरोल प्रांतांतील जर्मन जमीनदारवर्गावर करांची बेसुमार वाढ करून, त्यांचा सर्व दृष्टीनें अनन्वित छळ चालविला आहे. अल्पसंख्यांकांचें संरक्षण करणारे आंतरराष्ट्रीय कारारमदार असूनहि ते कवडीमोल ठरले आहेत. कारण त्यांची अंमलबजावणी कोण व कशी करणार ? इटलीचा स्नेह कांहींहि केल्या तोडावयाचा नाहीं; एवढेंच नव्हे तर इटलीचा भुंगा ब्रिटनच्या मागें ठेवून, मध्ययुरोपांत इंग्लंडला लक्ष घालण्यास सवडच द्यावयाची नाहीं आणि एकामागून एक एक प्रांत पादाक्रांत करावयाचे, हें हिटलरचें धोरण असल्यानें, टायरोल प्रांतामध्यें आपल्या रक्ताच्या जातिबांधवांवर चाललेल्या अन्यायाची दाद; हिटलर घेऊं शकत नाहीं. म्हणजेच थोडक्यांत, 'आई जेऊं घालीना व बाप भीक मागूं देईना' अशा कठीण परिस्थितींत इटलीमधील जर्मन अल्पसंख्यांक सध्यां सांपडले आहेत, व जोंवर युरोपियन राजकारणांत या दोघां अनिष्ट ग्रहांची गट्टी कायम आहे, तोंवर त्यांची छळणूक थांबेल असें मात्र वाटत नाहीं. अल्पसंख्यांकांना संरक्षण देण्याचें अभिवचन देऊन, नंतर त्यांचा

छळ करून अघोर अन्यायाचे व पाशवी वृत्तीचें वर्तन, मुसोलिनी सध्यां करीत आहे.

## जर्मनी.


जर्मनींत अल्पसंख्यांकांचें प्रमाण अत्यल्प म्हणजे शेंकडा फक्त दोन आहे; म्हणजे त्यांची संख्या सुमारें बारा लक्ष भरते. त्यांमध्यें मुख्यतः भरणा पोलिश लोकांचा आहे. त्यांची संख्या सात लक्ष वीस हजार आहे. ल्युसेटन सर्बस् एक लक्ष साठ हजार आहेत. सुमारें सहा लाख ज्यू लोकांची वस्ती आहे. यांशिवाय थोडेफार झेक्स, डेन्स, लिथुआनिअन्स इत्यादि आहेत. आंतरराष्ट्रीय करारनाम्यांनीं अल्पसंख्यांकांना संरक्षण देण्यास जर्मनी बांधला नाहीं हें खरें; पण नैतिक जबाबदारी त्यास खास टाळतां येत नाहीं. शिवाय आपला हात इतर दगडांच्या ढिगाखालीं जोंवर सांपडलेला आहे, तोंवर जर्मनीस अनुदार धोरण स्वीकारणें शक्य नाहीं. म्हणून बिचाऱ्या ज्या ज्यूंना जगाच्या पाठीवर स्वतःच्या मालकीची अशी वीतभरहि जागा नाहीं, अशांवर त्यानें मोर्चा चढवून, त्यांना 'त्राहि भगवान्' करून सोडिलें आहे. तरी पण जर्मनींत रक्ताच्या शुद्धिकरणाच्या पवित्र व गोंडस नांवाखालीं चाललेल्या अनन्वित जुलुमाचा आणि पाशवी कृत्यांचा परिणाम अल्पसंख्यांकांना भोगावा लागत आहे.

हुकूमशहाची राजवट असल्यानें सर्व पक्ष भरडून काढून, एकच जर्मन पक्ष उरला आहे. उत्तर–सायलेशिया व पूर्व–प्रशिया या प्रांतांत अल्पसंख्यांकांना मातृभाषेचें शिक्षण देण्यांत बरीच हेळसांड होत आहे. इटलीइतपत जरी दडपशाही नसली, तरी पुरेशी सवलत मिळत नाहीं किंवा स्वतः सरकार सोय करीत नाहीं; हें मात्र खास. ल्युसेटन सर्बस् हे जर्मन राष्ट्राचे अवशेष असें समजून, त्यांना आपल्यांत समाविष्ट केलें. डेन्मार्क-मध्यें जर्मन लोकांना मिळणाऱ्या सवलतींचा मोबदला म्हणून व डॅनिश लोक खरे आर्यवंशीय म्हणून, त्यांच्या मातृभाषेला बरीचशी सवलत जर्मनींत दिली जाते. झेक्स, लुथिआनिअन्स इत्यादि लोकांची फारच गळचेपी झाली आहे. फक्त पोलिश लोकांना आर्थिक बाबतींत थोडेंफार स्वातंत्र्य लाभलेलें आहे. पोलिश अल्पसंख्यांक बरेच असल्यानें व पुढेंमागें पूर्वेकडील

आक्रमणाच्या कामीं पोलंड उपयोगीं पडणार असल्यानें, पोलिश लोकांना जर्मनी सौजन्यानें वागवित आहे. बाकीच्यांना पद्धतशीर भरडून काढण्याचें यंत्र जोरांत चालू आहे.

## बाल्टिक राष्ट्रें.


बाल्टिक राष्ट्रांत रशियन अल्पसंख्यांकांना महत्त्वाचें स्थान देणें प्राप्त आहे. लिथुआनियामध्यें ५० हजार (शें. २), इस्टोनियांत ९२ हजार (शें. ८·२) व लॅटाव्हियांत २ लक्ष ३३ हजार (शें. १२), असे रशियन लोक आहेत. त्यांच्या खालोखाल जर्मन येतात. लिथुआनियांत ३५ हजार, इस्टोनियांत १६ हजार व लॅटाव्हियांत ६२ हजार, असे जर्मन लोक पेरले गेलेले आहेत. ज्यू लोकांची संख्याहि बरीच आहे. लिथुआनियांत दीडलक्ष (शें. ७·५), लॅटाव्हियांत ९३ हजार (शें. ४·७) व इस्टोनियांत साडेचार हजार, असे ज्यू लोक राहतात. लिथुआनियांत ६५ हजार (शें. ३·३), व लॅटाव्हियांत पन्नास हजार (शें. ३), असे पोलिश अल्पसंख्यांक अडकले आहेत. यांशिवाय या तीन राष्ट्रांचे अल्पसंख्यांक एकमेकांत अडकले आहेत ते निराळेच. थोडक्यांत लिथुआनियांत अल्पसंख्यांकांचें प्रमाण एकंदर शेंकडा १५, इस्टोनियांत शेंकडा १२ व लॅटाव्हियांत शेंकडा २७, असें असल्यानें व राष्ट्रें छोटीं असून, अल्पसंख्यांकांना पाठबळ मोठ्या राष्ट्रांचें असल्यानें, त्यांना वागविण्याच्या कामांत मोठ्या नाजुकपणें वागावें लागत आहे. विस्तृत मतदानाचा हक्क, समप्रमाणांत प्रतिनिधित्व यामुळें अल्पसंख्यांकांना भरपूर संरक्षण मिळत असल्यानें, ते अत्यंत संतुष्ट आहेत. तरी पण लिथुआनिया जर्मन गरुडाच्या नजरेंतून सुटलेला नाहीं. कदाचित् बहुसंख्य जर्मन लोकांचा प्रांत मेमेल,कीं जो युद्धानंतर लिथुआनियास मिळाला, त्यापायीं युरोपमध्यें जर्मनी लवकरच दंगल उडविणार असा रंग दिसूं लागला आहे. यामुळें लिथुआनियांत अल्पसंख्यांकांच्या चळवळीवर करडी नजर सध्यां ठेवली आहे. लिथुआनियन भाषा व संस्कृति यांचा प्रसार व्हावा म्हणून त्या लोकांची जोराची खटपट चालू आहे आणि हीच तक्रार अल्पसंख्यांकवाल्यांची मुख्यतः आहे. तसेंच पाहिलें तर बाल्टिक राष्ट्रें स्वयंनिर्णयाच्या फाजील ओढून






(वरील चित्र–)
इंग्लडांत चेंबर्लेन-
साहेबांची वांवडी.
जहालांचा प्रचार.

(बाजूचें चित्र–)
रोमन साम्राज्याच्या
स्वप्नांत गर्क झालेला
मुसोलिनी.






(वरील चित्र–)
लोकशाही गिळं-
कृत करण्यास
सिद्ध झालेली
हिटलर-मुसोलि-
नीची जोडगोळी

(बाजूचें चित्र-)
आज ब्रिटनची
पत कमी होणें
म्हणजेच उद्यां
त्याची शांतता
नष्ट होणें–इंग्लं-
डांत जहाल
असा प्रचार
करितात.

ताणून केलेल्या अर्थापासून निर्माण झालेलीं आहेत. तीं इतकीं छोटीं आहेत आणि त्यामध्यें जवळच्या मोठमोठ्या राष्ट्रांचे हितसंबंध इतके निगडित झालेले आहेत, कीं तीं स्वतंत्रावस्थेंत राहणेंच मुळीं शक्य नाहीं. कारण स्वतंत्र म्हणून जगण्यास अयोग्य व असमर्थ अशीं तीं आहेत. स्थानिक स्वराज्य उपभोगीत, मोठ्या राष्ट्रांचीं अंकित आणि अल्पसंख्यांक म्हणून जीवित कंठणें त्यांना इष्ट आहे; व ही गोष्ट एक दिवस युरोपच्या राजकारणांत घडून आल्याविना राहणार नाहीं. सध्यां नाझी तत्त्वज्ञानानें भारलेले बेफाम जर्मन तरुण या राष्ट्रांतून असंतोषाचें वातावरण निर्माण करण्यांत गुंतले आहेत. बाल्टिक समुद्रावरील वर्चस्वासाठीं हे प्रांत जर्मनी व रशिया या दोघांनाहि हवे आहेत. अर्थात या दोघांच्या लढ्यांत काय चार दिवस स्वतंत्रावस्थेंत काढतां येतील ते भाग्याचे, असें या राष्ट्रांनीं समजणें भाग आहे.

## झेकोस्लोव्हाकिया

अनेक वंश आणि भाषा यांची खिचडी झालेली, असा देश या राष्ट्राइतपत युरोपांत अन्य सांपडणें कठीण. अल्पसंख्यांकांचें प्रमाण या देशांत एकंदर लोकसंख्येच्या मानानें अधिक, म्हणजे शेंकडा ३३·८ इतकें आहे. अल्पसंख्यांकांचे पाठीराखे तर बिलगूनच. अशा गुंतागुंतीनीं बजबजलेलें हें राष्ट्र म्हणजे अठरा धान्यांचें कडबोळें. स्वयंनिर्णयाचें तत्त्व अंमलांत आणण्यासाठीं व विशेषतः महायुद्धामध्यें ऑस्ट्रियन साम्राज्यांत फंदाफितुरी करून दोस्त राष्ट्रांना मदत केल्याबद्दल, हें स्वातंत्र्य बहाल करण्यांत आलें. यापूर्वी हें राष्ट्र निदान पांचशें वर्षें तरी ऑस्ट्रियन साम्राज्यांत सामील झालेलें होतें. झेक लोकांना खरें स्वातंत्र्य द्यावयाचें होतें, म्हणून त्यांच्या जोडीस स्लोव्हाक लोक व त्यांचा प्रांत घालून हें प्रबल व प्रशस्त राष्ट्र बनविण्यांत आलें.

झेकोस्लोव्हाकियांतील दीड कोट प्रजाजनांमध्यें अल्पसंख्यांक पुढीलप्रमाणें आढळतील:—३२॥ लक्ष जर्मन, ६॥ लक्ष मग्यार, ५॥ लक्ष रुथेनिअन, ९० हजार पोलिश आणि एक लक्ष ८६ हजार ज्यू. भौगोलिक दृष्ट्या जर्मन अल्पसंख्यांकांचा प्रश्न बराच महत्त्वाचा आहे. अनेक शतकां-

पूर्वी त्यांचा झेक लोकांशीं असा मिलाफ झालेला आहे कीं, त्यांना एकमेकांपासून तोडणें कठीण आहे. त्यांचें स्वतंत्र राष्ट्र बनविणेंहि अशक्य आहे. १९१८ सालीं जर्मन पुढारी जोसेफ सेलिगर यानें असे उद्गार काढले आहेतः—" निरनिराळ्या आठ प्रदेशांच्या तुकड्यांतून अल्पसंख्यांक जर्मन असे विभागले गेले आहेत आणि ते आठ तुकडे इतके विस्कळित व एकमेकांपासून अलग आहेत कीं, त्यांमध्यें झेक लोकांचे प्रांत हटकून येऊन घोंटाळा माजणार आहे. त्या आठ तुकड्यांचें स्वतंत्र राष्ट्र बनविण्याची कल्पना अत्यंत अव्यवहार्य आहे. आर्थिक दृष्टयाहि त्यांना स्वतंत्र राहतां येणें शक्य नाहीं. त्यांचें राष्ट्र बनविण्याची कल्पना म्हणजे मला " राष्ट्र " या शब्दाची थट्टा केल्याप्रमाणें भासतें. " हे उद्गार उद्धृत करण्याचें प्रयोजन इतकेंच कीं हल्लीं ज्या गोष्टी सुडेटन जर्मनांच्या बाजूनें पुढें येतात, त्यांविषयीं त्यावेळचा कल कसा होता, हें दाखवावें.

वंश, भाषा, संस्कृति इत्यादिकांनीं अत्यंत भिन्न अशा लोकांचें हें राष्ट्र बनविलें आहे, ही जाणीव राष्ट्राच्या कर्णधारांना प्रथमपासून असल्यानें, अल्पसंख्यांकांना समानतेनें आणि सौजन्यानें वागविण्यांत त्यांनीं कोणतीच कसूर दाखविलेली नाहीं. प्रथमपासून ही जबाबदारी व सर्वांच्या संरक्षणाची हमी त्यांनीं शिरावर घेतल्यामुळें प्रथमपासून फार जपून पाऊल त्यांनीं टाकिलें आहे. अल्पसंख्याकांच्याकरितां जेवढ्या सुखसोई करितां येणें शक्य होतें तेवढ्या त्यांनीं केल्या. सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्य संपूर्ण दिलें. कायदेमंडळांतहि त्यांना योग्य तें प्रतिनिधित्व मिळालें. उदाहरणार्थ सन १९३५ मध्यें जर्मन अल्पसंख्यांकांनीं चेंबर ऑफ डेप्युटिजमध्यें ७२ जागा व सिनेटमध्यें ३७ जागा उपटल्या. मग्यार लोकांना १० डेप्युटिज् व ७ सिनेटर्स मिळाले. रुथेनिअनांना ८ डेप्युटिज् व ३ सिनेटर्स व पोलिश लोकांना २ डेप्युटिज् लाभले. संपूर्ण भाषास्वातंत्र्यहि त्यांनीं सर्वांना बहाल केलें. ज्या प्रांतांत शेंकडा वीसपेक्षां अधिक अल्पसंख्यांक असतील त्यांच्या मातृभाषेच्या शिक्षणाची सोय त्यांनीं सरकारतर्फे केली. एवढेंच नव्हे तर ज्या प्रांतांत अल्पसंख्यांक बहुत असतील तेथील न्यायकोर्टाची भाषा व दप्तर हीं त्यांच्याच भाषेंत ठेवण्यांत आलीं. बहुतेक लोक दोन

भाषा बोलणारे असल्यानें त्या प्रकारच्या शाळा अधिक होत्या हें खरें; पण बाकीच्यांची त्यांनीं मुळींच हयगय केलेली नाहीं. एखाद्या माणसास जर राष्ट्रभाषा येत नसेल, तर त्याची मातृभाषा त्याला सरकारी कामकाजांत व कागदपत्रांत कोठेंहि उपयोगांत आणतां येते. परगण्यांच्या ऑफिसांची भाषावारी अशी सांपडते. दोन लक्ष तीस हजार जर्मन; तीन लक्ष त्र्याण्णव हजार मग्यार व वीस हजार पोलिश अशीं निव्वळ एकेका भाषेची ऑफिसें होतीं. सहा लक्ष वीस हजार जर्मन, दोन लक्ष पंधरा हजार मग्यार व पंन्नास हजार पोलिश अशीं दोन भाषा वापरणारीं ऑफिसें होतीं.

प्राथमिक शाळा, दुय्यम शाळा, त्यांचीं क्रमिक पुस्तकें, बोर्ड, इत्यादि सर्व गोष्टी त्या त्या अल्पसंख्यांकांकडे पूर्णपणें त्यांनीं सोंपविल्या. राष्ट्रभाषेची यत्किंचितहि बळजबरी त्यांनीं अल्पसंख्यांकांवर केलेली नाहीं. मातृभाषेच्या शिक्षणाची इतकी उत्तम सोय व व्यवस्था आपणांस इतरत्र मुळीं सांपडणें शक्य नाहीं. उदा०:–स. १९३४ मध्यें, देशांतील ४,४६,८१५ जर्मन मुलांपैकीं ४,२३,२०३ मुलें जर्मन शाळांतून; १,२४,५२९ मग्यार मुलांपैकीं ९७,९३३ मुलें मग्यार शाळांतून; १,१४,७७२ रुथेनिअन मुलांपैकीं ९६,५४५ मुलें रुथेनिअन शाळांतून; १४,७३४ पोलिश मुलांपैकीं १२,३४० मुलें पोलिश शाळांतूनच शिक्षण घेतांना आढळलीं. यावरून मातृभाषेच्या शिक्षणाची व्यवस्था त्यांनीं किती उत्कृष्ट ठेविली असेल याची कल्पना करावी.

झेकोस्लोव्हाकिया हें महायुद्धापासून जन्माला आलेलें नवीन अपत्य असल्यानें व तें लोकशाहीच्या उदात्त तत्त्वावर अधिष्ठित झालेलें असल्यानें, अल्पसंख्याकांना चांगल्याप्रकारें वागविण्यास प्रथमपासून करारमदारांनीं बांधलेलें आहे. त्याप्रमाणें हिटलरच्या उदयापर्यंत सर्व गाडा सुरळीत व व्यवस्थित असा चाललेला होता ;पण हिटलरच्या चळवळीपासून जर्मन अल्पसंख्याकांत असंतोष धुमसूं लागला आणि त्यांनीं तक्रार करण्यास सुरुवात केली. त्यांच्या मुख्य तक्रारी खालीलप्रमाणें होत्या.:–(१) अल्पसंख्याकांना सरकार उदारपणें वागवीत नाहीं. (२) राष्ट्र स्थापन झाल्यापासून लाखों जर्मन लोकांच्या नोकऱ्या गेल्या. लाखों लोक बेकारींत कुचमत पडले आहेत, त्यांच्या पोटापाण्याची सोय सरकार करीत नाहीं. (३) सरकारी कंत्राटें झेक

लोकांनाच सरकार देतें. उदा०:—स. १९३५ मध्यें सुडेटन प्रदेशांतील ३९६ कंत्राटांपैकीं ३३२ कंत्राटें झेक लोकांनीं लाटलीं. (४) जर्मन शाळा व भाषा सोडून देण्यास सरकारनें प्रोत्साहन दिलें. उदा. झेक भाषा शिकणाऱ्यांना उत्तेजनार्थ अन्नवस्त्र फुकट देऊं केलें. (५) सरकारी नोकरांत जर्मन लोकांना योग्य प्रमाणांत नोकऱ्या मिळत नाहींत. स. १९३७ मध्यें सरकारनें शेंकडा २२ जागा देऊं केल्या; पण दिल्या मात्र शेंकडा १२. (६) पार्लमेंटांत जर्मन पक्षाचें बळ बरेंच असूनहि त्यांना प्रधानमंडळांत स्थान दिलेलें नाहीं. तें स्थान देण्यास सरकार जर्मन राष्ट्राशीं द्रोह करा अशी अट घालून आमचा अपमान करितें. इ. इ.

यांपैकीं सर्व तक्रारी निखालस खोट्या आहेत असें मी म्हणत नाहीं. ज्यांच्या हातीं राज्यकारभाराचीं सूत्रें, ते थोडेंफार आपुलकीनें आपल्या जमातीकडे पाहणार हें स्वाभाविक आहे. त्याप्रमाणें त्यांनीं झेक लोकांना थोड्या अधिक नोकऱ्या व कंत्राटें दिलीं तर फारसें नांवें ठेवण्यासारखें आहे असें मला वाटत नाहीं. शिक्षणांत व उद्योगधंद्यांत लोकांच्या लायकीवरच या गोष्टी बऱ्याचशा अवलंबून असतात. झेक लोक अधिक उद्योगी, कर्तबगार, सुशिक्षित, आर्थिक बाबतींत पुढारलेले असल्यानें, नोकऱ्या व कंत्राटें यांत त्यांनीं अधिक हिस्सा उपटला यांत कांहींच गैर झालें नाहीं; पण वरीलपैकीं बऱ्याचशा तक्रारी कुरापतीप्रमाणें आहेत. आपल्यावरील अन्याय भडक स्वरूपांत चव्हाट्यावर दाखविल्याशिवाय आपला स्वार्थ कसा साधतां येणार, हा हेतु त्यांच्या बुडाशीं आहे; म्हणून त्या सर्व अतिशयोक्तीनें भरलेल्या आहेत असें म्हणणें भाग आहे. प्रधानमंडळांत न घेण्याचें कारण तर अगदीं उघड आहे. प्रधानमंडळांत स्थान नसतांनाहि, हेर हेनलिन पक्षानें जर्मनीशीं सूत बांधून सुडेटन प्रांत जर्मनींत समाविष्ट होऊं दिला. प्रधानमंडळांत जर कां स्थान देण्याचा मूर्खपणा त्यांनीं केला असता, तर त्यांनीं सबंध राष्ट्राचाच गळा सफाईदार रीतीनें कापला असता व जर्मनीस कायदेशीर रीत्या झेकोस्लोव्हाकिया सर्वच्या सर्व गिळंकृत करण्यास, भरपूर मदत खात्रीनें केली असती. अल्पसंख्यांकांकरितां त्यांनीं काय सुखसोई केल्या, काय काय सवलती दिल्या, त्या मुद्दाम आंकडेवारीनें वर दिल्या आहेत. त्यावरून झेकोस्लोव्हाकियाचें अल्पसंख्या-

कांना वागविण्याचें धोरण यत्किंचितहि दोषास्पद नव्हतें, याची खात्री पटल्याविना राहणार नाहीं. पण असें म्हणतात ना कीं, एखाद्या चांगल्या कुत्र्यास गोळी घालायची झाली कीं, तें पिसाळलेलें आहे असें प्रथम ठरवा; त्याप्रमाणें झेकोस्लोव्हाकियाच्या राजवटीस दूषणें दिल्याशिवाय सुडेटनच्या प्रदेशास हात कसा घालावयाचा, हा पेंच हेर हिटलर यांना पडला; आणि म्हणून वरील अन्यायांचा तक्ता जाहीर रीत्या त्यांनीं फडकावला. बिचारें झेकोस्लोव्हाकिया राष्ट्र, फ्रान्स आणि रशिया यांच्या पोकळ आश्वासनांवर विसंबल्यामुळें आयत्या वेळीं तोंडघशीं पडून, फजित झालें; पण ही कारवाई येथेंच थांबली नाहीं. हंगेरी आणि पोलंड यांनीं आपापले विभाग झेकोस्लोव्हाकियापासून तोडून घेतले. आतां खुद्द ३५ लक्ष स्लोव्हाक लोकांत स्वतंत्रतेची चळवळ सुरू झाली असून, थोड्या दिवसांत झेकोस्लोव्हाकिया राष्ट्र नामशेष होणार इतकें स्पष्ट दिसूं लागलें आहे.

## जर्मनीचें धोरण.

झेकोस्लोव्हाकियांतील सुडेटनांचा इतका कळवळा जर्मनीस आला आणि इंग्लंडलाहि त्यांच्याबद्दल पाझर फुटला, याचें कारण उघड आहे. इंग्लंडला कांहींहि करून युद्ध टाळायचें होतें म्हणून त्यापायीं हा बळी दिला. जर्मनीस तर प्रदेशच लाटावयाचा होता. पण सुडेटनवरील अन्यायाची मोजदाद करण्यास निघण्यापूर्वी आपले हात अन्यायानें किती बरबटले आहेत, याचा विचार जर्मनीनें कधीं केला आहे काय ? वंशाचा अभिमान इतका प्रखरतेनें पुकारला गेला आहे कीं, जर्मनींत अन्यवंशीयांस नागरिकच मुळीं होतां येत नाहीं, असा दंडक घातला आहे. ज्यू लोकांवरील अन्याय, त्यांचा छळवाद आणि त्यांची अमानुष कत्तल या गोष्टींस तर इतिहासांत दुसरी तोड सांपडावयाची नाहीं. जर्मनीचा हा इतिहास इतका काळ्याकुट्ट कृत्यांनीं भरलेला आहे कीं, त्यामुळें अखिल मानवजातीस काळिमा लावला आहे असें म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. पॅरिसमध्यें जर्मन वकिलाचा खून एका ज्यूनें केल्यापासून तर हिटलर माथेफिरूप्रमाणें ज्यूंवरील अन्यायांची आणि त्यांच्या छळणुकीची परमावधी करीत आहे. अल्पसंख्याकांचा जर जर्मनीला इतका पुळका येतो, तर ज्यूंशीं असें वर्तन

कां ? याचें समर्पक उत्तर देणें अत्यंत कठीण आहे. द्यायचें झालें तर असें देतां येईल कीं, बाकीच्या अल्पसंख्याकांचें पाठीराखे प्रबळ राष्ट्रें आहेत, बिचाऱ्या ज्यूंना पृथ्वीच्या पाठीवर स्वतःच्या मालकीचा असा प्रदेश नाहीं आणि पाठीराखा तर कोणीच नाहीं. खरें पाहिलें तर निराधार आणि असहाय्य अल्पसंख्यांकांना अधिक काळजीपूर्वक वागविण्याची जबाबदारी प्रत्येक राष्ट्रावर आहे. पण ज्यांनीं जागतिक न्याय आणि नीति हीं सर्वस्वीं फेंकून दिलीं, त्यांना त्याची काय पर्वा ?

## अल्पसंख्यांकांच्या प्रश्नाची सोडवणूक.

आतांपर्यंत केलेल्या निवेदनाचा आतां थोडक्यांत समारोप करूं. राष्ट्रीय जातींना न्याय्य हक्क म्हणजे स्वातंत्र्य लाभावें, ही जी स्वयंनिर्णयाच्या मुळाशीं थोर कल्पना होती व तदनुसार जे मध्य–युरोपांत प्रांताचे फेरफार करण्यांत आले, त्यामुळें हा प्रश्न सुटला तर नाहीं, पण अधिक घोंटाळयाचा मात्र झाला. प्रत्येक जातीकरितां स्वतंत्र व अविच्छिन्न राष्ट्र बनविण्याची कल्पना अशक्य व अव्यवहार्य ठरली आहे. महायुद्धानंतर राष्ट्रवाद पुनः जोरानें फोफावूं लागला आणि लोकशाहीचीं राज्ययंत्रें कुचकामाचीं ठरल्यानें, राष्ट्रैकवादाचें सरकार व हुकूमशहा अवतरले. त्यांनीं राष्ट्रांत ऐक्य निर्माण केलें; पण त्याबरोबर बाहेरील आपलीं शकलें एकत्रित करणाची प्रतिज्ञा केली. अर्थात अल्पसंख्यांकांना वागविण्याच्या पूर्वीच्या उदार धोरणांत फरक पडूं लागला असल्यास आश्चर्य नाहीं. जर्मनी आणि इटली यांनीं तर राष्ट्रैकवाद परमोच्च कोटीस पोचविला, बळजबरीनें त्यांच्या राष्ट्रवादाचा संन्यास आणि आपल्या राष्ट्रवादाची दीक्षा देण्यास प्रारंभ केला. मध्ययुरोपांत जर्मन अल्पसंख्यांक बहुतेक सर्व राष्ट्रांतून पेरले गेले आहेत. त्यांच्यामार्फत देशांतील राज्ययंत्रांत बिघाड उत्पन्न करून, आपल्या अल्पसंख्यांकांवरील होणारा अन्याय दूर करण्याच्या संभावित पांघरुणाखालीं, त्या राष्ट्रावर आक्रमण करण्याचा कार्यक्रम जर्मनीनें आंखला आहे. त्याच्याच पाऊलावर पाऊल टांकून हंगेरियन उर्फ मग्यार लोक व पोलिश लोक आपला मार्ग सुधारीत आहेत. थोडेफार अपवाद सोडल्यास अल्पसंख्यांकांना, भाषा, संस्कृति आणि धर्म या बाबतींत मात्र चोहोंकडे पूर्ण मुभा दिलेली आढळते. कांहीं राष्ट्रांतून तर सार्वत्रिक, सम-

प्रमाणांत मतदान पद्धतीमुळें, अल्पसंख्यांकांना भरपूर प्रतिनिधित्व मिळत असल्यानें, ते संतुष्ट असल्याचें दिसत आहे. त्या ठिकाणीं अल्प-संख्याक, बहुसंख्यांक जमातीबरोबर राष्ट्रोन्नतीची धुरा मोठ्या हौसेनें व प्रेमानें वहात असल्याचा देखावा दिसत आहे.

अल्पसंख्यांकांचा बिकट प्रश्न सध्यां युरोपांतील राष्ट्रांना नडवित असून, पुढेंमागें त्यापायीं महायुद्धाचा वणवा पेटणार असें मात्र सध्यां दिसूं लागलें आहे. अल्पसंख्यांकांचा प्रश्न राष्ट्रांच्या सरहद्दी नवीन आंखून मिटण्यासारखा नाहीं; कारण जाति, वंश, धर्म इत्यादिकांची इतकी भेसळ झाली आहे कीं, प्रांतांच्या सरहद्दीच्या रेषा अधिक गिजबट करून अधिक घोंटाळा उत्पन्न केल्याप्रमाणें होणार आहे. शिवाय नवीन देश निर्माण करितांना, त्या देशाच्या सरहद्दीच्या रेषा युद्धशास्त्रदृष्ट्या संरक्षणास योग्य व सोईस्कर अशा ठेवण्याची खबरदारी घ्यावी लागेल ती निराळीच. अतएव या मार्गानें अल्पसंख्यांकांचा बिकट प्रश्न कायमचा सुटणार नाहीं.

कांहीं मुत्सद्यांच्या मतें अल्पसंख्यांकांची देवाण घेवाण करून प्रत्येक राष्ट्रानें हा वाद मिटवावा. अर्थात अल्पसंख्यांना अनौदार्यानें वागविल्या-मुळें, ते स्वतःहून तो देश सोडून आपल्या मायभूमीकडे धांव घेत आहेत, असें बऱ्याच ठिकाणीं दिसत आहे. बाल्कन राष्ट्रांतून तर या अल्प-संख्यांकांचा इतका चुथडा उडाला आहे, कीं त्यांत शहाण्यानें न शिरावें हेंच उत्तम. या ठिकाणीं वरील धोरण थोडेंफार अमलांत आलेलें दिसत आहे. उदाहरणार्थ, १८१५ ते १९१२ च्या अवधींत, सुमारें दोन लाख बल्गेरिअन लोक बाल्कन संस्थानांतून बल्गेरियांत कायमच्या वास्तव्यास आले. तुर्कस्थानांतहि हेंच चित्र दिसून येतें. १९१४ मध्यें ग्रीसमधून एक लक्ष पंधरा हजार व इतर बाल्कन राष्ट्रांतून एक लक्ष पस्तीस हजार लोक देश सोडून, तुर्कस्थानांत गेले. याच्या उलट तुर्कस्थानानें त्याच वर्षांत दोन लक्ष पासष्ट हजार ग्रीकांना हांकलून लाविलें आणि पंचाऐशीं हजार परदेशीयांना आशियांत हद्दपार केलें. पण ही अदलाबदल अल्पसंख्यांकांनीं समजुतीनें व स्वतःच्या संमतीनें केली पाहिजे. त्यापायीं जुलूमजबरदस्ती करणें रानटीपणाचें वर्तन होय. तेव्हां लोकांनीं स्वखुषीनें हा मार्ग अंमलांत आणावयाचा आहे.

स्वतःची खुषी असूनहि मालमत्ता, जिनगी, घरेंदारें, स्नेहसंबंध इतके खोलवर रुजलेले असतात कीं, त्यांना हा मार्ग चोखाळतां येत नाहीं. हजारों वर्षांचे संबंध आणि वास्तव्याचें ठिकाण सोडून देऊन, भटक्याप्रमाणें परदेशांस जाण्यास मनुष्याचें मन नेहमीं कचरत असतें. अर्थात अशा लोकांचाच भरणा अल्पसंख्यांकांत नेहमीं मोठा असतो. म्हणून ही अल्पसंख्याकांच्या अदलाबदलीची व त्या मार्गें हा प्रश्न सोडविण्याची कल्पना तितकीशी फलद्रूप होऊं शकत नाहीं. असे अल्पसंख्यांक प्रत्येक राष्ट्रांतून अट्टाहासानें कोणताहि मार्ग अवलंबिला तरी थोडेफार राहणारच. अर्थात त्यांना सौजन्यानें व उदार मनानें वागवून राष्ट्रकार्यांत समभागी करणें हा श्रेयस्कर आणि परिणामीं हितकर असा सोपा मार्ग आहे. त्यांना कठोरपणानें वागवून, देश सोडण्यास भाग पाडणें किंवा जबरीनें हद्दपार करणें हा मार्ग तर इष्ट नाहींच; पण अत्यंत धोक्याचा आहे. खऱ्या लोकशाहीच्या राजवटींत त्यांना सहकारी करणें, त्यांचें स्वातंत्र्य, न्याय्य हक्क यांचा आदरानें संभाळ करणें, त्यांचा विश्वास प्रेमानें संपादन करून राष्ट्रकार्याचा रथ हांकण्याच्या कामीं समभागी करून, त्यांना आपलें अल्पसंख्याकत्व विसरण्यास लावणें, हाच शाश्वत हिताचा मार्ग आहे. अल्पसंख्याकांनींहि पण ज्या बहुसंख्यकांशीं प्रेमानें, आनंदानें व स्नेहानें हजारों वर्षें जीवित घालवून आपले हितसंबंध एकमेकांत इतके गुरफटून घेतले, त्यांतून स्वतंत्र होण्याची, किंवा फुटून निघण्याची फाजील आकांक्षा दुसऱ्याच्या शिकवणीवरून धरणें, केव्हांहि श्रेयस्कर होणार नाहीं. त्याच प्रेमाच्या संबंधांनीं; बहुसंख्य जातीचा अधिकाधिक विश्वास संपादन करून, बहुसंख्याकांशीं एकजीव होण्याचा प्रयत्न करणें, यांत त्यांचें खरें कल्याण होणार आहे. अर्थात हा अल्पसंख्यांकांचा प्रश्न मिटण्यास एकच शाश्वत पण खात्रीचा मार्ग मला दिसतो; तो हा कीं, प्रत्येक राष्ट्रांत प्रेमानें, एकोप्यानें व एकदिलानें राष्ट्रकार्यार्थ तनमनधन अर्पण करण्यास प्रत्येकानें तयार होणें. राष्ट्रोन्नतीच्या कार्यास जारीनें लागलें कीं, हे आपापसांतील हीन, क्षुल्लक जातिवाद तेव्हांच मागें पडल्याशिवाय रहात नाहींत.

———

# हतभागी ज्यूंना वाली कोण ?

## कत्तल कीं हद्दपारी ?

अखिल जगतांत दीडकोट हतभागी ज्यू प्राणी इतःस्ततः विखुरलेले आहेत. त्यांचा प्रश्न कसा सोडवावा हें बिकट कोडें सर्वांना सध्यां पडलेलें आहे. ज्यू लोकांचा द्वेष न करील तो पापी. त्यांच्या लोकांच्या सबंध इतिहासांत त्यांना सुखासमाधानाचे लाभलेले दिवस फार थोडे आहेत. ज्यू लोकांचा नाहक छळ गोऱ्या लोकांनीं हजारों वर्षे केला, हा युरोपियन इतिहासावरील काळा डाग कशानेंहि पुसला जाणार नाहीं. मगतो छळ सामाजिक, राजकीय वा आर्थिक अशा कोणत्याहि कारणाकरितां असो; पण तीं कारणें सदसद्विवेकबुद्धीस पटणारीं मात्र खास नाहींत. पुन्हां एकवार त्यांच्यावर असाच हृदयद्रावक प्रसंग सध्यां गुदरलेला आहे. जगाच्या सहानुभूतीची भिक्षांदेही करण्याची पाळी आज त्यांच्यावर दुर्दैवानें आली आहे.

युरोपियन संस्कृतीला हा ज्यूचा कांटा काढण्यास अद्यापपावेतों दोनच मार्ग सांपडले आहेत. त्यापैकीं त्यांची सरसहा कत्तल करणें हा एक आणि त्यांना हद्दपार करून; देशाच्या बाहेर घालविणें हा दुसरा. दीडकोट ज्यूंची–बायका पोरांसह सर्वांचीं–कत्तल करून रक्ताचा समुद्र बनविण्याची कल्पना दिसते तितकी सोपी नाहीं. कारण त्या जातीपैकीं कांहीं थोड्या लोकांची कत्तलसुद्धां जगाची मानसिक प्रकृति क्षुब्ध व्हायला पुरेशी होईल. त्यांना हद्दपार करणें तर त्याहिपेक्षां अवघड. आपलीं घरेंदारें, इस्टेट, जिनगी, नातलग इत्यादिकांचा गोतावळा आणि संसार हजारों वर्षे स्थापलेल्या लोकांना निव्वळ जन्मजातीच्या दोषावरून हद्दपार करणें––छे ! ही कल्पनाच मुळीं सुसंस्कृत मनाला पटत नाहीं. तरी पण न पटणाऱ्या कल्पना वास्तवतेंत आणण्याचा अट्टाहास धरणाऱ्या विभूती जगांत आहेत. हद्दपारी वा कत्तल या दोन्ही शिक्षा द्यावयाच्या नाहींत, तर

त्यांना देह आणि आत्मा एकत्रित राहतील, एवढी जीवनाचीं साधनें उपलब्ध ठेवणें हें सुधारलेल्या राष्ट्राचें कर्तव्य नाहीं कां? पण त्यांचा तोहि हक्क हिरावून घेऊन, त्यांना देशोधडीला लावण्याच्या सत्कार्यात धन्यता मानून घेणारे सुलतान अवतरले आणि गरीब बिचाऱ्या ज्यू लोकांचें पुरें मरण ओढवलें.

## ज्यूंचा गुन्हा

ज्यू लोकांचा इतका तिटकारा कां? ज्यूंच्या द्वेषास पुनः भरती कां आली? त्यांची इतकी मानहानी, निंदा आणि बदनामी करण्याची प्रवृत्ती कां उत्पन्न झाली? मनुष्य जातीला लाजविणारीं अशीं त्यांचीं कृत्यें तरी कोणतीं आहेत? राष्ट्रोन्नतीच्या आड येणारी ही जात आहे काय? त्यांच्याविषयीं जी भरपूर निंदा ऐकूं येते, त्याप्रमाणें ते खरोखरच नीतिभ्रष्ट आहेत कां? समाजांत त्यांना स्थान देणें धोक्याचें आहे का? असे हजारों प्रश्न भंडावून सोडतात आणि त्यांच्या द्वेषास खरोखरी कांहीं सबळ कारणें आहेत कां, असा विचार पडतो.

त्यांच्या स्वभावधर्माविषयीं एवढें निश्चित सांगतां येईल कीं ते अत्यंत बुद्धिमान, सुस्वभावी, आदरातिथ्य सांभाळणारे आणि संगीत, चित्रकला इत्यादि कलांचे खरे उपासक असे आहेत. त्यांच्यांतील डॉक्टर लोकांचा लौकिक जितका त्यांच्या नैपुण्याबद्दल आहे, तितकाच त्यांच्या आत्मीयतेच्या व कळकळीच्या वागणुकीबद्दल आहे. क्षुद्र बुद्धीचा लवलेशहि त्यांच्यांत सांपडावयाचा नाहीं. इतक्या उत्तमोत्तम गुणांचा परिपोष झालेल्या या जातीनें असा कोणता गुन्हा केला आहे कीं, त्यांच्यावर सूड घेण्याची आवश्यकता भासावी? तशीं जबरदस्त कारणें सांपडणें अशक्य हें मात्र खास.

## ज्यू लोकांचा इतिहास

रोमन साम्राज्य लयाला गेल्यानंतर ज्यूनीं सर्व युरोपखंड व्यापलें. सरंजामशाहींत ज्यू लोकांना जमिनीची मालकी संपादन करितां येत नसे. समाजाच्या नरडीचा घोट घेणाऱ्या त्यांच्या सावकारी धंद्याबद्दल पुष्कळ बऱ्यावाईट कथा त्याकाळीं प्रचलित होत्या. अर्थात त्यांच्या सावकारी धंद्यावर कडक नियंत्रण बसविण्यांत आलें. आर्थिक क्षेत्रांत वरचेवर

पायबंद बसलेल्या या जातीनें, मारवाड्यांप्रमाणें व्यवहारांत चातुर्य, लबाडी, भोळ्या लोकांना फसविणें, यांसारखें गुण उचलले असले तर त्यांत कांहींच नवल नाहीं. बेसुमार व्याज जबरीनें उकळण्याच्या यांच्या पठाणी कायद्यामुळें, गरीब अज्ञ जनतेच्या जीवितावरहि त्यांनीं स्वामित्त्व मिळविलें. यामुळेंच त्यांचें नांव बद्द होऊन त्यांच्या तिरस्कारास प्रारंभ झाला. ज्यू जातीचा द्वेष युरोपियन लोकांच्या रोमरोमांतून भिनला आहे, व तो अद्यापहि कायम आहे.

यानंतर मात्र ज्यू, शिक्षण व कला यांकडे वळले व त्यांसच त्यांनीं स्वतःला वाहून घेतलें. तरीसुद्धां त्यांच्या द्वेषास ओहोटी लागली नाहीं. १६४८ सालीं पोलंडमध्यें आणि रशियामध्यें, हजारों ज्यूंची कत्तल झाल्याचा दाखला इतिहासांत मिळतो. ती अवस्था पुनरपि १९०३ मध्यें त्याच देशांत त्यांच्यावर कोसळली. हजारों ज्यू देश सोडून भराभर पळाले. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या उदात्त तत्त्वांचा उदय झाल्यावर, थोडा काळ ज्यूंना सुखासमाधानानें श्वास टाकण्यास अवसर मिळाला. पण त्यांचें दुर्दैव त्यांच्या पाठीस हात धुवून नेहमीं लागलेलें असतें. त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल लोकांनीं कितीहि तारीफ केली, अधिभौत्तिक शास्त्र व कला यांत त्यांनीं मिळविलेल्या वैशिष्ट्याबद्दल कितीहि कौतुक केलें, तरी त्यांची मत्सराची दृष्टी निवळेना. बुद्धिमान आणि ज्ञानाचे उपासक म्हणून त्यांच्याबद्दल केव्हांही आदर बाळगणें भाग आहे. तीव्रतर जातीय विषांतील हाच एक अमृताचा कण.

आतां ज्यूंचें वैग्युणच सांगावयाचें झालें तर तें असें सांगतां येईल कीं, ते देशांतील बहुसंख्य लोकांशीं एकजीव कधीं झाले नाहींत किंवा पूर्णपणें एकरूप बनले नाहींत. त्यांनीं आपली जात, धर्म, भाषा, संस्कृती या सर्व गोष्टी, सर्व प्रकारचा छळ सोसूनहि मोठ्या काळजीनें जपून ठेवल्या. राष्ट्राच्या राजकीय आकांक्षेच्या कामींहि ते समरस झाले नाहींत. थोडक्यांत स्वतःला ते केव्हांहि विसरले नाहींत हाच त्यांचा एक ढोबळ दोष.

## जर्मनींतील ज्यू

जर्मनींतील ज्यूंच्या छळाची करुण कहाणी पूर्णपणें रेखाटण्यास कोणाचीहि लेखणी असमर्थ ठरेल. त्यांच्या छळास कांहीं विशेष कारणें

जर्मनींत नाहींत. पण वड्याचें तेल वांग्यावर या म्हणीप्रमाणें व्हर्सलिसच्या तहाचें खापर त्यांनीं ज्यूंच्या डोक्यावर फोडलें. जर्मनी हा अजिंक्य आणि अजस्त्र आहे; पण ज्यूंनीं त्याचे पाय मोडले म्हणून पराभव झाला, असा विषारी प्रचार सुरू झाला. आणि त्या जोरावर पुनः एकवार जर्मन रक्त व जात यांच्या अभिमानाची प्रचंड लाट हिटलरनें निर्माण केली. तसेंच ज्यू रशियाशीं संधान बांधून जर्मनींत कम्युनिझम आणण्यास उत्सुक आहेत असा बागुलबोवा त्यांनीं उभारला.

खरें पाहिलें तर हे दोन्हीहि आक्षेप खोटे आहेत. गेल्या महायुद्धांत जर्मन लोकांच्या खांद्यास खांदा लावून ते लढले. त्यांच्यापैकीं सुमारें बारा हजार लोकांनीं पितृभूमीकरतां रणांगणावर बलिदान केलें.

जर्मन लोकांपेक्षां अधिक ज्यू रणभूमीवर लढले व पतन पावले. युद्धाचे वेळीं इतर महत्वाची जबाबदारी त्यांनीं हौसेनें शिरावर घेतली. महायुद्धांत सैनिकांची अन्नाची व्यवस्था वॉल्टर रॅथनो या ज्यूनें इतकी उत्कृष्ट ठेविली, म्हणून जर्मनीनें शेवटपर्यंत तग धरली. प्रो. हेबर या प्रख्यात ज्यू शास्त्रज्ञानें ऐन युद्धाचे गर्दीत, हवेंतील नायट्रोजन वायूपासून विषारी वायू बनवून जर्मनीस कांहीं काळ अजिंक्य ठरविलें. जगद्‌विख्यात प्रो. आईन्स्टाईन म्हणजे जर्मनीचें नाक; पण त्यांनासुद्धां हिटलरनें छाटून टाकलें. वॉल्टर रॅथनो हा व्हर्सलिसच्या तहास संमती देण्यास होता म्हणून त्याचा पुढें खून झाला. ज्यू लोक कम्युनिझमचा प्रसार करतील हा निव्वळ भ्रम आहे. कारण ते व्यापार, उद्योगधंदा, कारखानदारी या बाबतींत प्रमुख पुढारी व धनाढ्य असल्यामुळें, कम्युनिझमचा धोंडा आपल्या हातांनीं आपल्या पायावर पाडून घेतील, हें शक्य तरी आहे कां? पण हिटलरला व्हर्सलिस तहाचें मडकें कोणाच्या तरी डोक्यावर फोडावयाचें होतें, तें त्यानें परस्पर ज्यूंच्या डोक्यावर फोडलें. कम्युनिझमशीं त्यांचा लागाबांधा जोडून त्यांची इस्टेट जिनगी जप्त करून देशकार्यास लाविली.

## ज्यूंची नालस्ती

ज्यूविषयक निराधार प्रलापांचीं कांहीं मासलेवाईक उदाहरणें देतों, म्हणजे त्याची कल्पना येईल. हिटलर आत्मचरित्रांत म्हणतो कीं, ज्यूमुळें समाजसत्तावाद आणि उपदंशाचा रोग जर्मनींत आला. जर्मनी युद्धांत

कां हरला, केसरला कां पळावें लागलें, नाण्यांच्या किंमती भरभसाट कां घसरल्या, बेकारी कां वाढली, नोकऱ्या कां मिळत नाहींत या सर्व प्रश्नांचें उत्तर एकच कीं, त्यांना ज्यू कारणीभूत आहेत. फार काय एखादा जर्मन विद्यार्थी परिक्षेंत नापास कां झाला, मुली कां बिघडल्या, धर्म कां बुडाला, गर्भपात कां वाढले इत्यादिचेंसुद्धां खापर ज्यूंच्या डोक्यावर फोडलें. ज्यूमुळें आम्ही गुलाम बनलों, ज्यूनीं आमचा वर्ण बिघडविला, आमची नैतिक अधोगती केली,आम्हांला कमकुवत बनविलें.ज्यू हा शरीरांतील जंत आहे, त्यास काढला पाहिजे असें शिक्षणामृत लोकांना पाजण्यांत येऊं लागलें. ज्यूच्या उत्पत्तीबद्दल अशीच नालस्तीपूर्ण कंडी त्यांनीं उठविली. मोसेझ नांवाच्या कायदेपंडिताच्या नेतृत्त्वाखालीं जगांतले सारे बदमाष एका अरण्यांत जमले. त्यांच्यापासून कुत्र्यांची अवलाद उत्पन्न झाली. ज्यूंच्या रक्तांतच दुसऱ्यांना बिघडविण्याचे गुणधर्म आहेत, त्यांच्या स्वैराचारामुळें जर्मन मुली व स्त्रिया भ्रष्ट झाल्या व जातिसंकर झाला. ज्यू हा स्वार्थी शब्दाचा द्योतक आहे. जर्मन रक्ताला चिडवून ज्यूंचा खून करण्यास प्रवृत्त करणें व त्यांचा पैसा सरकारी खजिन्यांत जमा करणें हें हिटलरच्या धोरणाचें सार.

ज्यूंच्या छळाची परमावधी हिटलरनें केली. डॉक्टर व वकील या पेशांत ज्यू पुष्कळसे होते, त्यांना हांकलून लाविलें. नोकरी पेशांतील ज्यू-वर सरसहा संक्रांत आली. नाझीच्या पोषाकांत न्याय कोर्टांत भरदिवसा घुसून, ज्यू वकील व न्यायाधीश यांना ओढून बाहेर काढण्यांत आलें. व्यापार धंद्यांत अग्रस्थान पटकावलेल्या ज्यूवर सर्रास बहिष्कार टाकण्यांत आला. एवढेंच नव्हे तर त्यांच्या दुकानावर निरोधन करण्यांत आलें. ज्यू रोग्यांना जर्मन डॉक्टर औषध देण्यास धजेना. नाटक, सिनेमा, वृत्तपत्रें, शाळा इत्यादि ठिकाणांतून ज्यूंची उचलबांगडी झाली. त्यांचीं देवळें आणि थडगीं भ्रष्ट करण्यांत आलीं. ज्यूवर क्षुल्लक कारणावरून प्राणघातक हल्ले करण्यास प्रोत्साहन मिळाल्यामुळें सार्वजनिक हितासाठीं त्यांचे खून पाडण्यांत आले. त्यांच्यावरील करांची वाढ बेसुमार करून त्यांना जगणें अशक्य करून सोडिलें. ज्यू हा मनुष्यप्राणीच नव्हे अशा रितीनें त्यास वागविण्यांत येऊं लागलें. त्यांचे नागरिक हक्क, भाषणस्वातंत्र्य काढून घेतले. साहित्याच्या क्षेत्रांतसुद्धां त्यांना मज्जाव झाला. बेकार ज्यूंना सरकारी भत्ता नाहीं. लढा-

ईत देशाकरितां प्राण अर्पण करणाऱ्या ज्यू देशभक्तांचीं नांवें खोडून टाकण्यांत आलीं. खेडेगांवीं तळीं, विहिरी, वाचनालयें यांसारख्या सार्वजनिक ठिकाणीं " ज्यू आणि भटकणाऱ्या प्राण्यांना मज्जाव " अशा अर्थाच्या पाट्या लटकावण्यांत आल्या. फार काय ज्यूंनीं पाळलेल्या गाईंना, जर्मन लोकांनीं पाळलेले राखीव बैल दाखवावयाचे नाहींत, असा विचित्र व हास्यास्पद वटहुकुम जारी झाला.

## जर्मन रक्ताचें शुद्धीकरण

जर्मन रक्त आणि संस्कृति पवित्र करण्याची ही सारी हिटलरची खटपट आहे. जर्मन रक्त शुद्ध राखण्यासाठीं हिटलरनें जर्मन लोकांचे चार वर्ग बनविले. कोणत्याहि तऱ्हेनें ज्यू रक्ताशीं एखाद्याचा चुकूनसुद्धां संबंध असल्याचा नुसता वास आला, तरी त्याचें पुरें मरण ओढवलें असें समजावें. त्यांना समाजांत कनिष्ठपणाचें स्थान देऊन भागलें नाहीं तर त्यांची हृदय पिळवटून टाकणारी जाचणूक सुरू झाली. त्यांच्याविरुद्ध कोठलीहि गोष्ट करण्याची बाकी म्हणून हिटलरनें ठेविली नाहीं. परवां पॅरीसमध्यें जर्मन वकील व्हॉन रॅाथ याचा एका ज्यूनें केलेल्या खुनापासून, हिटलरच्या ज्यूविषयींच्या द्वेषास पुरा खून चढला आहे. सर्व ज्यूकडून दंडाची प्रचंड रक्कम वसूल करण्याची मोहीम त्यानें काढली. सर्व युरोपखंडभर हें ज्यू–द्वेषाचें विष पसरविण्याच्या महत्वाकांक्षेनें हिटलर पछाडला आहे. एका तोंडानें इतर राष्ट्रांतील आपल्या जातीच्या अल्पसंख्यांकांचा पान्हा फुटून त्यांच्या रक्षणाची घोषणा करावयाची, तर आपल्याच देशांतील अल्पसंख्यांकांवर वरवंटा फिरवावयाचा, या हिटलरच्या नीतीस काय म्हणावयाचें हेंच समजत नाहीं. बिचाऱ्या ज्यूंना जगाच्या पाठीवर आपल्या मालकीची वीतभरहि जागा नाहीं म्हणूनच हिटलर या चेष्टा करूं शकतो. पॅलेस्टाईनमध्यें ज्यूंची वसाहत करण्याच्या बेतास, जर्मनीच्या लावालावीमुळें तेथील अरब लोक खो घालीत आहेत. स्वदेशांत तरी मरावें किंवा पॅलेस्टाईनमध्यें वस्तीस जाऊन अरबांच्या गोळीस तरी बळी पडावें, हा एकच मार्ग त्यांना मोकळा आहे. हतभागी ज्यूंना वाली कोणच नसावा ना !

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. निबंध ६३८

हीच कां आधुनिक सुधारलेली संस्कृती ? लाज वाटायला पाहिजे माणसाला या संस्कृतीचा अभिमान बाळगायला !

## माणुसकीच संपली

पण मी म्हणतो ज्यूंना माणुसकीचे हक्क द्यावयास, जर्मनीजवळ माणुसकी शिल्लक राहिली आहे काय ? पण मनुष्य म्हणून जगण्यास पुरेसें संरक्षण आणि जीवपोषणार्थ पोटाचा उद्योग करण्याचें स्वातंत्र्य देणें, हें प्रत्येक राष्ट्राचें कर्तव्य नाहीं कां ? मर्चंट ऑफ व्हेनिस नाटकांत शॉयलॉकच्या तोंडचे उद्गार यथोचित वाटतात. 'आम्ही ज्यू आहोंत खरे म्हणून काय आम्ही गुन्हा केला आहे ? हातपाय, भावना प्रेम, विकार इत्यादि मनुष्य प्राण्याला स्वभावसहज असणाऱ्या गोष्टी ज्यूंना नाहींत काय ? इतर मनुष्यांत आणि आमच्यांत काय फरक आहे ? त्याच अन्नावर आम्ही जगतों ना, त्याच शस्त्रांनीं आम्ही घायाळ होतों ना, त्याच रोगाची उपाधी आम्हांस चिंताग्रस्त करिते ना, तींच औषधें त्या रोगापासून आम्हांस बरें करितात ना, त्याच उन्हाळ्यांत आणि हिंवाळ्यांत आम्हांस उष्णता मिळते व थंडी वाजते ना ? तुम्ही आम्हांस शस्त्रांनीं भोंसकलेंत, तर आमच्या अंगांतून रक्ताचाच पाट वाहतो ना ! तुम्ही आम्हांस गुदगुदल्या केल्या तर आम्हांस हंसूंच येतें ना ! तुम्ही आम्हांवर विषप्रयोग केला तर आम्ही मरतोच ना !'

ज्यू–छळाची कर्मकहाणी भाराभर पुस्तकें लिहूनहि पुरी व्हावयाची नाहीं. तद्विषयक उपलब्ध पुस्तकांतील प्रसंग रोमांचकारी आहेत. ज्यूंच्या अमर्याद छळानें जर्मनीचा उत्कर्ष तर केव्हांहि होणार नाहीं. आपल्याच हातानें आपलीच बेअब्रू आणि अधोगती जर्मनी करून घेत आहे. ज्यूंच्या छळामुळें जर्मनीच्या पापाचे घडे मात्र पूर्ण भरत आहेत. सर्व जगाच्या रोषास जर्मनी निष्कारण कारणीभूत होत आहे.

एक दिवस जगाची वक्रदृष्टी आणि रोष जर्मनीस बाधल्याशिवाय राहतील काय ?

———




युरोपच्या तीन चतुर्थांश भागावर स्वामित्व मिळविण्याची नाझी जमनीची महत्वाकांक्षा दर्शविणारा नकाशा.

# युरोपांतील धिंगाणा

तसें पाहिलें तर जगांत राजनीति अशी मुळीं वस्तूच नाहीं. पूर्वी असें म्हणत, कीं 'नृपनीति अनेकरूपा!' पण सुधारलेल्या जगांत राजा या नांवाचा मुळीं प्राणीच राहिलेला नाहीं. कोठें तुरळक असला तर देवघरांत पूजेचा मिरासदार आणि कांहीं ठिकाणीं तोहि सांगशींत घालून ठेवलेला–पूजाअर्जेचा त्रास वांचविण्यासाठीं! पण कसली का असेना, राजनीति म्हणून म्हणतात ती अनेकरूप धारण करणारी आहे हें मात्र खास. तरीसुद्धां मनुष्यस्वभावाचा चाळा आहेच कीं, कांहीं ठोकळ तत्त्वांनीं राजकारणाची छाननी करावयाची आणि उगीच अकलेचे तारे तोडून हवेंत मनोरे उठवावयाचे!

गमतीची गोष्ट म्हणून सांगतां येईल कीं सामाजिक प्रश्न सोडवायचे ना, तर करा जातिभेदांचें उच्चाटण! आर्थिक प्रश्नांची गांठ सोडावयाची तर आणा कम्युनिझम! आणि राजकारणांतील गुंतावळ उलघडायची, तर करा साम्राज्यशाही, राष्ट्रवाद आणि वर्चस्व यांचा नायनाट! कम्युनिझम नको म्हणून फॅसिस्टांची तटबंदी मनुष्य करील आणि साम्राज्यशाहीच्या संरक्षणार्थ समबलत्व, सामुदायिक संरक्षण यांचा अवलंब करील.

## दोन त्रिकोण

आज जागतिक राजकारणाचें एक चाक रोम–बर्लिन–टोकियोवर, तर दुसरें लंडन–पॅरिस–मॉस्कोवर! पैकीं दुसऱ्यानें गेलीं पंधरावीस वर्षें जागतिक राजकारणाचा गाडा लोकशाहीच्या नांवानें हांकला, भार वाहिला. आतां पाळी आली पहिल्याची! लोकशाहीची दुबळी सवत नष्ट करून, कम्युनिझमच्या प्रसारास आळा घालून, पुनः एकवार जगांतील असहाय्य प्रदेशांची पुनर्विभागणी करण्याचें कंकण हातीं बांधून हुकुमशहा पुढें सरसावले. कम्युनिझमविरोधी करारान्वयें रोम–बर्लिन–टोकियोनीं आंतरराष्ट्रीय राजकारणांत आक्रमणशील त्रिकोण बनवून,

जगाला गवसणी घालण्याचा डाव टाकला आहे. हा त्रिकोण अति जोर-दार, प्रबळ, पण अनिष्ट ग्रहांच्या युतीप्रमाणें खरोखरीच जगांतील राष्ट्रें गिळंकृत करण्यासाठीं अवतरला आहे. तशी गोष्ट विरोधी त्रिकोणाची म्हणजे लंडन–पॅरिस–मॉस्कोची नाहीं आणि तो असा संघटितहि पण नाहीं. इंग्लंडचें राजकारण खुद्द त्यांचें त्यांना समजणें शक्य नाहीं. एक-चाकी सायकलीप्रमाणें भरभसाट धांवणारें आणि वारा येईल तशी पाठ देणारें, पण स्वतःच्या स्वार्थाला जपणारें असें तें आहे. फ्रान्स म्हणजे इंग्लंडच्या हाताला हात लावून चालणारें. मॉस्कोचा विश्वास अद्याप या दोघांना वाटत नाहीं. आणि शक्तीचा अदमास मुळींच लागत नाहीं.

युरोपच्या राजकारणाच्या गाड्याचीं दोन चाकें म्हणजे, रोम–बर्लिन आणि पॅरिस–मॉस्को. युरोपखंडांतल्या दंगलीवर जपान पूर्वप्रदेशांत हाल-चाल करणार! पण युरोपखंडाबाहेर असूनहि त्यांतील राजकारणापासून इंग्लंडला अलिप्त राहतां येत नाहीं. तरीपण खुद्द मध्ययुरोपांत त्यांचे हित-संबंध नसल्यानें जर्मनीच्या आक्रमणाकडे कानाडोळा! युरोपच्या पूर्वप्रदेशांत त्यानें खुशाल धुमाकूळ घालावा. पण पश्चिमेकडे मात्र नजर टाकतां कामा नये. कारण त्यांत त्याचें स्वतःचें अस्तित्व धोक्यांत येतें ना! म्हणूनच नेहमीं ब्रिटिश मुत्सद्दी म्हणतात, कीं युरोपांतील आमची सरहद्द ऱ्हाइन नदी. पण भूमध्यसमुद्र म्हणजे मात्र ब्रिटिश साम्राज्याची मुख्य रक्तवाहिनी. त्या ठिका-णची गडबड मात्र सहन व्हावयाची नाहीं! अर्थात् पुढेंमागें युद्ध जुंपलेंच तर इंग्लंड इटलीचें होणार, आणि तेंहि परवांचें ॲबिसिनियाच्या वेळचें उट्टें काढण्यासाठीं.

पण फ्रान्स आणि रशियाचें तसें नाहीं. मध्ययुरोपांतील परिस्थितीवर त्यांचें अस्तित्व अवलंबून. कारण येथील वणव्यापासून त्यांना अलिप्त राहातां येणें अशक्य! म्हणून जर्मनीच्या लहानसहान हालचालींकडे हीं राष्ट्रें डोळ्यांत तेल घालून पाहात असतात. मध्ययुरोपांत जर्मनी पुन्हा प्रबल होणें दोघांनाहि अनिष्ट आणि अहितकारक आहे. पॅरिस–मॉस्को खलबतें सध्यां जोरांत आहेत याचें मर्म हेंच. पण इंग्लंडला जितकें फॅसि-

झमचें वावडें, त्याहून अधिक कम्युनिझमचें ! कम्युनिझमच्या प्रसाराला आळा घातला या फॅसिझमनें. अर्थात् तो प्रसार तसाच बंद राहावयास हवा असेल तर जर्मनी समर्थ होणें अवश्य. इकडे जपाननेंहि पॅसीफिक–राजकारणांत लक्ष न घालतां चीनमध्यें शक्तिसर्वस्व खर्च करून, सरहद्दीच्या भानगडीवरून रशियाशीं त्यानें भांडत राहावें, ही इंग्लंडची इच्छा. अर्थात् परस्पर जर्मनी, रशिया आणि जपान यांचें युद्ध पेटून, तिघेहि नाश पावले तर औषधाविना खोकला गेला. आणि हाच डाव राजकारणांत पडावा आणि त्या वेळीं नेमका इटलीचा कांटा काढावा, अशा सुवर्णसंधीची वाट ब्रिटिश मुत्सद्दी सध्यां पाहात आहेत.

पण इकडे हुकूमशहाच्या त्रिकोणांचा विचार प्रथम रशियाला चिरडणें. मग हळूहळू जपाननें पॅसिफिकमध्यें, इटली भूमध्यसमुद्राच्या मार्गें आफ्रिकेंत, तर जर्मनी पूर्वयुरोप संपवून पश्चिम–युरोप–असा आक्रमणाचा आराखडा हुकूमशहांनीं आंखला आहे. या दृष्टीनें जर्मनीचा मध्ययुरोपांतील चाललेला धिंगाणा पाहून, मग भूमध्यसमुद्राच्या राजकारणाकडे वळूं.

## मध्ययुरोपांतील धिंगाणा

महायुद्धानंतर स्वयंनिर्णय–तत्त्वाच्या दुरुपयोगानें मध्ययुरोपांत छोट्या राष्ट्रांची खिचडी बनली आणि राजकारणाचा चिवडा झाला. जगण्यास, सुद्धां असमर्थ अशीं राष्ट्रें लोकांच्या संकुचित आकांक्षा पुऱ्या करण्याकरितां निर्माण झालीं. अशीं छप्पन्नशेंसाठ छोटीं शकलें करण्यांत दोस्त राष्ट्रांचा स्वार्थी कावा हा, कीं जात्यभिमानानें प्रेरित होऊन त्यांनीं एकमेकांत भांडून कालक्षेप करावा, सरहद्दीवर सरहद्दी घांसून ठिणग्या पडाव्या पण मोठी आग तर लागूं नये ! अर्थात् हीं राष्ट्रें अशीं स्वतंत्र राहण्यांतच युरोपांतील शांतता अवलंबून आहे, असा दोस्त राष्ट्रांनीं आभास उत्पन्न केला.

दोस्त राष्ट्रांचा हा कयास अगदीं चुकला असें नाहीं. युरोपांतील ही दुबळ्यांची उतरंड ज्यांनीं निर्माण केली, त्यांनीं त्यांचें संरक्षण करून शांतता बिघडूं न देण्याचा देखावाहि केला. खरें पाहिलें तर त्यांपैकीं कांहीं राष्ट्रें स्वतंत्र राहण्याच्या लायकीचींसुद्धां नाहींत. कांहींना दुसऱ्यावर

अवलंबून प्राणरक्षण करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. कारण तीं स्वयंपूर्ण नाहींत. यांपैकीं बरीचशीं राष्ट्रें युद्धपूर्व ऑस्ट्रियन साम्राज्याचे तुकडे असल्यानें, ते एकत्रित करण्यासाठीं मध्यवर्ति राष्ट्र जर्मनी उठलें आणि नाझी तत्त्वज्ञानानें त्यानें त्यांना भारून टाकलें. तें कसें तें पाहूं. व्हर्सलिसंच्या तहानें ऑस्ट्रिया, हंगेरी, जर्मनी आणि बल्गेरिया या राष्ट्रांना आपापल्या कांहीं प्रांतांस मुकावें लागल्यानें तोटा झाला आणि झेकोस्लोव्हाकिया, रुमानिया, युगोस्लाव्हिया या राष्ट्रांचा नवा प्रदेश मिळून फायदा झाला.

हंगेरीस जर्मनीच्या बाजूनें लढल्याबद्दल प्रायश्चित्त म्हणून युद्धपूर्व शेंकडा ६९ प्रदेशांस आणि शेंकडा ५८ लोकांस मुकावें लागलें. त्यामुळें त्याचा सुवर्ण, चांदी, खनिज, मीठ, तांबें आणि अरण्यें यांचा विपुल सांठा नाहींसा झाल्यानें फार नुकसान झालें! व्हर्सलिसचा तह दुरुस्त करण्यास अर्थात हें राष्ट्र उत्सुक असल्यानें, तें जर्मनीच्या बाजूस सध्यां आहे. राष्ट्र स्वतंत्र दिसलें तरी राजकारणांत नाझी पक्षाचा वरचष्मा असल्यानें जर्मनीच्या तें मुठींत आहे.

झेकोस्लोव्हाकियाचे हाल तर कुत्रें खाईना! विश्वासघातकी म्युनिच कराराच्या जोरावर जर्मनीनें सुडेटन प्रांत पचविला; पण हंगेरी आणि पोलंड यांनींहि त्याला ओरबडून घेतलें. चार महिन्यांपूर्वीं या राष्ट्राचे बारा वाजण्यास फक्त पांचच मिनिटें आहेत असें मुत्सद्दी म्हणत होतें; पण आतां बारा वाजून पांच मिनिटें झालीं, एवढाच काय तो फरक! आतां त्याचें अस्तित्व निव्वळ नामधारी. या राष्ट्राचें स्वातंत्र्य अबाधित राहण्यास फ्रान्स व जर्मनी यांचें एकमत आणि सहकार्य हवें; पण ती गोष्ट या जन्मीं शक्य नाहीं. आतां सर्वांनीं ओरबडून शिल्लक राहिलेल्या राष्ट्राच्या सरहद्दी काळजीपूर्वक संभाळण्याची पवित्र कामगिरी, म्युनिच करारानें चार राष्ट्रांनीं आपल्या शिरावर घेतली आहे खरी! पण लंडन–पॅरिस–मॉस्को या लोकशाही आधारस्तंभानें दगा दिल्यापासून हें राष्ट्र सावध झालें असून, आतां रोम–बर्लिनशीं सलोख्याचे संबंध तें निर्माण करूं लागलें आहे. अर्थात यामुळें एक दिवस त्याला जर्मनीचें मांडलिकत्व पतकरावें लागणार हें उघड आहे. तरी पण त्यांच्या केवळ मेहेरबानीवर निघतील तेवढे

आयुष्याचे क्षण स्वतंत्रावस्थेंत काढावयाचे, याशिवाय दुसरा मार्गच राहिलेला नाहीं. पूर्वीं बिस्मार्क म्हणे, कीं बोहेमियाचा स्वामी युरोपवर स्वामित्व गाजविणार ! + तें खरेंहि आहे. कारण मध्ययुरोपांत अत्यंत सधन, कडवा, लष्करी तयारीनें सुसज्ज, उद्योगधंद्यांत प्रवीण म्हणून आघाडीवर असा हा प्रांत पहिल्यापासून असल्यानें, त्यास हें महत्त्व प्राप्त झालें आहे. रोम–बर्लिनशीं याचा एकोपा दोस्त राष्ट्रांना एक दिवस बाधल्याशिवाय राहणार नाहीं.

\+ + +

अर्थशास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें तर हंगेरी, रुमानिया, युगोस्लाव्हिया व बल्गेरिया या राष्ट्रांपासून उत्पादन होणारा कच्चा माल, धनधान्य आणि खनिज पदार्थ विकत घेण्यास पुरेंसे गिऱ्हाईक असें झेकोस्लोव्हाकिया व ऑस्ट्रिया या दोघांचें होऊं शकेल. कांहींच्या मतें उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें त्या दोघांचें एक राष्ट्र बनणें इष्ट आहे. पण त्या दोघांच्या जोडीस आतां जर्मनी आल्यानें वरील राष्ट्रांचें सर्व उत्पादन पचवून तीं राष्ट्रें कह्यांत आणणें जर्मनीस सोपें झालें आहे. कारण जर्मनी हें त्यांचें एक मोठें गिऱ्हाईक आहे.

## ऑस्ट्रिया

ऑस्ट्रिया गिळंकृत करून जर्मनीनें मध्ययुरोपांत पुन्हा एकवार प्रमुख स्थान मिळविलें. कारण ऑस्ट्रिया हा डॅन्यूब नदीतीरावरील प्रमुख प्रांत आहे; एवढेंच नव्हे, तर त्याच्या मध्यवर्तित्वामुळें पुढें होणाऱ्या अनेक महत्त्वाच्या गोष्टींचें तें माहेरघरच होईल. ऑस्ट्रिया एक दिवस जर्मनीच्या पुड्यांत शिरणार हें उघड दिसत होतें; पण फ्रान्सच्या पैशा-वर तो इतका काळ पोसला गेला आणि मुसोलिनीस, इटली व जर्मनीमध्यें हें पाचर म्हणून हवें होतें तोंवर तो जगला. इटली आणि जर्मनी या दोघां हुकूमशहांची जिगर दोस्ती घडवून आणण्यास ऑस्ट्रियाच कारणी-भूत झाला असून, ह्या दोन हुकूमशहांच्या सरहद्दी एकमेकांवर घासून ही जोडगोळी फुटेल, हा दोस्त राष्ट्रांचा कयास सपशेल फसला. उलट दोघा

\+ The master of Bohemia is the master of Europe–Bismark.

हुकुमशहांची गट्टी जमवून आणण्यास भरभक्कम दुवा म्हणून खासा उपयोगी पडला. जर्मन आणि ऑस्ट्रियन लोक एका वंशाचे आणि एका रक्ताचे आहेत. जर्मन साम्राज्याचा गुरुत्वाकर्षणाचा मध्यच; यामुळें हिटलरला मिळाला. मुसोलिनीच्या संमतीनें त्यानें तो पचविला. ॲबिसिनियाच्या वेळच्या मदतीबद्दल हा फार मोठा मोबदला हिटलरला मुसोलिनीस द्यावा लागला आहे, यांत मात्र शंका नाहीं.

## रुमानिया

रुमानिया हें पेट्रोलचें आगर असून; रशिया आणि जर्मनी या दोघांमध्यें मारलेलें पाचर आहे. अर्थात लढाई सुरू होतांच त्या दोघांपैकीं कोणातरी एकाच्या भक्ष्यस्थानीं पडणें हें या राष्ट्राच्या नशिबीं लिहिल्यासारखें आहे. या त्याच्या नाजूक व अवघड ठिकाणामुळें, युरोपांतील तें सर्वांचें लाडकें राष्ट्र असून, फ्रान्स, जर्मनी, रशिया हे त्याला नेहमीं गोंजारून खूष राखण्यांत गर्क आहेत. तेंहि राष्ट्र लबाड असल्यानें लाडक्या हुषार पोराप्रमाणें आपला कल वरचेवर बदलून त्यांना झुलवीत आहे. परवांच्या झेकोस्लोव्हाकियाच्या प्रसंगीं; रशियाच्या विमानांना व लष्कराला आपल्या प्रांतांतून वाट देण्याचें नाकारतांच, रशियाची मदत मिळण्याची आशा दुरावली आणि फ्रान्सला नमतें घ्यावें लागलें. तरीपण फ्रान्सला त्यास सोडवत नाहीं. त्याला दूर करणें जर्मनीलाहि शक्य नाहीं. याचें कारण पेट्रोलच्या खाणी. शिवाय कच्चा माल, धान्य इत्यादिकांची समृद्धि. शिवाय आठ लक्ष जर्मन लोक तिथें अडकलेले आहेत. रुमानियाचा खरा शत्रु हंगेरी. या दोन राष्ट्रांची एकमेकांविरुद्ध नेहमीं कुरबूर चालू असते. पण ही कुरबूर बंद करण्यास जर्मनीची मदत होत असते व पुढेंहि होणार आहे. फ्रान्सला मध्यें पडायचें म्हणजे उंटावरून शेळ्या राखण्याचा कारभार. तरी पण युद्धाच्या वेळीं जर्मनीस हंगेरी आणि रुमानिया यांपैकीं एकाच्या दोस्तीचा त्याग करणें भाग पडेल. त्या दोघांच्या वांकडेपणामुळें तीं दोन्ही राष्ट्रें जर्मनीस आत्मसात् करतां येत नाहींत. पण महायुद्धांत प्रांताची लूट मिळाल्यानें प्रांत गमावण्यास म्हणजे व्हर्सेलिस तह दुरुस्त करण्यास याचा केव्हांहि विरोध आहे. पण नाझी प्रचार

या राष्ट्रांत चालू आहेच. रोम–बर्लिन झेंड्याखालींच, रशियाविरुद्ध रुमानियानें पोलंडशीं करारनामा केला आहे.

## युगोस्लाव्हिया.

युगोस्लाव्हिया महायुद्धांतील लुटीमुळें विस्तार पावून मोठें राष्ट्र बनलें. मध्ययुरोपांत हें एक बडें धेंड असून, धान्य उत्पादनांत आघाडीवर आहे. लष्कर पहिल्या प्रतीचें असून तें युरोपांत सहाव्या नंबरचें आहे. बाकी युद्धोपयोगी शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज असल्यानें भावी युद्धांत या राष्ट्राची मदत चांगली परिणामकारक ठरण्याचा संभव आहे. व्हर्सलिसचा तह बदलून घेण्याच्या विरुद्ध अर्थात हें असणारच. राष्ट्राची सर्वांगीण प्रगति करण्यास यांना निदान पंचवीस तीस वर्षांचा शांततेचा काळ हवा आहे. अर्थात् युद्धास सर्वस्वीं प्रतिकूल असें वातावरण देशांत आहे. पण युरोपांत युद्धरूपी प्लेगची सांथ उद्भवल्यास यास अलिप्त राहतां येणें अशक्य असल्यानें, आपल्या बाजूस त्याला वळविण्याच्या खटपटी लटपटी, युरोपांतील दोन प्रमुख तट सध्यां करीत आहेत. प्रथमतः फ्रान्सनें भरमसाट कर्ज देऊन त्याला संतुष्ट राखण्याची कामगिरी केली, पण आतां तसें कर्ज पुरविणें फ्रान्सला डोईजड होऊं लागलें आहे. पण जर्मनी हें त्याच्या कच्च्या मालाचें प्रमुख गिऱ्हाईक असल्यानें, राष्ट्राचा वाढता कल जर्मनीस अनुकूल असा आहे. इटली आणि हंगेरी हे याचे खरे शत्रु; पण त्या दोघांपासून जर्मनीच आपला बचाव करील असा त्याला विश्वास वाटतो. कारण दोस्त राष्ट्रें मध्ययुरोपच्या खोल डोहांत उडी टाकून, त्याचें जीवरक्षण करण्यास असमर्थ आहेत. या देशांत नाझी पक्षाचा प्रचार जोरांत आहे. देशांत सर्बस् आणि क्रोटस या दोन पक्षांचें तुंबळ युद्ध नेहमीं चालू असतें. सर्बस् लोकांना फूस देऊन, देशांतील राज्ययंत्र आपणास अनुकूल करून घेण्याच्या खटपटींत जर्मनी आहे.

## पोलंड

पोलंड हें मध्य–युरोपांतील दुसरें बडें प्रस्थ असून, विस्तृत मुलूख, खनिज द्रव्यें, कच्चा माल यांनीं समृद्ध असें असल्यानें प्रत्येकास तें आपल्या बाजूस हवें आहे. जर्मनी आणि रशिया या दोघांमधील लढाईची शक्यता टाळण्याची कामगिरी, मध्यवर्तित्वामुळें हें राष्ट्र करीत आहे. पोलंडच्या

राजकारणांत प्रथम फ्रान्सचें वर्चस्व होतें; पण तें हळूहळू कमी होत आहे. या राष्ट्रास जर्मनी आणि रशिया या दोघांच्या आक्रमणापासून धोका असल्यानें, त्या दोघांशींहि शांततेचा आणि अनाक्रमणाचा दहा वर्षांचा करार करून तें आपलें आयुष्य कंठीत आहे. तरी पण जर्मनीच्या आक्रमणास योग्य असा हा मुलूख असल्यानें, जर्मनीचा डोळा यावर फार आहे. पण या दोन बड्या सत्तेच्या टोकांनींच याचें अस्तित्व कायम राहूं शकलें आहे. जर्मनीविरुद्ध प्रतिस्पर्धी म्हणून ही लष्करी सत्ता, फ्रान्स आणि रशिया यांना ठेवणें भाग आहे. प्रशियापैकीं पोलिश कारिअर हा पोलंडच्या ताब्यांत आहे. त्याचप्रमाणें राष्ट्रसंघामार्फत डॅझिग हें बंदरहि त्यांच्याकडे आहे. डॅझिग हें स्वतंत्र शहर आहे. नाझींचा राजकारणांत वरचष्मा आहे. बाल्टिक समुद्रांत हें महत्त्वाचें व व्यापारी उलाढालींचें केंद्र असल्यानें पोलंडला तें आपल्या हातून जाणें हितावह नाहीं. पोलंडशीं स्नेह जोंवर जर्मनीस ठेवावयाचा आहे, तोंवर या प्रांताचा अभिलाष जर्मनीस दूर ठेविला पाहिजे, हें उघड आहे. जर्मनीचा उत्तर सायलेशिया स्वारी चढवून पोलिश लोकांनीं जबरीनें बेकायदेशीर रीत्या घेतला. कच्चा मालाचें व खानिज पदार्थांचें तें आगर असल्यानें, दोघांनाहि त्याचें अगत्य आहे. पण डॅझिगप्रमाणेंच या प्रांताचा अभिलाष तूर्त जर्मनीस धरितां येणार नाहीं.

## बाल्टिक राष्ट्रें

लिथुआनिया हें अत्यंत छोटें राष्ट्र जर्मनी आणि पोलंड यांच्या तडाख्यांत सांपडलें आहे. पण रशियाचें भरपूर पाठबळ असल्यानें तें आपलें अस्तित्व टिकवूं शकलें आहे. लॅटाव्हिया हें दुसरें छोटेंसें राष्ट्र नाझी पक्षाचें पिल्लू असल्यानें, रशियास अस्तनींतील ढेकणाप्रमाणें त्रास देण्यास खासें उपयोगी पडत आहे. लिथुआनियाकडील मेमेल हा आपला प्रांत पुन्हां मिळविण्यास जर्मनी अत्यंत उत्सुक आहे. जर का जर्मनी आणि पोलंड या उभयतांनीं; लुटीचा प्रांत वांटून घेण्याच्या इराद्यानें लिथुआनियावर स्वारी चढविली, तर मात्र या राष्ट्राचें पुरें नष्टचर्य ओढवलें असें म्हणावयास पाहिजे. एकटा रशिया त्याच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ युद्धाचा वणवा पेटवील हें शक्य दिसत नाहीं. बरें त्याच्या मदतीस फ्रान्सला धांवून जात

येणें अशक्य आहे. झेकोस्लोव्हाकियाची पुनरावृत्ति होणार हेंच खरें. शिवाय रशिया युरोपमध्यें युद्धांत गुंतला कीं इकडे पूर्वेस सरहद्दीवर जपान कुरापत काढून युद्ध जुंपविणार ! अर्थात् रशियास दोन सरहद्दीवर युद्ध चालवून बलाढ्य राष्ट्रांशीं टक्कर देणें, म्हणजे स्वतःचा सत्यानाश करून घेण्याप्रमाणें आहे.

## फिनलँड

बाल्कन राष्ट्रें

बाल्कन राष्ट्रांचें राजकारण मी मी म्हणणाऱ्या रथीमहारथींना उमजणें अशक्य आहे. लहानलहान राष्ट्रें, जात्यभिमानाइतकाच राष्ट्राभिमान कडवा आणि यामुळें नित्य आपसांत भांडणें, हेंच त्यांचें राजकारण. समानशत्रुत्वाशीं दोस्ती, हें त्यांच्या परराष्ट्रीय राजकारणांतील सूत्र. एका प्रसिद्ध ग्रंथकारानें असें म्हटलें आहे, कीं गेलें महायुद्ध या बाल्कन राष्ट्रांतील तेढी मिटवून त्यांना युरोपियन संस्कृति आणि मनमोठेपणाचें राजकारण शिकविण्यासाठीं झालें पण त्यामुळें तीं राष्ट्रें आपला स्वभावधर्म न बदलतां, युरोपिअन राष्ट्रें मात्र 'बाल्कन' बनलीं. कारण बाल्कन राष्ट्रांप्रमाणेंच, युरोपांतील राजकारणाचा १९१८ नंतर चुथडा उडाला.

## अल्बानिया

अल्बानिया या छोट्या राष्ट्रांत इटली आणि युगोस्लाव्हिया यांचे हितसंबंध गुंतल्यामुळें, दोघांनाहि त्याचें अगत्य वाटतें. इटलीनें यास खूष ठेवण्यासाठीं पाण्यासारखा पैसा ओतला. पण आतां खुद्द इटलीसच जर पैसा वांटणीस येईना, तर हे अल्बानियाचे श्रीमंती चाळे तो कसे पुरविणार ? अर्थात आतां युगोस्लाव्हियाच्या जाळ्यांत उडी मारून, आपला फायदा करून घेण्याचें त्यानें ठरविलें आहे. तें लष्करी तयारींत मागासलेलें असल्यानें आधुनिक संहारक शस्त्रास्त्रांच्या विद्येंत त्याला पारंगत करण्याचें पवित्र कार्य, युगोस्लाव्हिया करीत आहे; त्यामुळें अल्बानिया त्यांच्या हातांतील बाहुलें बनलें आहे.

## बल्गेरिया

बल्गेरियास महायुद्धांत आपल्या प्रांतांचा स्वार्थत्याग करावा लागल्यामुळें व्हर्सलिसचा तह बदलून घेण्यास तें उत्सुक आहे. हंगेरीप्रमाणें

रुमानिया, ग्रीस, तुर्कस्थान, युगोस्लाव्हिया ; या राष्ट्रांनीं तें वेढल्यामुळें, स्वतंत्र राजकारण आंखणें या राष्ट्रास कठीण झालें आहे. दोस्त राष्ट्रांचा पक्का द्वेष्टा असल्यानें, आपला गमावलेला प्रांत पुनश्च मिळविण्याचें व परिस्थित्यनुरूप वेळेचा फायदा पदरांत पाडून घेण्याचें याचें राजकारण आहे.

## ग्रीस

ग्रीसमध्यें लष्करी हुकूमशहांची राजवट असली तरी लोकशाहीच्या झेंड्याखालीं हें राष्ट्र—विशेषतः इंग्लंडशीं—प्रेमाचे संबंध ठेवून आहे. बाल्कन राष्ट्रांच्या गटांत असूनहि, त्यांच्या राजकारणाच्या बाहेर राहण्यास तें नेहमीं धडपडत असतें. भावी युद्धांतील हा इंग्लंडचा जबरदस्त आधारस्तंभ असून, इटलीविरुद्ध वैमानिक व आरमारी केंद्र म्हणून ग्रीसचा इंग्लंडला खासा उपयोग होण्यासारखा आहे. याचें मुख्य कारण म्हणजे इंग्लंडच्या राजघराण्याशीं घडलेला याचा पाहुणेपणाचा संबंध. म्हणूनच इंग्लंड ते संबंध मोठ्या नाजुकपणें राखीत आहे.

## तुर्कस्थान

तुर्कस्थान गेल्या महायुद्धांत होरपळून निघाल्यामुळें, युरोपियन राजकारणांत इतःपर प्रत्यक्ष भाग न घेण्याविषयीं त्यानें कानास खडा लावून घेतला आहे. पण युरोपियन राष्ट्रांची संस्कृति, पेहेराव इत्यादिबरोबर मुत्सद्दीगिरीहि त्यानें चांगली उचलली आहे. पै. केमालपाशाच्या राजवटीमुळें पुन्हां हें राष्ट्र पूर्वस्थितीस आलें.या राष्ट्राशीं स्नेह ठेवण्यास रशिया आणि इटली अहमहमिकेनें प्रयत्न करीत असून, केव्हां याला तर केव्हां त्याला आपल्या प्रेमळ कटाक्षांवर, इतका काळ तुर्कस्थानानें झुलवीत ठेवलें आहे. काळ्या समुद्रांतून बाहेर पडण्याचा मार्ग—डार्डानेल्सची सामुद्रधुनी यांच्या ताब्यांत असल्यानें, रशियाचें नाकच पकडींत असल्याप्रमाणें आहे. कारण काळ्या समुद्रांतून भूमध्य समुद्रांत शिरण्याकरितां रशियास हाच एकमेव मार्ग आहे. यामुळें रशियास या राष्ट्राशीं गोडीगुलाबीनें वागणें भाग आहे. इटलीची ॲबिसिनियावरील स्वारी मात्र यास आवडली नाहीं. कारण एक दिवस त्याची झळ आपणांस लागणार इतकी त्याची खात्री आहे. म्हणून रशियाशीं मैत्रीचे संबंध ठेवण्यास हें राष्ट्र पूर्ण राजी आहे. पै. केमाल-

पाशाच्या मृत्यूनें त्यांच्या परराष्ट्रीय राजकारणांत फारसा फरक पडण्याचा संभव नाहीं. जर्मनीचे फडणीस डॉ. फुंक यांनीं नुकत्याच दिलेल्या भेटीमुळें पुनःश्च जर्मनी अग्रपूजेचा मान पटकावणार असें दिसतें. रशियास शेंकडा ९० टक्के पेट्रोल पुरविण्यास कॉकेशस प्रांत या राष्ट्राच्या सरहद्दीस बिलगून असल्यानें, जर्मनीस तुर्कस्थानचें इतकें अगत्य वाटतें.

## स्कँडिनेव्हिया

स्कँडिनेव्हियन प्रदेशांत स्वीडन, नॉर्वे आणि डेन्मार्क या राष्ट्रांचा समावेश होतो. पण हे लोक अस्सल आर्यवंशीय असल्याचा हिटलरने शोध लावून, आपली कृपादृष्टि तिकडे वळविली आहे. या आर्यजातीच्या संस्कृतिरक्षणार्थ नाझी तत्त्वज्ञानाचा फैलाव जोरानें होऊं लागला आहे. युरोपच्या राजकारणांत इतका वेळ निरोगी अवस्थेंत राहिलेलीं हीं राष्ट्रें, इतःपर अलिप्त राहतील असें वाटत नाहीं. या राष्ट्रावर हिटलरचा पूर्ण डोळा असून, एक दिवस त्यांना जर्मन साम्राज्यांत सामील करून घेण्यास, हिटलर अत्यंत उत्सुक आहे. विशेषतः डेन्माकला आपल्या बाजूस ओढण्याचा जर्मनी फार प्रयत्न करीत आहे. कारण ते अस्सल आर्यवंशीय आहेत म्हणून हा पान्हा फुटला, शिवाय बाल्टिक व उत्तर समुद्रांतील त्यांच्या मध्यवर्ति अवस्थेमुळें, आरमारी लढ्यास उपयुक्त तें राष्ट्र ठरणारें असल्यानें ही खटपट चालू आहे.

## तटस्थ राष्ट्रें

आंतरराष्ट्रीय तटस्थ राष्ट्रें म्हणून बेल्जियम, स्वित्झर्लंड आणि हॉलंड हीं इतिहास पुराणापासून प्रसिद्ध आहेत. त्यांची तटस्थतेची भूमिका आणि स्वातंत्र्याचें रक्षण करण्याची जोखीम, युरोपांतील सर्व राष्ट्रांनीं आपल्या शिरावर घेतली आहे. तरीसुद्धां बेल्जियमचा खुर्दा गेल्या युद्धांत कसा उडाला हें सर्वश्रुत आहे. त्यामध्यें तो सर्व प्रांत उध्वस्त होऊन बेचिराख झाला, उद्योगधंद्यांच्या केंद्रांची राखरांगोळी झाली व राष्ट्र पार धुळीला मिळालें. दोस्त राष्ट्रांच्या मदतीनें तें थोडेंफार सांवरलें. पुनःश्च महायुद्धाच्या होमकुंडासाठीं आपली भूमि अर्पण करण्याइतका साळसूदपणा बेल्जियम दाखवील, ही आशाच मुळीं फोल आहे.

पण आतां ती पाळी स्वित्झर्लंड व हॉलंडवर येईल असें मात्र दिसतें. फ्रान्स आणि बेल्जियमच्या जर्मनीकडील बाजूस सरहद्दीवर, कडेकोट अभेद्य तटबंदी आहे. त्या मानानें हॉलंडकडील सरहद्दीकडे फ्रान्सची तर तटबंदी नाहींच, पण खुद्द हॉलंडचीहि पण नाहीं. भावी युद्धाची आघाडी बेल्जियमप्रमाणें आपल्या देशांतून निर्माण होऊं नये म्हणून, हॉलंड आतां-पासून तयारीस लागला असून, अभेद्य किल्ल्यांची योजना त्यांनीं हातीं घेतली आहे. विशेषतः स्वित्झर्लंडच्या बाजूस सरहद्दीवर फारशी तटबंदी फ्रान्सनें उभारली नसल्यानें, जर्मनीस या बाजूनें स्वारी करण्याचा मोह होणें स्वाभाविक आहे. तटस्थ राष्ट्रांची भूमिका राखणें स्वित्झर्लंडला कठीण होणार आहे. उद्योगधंद्यांचें केंद्र, लोकशाहीच्या अधिष्ठात्री देवतेचें देवघर आणि जगांतील सुखीसमाधानी लोकांचें माहेरघर, म्हणून प्रसिद्धि पावलेल्या स्वित्झर्लंडवर दुर्दैव कोसळून, बेल्जियमच्या अवस्थेस तें एक दिवस पोचणार ही मात्र खेदाची गोष्ट आहे.

फिनलँड हा बाल्टिक समुद्रांतील जर्मनीचा भरंवशाचा स्नेही. कम्युनिझमच्या भयानें तो नाझीच्या गोटांत शिरला. हिटलरचे डावे उजवे हात गोअरिंग आणि गोबेल्स या देशांत नेहमीं शिकारीनिमित्त जातात व राष्ट्राच्या अंगावरून हात फिरवून कुरवाळीत असतात. बाल्टिक समुद्र–किल्ला म्हणून त्याचा जर्मन मुत्सद्दी उल्लेख करितात. इस्टोनिया देश मात्र नाझींचा कट्टर द्वेष्टा आहे. जर्मन वरवंट्याखालीं हीं चिमुकलीं बाल्टिक राष्ट्रें एक दिवस चिरडलीं जाणारच. जर्मनीच्या हिटलरच्या भयानें नेहमीं हीं राष्ट्रें चिंताग्रस्त असतात. यासाठीं शांततावादी बाल्टिक राष्ट्रांचा संघ स्थापावा व सामुदायिक संरक्षण करावें अशी कल्पना अनेकदां या राष्ट्रांपुढें विचारार्थ आली; पण ती फलद्रूप झाली नाहीं. विशेषतः नाझींची चिथावणी यास कारणीभूत आहे. या छोट्या बाल्टिक राष्ट्रांचें भवितव्य मात्र खास काळेंकुट्ट आहे, यांत मुळींच शंका नाहीं.

———

# भूमध्य सागरांतील पाणसुरुंग

## मनुष्य देहाची उपमा

युरोपांतील साम्राज्यशाहीच्या उदयाबरोबर भूमध्यसमुद्रास महत्व प्राप्त झालें. जगभर वसाहतींच्या साम्राज्याचा संसार नीटनेटका थाटून बसलेल्या राष्ट्रांना, हा जवळचा मार्ग फार उपयुक्त ठरला. कधींहि सूर्य न मावळणाऱ्या अति विस्तीर्ण ब्रिटिश साम्राज्यांत, सप्तसमुद्रास फार महत्वाचें स्थान आहे. ब्रिटिश साम्राज्याला मनुष्य देहाची उपमा देऊन बोलावयाचें झालें तर असें म्हणतां येईल कीं ब्रिटिश खाडी म्हणजे ब्रिटनची आणि साम्राज्याची श्वासनलिका. भूमध्य-समुद्र म्हणजे अन्ननलिका आणि जिब्राल्टर हे या दोन अन्ननलिका व श्वासनलिका यांच्या संगमाचें नाजूक ठिकाण. जिब्राल्टरच्या वर्चस्वास एवढासा जरी धक्का लागला तरी ब्रिटिशांना मोठा ठसका लागतो; तो या कारणाकरितां. ऑफ्रिकेच्या केप ऑफ गुडहोपला वळसा घालण्याचा मार्ग म्हणजे, इंग्लंडला पश्चिमद्वारा अन्न पोंचविण्याचा मार्ग (Rectal Feeding) तोंडावाटे मनुष्याला वरून अन्न जाईनासें झालें म्हणजे ज्याप्रमाणें खालून गुदद्वारानें अन्न पोहोंचून त्याचें जीवपोषण करितां येतें, त्याप्रमाणें भूमध्य समुद्र कांहीं ना कांहीं कारणानें धोक्याचा झाला, तर हा केप ऑफ गुडहोपचा मार्ग थोडा काळ इंग्लंडच्या उपयोगी पडणार. थोडा काळ म्हणण्याचें प्रयोजन हें कीं जसें गुदद्वारा अन्न पोहोंचवून मनुष्यास फार दिवस जगतां येणार नाहीं, तसेंच केप ऑफ गुडहोपच्या मार्गें येणाऱ्या अन्नसामुग्रीवर ब्रिटन फारकाल जिवंत राहूं शकणार नाही. अर्थात इंग्लंडच्या समुद्रावरच्या स्वामित्त्वाचें भवितव्य या समुद्रावर अवलंबून आहे.

शिवाय पूर्वेकडील ब्रिटिश साम्राज्यास हा जवळचा मार्ग आहे. हिंदुस्थानांतील प्रचंड मनुष्यबल युद्धकाळीं स्वतःच्या रक्षणाकरितां जलदीनें आणण्यास हाच मार्ग इंग्लंडला उपयोगी पडणार. साम्राज्यांतून सर्व

प्रकारचा कच्चा माल व अन्न याचीहि सामुग्री युद्धकाळीं या मार्गानें लवकर आणतां येणार. शिवाय इंग्लंडला लागणाऱ्या पेट्रोलचा तीन चतुर्थांश पुरवठा हैफा या बंदरांतून होतो. अर्थात भूमध्यसमुद्राचा मार्ग बंद झाला, तर इंग्लंडचें वैमानिक दल पेट्रोलच्या अभावीं लुलेपांगळें होणार. युरोपांतील भानगडींबरोबर पूर्वेकडील साम्राज्यांत गडबड उडाल्यास, ब्रिटिश साम्राज्य गडगडणार हें जवळ जवळ ठरल्याप्रमाणें आहे.

सिंगापूरची तटबंदी व सैन्याचा तळ या दृष्टीनें भरभक्कम करण्याच्या प्रयत्नांत सध्यां ब्रिटिश मुत्सद्दी गुंतले आहेत. हल्लीचें पश्चिमेकडील राजकारण एक जिब्राल्टर आणि दुसरें मॉस्को, याभोंवतीं घोटाळलें आहे. तर पौर्वात्य साम्राज्य टिकविण्यासाठीं सिंगापूरचा जास्तींत जास्त उपयोग कसा करून घेतां येईल, याच्या विवंचनेंत ब्रिटिश मुत्सद्दी गर्क आहेत.

## अविभाज्य मिळकत

तसें पाहिलें तर भूमध्य समुद्र ही फ्रान्स आणि इटली यांची उभयतांची अविभाज्य मिळकत आहे. त्या मिळकतीच्या वांटणीपायीं दोघांची मारामारी ही केव्हांतरी एक दिवस जुंपणारच. पण जोंपर्यंत इटलीस साम्राज्य नव्हतें, तोंपर्यंत खुद्द युरोपांत त्यास कोणीहि विचारीत नव्हतें. आतां त्यानें ऑफ्रिकेंत साम्राज्य कमावलें, अर्थात या अविभाज्य मिळकतींत वांटणी घेण्याची खरी जरुरी आतां त्यास भासूं लागली.

भूमध्य सागराचें अगत्य फ्रान्सला फार वाटतें. याचें कारण फ्रान्सचें साम्राज्य आफ्रिकेंत पसरलेलें आहे हें होय. युद्धप्रसंगीं स्वतःचा बचाव करण्याकरतां काळे अदमीच युरोपियन साम्राज्यवाद्यांना नेहमीं लागतात. मोरोक्कोंतील प्रचंड सैन्यबळ या समुद्राच्या मार्गें समरांगणावर आणण्यास अन्य मार्ग नाहीं. फ्रान्सचें सुसज्ज असें एक तृतीयांश सैन्य मोरोक्कोंत असल्यामुळें, भूमध्य सागरावरील वर्चस्व कमी होणें त्याला इष्ट नाहीं. हा समुद्र दुसऱ्याच्या मालकीचा झाला तर फ्रान्सचें स्वातंत्र्य संपुष्टांत येणार.

पण याहिपेक्षां साम्राज्यमदानें धुंद झालेल्या इटलीस या समुद्राबद्दल फार आस्था वाटते. भौगोलिक दृष्ट्या तो त्या समुद्रानें चोहोंकडून वेढ-

लेला आहे, पण ज्या हक्काच्या समुद्रांत इटालियन पोरांनीं कागदी नावा सोडण्याचा खेळ खेळावा, त्यावर दुसऱ्याचें स्वामित्व असावें ही गोष्ट इटलीला मुळींच खपत नाहीं. त्यांत ॲबिसिनिया जिंकल्यापासून, आफ्रिकेंतील साम्राज्यवाद्यांच्या मालिकेंत तो जाऊन बसला आहे. अर्थात सर्व दृष्टीनीं भूमध्य समुद्रावर आपलें वर्चस्व असावें आणि आपण म्हणूं तेव्हां इतर साम्राज्यवाद्यांना चटकन शह देण्याचा हा एकमेव खात्रीचा मार्ग आपल्या हातीं असावा, अशी महत्वाकांक्षा मुसोलिनीनें बाळगली आणि यांतच स्पॅनिश यादवीस तोंड फुटलें आहे.

## स्पॅनिश यादवीचें अंतरंग

स्पॅनिश यादवी प्रथम अंतर्गत बंडाळ्यांप्रमाणें भासली, पण पुढें ती एक हुकुमशहांची लीला आहे असें दृष्टोत्पत्तीस आलें. त्यापायीं युरोपांत वणवा पेटविण्याची इच्छा इंग्लंड आणि फ्रान्स यांची नसल्यानें, त्यांनीं हा लढा मर्यादित करून स्थानिक स्वरूपाचा करण्याचा हास्यास्पद प्रयत्न, स्पेनभोंवती तटस्थेचा तट्टया लावून केला. सरकारपक्षाच्या मदतीस रशिया आणि फ्रान्स, तर बंडवाल्यांच्या सहाय्यास इटली आणि जर्मनी, असे समरांगणावर उतरल्याकारणानें; या लढ्यास कम्युनिझम विरुद्ध फॅसिझम अशा दोन तत्त्वांच्या झगड्यांचें स्वरूप आलें. रशिया हा कम्युनिस्ट सरकारच्या बचावास प्रामाणिक सद्हेतूनें स्वयंसेवकाची भूमिका घेऊन आला, पण हुकूमशहांच्या मदतीमागचा हेतू मात्र निराळा आहे.

स्पेन जिंकल्यावर त्याचा उत्तरेकडील प्रांत बळकावून दक्षिणेकडील सरहद्दीवर फ्रान्सला शह द्यावा हा जर्मनीचा हेतू, तर स्पेनचा दक्षिणेकडील प्रांत कबज्यांत घेऊन, जिब्राल्टरच्या तटबदीस आंतून सुरुंग लावून, भूमध्य सागरांतील ब्रिटिशांचें वर्चस्व संपुष्टांत आणावें हा इटलीचा हेतू. म्हणून स्पेनमधील लढ्यांत इटली जर्मनीची गट्टी दृढ झाली. ब्रिटिशांच्या माल्टामधील प्रचंड आरमारी व वैमानिक तळास प्रतिस्पर्धी म्हणून इटलीनें अगोदर सिसिली आणि सार्डिनिया येथें लष्करी ठाणीं बसविलीं. पण यामुळें भूमध्य सागराच्या पूर्व विभागावर फार तर स्वामित्व गाजविता येईल. जिब्राल्टरला शह देऊन समुद्राच्या पश्चिम विभागांत सत्ता प्रस्था-

पित करण्याची इच्छा पुरी होईना. स्पेनची बंडाळी या कामीं खाशी उपयागीं पडली.

स्पेनच्या भोंवतीं स्पेनच्या मालकीचीं अनेक बेटें होतीं, तीं प्रथम हस्तगत करून या दोघां हुकूमशहांनीं लष्करी उपयोगांत आणलीं. इटलीनें बेलरिक बेटें म्हणजे मुख्यतः माजोर्का आणि मिनोर्का या स्पेनच्या मालकीच्या बेटांवर प्रचंड आरमारी व वैमानिक केंद्रें स्थापिलीं; तर अॅटलांटिक महासागरांतील कॅनरीज बेटांचा उपयोग जर्मनीनें करून घेतला. यामुळें या दोन सत्तेच्या कैचींत जिब्राल्टर चांगलेंच सांपडलें. याशिवाय स्पॅनिश मोरोक्को या दोघांनीं केव्हांच घशांत टाकला आहे.

आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर ट्रिपोली हा मध्यबिंदू कल्पून, लष्करी तटबंदीस इटलीनें प्रारंभ केला. इजिप्त आणि न्यूबिया पूर्ववत् रोमन साम्राज्यांत सामील करावीं हा मुसोलिनीचा हेतू. लिबीया आणि इरिट्रिया या दोन भिंतीमध्यें इजिप्त आणि सूडान यांना चिरडून टाकावें आणि मध्य ऑफ्रिकेंतील, चाड सरोवरामार्गें आपली संस्कृती अॅटलांटिक महासागरास भिडवावी, ही त्याची महत्वाकांक्षा. हा झाला ऑफ्रिकेंतील ब्रिटिश साम्राज्याला शह. तो लागू नये म्हणून इंग्लंड इटलीचे स्पेनमधील शंभर खून माफ करण्यास तयार आहे.

तटस्थतेचें बुजगावणें दाखवून स्पेनमधील सरकार पक्षाची कुचंबणा त्यांनीं चालविली आहे ती या कारणाकरितां. शिवाय स्पेनकडे जाणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या किंमती वाढवून इंग्लंड, फ्रान्स इत्यादिकांनीं पैसा उकळला तो निराळाच. चोरटा व्यापार करून स्वतःची तुंबडी भरणाऱ्या मृत्यूच्या दलालांना; त्यांनीं सुवर्णसंधी आणून दिली. तसेंच धान्य व कच्चा माल यांचा व्यापार करणाऱ्यांचीहि चंगळ उडाली. अशा अनेक जहाजांना इटलीच्या पाणबुड्यांनीं जलसमाधी दिली; तरी इंग्लंड मूग गिळून स्वस्थ बसलें. असला व्यापार ज्याचा त्यानें आपल्या स्वतःच्या जोखमीवर करावा, त्यास सरकार कसलेंहि संरक्षण देणार नाहीं असा जो ब्रिटिश पार्लमेंटांत मुत्सद्दीपणाचा खुलासा करण्यांत आला, त्यांतलें इंगित हेंच. व्यापारी जहाजांच्या जलसमाधीमुळें इंग्लंडमध्यें माजलेला हलकल्लोळ

नाहींसा होऊन शांतता प्रस्थापित करण्यासाठीं, इंग्लंडनें निऑन परिषद बोलाविली व या चांचेगिरीवर पहारा बसविला. इटली जरी गैरहजर राहिला तरी त्यास पहाऱ्याचें काम वांटून दिलें. यामुळें इंग्लंडनें मात्र आपला कावा साधला. पहाऱ्याच्या निमित्तानें त्यांनीं आपलें आरमार भूमध्य समुद्रांत राजरोस आणलें. इटलीवर त्यावेळीं राग काढावा म्हटलें तर त्याच्याबरोबर युद्ध पुकारणें भाग होतें. अनुकूल वेळ येईतोंपर्यंत वाटेल तो अपमान सहन करून राग गिळण्याची विद्या, एकट्या ब्रिटिशांनाच चांगली अवगत आहे.

## स्पॅनिश लढ्याचें भवितव्य

स्पॅनिश लढा लौकर संपण्याची आशा मात्र दुरावत चालली. हा कंटाळवाणा लढा किती दिवस चालणार हें सांगणें कठीण आहे. बंडवाल्यांविरुद्ध या देशांतील शेतकरी वर्ग प्रथमपासून आहे. देशांतील लोकांना हें पक्कें माहीत आहे कीं; हा स्वदेशांतील बंडावा नसून, बाहेरील देशांचें आपल्यावर पद्धतशीर आक्रमण आहे. इटली, जर्मनी, रशिया आणि फ्रान्स हीं राष्ट्रें आपली युद्धाची खुमखुमी मात्र जिरवून घेत आहेत. त्यापायीं बिचाऱ्या शांतताप्रिय नागरिकांच्या रक्ताचा पाऊस आणि मांसाचा चिखल होऊन, प्रांताचा विध्वंस किती दिवस चालणार आहे कोण जाणे !

खुद्द बंडवाल्यांच्या सैन्यांत फॅलेजिस्टस् आणि रिकेटस् अशी दुफळी माजली असून, जर्मन इटॅलियन–स्पॅनिश या लोकांच्यामध्यें खटके वारंवार उडत आहेत. युद्धावर जबरदस्तीनें धाडलेल्या स्वयंसेवकांच्या मनांत असंतोष धुमसत आहे. ते लढण्यास अत्यंत नाखूष असून, आघाडीवर जाण्याचें टाळण्यासाठीं, स्वतःच स्वतःला घातक जखमा करून घेऊन, हॉस्पिटलमध्यें आराम घेण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस इटॅलियन सैनिकांत वाढत चालली आहे. त्यास आळा बसावा म्हणून त्यांच्यावर करडी नजर ठेवण्यासाठीं, प्रसंगीं देहान्ताची शिक्षा देणारीं लष्करी कोर्टें स्थापून, त्या दहशतीनें त्यांना लढण्यास इटली भाग पाडीत आहे.

Cowards exist even in the best and bravest masses. We must not therefore be surprised that there are also cowards amongst us.

But we must get rid of them.

(I) There have been cases of self-inflicted wounds.

(2) There have been cases of wounded and bandaged soldiers, who in fact had nothing the matter to them.

(A) Order : Whoever is guilty of any of the foregoing acts should be immediately shot.

(B) The medical service is to report immediately cases of self-inflicted wounds or what they suspect to be such.

*Macini*

General Commander.

स्पॅनिश लढ्याचा शेवट काय होईल तें सांगणें कठीण आहे. कोणत्या वेळीं कसा अचानक फेरबदल होईल तें सांगतां यावयाचें नाहीं. स्पेनमधील दोन तृतीयांश प्रदेश बंडवाल्यांनीं काबीज केला असून, सरकार पक्षाच्या ताब्यांत कॅटलोनिया प्रांत आणि माद्रिदच्या भोंवतालचा प्रांत मिळून एक तृतीयांश मुलुख आहे. कॅटलोनियाचा प्रदेश फ्रान्सच्या सरहद्दीस लागून असल्यामुळें, फ्रान्सची कुमक तेथें पोहोंचूं शकते. शिवाय या प्रांतांतील बार्सिलोना बंदरांतून, रशियांतील स्वयंसेवक व शस्त्रास्त्रें इत्यादि मोठमोठ्या देणग्यांचा अहेर इतके दिवस पोहोंचूं शकला. पण नुकत्याच झालेल्या जनरल फ्रँकोच्या चढाईंत बार्सिलोना पडलें व हा कॅटलोनिया प्रांतहि बंडवाल्यांनीं जिंकला. म्हणजे सरकार पक्षाची एकेठिकाणची फळी फुटली; बाहेरून कुमक मिळण्याचें सर्वोत्कृष्ट बंदर सरकार पक्षानें गमावलें. आत फक्त माद्रिदच्या भोंवतीं रणकंदन माजणार व तेथील जयापजयावर स्पेनचें भवितव्य ठरणार. एकंदरींत सध्यांच्या परिस्थितीवरून पाहतां संपूर्ण स्पेन हुकूमशहांच्या भक्ष्यस्थानीं पडणार असें दिसतें.

याच्याच जोडीस पॅलेस्टाइनमधील अरबांना इंग्लिशांविरुद्ध फूस देऊन चिथावणी देण्याचे पद्धतशीर प्रयत्न जर्मनी करीत आहे. ' इस्लामी धर्माचे संरक्षक ' ही पदवीहि हुकूमशहा लवकरच उपटणार, असें दिसतें.

इंग्लिशांच्या सुवेझ कालव्यावर नियंत्रण घालतां यावें म्हणून हा सारा डाव. परस्पर पॅलेस्टाईनमधील अरबांना आधुनिक शस्त्रास्त्रें पुरवून इंग्लिशांच्या विरुद्ध उठविण्याचा हा सारा खटाटोप आहे. अशा रीतीनें इंग्लिशांच्या भूमध्य सागराच्या दोन टोंकांना शह यशस्वी रितीनें देण्याचा व्यूह हुकूमशहांनीं रचिला आहे.

## लष्करी शास्त्रांतील नवीन प्रयोग

स्पेनच्या लढ्यांत इटली, जर्मनी आणि रशिया यांचे लाखों लोक स्वयंसेवकांच्या नांवाखालीं लढले, अनेक कामास आले. आधुनिक संहारक शस्त्रास्त्रांची परीक्षाहि यांत त्यांना अनुभवितां आली. बंडाच्या सुरवातीस बंडवाल्यांना स्पॅनिश आरमारानें मोरोक्कोंत कोंडलें. पण ती कोंडी बंडवाल्यांच्या लष्करी विमानांनीं फोडली. आरमाराचा बॉम्बसनीं तर धुव्वा उडविला, पण आणखी विमानांच्या सहाय्यानें बंडवाल्यांनीं एकदम स्पॅनिश किनाऱ्यावर उतरून, माद्रिद सरकाराला चकित करून सोडलें. त्याच प्रमाणें बंडवाल्यांनीं जिंकलेलें माजोर्का बेट परत घेण्याच्या इराद्यानें माद्रीद सरकारनें आठ हजार सैन्य पाठविलें व त्यांनीं त्या बेटाचा ताबाहि पण घेतला. इतक्यांत बंडवाल्यांच्या विमानांनीं त्या सैन्यावर हल्ला करून त्या सर्वांना पिटाळून लाविलें. आरमार आणि विमानें या दोघांचें मोठ्या प्रमाणावर झालेलें पहिलेंच युद्ध असल्यामुळें त्याकडे सर्व जगाचें डोळे लागले होते. आणि हें त्यामध्यें आरमार पराजय पावलें हें दृश्य पाहून, आरमारी सत्तेवर जगाच्या स्वामित्वाची घमेंड मारणाऱ्याचें डोळे मात्र खाडकन् उघडले.

रशियाच्या चिलखती गाड्यांचा प्रताप बंडवाल्यांना चांगला जाणवला. ज. फ्रँकोचे सेनापती म्हणतात कीं, अशा दोनशें गाड्यांनीं संघटित हल्ला केला, तर आमची दाणादाण उडाल्याविना राहणार नाहीं. गेल्या महायुद्धांत असल्या चिलखती गाड्यांचा प्रतिकार करण्याचें साधन उपलब्ध नव्हतें. पण आतां अशा गाड्यांवर विमानांतून बॉंब-वर्षाव करून त्यांचा विध्वंस करतां येतो हें सिद्ध झालें. या-साठीं अंधारांत किंवा दाट धुक्यांत, पहांटे चिलखती गाड्यांचा

हल्ला करणें आणि शत्रुपक्षीय विमानांना पिटाळण्यासाठीं आपल्या डोक्यावर संरक्षक विमानांचा ताफा ठेवणें, हे नवीन अनुभव या ठिकाणीं मिळाले. शिवाय चिलखती गाड्या फोडणाऱ्या नवीन तोफांची कार्यक्षमता कसास लागली. अशा प्रकारच्या जर्मन तोफा उत्कृष्ट ठरल्या.

वैमानिक दळाचें कार्यक्षेत्र विस्तृत झालें. शत्रूचा पाठलाग करण्याचें घोडदळाचें पूर्वींचें काम आतां वैमानिक दळाकडे आलें. वैमानिक काफिल्यांनीं ठराविक ठिकाणीं संघटित रीतीनें अचुक हल्ला करण्याच्या विद्येंत पुष्कळ सुधारणा झाल्या. तसेंच भूमध्यसमुद्रांत मध्यंतरी चांचेगिरी करून, इटलीनें आपल्या पाणबुड्या बोटींची परीक्षा पाहिली व त्यांचा प्रताप विशेषतः इंग्लिश जहाजांना सहन करावा लागला.

शत्रुपक्षांना जर्जर करण्यास खेड्यांचा उपयोग गनिमी काव्यानें कसा करून घ्यावयाचा, या शास्त्रांत बरीच प्रगती झाली. खेड्यांच्या असुरक्षित जीवनास त्रासून लोकांनीं मोठालीं शहरें बनविलीं. पण काळाचा महिमा असा कीं, नवीन युगांत सुरक्षितपणाच्या दृष्टीनें शहरें कुचकामाचीं ठरलीं व आपली जुनीपुराणी खेडगांवचीच राहणी बरी, असें म्हणावयाची पाळी लोकांवर आली. तसेंच नव्या शास्त्रीय शोधांचा स्वीकार जीं राष्ट्रें तत्परतेनें करीत नाहींत त्यांचा नाश होणार हें ठरल्याप्रमाणें झालें. यांत्रिक सैन्याच्या हालचाली; पायदळी सैन्यास कशा पराभूत करूं शकतात, याचेहि अनेक अनुभव या लढ्यांत आले. निरपराधी बायकामुलें, वृद्ध व इतर नागरिकांच्यावर बॉंबच्या हल्ल्यामुळें होणारी निष्कारण प्राणहानी व त्यांचे हृदयद्रावक देखावे जगांतील लोकांना स्तंभित करून टाकणारे ठरले. शस्त्रास्त्रांच्या सुधारणेच्या बाबतींत आपण कोठें आहोंत याची जाणीव सर्वांना झाली.

## इटली–फ्रान्सचें भांडण

आफ्रिकेंतील ॲबिसिनिया हें एकमेव स्वतंत्र राष्ट्र गिळंकृत केल्यावर, आतां मुसोलिनीची दृष्टि फ्रेंच साम्राज्याकडे वळली आहे. गेल्या महिन्यापासून आफ्रिकेंतील ट्यूनिस, सेव्हॉय आणि कॉर्सिका यांमध्यें धुमाकूळ घालण्यास त्यानें प्रारंभ केला आहे. भूमध्यसागरांत फ्रान्स व इटली

यांचे पाय एकमेकांत अडकून बसलेले आहेत. कार्सिका बेट फ्रान्सचें, तर त्याच्या शेजारचें सार्डिनिया बेट इटलीचें. ऑफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर त्रिपोली इटलीचा, तर त्याच्या शेजारचें ट्यूनिस, अल्जेरिया व मोरोक्को फ्रान्सचे.

फ्रान्समधील मंत्रिमंडळें पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणें, लहानशा झुळुकेनेंहि वारंवार कोलमडून पडतात. अशा कमकुवत राजवटीचा फायदा घेण्यासाठीं जर्मनी-इटली टपून बसले आहेत. इटलीचें एकीकरण सेव्हॉयच्या राजघराण्याच्या नेतृत्वानें झालें, पण सेव्हॉय प्रांत मात्र फ्रान्सच्या ताब्यांत राहिला. अर्थात देशाभिमानानें पिसाळलेलें राष्ट्र त्यावर हक्क सांगल्याशिवाय कसें राहणार ? जिनिआच्या कमकुमत राजवटीचा फायदा घेऊन कार्सिका बेट फ्रान्सनें हस्तगत करून, नंतर जिनिआस थोडेफार मोबदल्यादाखल पैसे देऊन आपलें स्वामित्व प्रस्थापिलें. ट्यूनिस म्हणजे जुन्या रोमन साम्राज्यांतील जुनें कार्थेज. रोमन साम्राज्याच्या गतवैभवाच्या स्मरणानें निद्रानाश जडलेल्या इटलीस, तो प्रांत दुसऱ्याच्या ताब्यांत असलेला कसा पाहवेल ? पण फ्रान्सलाहि त्याचें अगत्य आहे. ट्यूनिस प्रांतांतील बिझर्टा बंदर फ्रान्सला स्वसंरणार्थ ठेवणें जरुरीचें आहे. तसेंच फ्रान्सच्या मालकीच्या जिबूती बंदरावरहि आतां इटलीची कृपादृष्टी वळली आहे. तें बंदर व्यापारी महत्वाचें आहे. शिवाय तेथपासून ॲबिसिनियाच्या राजधानीकडे रेल्वे गेलेली आहे. अर्थात ॲबिसीनियाचें हें द्वार दुसऱ्याच्या हातीं ठेवणें आतां इटलीस परवडत नाहीं.

ट्यूनिस, कार्सिका व अल्जेरिया प्रांतांतील फ्रान्सच्या साम्राज्याविषयींचा विश्वास डळमळूं नये म्हणून नुकतीच फ्रेंच मुख्य प्रधान डॅलाडिअर यांनीं प्रचंड दौरा काढला. आणि एक इंचभरहि जागेचें अपहरण फ्रान्स करू देणार नाहीं, असा जाहीर संदेश दिला. याच हिशोबानें वाढत्या मागण्या करणाऱ्या मुसोलिनीची प्रादेशिक आकांक्षा, एकेकाळीं इंग्लंड रोमन साम्राज्यांत मोडत असल्यानें, इंग्लंड जिंकण्याची असणार नाहीं ना ! पण मुसोलिनीच्या मनांतला डाव कोण सांगू शकणार ?

———

# हुकूमशहांचा अपमृत्यु

ज्योतिषशास्त्रांत असा एक नियम आहे कीं, कोणाच्याही मृत्यूचें भविष्य वर्तविण्याचें धाडस कधींही करूं नये. कारण तें नेहमीं हमखास चुकीचें ठरतें. या ज्योतिषशास्त्राच्या नियमांस यत्किंचितही बाध न आणतां, दुसऱ्या एका शास्त्राच्या आधारें हुकूमशहांचा अपमृत्यु मी वर्तविणार आहे, आणि तें म्हणजे अर्थशास्त्राच्या आधारें.

तसेंच पाहिलें तर हुकूमशहांच्या मृत्यूचें भविष्य वर्तविण्याइतकी सोपी गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं. त्यांच्यावर प्रत्यहीं होणाऱ्या प्राणघातक हल्लयांच्या बातम्यावरून, त्यांचा मृत्यू एक दिवस तशाच अपघातांत होणार, हें सर्वसामान्य मनुष्य पटकन् सांगूं शकेल. खलाशाचा मृत्यू जसा एक दिवस समुद्रांत किंवा वैमानिकांचें मरण विमानोड्डाणांत, तसें हुकूमशहांचें मरणहि एकतंत्री राजवटींत त्यांच्यावर होणाऱ्या प्राणघातक हल्लयांतच ओढवावयाचें. तसेंच हुकूमशाहीचा अंतहि हुकूमशहाच्या मृत्यूबरोबर व्हावयाचा हेंहि तितकेंच खरें. राजाप्रमाणें देशांत मिरासदारी निर्माण करितां येणें हुकूमशहांना अशक्य आहे, म्हणून कोणी आशा सोडली नाहीं. वीरांना समरांगणावर आलेल्या मृत्यूचा आनंद जसा अलौकिक व अवर्णनीय, तसेंच हुकूमशहांना त्यांच्या कारकीर्दीतच देशकार्यांत आलेल्या मृत्यूहून अधिक चांगलें मरण, देवाजवळ मागूनही मिळावयाचें नाहीं.

अशा अपमृत्यूच्या धोक्यांनीं वेढलेल्या हुकूमशहांच्या आयुष्याचा विमा उतरविण्यास कोठलीहि विमा कंपनी तयार होणार नाहीं. प्रत्यक्ष मृत्यूच्या जबड्यांत वावरणाऱ्यांचा घातक विमा, विमा कंपनीच्या डोक्यांतच एक दिवस धोंडा घालणार.

पण हा झाला हुकूमशहांच्या मृत्यूसंबंधीचा सर्वसामान्य माणसाचा अंदाज आणि तो बहुतांशीं खराहि पण आहे. पण घटकाभर आपण

ग्रंथालय प्रत

धरून चाललों, कीं या प्राणघातक हल्ल्यांतून हुकूमशहा बचावले. तर मग त्यांचा मृत्यू कशानें ओढवेल, त्याचें उत्तर मात्र यांत मिळत नाहीं. अर्थशास्त्रानें तें हमखास मिळतें. हुकूमशहांचें अर्थशास्त्र जगावेगळें आहे. त्यांचें अर्थशास्त्राचें खरें ज्ञान आवळ्याएवढें पूज्य आहे, आणि त्यांचें हें गाढ अज्ञान एक दिवस त्यांचें आणि त्यांच्या राष्ट्राचें वाटोळें करणार हें स्पष्ट दिसतें. देशांत खाद्यपदार्थांची निपज करण्याऐवजीं शस्त्रास्त्रांची लागवड करणाऱ्या हुकूमशहांचें, लोकांना भाकरी ऐवजी बंदुकीच्या गोळ्या पुरविणारें अपूर्व व अद्भूत अर्थशास्त्र, त्यांना एक दिवस भोंवल्याशिवाय कसें राहील? पण तें कसें हें पाहण्यापूर्वी हुकूमशहांचें सर्वसाधारण स्वरूप, त्यांचें कार्य व त्यांच्या उदयाचीं कारणें, याविषयीं थोडेंसें विवेचन करूं.

## हुकूमशहांचा अवतार

परमेश्वरानें मनुष्याच्या जीविताविषयीं अगोदर अशाश्वती निर्माण करून ठेविली आहे. एकतंत्री राजवटींत लोकांचें जीवित जास्तच क्षण-भंगुर ठरलें; एवढेंच नव्हे तर मनुष्याच्या मालमत्तेविषयींहि अशाश्वती उत्पन्न झाली. कारण अशा राजवटींत प्रजेचें जीवित आणि मालमत्ता, हीं पूर्णपणें राजाच्या लहरीवर अवलंबून राहिलीं. त्यांतूनच लोकशाहीचीं तत्त्वें वाट काढीत पुढें आलीं. लोकशाहीचा सूर्योदय झाला. जीविताविषयीं शाश्वती उत्पन्न झाली, तसेंच मालमत्तेविषयीं फिकीर करण्याचेंहि कारण उरलें नाहीं.

लोकशाहीच्या उदयाबरोबर औद्योगिक क्रांतीचें युग अवतरलें. यंत्राच्या सहाय्यानें मनुष्याचें जीवन निव्वळ सुखमय होऊन भागलें नाहीं, तर मनुष्याच्या जीवनक्रमांत एक प्रकारची क्रांती झाली. त्यामुळें उत्पादनशक्ति वाढली आणि भांडवल एकत्र होण्यास मदत झाली. भांडवलशाहीनें राज्ययंत्र पैशाच्या जोरावर काबीज केलें. संपत्तीच्या आधारावर सामाजिक मानमरातब व वर्चस्व संपादलें. थोडक्यांत भांड-वलशाहीनें लोकशाहीस पूर्णपणें ग्रासलें. आतां भांडवलशाहीविरुद्ध क्रांतीच्या भाषेस सुरवात झाली आहे. भांडवलशाहीच्या कचाट्यांतून

स्वतंत्र विचार डोकें वर काढूं शकले. यांत्रिक युगांत समाजघटनाच बदलली पाहिजे असें लोक प्रतिपादूं लागले. भांडवलशाहीनें नवनवीन सुधारणा, सुखसोई, सवलती इत्यादिकांची लयलूट केली, तरी पण लोकांचें समाधान होईना. समतेच्या अभावीं लोकांना स्वातंत्र्याचा आस्वाद पुरा घेतां येईना. समतेची इच्छा बहुजनसमाजांत अधिष्ठित होऊन राहणारी आहे. भांडवलशाही तर समाजांत विषमता उत्पन्न करून आपलें आसन स्थिर राखण्याचा प्रयत्न करणार, यामुळेंच भांडणास प्रारंभ झाला. स्वतंत्रतेच्या काळांतहीं देशांतील लोक असंतुष्ट राहिले. शिवाय भांडवलशाहींत लोकसत्ता केव्हांही मर्यादित स्वरूपांतच वावरणार. वाढत्या सत्तेची भूक बहुजनसमाजांत निसर्गतः आहे. या कारणामुळेंच भांडवलशाही विरुद्ध बहुजन समाज उठला. रशियावरील बहिष्कारास न जुमानतां कम्युनिस्टांच्या गळचेपींतून समाजसत्तावादाचीं तत्त्वें मान वर काढूं शकलीं. इतकेंच नव्हे तर थोडक्या कालांत जगाच्या कोन्याकोपऱ्यांत तीं पसरूं शकलीं याचें मर्म हें आहे. या समाजसत्तावादाशीं अखेरचा सामना देण्यासाठीं भांडवलशाहीनें सध्यांचें हुकूमशाहीचें उग्र स्वरूप धारण केलें आहे. हुकूमशहांच्या अवताराची ही झाली एक बाजू.

## लोकशाहीची अप्रिय राजवट

याशिवाय दुसरीहि एक बाजू आहे, आणि ती म्हणजे प्रातिनिधिक राजव्यवस्थेचे अंगभूत दोष. लोकशाहीच्या नांवानें सौभाग्यतिलक कपाळीं लावणाऱ्या प्रातिनिधिक राजवटीनें लोकांची सहानुभूती, आणि समाधान हीं मिळविली नाहीं. गेल्या महायुद्धानंतर अनेक नवीन राज्यें युरोपांत निर्माण झालीं. त्यांना नामधारी कां होईना, राजांची वाण भासली. राजांच्या दुष्काळामुळें त्या राष्ट्रांनीं प्रातिनिधिक राज्यव्यवस्थेचा अंगीकार केला. शिवाय गेलें महायुद्ध लोकशाहीच्या अंतिम संरक्षणाच्या नांवानें लढलें गेलें. अर्थात् लढाईतील जय म्हणजे लोकशाहीचाच जय असा भ्रम उत्पन्न झाला. त्यामुळें कांहीं राष्ट्रांवर तर ती राज्यव्यवस्था निष्कारण लादण्यांत आली. महायुद्धानंतर कित्येक

राष्ट्रांच्या डोईवर प्रचंड कर्जाचे डोंगर चढले. त्यांतच आर्थिक हलाखीचा जागतिक प्लेग आला. बेकारी कळसास पोंचली. राजकारणांत पक्षोपक्षांची गर्दी झाली व त्यांच्या चकमकी उडूं लागल्या. यामुळें कोणतेंही एक सरकार फार काळ राज्य करूं शकेना. अमर्याद बडबड, अपरिमित बाष्कळपणा आणि कृतीचा रगडून अभाव, यांचें प्रत्यंतर लोकांना वारंवार येऊं लागलें. लोकशाहीची अमदानी खरी, पण भांडवलशाहीचा वरचष्मा बहुजनसमाजास डोळे वर करून पाहूं देईना. अशा राष्ट्रीय संकटाचे वेळीं प्रातिनिधिक राजवट कुचकामाची आहे, असेंच सर्वांना वाटूं लागलें. किंबहुना जग प्रातिनिधिक राजवटीच्या रोगानें झपाटलें असें लोक बोलूं लागले. + त्या वातावरणांत अगोदर रुजलेली समाजसत्तावादाचीं बीजें मात्र फोफावूं लागलीं.

जर्मनींत व इटलींत या परिस्थितीची प्रचीति आली. बेजबाबदार पुढाऱ्यांची चर्पटपंजिरी व पांचटपणा यांचा लोकांना वीट आला. प्रातिनिधिक राजवटीच्या धोरणांत सर्वत्र अनिश्चितता, निर्बलता आणि संदिग्धपणा, हेच दोष दिसून आले. अर्थात् त्या राजवटींतील वावदूकपणामुळें आलेली नालायखी व कर्तृत्वशून्यता, यामुळें तें सरकार दिवसेंदिवस अप्रिय होत चाललें.

अशा परिस्थितींत लोकांची मनधरणी करून सामोपचाराच्या धोरणानें चालणाऱ्या प्रातिनिधिक राज्यकारभारापेक्षां, धाकधपटशा दाखवून; राष्ट्रोन्नतीच्या गाड्यास लहानथोर सर्वांना सक्तीनें जुंपणारें सरकार अधिक लोकप्रियता मिळवितें, असा सर्वसाधारण नियम आहे. म्हणून हुकूमशहांचा उदय झाला. एरव्हीं व्यक्तिस्वातंत्र्य आणि राजकीय हक्क मनमुराद उपभोगणारे लोक, आपले सर्व हक्क आणि सत्ता एखाद्या निरंकुश व्यक्तीच्या हातीं देण्यास आपणहून कसे तयार होतील ?

## हुकूमशहांची लोकप्रियता

कम्युनिझममुळें येणारी समाजघटना जरी कितीहि समाधानकारक व आकर्षक वाटली, तथापि त्याच्या प्रस्थापनेसाठीं पडणारा रक्ताचा सडा

+ The world is sick of Parliamentarism. *H. G. Wells.*

किंवा घडून येणारी क्रांति पत्करण्यास, बहुजनसमाज नेहमीं नाखूष असतो. कारण क्रांतीनंतर कम्युनिझमच्या ऐवजीं, दुसऱ्या-एखाद्या जुलमी हुकूमशहाचें भूतच मानगुटीं बसण्याची भीती जास्त असते. रशियांत हेंच नाहीं कां घडलें ? कम्युनिझमचा बागुलबोवा, दाखवून, हुकूमशहांनीं आपली सत्ता दृढ केली.

बहुजनसमाज हुकूमशहास कां पत्करूं लागला, याची ही कारणमीमांसा झाली. कम्युनिस्ट लोकांची कत्तल, विरोधी पक्षाची गळचेपी आणि वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी, या तीन गोष्टी हुकूमशहांच्या पांचवीलाच पुजलेल्या आहेत. हुकूमशहांच्या कारकीर्दींत इतका अनन्वित जुलूम होत असतांनाही, त्यांची लोकप्रियता कां कायम रहावी असा प्रश्न साहजिक उभा राहतो. त्याचें उत्तर थोडक्यांत असें कीं, लोकशाहीप्रमाणें विरोधी पक्षास भिऊन ते राज्य करीत नाहींत हें आहे. विरोधी पक्ष प्रबल होऊन आपणास अधिकारावरून हांकून देईल, अशी चुकूनही भीति मनांत न आणतां हुकूमशहा राज्य हांकतात, यांतच त्यांच्या यशाचें मर्म सांठविलेलें आहे.

## हुकूमशहा आणि राजा

हुकूमशहा आणि राजा हे सकृद्दर्शनीं सारखे दिसले, तरी दोन्हीं राजपद्धती मूलतः भिन्न स्वरूपाच्या आहेत. राजाचें राजेपण अनुवंशिक असतें, तर हुकूमशहाची सत्ता स्वकष्टार्जित औटघटकेची असते. लोकमताचें बूड नाहींसें झाल्यावर, हुकूमशहा एक क्षणभरही आपल्या जागेवर राहूं शकणार नाहींत. पण राजाचें राजेपण मात्र त्याची वडिलोपार्जित मिरासदारी. लोकमतानें निवडून दिलेला सर्वाधिकारी राजा म्हणजे हुकूमशहा, अर्थात् लोकमताच्या नाडीवर एक हात ठेवून राजयंत्र चालविणारा हुकूमशहा. ही जुन्या अनियंत्रित राजाची नवीन पण सुधारलेली आवृत्ति. हुकूमशहाच्या मृत्यूबरोबर त्याची राजवट संपावयाची, म्हणूनच लोकांनीं ती स्वीकारली आणि राष्ट्रांना ती मानवली.

हुकूमशहाची राजवट उत्कृष्ट म्हणून कोणीहि म्हणत नाहीं व म्हणणारहि नाहीं. पण कांहीं एका विशिष्ट परिस्थितींत राष्ट्राला अधोगतीपासून

ती तारूं शकते हें मात्र निःसंशय. नवीन येऊं घातलेली समाजघटना भांडवलशाही येऊं देत नाहीं. पण या भांडवलशाहीच्या गर्भाशयांतच नवीन समाजघटना जन्म घेण्याकरितां धडपडत आहे. आणि हा जन्म बऱ्या बोलानें भांडवलशाहीनें दिला नाहीं, तर सामाजिक क्रांती होऊन म्हणजेच भांडवलशाहीचें पोट फाडून, ती समाजघटना जन्म घेईलच घेईल. बहुजनसमाज क्रांतीच्या भयानें हुकूमशहांना पाठिंबा देत आहे, आणि सामाजिक क्रांतीशिवाय नवीन समाजरचनेची घडी देशामध्यें हे हुकूमशहा बसवितील म्हणून मार्गप्रतीक्षा करीत आहे. पण ती अपेक्षा पांच वर्षांच्या अनुभवानें मात्र फोल ठरली.

## हुकूमशाही कां लष्करशाही ?

कम्युनिझमचें बुजगावणें उभारून त्यांनीं कामकरीवर्ग चिरडला, तसें भांडवलवाल्यांनाहि नागविलें. लोकांचें व्यक्तिस्वांतत्र्य, वर्तमानपत्रांचें मतस्वातंत्र्य हिरावून घेऊन, समाजाची नवीन घडी बसविण्याच्या ऐवजीं, समाजाचा गळा दाबून श्वास कोंडण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. लष्करशाहीचें उग्र स्वरूप धारण करून, सामाजिक, राजकीय, व आर्थिक अन्याय दूर करण्याऐवजीं, तेच अन्याय दुसऱ्यांवर लादण्यासाठीं ते प्रयत्नांची पराकाष्टा करूं लागले. साम्राज्यलोभानें धुंद होऊन, त्यानीं पुनः एकवार महायुद्धाचें पिशाच मोकाट सोडलें. लोकांना लष्करी शिस्तीचें बाळकडू पाजून सैनिक बनविलें व समाजास लष्कराचें स्वरूप दिलें. एवढेंच नव्हे, तर प्रत्यक्ष लोकशाहीच्या नरडीसहि नख लावण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं.

लोकांचा आत्मा मारण्याचें पाप सर्वांत भयंकर. तें करण्याचें मूर्ख धाडस कोणी कधींहि करूं नये. पण हुकूमशहांच्या सध्यांच्या धोरणानें अशा पापांचे धडे भरून येत आहेत. त्यांचें पुरेपूर प्रायश्चित त्यांना एक दिवस मिळाल्याशिवाय राहील काय ?

## लष्करी अर्थशास्त्राचा ओनामा

हुकूमशहांचें अर्थशास्त्र सर्व लष्करी शास्त्रावर आधारलेलें आहे. व्यक्तिगत भांडवलवाल्यांना पुरेसें संरक्षण देऊन, राष्ट्रकार्यार्थ त्यांचा

उपयोग करून घेणें, किंवा राष्ट्रानें स्वतः भांडवल न गुंतवितां खासगी भांडवलाच्या उत्पादनावर राष्ट्रहिताच्या दृष्टीनें कडक नियंत्रण वा देखरेख ठेवणें, हा फॅसिस्ट अर्थकारणाचा मूळ पाया. तसेंच मजुरांचा संप पुकाण्याचा हक्क त्यांनीं हिरावून घेतला. दोघांच्या हितसंबंधांना थोडी फार मुरड घालून, दोघांना राष्ट्रकार्याच्या रथास समभागी म्हणून जुंपणें व तो आपण एकट्यानें हांकणें, हीच थोडक्यांत फॅसिस्टांची कल्पना.

लष्करी शास्त्र युद्धशास्त्रावर उभारलेलें असल्यामुळें, युद्धांचा उपयोग राजकीय वृद्धीबरोबरच व्यापाराच्या वाढीसाठीं करणें ही नीति आली. राष्ट्रांतील प्रत्येक लहान सहान गोष्टीचा विचार नेहमीं लष्करीदृष्ट्या करावयाचा आणि महायुद्धाच्या प्रसंगीं देशाची आर्थिक बाजू उत्कृष्टपणें कशी संभाळतां येईल हा दृष्टिकोन ठेवून, उद्योगधंद्यांना प्रोत्साहन द्यावयाचें, हें त्यांचें धोरण बनलें. भांडवलवाल्यांचें रक्षण करावयाचें, पण त्याचबरोबर त्यांच्या फायद्यांतला सिंहाचा वांटा उचलावयाचा. भांडवलवाल्यांना अशा तऱ्हेनें लुबाडावयाचें, तर त्यांना दुसरी एखादी लांच नको का द्यावयास ? आणि ती म्हणजे देशांतील मजुरांचें आर्थिक शोषण करण्यास त्यांना दिलेला परवाना.

लहान उद्योगधंद्यांचे पुरस्कर्ते म्हणून हुकूमशहा अधिकारारूढ झाले. पण अधिकारावर आल्यावर लहान उद्योगधंद्यांच्या हितसंबंधांकडे पाठ फिरवून, मोठमोठ्या धंद्यांना त्यांनीं प्रोत्साहन दिलें, व त्यांची सत्ता वाढविली. गेल्या महायुद्धांत समरांगणावर जर्मनीचा पराजय कधींच झालेला नाहीं, तर अन्नपुरवठ्याच्या कोंडमाऱ्यानें उपासमार झाली व त्यानें राज्यक्रांती झाली, अशी नाझी लोकांची विचारसरणी आहे. अर्थात भावी युद्धांत ही उपासमार टळावी या दृष्टीनें, राष्ट्रानें स्वयंपूर्ण असणें इष्ट–नव्हे आवश्यक–आहे.

महायुद्धानंतर गमावलेल्या बाजारपेठा पुनःश्च मिळविण्याचा नाद जर्मनीनें धरला नाहीं. अर्थात बाहेरून संपत्ति मिळवून आणण्याचा मार्ग कायमचा बंद झाला. सुवर्णाचा तर देशांत पार दुष्काळ पडला. आंतरराष्ट्रीय व्यवहारांत जर्मनीची कवडीचीहि पत उरली नाहीं, कारण त्यानें

जुनीं डोईजड कर्जें सफाईदार बुडविलीं. तरी पण नवीन कर्जांच्या धुमधडाक्यावर, देशांत मोठालीं सार्वजनिक कामें त्यानें आरंभिलीं. त्यामुळें बेकारी बऱ्याच प्रमाणांत नष्ट झाल्यानें लोक संतुष्ट झाले. शस्त्रास्त्रांच्या प्रचंड खर्चापायीं, देशांतील पैसा व श्रम यांच्या उधळपट्टीचा धूमधडाका जर्मनीनें सुरू केला. जर्मनीजवळ पैसा नाहीं व आंतरराष्ट्रीय व्यवहारांत नादान नादारी पत्करली, तर मग देशाचें डोकें वर कसें निघालें? पैसे, पत, आणि सुवर्ण यांच्या अभावीं, जर्मनी या पैशाच्याच मोठाल्या उलाढाल्या कसा करूं शकेल? युद्धाच्या जय्यत तयारीसाठीं पैशाचा पाऊस तो कसा पाडूं शकतो?

## जादुगार डॉ. शाक्त

जर्मनी म्हणजे हिटलर व हिटलर म्हणजे डॉ. शाक्त. देशांतील आर्थिक परिस्थितींत अपूर्व कामगिरी करून दाखविली ती यांनीं. अर्थशास्त्राचे जगन्मान्य सिद्धांतहि कदाचित् ते बदलण्यास लावतील अशी भीति वाटूं लागली. डॉ. शाक्त यांना जादूगार म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. निदान पंचवीस वर्षें ज्या जर्मनीचें नांवही राजकारणांत ऐकूं येणें शक्य नाहीं अशी दोस्त राष्ट्रांची खात्री होती, तेंच राष्ट्र अवघ्या पांच वर्षांत पुनःश्च सर्व जगाचें लक्ष्य वेधून घेऊं शकलें. ही यक्षिणीच्या कांडीसारखी जादुगारी डॉ. शाक्तांची.

त्यांचें सर्व आर्थिक धोरण राष्ट्राच्या स्वयंपूर्णतेंत समाविष्ट झालेलें आहे. युद्धाचे वेळींसुद्धां जर्मनीनें सर्व जगाशीं टक्कर देण्यास आपल्या स्वतःच्या पायावर उभें राहावें, आपल्या सर्व प्रकारच्या गरजा राष्ट्रांतूनच भागाव्यात, कोणत्याहि गोष्टींत दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग येऊं नये, हें त्यांच्या स्वयंपूर्णतेच्या कल्पनेचें सार. अन्नपुरवठा व कच्चा माल यांच्या बाबतींतसुद्धां राष्ट्र हरएक प्रकारचा माल उत्पन्न करूं लागलें पाहिजे. जो कच्चा माल देशांत उत्पादन करितां येत नाहीं, त्याच्या बदली दुसरा जिन्नस रसायनशास्त्राच्या आधारें शोधून काढला पाहिजे. जर्मनीची सर्व भिस्त प्रामुख्यानें आपल्या रासायनिक कल्पनाचातुर्यावर आहे. रासायनिक शक्तीमुळें जगांतील कोठल्याही जिन्नसाची वाण भासणार नाहीं, असा त्याचा दुर्दम आत्मविश्वास आहे; आणि तो यथायोग्य आहे.

## रसायनशास्त्राचा अभिमान

जर्मनीची सर्व खनिज संपत्ति म्हणजे क्षार आणि कोळसा. त्यांची विपुलता जर्मनीच्या रासायनिक भरभराटीस कारणीभूत आहे. जर्मनी रंगाच्या धंद्याबद्दल जगप्रसिद्ध आहे. त्यासाठीं त्याला हिंदुस्थानांतून निळाची प्रचंड आयात करावी लागत असे. पण आतां निळाच्या बदली त्यानें दुसरा पदार्थ अनेक प्रयत्नांनीं शोधून काढला. त्यामुळें हिंदुस्थानचा निळाचा व्यापार बसला हें खरें, पण जर्मनी मात्र त्या गोष्टींत स्वयंपूर्ण झाला, हें तितकेंच खरें. त्याचप्रमाणें त्यांनीं रेशिमाची नड भागविली. लोंकरीपासून रेशमाचा तंतू काढण्याची अभूतपूर्व कल्पना, जर्मनीनें सत्यसृष्टींत आणली. तसेंच रबराची अडचण दूर करण्याच्या प्रयत्नांत हल्लीं जर्मन शास्त्रज्ञ गुंतले आहेत. कोळशापासून पेट्रोल काढण्याचा शोध लावून, पेट्रोलचा जंगी पुरवठा मोठ्या प्रमाणावर कसा करावा या नादांत ते सध्यां आहेत. देशांतील बेंझॉल, अल्कोहोल व त्यांत थोडें परदेशी गॅसोलीन असें तेलाचें मिश्रण, पेट्रोलच्याऐवजीं उपयोगांत आणून पेट्रोलची वाण ते सध्यां भागवीत आहेत. पेट्रोलचें अगत्य जर्मनीस फार आहे; कारण जर्मनीचें सर्व सामर्थ्य वैमानिक दलांत एकवटलेलें आहे. अर्थात पेट्रोलच्या कोंडमाऱ्यानें भावी युद्धांत आपण हतबल होऊं, अशी त्यांना भीति वाटत आहे. म्हणूनच पेट्रोलच्या बदली दुसऱ्या पदार्थांच्या शोधांत जर्मन शास्त्रज्ञ अहोरात्र गढलेले आहेत.

## व्यापारी करार

वसाहतीच्या साम्राज्यांतून खनिज व कच्च्या मालाचा पुरवठा युद्धाच्या वेळीं आणविणें कसें अशक्य होतें, याची पूर्ण कल्पना जर्मनीस गेल्या महायुद्धांत आली आहे. शांततेच्या काळीं वसाहतींचा उपयोग जरी देशांतील उद्योगधंद्यांना पुष्कळसा झाला, तरी त्यांच्यावर सर्वस्वी अवलंबून रहातां येत नाहीं. म्हणून खुद्द युरोपांत अशा कच्च्या मालाची स्वतःच्या मालकी हक्काचीं ठिकाणें निर्माण करण्याचा त्यांचा यत्न आहे. दुसऱ्या देशांच्या कच्च्या मालाची भरपाई करण्यास जर्मनी-जवळ मुळींच सुवर्ण नाहीं, म्हणून जर्मनीनें शेजारच्या राष्ट्राबरोबर

व्यापारी करारमदार केले आहेत. त्यांच्या कच्च्या मालाची भरपाई आपल्या पक्क्या मालानें करण्याचें त्यांचे धोरण आहे. अशा रीतीनें जर्मनीच्या आयात आणि निर्गत व्यापारामध्यें त्यांनीं एक प्रकारचा मेळ बसविला आहे. आयात वाढून त्याबदली सुवर्ण द्यावयास लागूं नये म्हणून त्यांची सारी खटपट. ज्या निर्गत मालाची भरपाई करितां येत नाहीं, तो माल अजिबात बंद करणें त्यांना श्रेयस्कर वाटलें. या दृष्टीनें शेजारच्या सव्वीस लहान मोठ्या राष्ट्रांबरोबर व्यापारी करार केले असून, त्यांचा पुरा फायदा जर्मनी घेत आहे.

विशेषतः युरोपांत महायुद्धाचा आभास उत्पन्न करणें, लहान राष्ट्रांना स्वतःच्या स्वातंत्र्याविषयीं विवंचनेंत पाडणें व त्यांना शस्त्रसंभार वाढविण्यास भाग पाडणें, ही कारवाई सध्यां जर्मनी करीत आहे. शस्त्रास्त्रांचें फायदेशीर गिऱ्हाईक आपणाला मिळून, आपल्या राष्ट्राचा चरितार्थ उत्तम रीतीनें चालावा असा त्यांचा यत्न आहे. विशेषतः त्या राष्ट्रांच्या कच्च्या मालाच्या बदली पक्का माल न देतां, भारी किंमतीचीं अवजड शस्त्रास्त्रें पुरविणें व असा दुहेरी फायदा लुबाडणें या दृष्टीनें सर्व युरोपच्या कच्च्या मालाचें आर्थिक शोषण करून, त्यांच्या भरपाईसाठीं सर्व युरोपला शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज करण्याचा त्यांचा सध्यांचा प्रयत्न आहे. तागडीबरोबर तलवार व सत्ता हीं नेहमीं निगडित असल्यामुळें, व्यापारी करारांच्या योगानें त्या छोट्या राष्ट्रांवर आपलें राजकीय वर्चस्वही स्थापन होण्यास एक प्रकारें मदत होत आहे. विशेषतः बाल्कन राष्ट्रांतून जें जर्मनीच्या वर्चस्वाचें प्राबल्य दिसून येतें, त्याचें कारण जर्मनीनें त्या छोट्या राष्ट्रांबरोबर केलेले व्यापारी करार होय. बर्लिन–रोम झेंड्याखालीं बाल्कन राष्ट्रें गोळा झालीं आहेत याचें रहस्य हेंच.

देशांतील शेतकीविषयक धोरणांत असाच आमूलाग्र फरक पडला आहे. भाकरीपेक्षां बंदुकीच्या गोळ्याच अधिक हितकारक आहेत* असा त्यांचा सिद्धांत. अन्नपुरवठ्याच्या बाबतींत जर्मनीस पूर्वी इतर देशांच्या कृपेवर अवलंबून राहणें भाग पडत असे. नाझीझमच्या उदयानें देशांतील

* Bullets are important than bread.

सर्व पडीक जमीन लागवडीस आणली गेली. ज्यू लोकांच्या मालकीच्या सर्व जमेनी बळजबरीनें सरकारी हक्कांत काढून घेतल्या. किंबहुना आधुनिक जर्मनीचें अर्थशास्त्र रक्त व भूमि (Blood & Soil) यांच्या सांगडींतच समाविष्ट झालेलें आहे. शेतकींतून निपजणाऱ्या मालांच्या भावांत भराभसाट घसरगुंडी होऊन, शेतकरी निकृष्ट होऊं नये म्हणून त्यांच्या किंमती सरकारनें ठरविलेल्या आहेत. बाहेरच्या चढाओढीचा त्यावर परिणाम होऊं नये म्हणून जर्मनी नेहमीं दक्ष आहे. अर्थात जर्मनींत शेतकीच्या मालांच्या किंमती इतर राष्ट्रांपेक्षां भारी आहेत हें निराळें सांगावयास नकोच. समाजाच्या हिताच्या दृष्टीनें त्या किंमती योग्य आहेत असें नाझींचें म्हणणें आहे.

## सुवर्णपरिमाणाचें वेड

नाझींच्या जमाखर्चाचें शास्त्र तर औरच आहे. देशांतील चलन सुवर्णाच्या खुंट्याला बांधून घालण्याचा अट्टाहास नेहमीं अर्थशास्त्रज्ञांचा असतो. यालाच सुवर्णपरिमाण म्हणतात. सुवर्णपरिमाणचें वेड अर्थशास्त्रज्ञांच्या डोक्यांतून जाणें अशक्य आहे. या वेडाच्या पायांत इंग्लंडनें स्वतःच्या सुवर्णाची धुळधाण करून घेतली. महायुद्धानंतर या सुवर्णपरिमाणाचें खूळ बरेचसें कमी होऊं लागलें आणि आर्थिक हलाखीच्या तडाख्यानें तर त्याचें कंबरडेंच मोडलें. तरी पण चलनाला दुसऱ्या एका कोणत्या तरी खुंटीला अडकवून ठेवण्याचा अट्टाहास जगांतील सर्व राष्ट्रें अद्यापिहि करीत आहेत.

## चलनाचें अनेकदांती चक्र

जर्मनीनें मात्र आपलें शास्त्र निराळें बनविलें व जगावेगळा मार्ग सुधारला. चलनाचें एकदांती चक्र बनविण्याऐवजीं त्यानें त्याचें अनेकदांती चक्र बनविलें. वस्तूच्या किंमतीप्रमाणें चलनाच्या निरनिराळ्या किंमती बनविल्या, अर्थात त्यामुळें शेकडों परिमाणें निर्माण झालीं. याची थोडक्यांत कल्पना अशी देतां येईल. सर्वसाधारणपणें एका पौंडाबरोबर बारा मार्क्स असें नेहमीं प्रमाण असतें. असें समजा कीं एखाद्या माणसास एक मार्क किंमतीचें पुस्तक खरेदी करावयाचें आहे. तें जर त्यानें जर्मनींत खरेदी केलें तर त्यास दहा पेन्स द्यावे लागतील, त्यानें इंग्लंडांतील बाजा-

रांत खरेदी केलें तर वीस पेन्स द्यावे लागतील, आणि जर्मन सरकारच्या परराष्ट्रीय खात्यामार्फत मागविलें तर पंधरा पेन्स भरावे लागतील. पुस्तक तेंच, त्याची किंमतही तीच, पण त्याच्या विक्रीचीं ठिकाणें बदललीं, तशा त्याच्या किंमती पण बदलल्या. हेंच किंमतीचें कोष्टक हरएक वस्तूस लावलें म्हणजे झालें. अंतर्गत कारभारांत नाण्यांच्या किंमती अशाच बदलल्या जातात. बाहेरचा एखादा प्रवासी जर्मनींत गेला कीं त्यास पुरा लुबाडावयाचा हें त्यांचें धोरण. बाहेरचा प्रवासी आपणांस लागतील तेवढीं जर्मन नाणीं प्रथम खरेदी करितो. तेव्हां त्यास एक पौंडास तेवीस मार्क्स सरकार देतें, म्हणजे जवळ जवळ नेहमींच्या दुप्पट. हेतू हा कीं त्यास जर्मनींतील माल स्वस्त वाटून, त्यानें भरमसाट विकत घ्यावा. देशांतून बाहेर नेतांना त्यावर जबर जकात ते उकळतातच. पण याहिपेक्षां त्याच्या जवळचें सर्व जर्मन नाणें खलास झालें आणि पुनः तो जर्मन नाणें खरेदीस आला कीं, एकदम तेवीस मार्क्सचा भाव नेहमींच्या बारा मार्क्सवर आणतात. अर्थात तेथून पुढें त्याला खर्चास दुप्पट पैसे लागतात व जर्मन सरकार व व्यापारी तो फायदा लुबाडतात. थोडक्यांत जर्मनींत नाणीं, नोटा सर्व कांहीं आहे, पण त्यांना ठराविक किंमती नसल्यानें, दुसऱ्यांना पुरें नागविण्यास बरें सांपडतें.

### सक्तीचीं कर्जें

याशिवाय त्यांनीं बाहेरच्या देशांचीं कर्जें साफ बुडविलीं. देशांतील भांडवल परदेशीं न जाण्याविषयीं सक्तीचे हुकूम काढले. देशांतील सर्व संपत्ति देशाच्या उद्योगधंद्यांतच कामीं आणण्याचा त्यांनीं प्रयोग केला. एवढेंच नव्हे तर जर्मन लोकांनीं परदेशीं गुंतविलेलें सर्व भांडवल पुनः जर्मनींत परत आणण्याचें फर्मान काढलें. परदेशांतील आपली संपत्ति सरकारच्या परवानगीशिवाय लपवून ठेवणें, हा देशद्रोहाचा गुन्हा ठरवून त्यास कडक शिक्षा ठेविली. शिवाय श्रीमंत लोक, बँका, विमा कंपन्या यांच्याकडून सक्तीच्या खुषीनें मोठालीं कर्जें उकळलीं. ज्यू, कम्युनिस्ट इत्यादिकांची संपत्ति कायदेशीर रीत्या हिरावून घेऊन देशकार्यास लाविली. जमीनदार वर्गाला कम्युनिझमचें भय दाखवून बेसुमार कर लादून पैसे जमा केले.

## कामगार वर्ग संतुष्ट

कामगार वर्गास संतुष्ट राखण्याची हातोटी व परत पुनः त्यांना नागविण्याची युक्ती हिटलरला चांगली साधली आहे. अठ्ठेचाळीस तासांचा आठवडा व एकशेंवीस मार्क्सचें मासिक वेतन असें कायद्यानें ठरविल्यामुळें, मजुरांना वेळप्रसंगीं लुबाडण्याचे भांडवलवाल्यांचें शस्त्र त्यांनीं काढून घेतलें. त्यांच्या हितासाठीं घरभाडीं कायद्यानें स्वस्त ठरविलीं. अन्नपदार्थांच्या किंमती त्यांना माफक अशा मुद्दाम ठेवण्यांत आल्या. त्यांच्या सुखासाठीं व करमणुकीसाठीं, नाटक सिनेमा, रेल्वेचा प्रवास, इत्यादि परवाने सरकारतर्फें देण्याची सोय करण्यांत आली. कामगार वर्गाचे संप करण्याचा, संघ बनविण्याचा इ. हक्क काढून घेतल्यामुळें त्यांचें स्वातंत्र्य नष्ट झालें हें खरें, पण त्यांच्या पोटापाण्याची, सुखसोयीची सर्व व्यवस्था सरकारनें शिरावर घेतली. अर्थात मजुरांचें स्वातंत्र्य म्हणजे उपाशीं मरण्याचेंच स्वातंत्र्य हिरावून घेतलें, असें नाझी म्हणतात. प्रत्येक मजुरास स्वतःची जागा, घर मिळून पोटापाण्याची ददात राहिली नाहीं, म्हणजे कम्युनिझमची उचलबांगडी तेव्हांच होईल* असें नेहमीं हिटलर म्हणतो व तें आकर्षक चित्र मजुरांना झुलवितें.

## फुकटे हमाल

देशांत मोठमोठालीं सार्वजनिक कार्यें उभारून हिटलरनें बेकारी नष्ट केली. त्याच्या अमदानीच्या आरंभीं साठ लक्ष बेकार होते, ते आतां फक्त दहा लाख उरलेले आहेत. त्यांतील सुमारें दहा पंधरा लाख लोक सैन्यांत खपले व उद्योगधंद्यांत बाकीचे उपयोगी आणले. हजारों ज्यू, कम्युनिस्ट इत्यादिकांच्या नोकऱ्या जर्मन बेकारांना उपलब्ध झाल्या. देशांत प्रत्येक माणसास ज्याप्रमाणें सक्तीचें लष्करी शिक्षण घेणें भाग आहे; त्याप्रमाणें, हिटलरनें प्रत्येक जर्मन माणसास देशासाठीं सहा महिने राब-

---

* But he is no longer free, it is true no longer free to starve. The day when every German posseses a house and a plot of his own, Communism will disappear from this land.

—*Hitler*

ण्यास लाविलें. पोटापाण्यापुरतें त्यांना वेतन देऊन, त्यांच्याकडून सहा महिने फुकट हमाली करून घेण्याची कल्पना, त्यांनीं मोठाले कँप उभारून यशस्वी केली. फारसा पैसा खर्च न करितां देशांतील मोठीं सार्वजनिक कार्यें लोकांकडून करवून घेण्यासाठीं, आपलें अव्यक्त मनुष्यसामर्थ्य उपयोगांत आणण्याची जर्मनीची कल्पना अभूतपूर्व आहे. त्यास जगांत दुसरी तोडच नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

## संपत्तीची धुळदाण

जर्मनीच्या आर्थिक धोरणाचें हें चित्र जितकें आशादायक व आकर्षक वाटतें तितकीच त्याची पार्श्वभूमि काळीकभिन्न आहे. या धोरणाचे दुष्परिणाम जर्मनीस भोवल्याविना राहणार नाहींत. तो अतिदुःखाचा दिवस जर्मनी दूर लोटीत आहे एवढेंच काय तें! लोकांना अज्ञानांधःकारांत ठेऊन, देशाच्या संपत्तीची व सामर्थ्याची ते धुळधाण करीत आहेत. देशाच्या जमाखर्चातील, बजेट, वादविवाद, ताळेबंद इत्यादि कांहीं नसल्यानें, तूट लोकांच्या ध्यानीं येत नाहीं. १९३४–३५ सालीं ही तूट निदान ३५ कोटींची असावी असा अंदाज आहे. राष्ट्रीय कर्ज १९३३–१९३५ अखेर ३५ कोटींपासून २६५ कोटीपर्यंत वाढलें. यानंतर तर लढाईच्या तयारीसाठीं पैशांच्या केलेल्या अनागोंदी कारभारामुळें, हिटलरनें हे आंकडे बेसुमार वाढविले असले पाहिजेत हें उघड आहे.

तीच स्थिति थोड्याफार प्रमाणांत इटलींत आहे. फॅसिझमनें राष्ट्रीय कर्ज दुप्पट तिप्पट केलें. १९२२ मधील १०३ कोटींचें कर्ज, १९३५ मध्यें २०० कोटींच्यावर गेलें. देशांत सुवर्णाची टंचाई भासूं लागली. १९२८ मध्यें ११०६१ दशलक्षांचा सुवर्णनिधी, १९३७ मध्यें ४०२२ दशलक्षापर्यंत खालीं आला. इटलीनें स्थापलेली अबिसिनियाची वसाहत अशीच आंतबट्ट्याची झाली. ती वसाहत पोसण्यासाठीं व नवीन उद्योगधंद्यांना चालना देण्यासाठीं, इटलीस त्या ठिकाणीं पैशाचा पाऊस पाडावा लागत आहे.

जर्मनींत डॉ. शाक्त यांनीं देशांत बुद्धिपूर्वक भरभराटीचा आभास उत्पन्न केला आहे. मोठमोठाले रस्ते, शस्त्रास्त्रांचे कारखाने व इतर युद्धोपयोगी कारखाने अहोरात्र चालू आहेत. त्यामुळें देशांतील बेकारी कमी झाली हें खरें, पण त्यामुळें लोकांच्या नित्योपयोगी गरजा भागल्या नाहींत. एकंदर देशाची युद्धकालीन लष्करी तयारी कशी कडेकोट राहील, याकडे त्यांचा पैसा खर्च होत आहे. विमानें बांधविण्याचे कारखाने रात्रंदिवस चालू असले, तरी लोकांची क्रयशक्ति एकंदरींत खालावलीच. म्हणून लोकांची राहणी दिवसेंदिवस निकृष्ट दर्जाची होऊं लागली आहे.

देशाची उत्पादनशक्ति; लोकांच्या गरजा पुरविणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनार्थ खर्च न करितां, शस्त्रास्त्रासारख्या संहारक वस्तूंच्या उत्पादनार्थ खर्च करणें, हें केव्हांही आत्मघातकीपणाचें आहे. त्यामध्यें लोकांना जिवंतपणीं अर्धपोटीं ठेवण्याचें पातक ज्याप्रमाणें आहे, त्याप्रमाणें उपासमारीनें सपाट झालेल्या पोटांवर गोळ्या घालण्याचें महापातक, हिटलर सध्यां करीत आहे. शेतकींत उत्तम पीक येऊनही सरकार तें सक्तीनें हिरावून घेत आहे. आणि लोकांनीं कोणते जिन्नस किती प्रमाणांत खाऊन जीवरक्षण करावें, यांचीं फर्मानें ते काढीत आहेत. चोहोंकडून कोंडलेल्या व उपासमारीच्या पायरीस पोंचलेल्या एखाद्या किल्ल्याचे व त्यांतील सैन्याचें स्वरूप, सध्यां जर्मनी व त्यांतील लोक यांना प्राप्त झालेलें आहे. यासंबंधीं एक सुंदर व्यंगचित्र प्रसिद्ध झालेले आहे. दोन जर्मन लोक आपल्या कमरेचे पट्टे करकचून आवळीत असून, त्यामुळें त्यांच्या कंबरा युरोपिअन बायकांप्रमाणें चिमुकल्या बनत आहेत, असें दाखविलें आहे. अर्थात या सर्व हालअपेष्टांतून सोडवणूक आणखी एखादी लढाई जिंकूनच करितां येईल, असा त्यांचा आत्मविश्वास आहे.

## डॉ. शाक्तांची उचलबांगडी

डॉ. शाक्त व हिटलर यांचा मतभेद झाल्यानें डॉक्टरसाहेबांची उचलबांगडी नुकतीच झाली. जर्मन मार्कांची किंमत कृत्रिमपणें वाढवून व भविष्यकालांतील कर्जबाजारीपणा पत्करून, शस्त्रास्त्रवाढीचा चार वर्षांचा कार्यक्रम पुरा करावा असा हिटलर यांचा आग्रह होता. डॉ. शाक्त हे

जुगारी आहेत हें खरें; पण हिटलर हा तर अट्टल जुगारी आहे. इतकें भयंकर जुगारी धोरण आत्मघातकी असल्यानें, डॉ. शाक्तांना तें पटलें नाहीं. यामुळें त्यांना बडतर्फ करण्यांत आलें असून, त्याजागीं आपलें लष्करी अर्थशास्त्र अंमलांत आणणारे डॉ. फंक यांची नेमणूक झाली आहे.

पहिल्यापासूनच डॉ. शाक्त यांच्या मवाळ धोरणास जर्मनींत बराच विरोध होता. पण हिटरचा त्यांच्यावर पुरा विश्वास असल्यानें त्यांना चार दिवस त्या जागेवर काढतां आले. देशांतील जमाखर्च त्यांनीं बसविला, बाहेर दुसऱ्यांचा विश्वास संपादन केला व पुनः जर्मनीची पत आंतरराष्ट्रीय व्यवहारांत निर्माण केली. दुसऱ्या देशांच्या सहकार्यानें जर्मनीनें आपलें आर्थिक धोरण स्वीकारलें पाहिजे, असें त्यांचें म्हणणें होतें. इतर देशांपेक्षां भयंकर महागाईचा बाजारभाव जर्मनींत ठेवण्यास त्यांचा विरोध होता. तसेंच श्रीमान ज्यूंना हद्दपार करण्याचें हिटलरचें धोरण त्यांना पूर्णपणें नापसंत होतें.

डॉ. शाक्तांच्या बडतर्फीपासून जर्मनींत जहालांचें राजकारण सुरूं झालें, असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. आतां ढुंगणाचें सोडून डोकीस गुंडाळण्यास कांहींच हरकत नाहीं. यापुढें जर्मनीनें शस्त्रास्त्रवाढीचा कार्यक्रम चालू ठेवणें इष्ट नाहीं, असें डॉ. शाक्त यांनीं बजावलें असें म्हणतात. पण जर्मनीचें आजचें वैभव व पुढील उज्ज्वल भविष्यकाळ जर्मनीच्या शस्त्रास्त्रांच्या वर्चस्वावर अवलंबून असल्यानें, हा त्यांचा इषारा धुडकावून लावण्यांत आला. जर्मनीनें शस्त्रास्त्रांवर आपला स्वार्थ साधला हें खरें, पण तेंच पिशाच्च एक दिवस जर्मनीच्या मानगुटी बसल्याशिवाय राहील काय? महायुद्धाचा आभास उत्पन्न करून जर्मनीनें अनेक कारवाया साधल्या. पण शांततेच्या कालांत हें युद्धाचें तुफानी वातावरण चालू ठेवून लोकांना किती दिवस झुलविणार?

दिवसेंदिवस जर्मनींतील लष्कराची सत्ता अमर्याद वाढूं लागली आहे. जपानचें राज्ययंत्र ज्याप्रमाणें पूर्णपणें लष्करी सेनापतींच्या हातीं आहे, त्याप्रमाणें जर्मनीचें राज्ययंत्र एक दिवस सेनापतींच्या हातीं जाईल असें दिसतें. आणखी एक महायुद्ध होऊनच जर्मनीची परिस्थिति निवळेल,

महायुद्धाव्यतिरिक्त चालू हलाखींतून डोकें वर निघण्याचा अन्य मार्ग नाहीं, अशा प्रकारची विचारसरणी जोरानें प्रसृत होत आहे. अर्थात लष्करी वृत्तीचा पाठपुरावा करीत राहणें म्हणजे एक दिवस महायुद्धाचें होमकुंड पेटविणें व लष्करी वृत्तीच्या त्याग करण्यास सिद्ध होणें म्हणजे स्वतःच नामशेष होणें, असें कोडें या हुकूमशहापुढें राहणार आहे. हुकूमशहांच्या धोरणाचा विजय होवो वा पराजय होवो, जगांत महायुद्धाचा वणवा पेटविल्याविना रहात नाहीं इतकें निश्चित. एक महायुद्धाच्या खाईत तरी राष्ट्राला ओढलें पाहिजे; अगर राष्ट्रांत राजकीय क्रांति तरी होऊं दिली पाहिजे, याशिवाय तिसरा मार्ग हुकूमशहांना उपलब्ध नाहीं, आणि त्यापैकीं हुकूमशहा पहिला मार्ग स्वीकारतील इतकें स्पष्ट दिसतें.

## कांचेचीं घरें

हुकूमशहांनीं बांधलेल्या घरांना कांचेच्या गृहांची उपमा खाशी शोभते. शस्त्रास्त्रावर आधारलेलें राष्ट्र आणि कांचेचें घर हीं दोन्हीही सारखींच घातक होत. कांचेच्या घरांत वावरणाऱ्यानें बाहेरून आपल्यावर दगड-धोंडे येणार नाहींत म्हणून जितकें दक्ष राहिलें पाहिजे, तितकेंच आंतून बाहेर दगड-धोंडें आपण फेंकणार नाहीं याबद्दलहि खबरदारी बाळगली पाहिजे. कारण या दोहोंचेंही पर्यवसान कांचेचे तुकडे टाळक्यांत पडण्यांतच होणार. जर्मनीनें स्वरक्षण करणें व आपल्यावर आक्रमण न होईल याची काळजी घेणें जरूर आहे. त्याहिपेक्षां आपण दुसऱ्यावर आक्रमण करून महायुद्धाची ज्वाला पेटविणार नाहीं, याबद्दल हुशार असलें पाहिजे; कारण दोघांचाहि परिणाम जर्मनीची राखरांगोळी होण्यांत होणार आहे.

जर्मनी, इटली व जपान यांचा त्रिकोण जमला. इटली व जपान यांच्या सहकार्यानें, जर्मनीनें सामुदायिक 'युद्धनिधी' प्रस्थापित करून, ती गट्टी अधिकच घट्ट करण्याचें श्रेय डॉ. शाक्तसाहेबांकरवीं संपादिलेलें आहे. डॉ. शाक्तसारखा दूरदर्शी अर्थशास्त्रज्ञ जर्मनीनें गमावला ही गोष्ट अत्यंत अनुचित आहे, यांत मुळींच शंका नाहीं.

## महायुद्धाचें पिशाच्च

आंतरराष्ट्रीय राजकारणांत इटलीशिवाय खरा जिव्हाळ्याचा स्नेही जर्मनीस नाहीं. जर्मनीनें आपला गेलेला स्वाभिमान परत मिळविला व झालेल्या अपमानाचें उट्टेंही पण पुरें काढलें. व्हर्सलिसच्या तहाचें अपमानशल्य काढून टाकण्याचें हिटलरचें धोरण केव्हांही बरोबर होतें. पण आतां शक्तीच्या सामन्यानें जग पादाक्रांत करण्याची त्याची योजना घातक आहे. महायुद्धाचें पिशाच्च उठवून, जर्मनीनें कांहीं काळ देशाला तारलें. त्यामुळें देशाची कृत्रिम भरभराट झालेली दिसेल, पण ही पुष्टता निरोगी नसून सूजच ठरेल. युद्धाच्या कालीं त्यांची नापत त्यांना अडवील. पैशांचा दुष्काळ लोकांना जाणवेल. त्याची परिणति दुष्काळ आणि दारिद्र्यांत होऊन, लोक अन्नाच्या अभावीं टांचा घांसून मरण्याच्या अवस्थेंत आपणांस दिसतील. एकूण हुकूमशहांच्या अर्थशास्त्राची पार्श्वभूमि काळ्याकभिन्न रंगांत भेसूरपणें रंगविली असून, अर्थशास्त्राच्या कठोर सिद्धांताच्या पायरीवर हुकूमशहांचा व त्यांच्या राष्ट्रांचा कपाळमोक्ष झालेला आपणांस एक दिवस आढळून येईल.

———

# भडकत्या ज्वाला

इतका वेळ केलेल्या विवेचनावरून भावी महायुद्धाच्या अंदाजाचा रोख वाचकांच्या लक्ष्यांत आला असेलच. मध्ययुरोपांत एकेक राष्ट्रें गिळंकृत केल्यावर, युक्रेन प्रांताबद्दल रशियाची कुरापत जर्मनीनें काढावी. त्याचवेळीं दुसऱ्या बाजूनें जपानला फूस देऊन, त्यानें चीन-मधील प्रचंड मनुष्यबलाचा उपयोग करून घेऊन, रशियाविरुद्ध उठावें. काटेकोररीतीनें पाहिलें तरी रोम—बर्लिन—टोकियो या त्रिकोणांत रशिया बरोबर समाविष्ट होतो. जर्मनी, जपान आणि रशिया हीं तीन बलाढ्य राष्ट्रें आपापसांत झुंजून तिघेहि नष्ट व्हावेत, म्हणजे औषधाविना जगांतील खरूज गेली असा इंग्लंडच्या पोटांतला डाव आहे. पण जर्मनीच्या वाढत्या सामर्थ्यामुळें फ्रान्स अधिक बेचैन होत चालला आहे. जर्मनी इंग्लंडच्या कानांत कोठली गोष्ट सांगून आगाऊ संमति मिळविल्याशिवाय, कसलेंच पाऊल टाकीत नाहीं.

## युरोपला आग.

असें म्हणतात कीं; बोहेमियाला आग लागली कीं युरोपखंड कोरडा राहणें शक्य नाहीं.* म्युनिच करारानें युद्धकुंडावर थोडेंबहुत पाणी शिंपडलें गेल्यामुळें; अग्नि विझल्याप्रमाणें देखावा दिसत असला, तथापि तो खरा नाहीं. आंतून तो धुमसतच आहे.

जर्मनीच्या गमावलेल्या प्रांताच्या एकीकरणाच्या प्रयत्नांस कोणीही पायबंद घालूं शकणार नाहीं. युक्रेनच्या आधीं मेमेलचा प्रश्न, जर्मनीस अगत्याचा वाटतो. बाल्टिक समुद्रांतील हें महत्वाचें बंदर आहे. शिवाय तें लिथुआनियापासून जबरीनें हिरावून घेऊन, त्या छोट्या राष्ट्रास रशियाच्या अधिराज्यांतून काढून, आपल्या नाझी पंखाखालीं आणण्याचा डाव हिट-

---

* When Bohemia ia aflame, there can be no peace for the rest of Europe.

लरचा आहे. यावेळीं लिथुआनियाच्या बाजूनें रशिया एकमेव स्वसामर्थ्यावर जर्मनीविरुद्ध शस्त्र घेऊन उठेल, हें संभवनीय दिसत नाहीं. मेमेलसाठीं वेगळें कायद्यानें स्वराज्य निर्माण केलें असल्यानें, निव्वळ दमबाजी आणि सामोपचार या कुटिल नीतिस, तें सहजासहजीं बळी पडण्यास हरकत पडणार नाहीं. मि. चर्चिलचे नाझींच्या पुढील आक्रमणासंबंधींचे उद्गार शंभरटक्के खरे आहेत. ते म्हणाले, "मेमेल, पोलिश युक्रेनिया, डँझिग व रुमानियांतील ट्रान्सिल्व्हानिया यांपैकीं प्रथम कोणास कृपादृष्टीचा प्रसाद द्यावा, ही गोष्ट आतां केवळ हिटलरच्या लहरीवर अवलंबून आहे." मध्ययुरोपांत, बाल्टिक आणि बाल्कन राष्ट्रांत जर्मनीनें आपलें अधिराज्य स्थापलें, ही गोष्ट मान्य केल्याविना आतां गत्यंतर नाहीं.

## हिटलरला पाहिजे तरी काय ?

हिटलर आपल्या गमावलेल्या वसाहतींचा प्रश्न इतक्यांत धसास लावील असें मात्र वाटत नाहीं. हिटलरनें आत्मचरित्रांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, "फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यापासून वसाहतींवांचून दुसरी कोणतीहि अपेक्षा जर्मनी करीत नाहीं. सामोपचारानें तो प्रश्न मिटला तर आम्हांस हवाच, पण त्याच्या याचनेसाठीं आम्ही आपला हात पुढें करावयास तयार नाहीं. बऱ्या बोलानें तुम्ही त्या परत दिल्यात तर ठीक. नाहींतर त्या कशा घ्यावयाच्या, याचें शास्त्र आम्ही परिपूर्ण जाणतों. वेळ आल्यास आम्ही त्याचा अवलंब करूंच करूं." वरचेवर आपल्या वसाहतींची मागणी हिटलरनें केली, पण त्या प्रश्नापायीं इंग्लंड–फ्रान्सशीं आतांच तेढ माजविण्याची त्याची इच्छा दिसत नाहीं. त्या लांचेच्या तुकड्यानें इंग्लंड, फ्रान्स मिंधीं बनून, जर कां आपणास पूर्व युरोपांत मोकळें रान देत असतील, तर त्याचा फायदा अगोदर घेतलेला काय वाईट ? शिवाय आपण सामर्थ्यवान झाल्यावर आपल्या वसाहती हक्कानें मागूं व घेऊं. त्यावेळीं इंग्लंड–फ्रान्सची नकार देण्याची काय छाती आहे ? वसाहतींची कुरपात काढून, इंग्लंड–फ्रान्सशीं युद्ध द्यावयाचें म्हणजे, आपलें आरमारी सामर्थ्य नको का सबळ ? प्रचंड आरमारी सामर्थ्याशिवाय

वसाहती बळजबरीनें घेण्याची भाषा बोलणें मूर्खपणाचें नाहीं का ठरणार ? शिवाय साम्राज्याचा प्रदेश एकजिनसी असलेला संरक्षणाच्या दृष्टीनें अधिक श्रेयस्कर. लांबवर पसरलेलें वसाहतींचें साम्राज्य संरक्षण करणें आधुनिक कालांत कष्टप्रद झालें आहे, असें हिटलर म्हणतो त्याचें रहस्य हें. खुद्द युरोपांत आपल्या वसाहतींच्या स्वार्थत्यागावर, पुनःश्च जर्मन साम्राज्य स्थापण्यास योग्य संधी मिळत असेल, तर ती घेणें अधिक हितावह व फायदेशीर नव्हे का ?

हिटलरला पाहिजे तरी काय ? असें विचारण्याची पाळी युरोपिअन मुत्सद्यांवर आली आहे. हिटलरचा आधाशीपणा आणि प्रादेशिक अभिलाष थांबणार तरी कोठें ? साऱ्या जगांत आपल्या राष्ट्रास अग्रेसरत्व मिळावें ही मनीषा, त्याच्या आक्रमक वृत्तीस नेणार तरी कोठें ? व्हर्सलिसच्या अपमानकारक तहामुळें जर्मनी बिथरला, हें म्हणणेंही आतां खोटें वाटूं लागलें आहे. तो तह फेटाळण्याच्या किंवा पायदळीं उडविण्याच्या आड कोणी आतां येऊं शकत नाहीं. पण जर्मन रक्तांतील खुमखुमी त्यास तेवढ्यावर स्वस्थ बसूं देत नाहीं. तडजोड आणि सवलती यांचा स्वीकार तो मोठ्या नाखुषीनें करितो, इतकें स्पष्ट दिसतें. करारावरील शाई वाळते न वाळते तोंच, त्या करारभंगाची भाषा तो बोलतो, यावरून हें नाहीं कां दिसत ?

पण यांत तो आपल्या राष्ट्राच्या नाशास कारणीभूत होणार आहे. दोन दृष्टीनें हिटलरला दुहेरी सामना द्यावा लागेल असें दिसतें. फ्रान्सची वा रशियाची कोणाचीहि कुरापत काढली, तरी जर्मनीच्या पूर्वपश्चिम आघाडीवर जर्मनीस युद्ध खेळावें लागणार. युद्धाच्या नुसत्या धाकानें कांहीं काल जर्मनी आणखी थोडे विजय संपादन करेल. पण एक दिवस त्याला असा मोठा सामना देण्याखेरीज गत्यंतर नाहीं.

## भावी युद्ध दीर्घकालीनच होणार

लष्करीदृष्ट्या बोलावयाचें झालें तर, पुढील युद्ध दीर्घकालीन होईल. विमानांच्या साहाय्यानें कांहीं लष्करी विजय प्रथमतः जरी जर्मनी मिळवूं शकला, तथापि त्यामुळें युद्धाचा चटकन निर्णय लागूं शकणार नाहीं.

लष्करी तज्ञांच्या मतें इतकें निर्विवाद ठरलें आहे कीं, खंदकांतील लढाईचें शास्त्र, नवीन वैमानिक लढ्याच्या युगांतहि उपयुक्त ठरेल आणि त्यायोगें कसलेंहि आक्रमण थोपवितां येईल. आकस्मिक वैमानिक हल्ल्यांच्या शोधामुळें भावी लढाई झटपट संपेल ही आशा निरर्थक आहे. खंदकांतील वर्षानुवर्षें चालणारी लढाई या हुकूमशहांना तेव्हांच नमविणार. दीर्घकालीन युद्ध होणें जर्मनीस धोक्याचें आहे. कारण या दृष्टीनें त्यांची तयारी नाहीं. लोकशाहीचीं राष्ट्रें मात्र या बाबतींत सुसज्ज होत चाललीं आहेत. लोकशाही राष्ट्रें लोखंड, पोलाद, खाद्यपदार्थ यांत निःसंशय श्रेष्ठ आहेत. हुकूमशहांच्या अमदानींत लढाईच्या वेळीं उत्पादनशक्ति शिखरास पोंचल्याबरोबर त्याच्या उतारास प्रारंभ होईल. आकस्मिक वैमानिक हल्ल्याच्या शास्त्रावर ते विसंबून राहिलेले आहेत. त्या हल्ल्यानें शत्रुपक्षाच्या हृदयस्थानावर मारा करितां येईल हें खरें, पण त्यानें एखाद्या आधुनिक तयारीनें सुसज्ज अशा देशाचें भवितव्य एकदम पालटेल, हें मात्र शक्य दिसत नाहीं.

महायुद्धाच्या डोंबांत आपल्या राष्ट्रास ओढण्यापासून, देशांतील लोकांमधील दडपून टाकलेले पक्षभेद पुनः उसळी घेतील. लढाईस निव्वळ लष्करी तज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ यांचें सहकार्य पुरेसें होत नाहीं. देशांतील जनता त्यास तयार असावी लागते. हुकूमशहांच्या राजवटींत गुप्तपणें, विरोधी वातावरणाचे ढग जमा होत असल्याचें दिसेल. अर्थात भावी युद्ध जर का दीर्घकालीन झालें तर हुकूमशहांना बाहेरच्या लढाईबरोबर, आपल्या देशांतील समरभूमीवर, आपल्याच जातिबांधवांशीं झुंजावें लागेल. आपल्या साम्राज्यांत धाकदपटशावर सामील करून घेतलेलीं राष्ट्रें त्याचवेळीं नेमकीं बंडावा करितील. आणि हुकूमशहा आणि त्यांचीं राष्ट्रें यांचें नष्टचर्य पुरें ओढवेल.

## युद्धाचा भयानक देखावा

रोम–बर्लिन झेंड्यानें युरोपांतील लोकशाही पक्षाचीं प्यादीं एकेक फोडण्यास प्रारंभ केला आहे. मध्ययुरोपांतील जर्मनीचें वाढतें सामर्थ्य व वैभव छोट्या राष्ट्रांना त्या झेंड्याखालीं आणीत आहे. व्यापारी कराराच्या

जोरावर, त्यांना जर्मनी मिंधी बनवित आहे. असंरक्षणाचें भय दाखवून, त्यांना शस्त्रास्त्रें पुरवून सुसज्ज करीत आहे. तरीपण हीं राष्ट्रें युद्धकालांत जर्मन अधिराज्यांत सलोख्यानें नांदणें शक्य नाहीं.

इंग्रजी साम्राज्यशाहीचा 'आपण म्हणूं, त्याला हाणून टाकूं' हा गर्व पार मावळला. जर्मनीचीं विमानें लंडनवर घिरट्या घालूं लागल्याचें दृश्य त्यांच्या डोळ्यापुढें काजवे उभे करण्यास कारणीभूत झालें. परवाच्या झेकोस्लोव्हाकियाच्या वेळीं इंग्लंडमधील जनता गर्भगळित झाल्याचा देखावा नांहीं का दिसला? आगगाडीच्या प्लॅटफॉर्मवर सैनिकांना निरोप देण्यास किंवा शहरांतील लोक खेडगांवीं जाण्यास निघालेल्यांना निरोप देण्यास, जमलेल्यांच्या रडारडीशिवाय ऐकूं येईना. शहरांतील बगीच्यांचें आणि सुंदर उद्यानांचें रूपांतर झटपट खंदकांत झालें. हवालदील स्त्रीपुरुष रस्त्यांतून चिंताग्रस्त चेहऱ्यानें भटकत असल्याचें दिसलें. विजेच्या दिव्यांच्या लखलखाटांत, ऐषआरामांत गाद्यागिरद्यावर लोळणाऱ्या मनुष्यजातीवर, युद्धाच्या भयानें मुखवटे चढवून, तळघरांत अंधारांत लपून उंदराप्रमाणें खडबडाट करण्याचा प्रसंग यावा ना? हीच का आधुनिक मानवसंस्कृति! याचाच अभिमान माणसानें धरावयाचा काय?

म्युनिच करारानें ब्रिटनच्या वैभवास आणि पराक्रमाला ओहोटी लागली. असें म्हणतात कीं कोणत्याहि राष्ट्राचें शील व दानत प्रथम जाते आणि त्यानंतर त्या राष्ट्राचें वैभव लयाला जातें. ही दानत संपल्याची कबुली चेंबर्लेनसाहेबांनी म्युनिच करारावर सही करितांना दिली. कारण आत ब्रिटनच्या शब्दावर कोणाचाहि विश्वास उरलेला नाहीं. एवढेंच नव्हे तर इंग्लंड फॅशिस्टांच्या गोटांत जाणार काय, असाहि प्रश्न लोक विचारूं लागले आहेत. जर्मनीस इंग्लंडच्या अंतर्गत राजकारणांतहि दुरून होईल तितकी ढवळाढवळ करण्याचा मोह होऊं लागला आहे; व इंग्लंड ती ढवळाढवळ निमूटपणें सहन करीत आहे. खुद्द इंग्लंडमध्यें जर्मनीवर होणाऱ्या कडक टीकेवर कायद्यानें नियंत्रण घालावें म्हणून हिटलरनें चेंबर्लेनसाहेबाकडे तगादा लाविला आहे. परवा आरमार मंत्री कूपर यांच्या राजिनाम्यानंतर त्या जागीं मंत्र्याची योजना हिटलरच्या सल्ल्यानें झाली असें प्रसिद्ध झालें आहे. परराष्ट्रीय

मंत्री अँथनी ईडन यांच्या राजिनाम्यास मुसोलिनी कारणीभूत झाले, इत्यादि अनेक गोष्टी उदाहरणादाखल सांगतां येतील. जर्मनीचा वाढता हट्ट पुरा करण्यांत चेंबर्लेनसाहेब अखेर अयशस्वी ठरणार. आणि वाढता हट्ट जर्मनीच्या अंतिम हिताच्या दृष्टीनें अनिष्ट ठरणार.

## ब्रिटिश सिंह दांत विसरला

एका विनोदी लेखकानें म्युनिच कराराच्या वेळची परिस्थिती खालीलप्रमाणें वर्णिली आहे. ती अशी—

हेर हिटलरनें आपल्या पुस्तकांत जर्मनीचा इतिहास देतांना असें म्हटलें आहे कीं, कैसरची सर्वांत मोठी चूक ही झाली कीं, त्यानें ब्रिटिश सिंहाची आयाळ कुरवाळण्याचा प्रयत्न केला नाहीं. महायुद्ध सुरू होण्यापूर्वी ब्रिटन हा आपल्या शत्रूपक्षाच्या फळींत सामील होऊं नये अशी व्यवस्था कैसरनें करावयास पाहिजे होती. पण हें त्याला साधलें नाहीं. आपल्या हातीं जर राजसत्ता आली तर आपण असली चूक कधींहि करणार नाहीं असें हिटलरनें त्यांत सांगितलें आहे. तथापि हिटलरच्या स्वप्नांतहि असें कधीं आलें नसेल कीं, हा ब्रिटिश सिंह आपण होऊन इंग्लिश खाडी ओलांडून आपल्याकडे धांवत येईल व आपल्या पायापाशीं बसून शांतता रक्षण करण्याची याचना करील. पण तसें घडून आलें खरें! जर्मनीनें चालविलेल्या कत्तलखान्यांत, या ब्रिटिश सिंहानें मध्ययुरोपमधील बकरीं स्वतः आणून सोडलीं. गंमत ही कीं, या बकऱ्यांचें संरक्षण करण्याची हमी याच ब्रिटिश सिंहानें पूर्वी दिली होती. इतकेंच नव्हे तर हा ब्रिटिश सिंह जेव्हा हिटलरची भेट घेऊन परतला, त्यावेळीं या प्रसंगाची संस्मरणीय खूण ठेवली जावी म्हणून, आपले दांतहि हिटलरजवळ ठेवून आला. इंग्लंड व जर्मनी यांच्या संबंधाच्या इतिहासांत असा प्रसंग पूर्वी कधीं आला होता कां? जर्मनीच्या राजकीय आकांक्षेच्या पतंगाची शेपूट होण्याचा मान सध्यां इंग्लंडला मिळाला आहे हें दृश्य कोणाला विलोभनीय वाटेल?—

भेकड आणि स्वाभिमानरहित इंग्लंडच्या सद्यः धोरणाचें हें यथातथ्यच चित्र नव्हे कां?

## भावी युद्धाचा अंदाज

एकंदरीत, युरोपांतील हुकूमशहारूपीं पापग्रहांचे परिणाम अटळ आहेत. त्रिकोणाच्या समस्यांत रशियाला चिरडण्यांत तरी त्याचें एक रूपांतर होणार. अथवा अंतःकलहामुळें मोडकळीस आलेल्या फ्रान्सच्या साम्राज्यावर तरी त्यांची धाड येणार. युरोपांतील साम्राज्यवादी राष्ट्रांची ऑफ्रिकेंतील वसाहती उपटण्यासाठीं तरी ही मारामारी नाहीं ना ! अशी जबर शंका आल्यावांचून रहात नाहीं. हुकूमशहांनी स्पेन तर आतां पचविलाच. स्पेनमधील लढा आता जवळ जवळ संपुष्टांत आला आहे. हुकूमशहाकडून काढलेल्या अवाढव्य कर्जांत ज. फ्रँकोचा स्पेन बुडणार. यानंतर भूमध्य समुद्राच्या राजकारणांत निराळें वळण लागणार. आणि त्या सर्वांचा अनिष्ट परिणाम ऑफ्रिकेंतील वसाहतीवर होणार. आतां ऑफ्रिकेंत स्वतंत्र अशी राष्ट्रें राहिलेलीं नाहींत. साम्राज्यशाही राष्ट्रावर झडप घातल्याविना गत्यंतर नाहीं. असें ठरल्यास, फ्रान्सच्या कमकुमत साम्राज्याशिवाय दुसऱ्याचा लोभ कसा सुटणार ? यावेळीं फ्रान्सला इंग्लंड वाऱ्यावर सोडून देईल काय ? पण असें म्हणतात कीं इंग्लंडचें धोरण नेहमीं दूरदर्शीपणाचे असतें. स्वतःचें मोडकळीस आलेलें साम्राज्य टिकविण्यास, इंग्लंड फ्रान्सच्या साम्राज्याचा बळी देणारच नाहीं, असें मात्र खात्रीपूर्वक म्हणतां येणार नाहीं तें यामुळें.

थोडक्यांत महायुद्ध झालें तर तें लहानशा गोष्टीवरून होत नाहीं. त्यासाठीं अशा एखाद्या मोठ्या राष्ट्राचे हितसंबंध धोक्यांत आल्याशिवाय तें होऊं शकत नाहीं. युरोप म्हणजे दारूनें कडेकोट भरलेलें कोठार झालेलें आहे. ठिणगी कोठें आणि केव्हां पडते एवढाच काय तो अवकाश, त्याचा भडका होण्यास ! तूर्त लोकशाहीवरील जगाचा विश्वास डळमळला हें मात्र खरें. फार झटपट ज्याचे परिणाम पोंचतील अशी हेळसांड, प्रसंगीं विश्वासघात आणि कालहरण करण्यास तशींच जबरदस्त कारणें असलीं पाहिजेत हें उघड आहे. तीं कोणतीं तें आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

---

स्थळ प्रत

# अशुभस्य कालहरणम्

महायुद्ध अपरिहार्य आहे इतकी खात्री पटल्यानंतर, इंग्लंडच्या सध्यांच्या धोरणाचा थोडाबहुत विचार करूं. त्याचें सर्व धोरण " अशुभस्य कालहरणम् " या एकाच वाक्यांत सांठविलेलें आहे. तें सर्व भावी अनिष्टांचें द्योतक आहे, असा सध्यां जोराचा विचारप्रवाह वहात आहे. तो कितपत खरा आहे आणि इंग्लंडला हें धोरण सद्यःस्थितींत कां अनुसरावें लागलें याची कारणमीमांसा करूं.

## अमेरिका आखाड्यांत उतरली

हुकूमशाही राष्ट्रें युद्धास चटकन सिद्ध होऊं शकतात, पण लोकशाही राष्ट्रांना असा चुटकीसरशी मांडव उभारतां येत नाहीं. देशांतील पक्षोपपक्षांचें आणि बहुजन समाजाचें मत युद्धास अनुकूल असें बनवावें लागतें. तडजोडीचे सर्व प्रयत्न पूर्णपणें निष्फळ ठरले इतकी त्यांची खात्री पटवावी लागते. वर्तमानपत्रें आणि भाषणें यांच्या जोराच्या प्रचारावर, युद्धास अनुकूल अशी मनोवृत्ती निर्माण करावी लागते. तर युद्धास राष्ट्रांचा पाठिंबा एकदिलानें मिळूं शकतो. नाहींतर नेमकी आयत्यावेळीं देशांत बंडाळी माजावयाची ! यामुळें अनेक ठिकाणीं पड खाऊन अपमान सहन करावा लागतो. म्युनिच करारापासून फ्रान्स, इंग्लंड इत्यादि राष्ट्रांनीं आपल्या लोकांची पक्की खात्री पटविली, कीं यापुढें तडजोडीनें व सामोपचारानें प्रश्न मिटण्याची आशा संपली. हातांत दंडुका घेतल्याविना गत्यंतर नाहीं.

पण याहिपेक्षां एक निराळा कावा इंग्लंडचा होता. गेल्या महायुद्धाच्या आरंभापासून, आपल्या जोडीस अमेरिकेस ओढण्याचे प्रयत्न इंग्लंडनें केले व अखेर ते फलद्रूपहि झाले. त्यानंतर मात्र इंग्लंड–फ्रान्स यांची अमेरिकेशीं वागणूक पूर्णपणें बेपर्वाईची आणि विश्वासघाताची झाली. अमेरिकेस प्रारंभीं दिलेल्या गोड आश्वासनांना पूर्णपणें हरताळ

फांसून, प्रे. विल्सन यांना त्यांनी खुळयांत काढिलें. जर्मनीबरोबर, इंग्लंड व फ्रान्स यांनीं खांका वर करून, अमेरिकेचें कर्ज सपशेल बुडविलें. या सर्वांचा राग अमेरिकेच्या मनांत धुमसत होता. म्हणून गेल्या दहा बारा वर्षांत अमेरिकेचें युरोपिअन राजकारणांतील धोरण तटस्थपणाचें होतें. आखाड्यांतील लहान मुलांच्या कुस्त्या एखाद्या वस्तादाप्रमाणें पाहण्याचें कार्य अमेरिकेनें केलें.

भौगोलिक, आर्थिक व राजकीय दृष्ट्या अमेरिका खरें म्हटलें तर अगदीं स्वतंत्र. जगाचा व तिचा तसा कांहींच संबंध येत नाहीं. पण तो देश आर्थिक क्षेत्रांत पुढारलेला असल्यानें, तो श्रीमंत व सुखी आहे. तो सर्व जगाचा सावकार बनलेला आहे. वेळोवेळीं सर्व जगाला मोठमोठ्या सद्‌गुणांचा आणि नीतितत्त्वांचा उपदेश करण्याव्यतिरिक्त त्यानें कांहींही केलें नाहीं. जगाच्या राजकारणांत कोणतीच जबाबदारी त्यानें पत्करली नाहीं. सर्व जगाला कर्ज पुरवून, सावकार मात्र तो बनला. या सर्वांचें कारण युरोपिअन राष्ट्राबद्दल पोटांत असलेला राग.

आगामी युद्धांत अमेरिका आपल्या जोडीस घ्यावी, यासाठीं इंग्लंड व फ्रान्स यांनीं प्रयत्नांची शिकस्त केली व अखेर यश संपादलें. यश त्यांनीं मिळविलें म्हणण्याऐवजीं तें जपाननें प्राप्त करून दिलें, असें म्हणणें अधिक सयुक्तिक. पॅसिफिक महासागरांत जपानची सत्ता प्रबळ होणें अमेरिकेस केव्हांही अनिष्ट आहे. पण त्यांतल्या त्यांत अमेरिका आपल्या भांडवलाकडे अधिक जागरूकतेनें पाहते. अमेरिकेचें भांडवल दक्षिण चीनमध्यें गुंतलेलें आहे. अर्थात जपानच्या दक्षिण चीनवरील स्वारीमुळें, अमेरिकन भांडवलवाल्यांचें धाबें दणाणलें.

हें झालें एक कारण. तसेंच अमेरिकेनें आपलें प्रचंड भांडवल दक्षिण अमेरिकेंत पेरून, एक तऱ्हेनें आर्थिक साम्राज्य त्याठिकाणीं स्थापन केलें. फॅशिस्टांची उठाठेव आतां युरोपपुरती मर्यादित राहिलेली नाहीं. त्यांनीं दक्षिण अमेरिकेंतसुद्धां ढवळाढवळ करण्यास प्रारंभ केला असून, त्याठिकाणचें अमेरिकेचें आर्थिक सार्वभौमत्व रसातळाला जाणार अशी धास्ती उत्पन्न केली आहे. आणि म्हणूनच एकाएकीं अमेरिकेचे प्रे. रूझवेल्ट यांना जर्मनीतील ज्यूंवरील अत्याचारांचा सात्त्विक संताप आलेला दिसत आहे.

किंबहुना जर्मनीशीं असलेले सर्व राजकीय संबंध तोडून टाकण्याससुद्धां अमेरिका सिद्ध झाली आहे. आणि त्या दृष्टीनें तूर्त तरी अमेरिकेनें आपला परराष्ट्रीय वकील जर्मनींतून परत बोलावला आहे.

## त्रिकोणाचा चौकोन

व्हर्सेलिसच्या तहानंतर युरोपियन राजकारणांत इतकें प्रत्यक्ष पदार्पण अमेरिकेनें पूर्वी कधींच केलेलें नव्हतें. यंदाच्या नव्या वर्षारंभीं प्रे. रूझवेल्ट यांनीं दिलेला संदेश, हें धोरण स्पष्टपणें दाखवितो. ते म्हणाले कीं "ज्या राज्यपद्धतींत धर्म, लोकशाही आणि आंतरराष्ट्रीय नीतिमत्ता हीं पायाखालीं तुडविलीं जातात, त्या राज्यपद्धतींत शांततेला स्थान असणें शक्य नाहीं. अशा राज्यपद्धतीचा व समाजरचनेचा आमचें राष्ट्र धिक्कार करितें. आतां अशी वेळ आली आहे कीं, जेव्हां केवळ आपल्या घरादारांच्या रक्षणासाठींच नव्हे, तर संपूर्ण मानवी संस्कृतीच्या रक्षणासाठीं आपणास सज्ज झालें पाहिजे. सोटेशाहीचें नवे तत्त्वज्ञान जर इतर खंडांतून थैमान घालूं लागलें आणि आपल्याही खंडावर आक्रमण करूं लागले, तर आपल्या राष्ट्राची गत काय होईल याचा आपण विचार केला पाहिजे. आधुनिक यांत्रिक शोधांमुळें समुद्राचीं आणि हवेचीं मोठालीं अंतरें इतकीं तोकडीं झालीं आहेत कीं; जोंपर्यंत एकही प्रबल राष्ट्र तडजोडीनें तंटे मिटविण्यास तयार नाहीं, तोंपर्यंत इतर कोणतेंच राष्ट्र स्वतःला सुरक्षित समजूं शकत नाहीं."

जगाला गवसणी घालण्यास उठलेल्या रोम-बर्लिन-टोकियो या त्रिकोणास प्रतिस्पर्धी म्हणून, लंडन-पॅरिस-मॉस्को या लोकशाहीनें अमेरिकेस निमंत्रित करून, चौकोन बनविला असें म्हणावयास हरकत नाहीं. आणि नेमक्या याच गोष्टीची मार्गप्रतीक्षा युरोपांतील लोकशाहीचीं पुरकर्तीं राष्ट्रें करीत होतीं. दोस्त राष्ट्रांचें भावी युद्धांतील झेकोस्लोव्हाकिया प्रकरणापासून बल कमी होऊं लागलें हें खरें. पण याच्या उलट दोस्त राष्ट्रांनीं हरएक प्रकारें अमेरिकेस आपल्याकडे वळविलें; व तिला आपल्यांत सामील करून त्यांनीं हुकूमशहावर मोठा विजय मिळविला यांत तिळमात्र शंका नाहीं. अमेरिकेचें प्रचंड भांडवल आणि आधुनिक शस्त्रा-

स्त्रांची मदत दोस्त राष्ट्रांच्या कामीं चांगलीच पडेल. अर्थात अमेरिकेच्या या बदललेल्या धोरणास जरी अमेरिकेचा स्वार्थ कारणीभूत झाला असला, तथापि लोकसत्ताक राष्ट्रांच्या पारड्यांत त्यांनीं घातलेलें आपलें वजन निःसंशय हुकूमशहांना दहशत बसवील. अमेरिकेस हाताशीं धरून, पॅसिफिक महासागरांतील जपानच्या वाढत्या सत्तेस पायबंद घालण्याच्या विचारांत फ्रान्स व इंग्लंड सध्यां आहेत. प्रे. रूझवेल्ट यांनीं अमेरिकेची पूर्वेकडील सरहद्द ऱ्हाईन नदी, असें गुप्त मसलतींत ठरविलें आहे असें म्हणतात.

## लोकशाहीची शरणांगती

मि. अँथनी ईडनसारखे लोक लोकशाही आजच्या परिस्थितींत सुखानें टिकूं शकेल असें दिसत नाहीं, असें स्पष्ट बोलूं लागले आहेत. एवढेंच नव्हे तर सुलतानशाहीच्या मान्यापुढें; लोकशाही राष्ट्रें शरणांगतीनें लोटांगण घालित आहेत असें म्हणून, त्यांनीं म्युनिच कराराकडे बोट दाखविलें. आधुनिक लोकशाहीचें मुख्य गमक म्हणजे सहिष्णुता. तिचाच खून पडला तर त्या परिस्थितींत आपण सुरक्षित राहूं शकणार नाहीं.

परवां चेंबर्लेनसाहेबांनीं रोमला जाऊन मुसोलिनीस भेटण्यांत सर्व जगाला हें दाखवून दिलें कीं; शांततारक्षणाचे सर्व मार्ग आपण चोखाळले, आतां इतःपर महायुद्धाच्या त्यागाला राष्ट्रानें तयार झाल्याविना गत्यंतर नाहीं. अर्थात चेंबर्लेनसाहेबांच्या सामदामाच्या राजनीतींतील हा अखेरचा डाव झाला. यानंतर हिटलर–मुसोलिनींच्या गुर्मीच्या, बेदरकारपणाच्या आणि वचनभंगाच्या वृत्तीला ताळ्यावर आणण्यास, दंडुक्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. रोमहून परत आल्यानंतर पार्लमेंटांतील चेंबर्लेनसाहेबांच्या भाषणाचा मथितार्थ हाच. ते म्हणाले कीं "सध्यांच्या काळीं युद्ध ही इतकी भयंकर आणि घातक गोष्ट झाली आहे कीं, तडजोडीचा प्रत्येक मार्ग अपेशी ठरल्याशिवाय युद्धाचा विचार आपण करितां, कामा नये."

याच्या उलट भावी वर्ष जर का जर्मनीनें युद्ध न करितां निव्वळ दमदाटीच्या धोरणावर छोटेछोटे गमावलेले आपले प्रांत पैदा करण्यांत खर्च केलें, तर तें वर्ष 'म्युनिचवर्ष' म्हणून जर्मनीस अत्यंत भरभराटीचें

जाईल. कारण हिटलरचे ग्रह सध्यां उच्चीचे आहेत. फक्त त्यानें त्यांच्या जोरावर फार मोठा जुगार मात्र खेळतां कामा नये.

## चेंबर्लेनसाहेबांची वावडी

परवां चेंबर्लेसाहेबांनीं रोमला भेट दिली त्याप्रसंगीं मुसोलिनीनें चेंबर्लेनसाहेबांना एक छत्री अर्पण केली. ऐक्याचें प्रतीक म्हणून त्यांनीं ती मोठ्या समारंभानें वाजत गाजत इंग्लंडांत नेली. पण त्यामागें चेंबर्लेनसाहेबांना ' आपलें छत्र नीट संभाळा ' असा इषारा देण्याचा मुसोलिनीचा इरादा तर नसेल ना ? किंवा ' आतां चेंबर्लेनसाहेब राजकारणांतील ' दादागिरी ' पुरी करून संन्यास घ्या व म्हाताऱ्या पेन्शनरप्रमाणें, छत्री घेऊन सकाळ संध्याकाळ फिरण्याचा व्यायाम घ्या, ' असें मुसोलिनीस ध्वनित करावयाचें नाहीं ना ?

खुद्द मुसोलिनीचा पोटांतला डाव कांहींही असला, तथापि चेंबर्लेनसाहेबांची वावडी लवकरच इंग्लंडांत उडणार; एवढें मात्र निश्चित. एकामागोमाग ईडन, डफ, कूपर या प्रधानांच्या राजिनाम्यापासून इंग्लंडांत बरीच खळबळ उडाली असून, युद्धास अनुकूल असें वातावरण निर्माण होण्यास बरीच मदत झाली आहे. ईडन–डफ–कूपर यांची विचारसरणी साम्राज्यलालसेनें मलिन झालेली असली, तथापि त्यांच्या धोरणाला एकतऱ्हेची संगती आहे. कारण ते कठोर वास्तववादी आहे. चेंबर्लेनसाहेबांच्या पंगू आणि भीरू धोरणाचा इंग्लिश लोकांना दिवसेंदिवस वीट येत चालला आहे. "राष्ट्रांतून चेंबर्लेनसाहेबांना हांकला" असा जारीचा प्रसार जहाल पुढारी करूं लागले आहेत. नवीन वातावरणांत इंग्लंडमध्यें लवकरच पार्लमेंटची नवी निवडणूक झाल्यास, ईडन–कूपर–चर्चिल या त्रिकूटाकडे आधिकारवस्त्रें येण्याची शक्यता अधिक आहे. चेंबर्लेनसाहेबांना लवकरच राष्ट्रकार्यांतून निवृत्त व्हावें लागेल असा रंग दिसतो. कारण युद्धासारख्या प्रसंगीं त्यांच्यासारखे मुळमुळीत प्रधान उपयोगी पडावयाचे नाहींत. फारतर युद्धानंतर व्हर्सलिसच्या तहाप्रमाणें दुसऱ्यावर अन्याय लादण्याच्या कामीं त्यांची योजना योग्य होईल.

## इंग्लंड कालहरण कां करितें ?

इंग्लंड महायुद्धाचा काल दूर कां लोटित आहे यास अनेक जबरदस्त कारणें आहेत. निःशस्त्रीकरणाच्या गोंडस कल्पनेवर विसंबून, शस्त्रास्त्रांच्या शर्यतींत इतरांच्या मागें तें पडलें, हें एक कारण. वैमानिक दलाच्या बाबतींत तर तें अगदींच मागासलेलें ठरलें. इंग्लंडमध्यें वर्षास फार तर एक हजार विमानें तयार होऊं शकतात तर, जर्मनींत सालिना तीन चार हजारांची निर्मिती होऊं शकते. म्हणून नुकतींच अमेरिकेपासून इंग्लंडनें एक हजार विमानें खरेदी केलीं. तसेंच आरमाराच्या सामर्थ्यांतही आपला कमकुवतपणा त्यांच्या दृष्टीस पडला. दोन वर्षांपूर्वी लष्करी जहाजांचा तुटवडा त्यांना भासला. व्यापारी जहाजेंसुद्धां त्यांच्याजवळ भरपूर नव्हतीं. ब्रिटन समुद्राची राणी खरी पण तिचें वर्तन दासीकुणबिणीप्रमाणें होत आहे याचें कारण हें. आतां कोठें इंग्लंड जागें झालें असून, त्यानें १९४० अखेर शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज होण्याचा टोलेजंग कार्यक्रम आंखला आहे. तत्पूर्वी महायुद्ध टाळण्याची ते शिकस्त करणार. याच्या उलट तो कार्यक्रम संपूर्ण होण्याच्या आंत इंग्लंडला समरांगणावर खेंचण्याचा यत्न, हुकूमशहा करीत आहेत व त्या हेतूनें ते वरचेवर डिंवचूनहि पहात आहेत.

दुसरें एक महत्वाचें कारण म्हणजे आपल्या अवाढव्य साम्राज्याचें रक्षण कसें करावें, हा प्रश्न सध्यां इंग्लंडच्या डोळ्यापुढें आहे. त्या दृष्टीनें ठिकठिकाणीं तटबंदी उभारून, त्याच्या संरक्षणाच्या नादांत सध्यां इंग्लंड गुंतलेलें आहे. शिवाय इतके दिवस एके ठिकाणींच युद्ध करावें लागलें, त्यामुळें सर्व सैन्यबळ आणि राजकारणाचे धागे एकत्रित करितां आले. आतां यापुढें दोन ठिकाणीं राजकारण एकाच वेळीं रंगणार. अर्थात दोन्हीठिकाणीं यशस्वी रीतीनें तोंड देण्यास जय्यत तयारी अगोदर करून ठेवणें क्रमप्राप्त आहे.

मागील युद्धाइतकें बल आतां एकवटता येणें अशक्य झालें आहे. साम्राज्यवादी राष्ट्रें युद्धांत गुंतलेलीं पाहून, त्यांच्या अंमलाखालीं अनेक वर्षें पारतंत्र्यांत खिचपत पडलेलीं राष्ट्रें स्वातंत्र्यप्राप्तीस्तव बंड पुकारणार.

ही बंडाळी आटोक्यांत ठेवण्यास बरेंच सैन्य त्या त्या देशांत ठेवावें लागणार हें उघड आहे. उदाहरणार्थ, युद्धांत इंग्लंड गुंतलेलें पाहून हिंदुस्थान, रानटी टोळ्या, पॅलेस्टाईनमधील अरब लोक व इतरत्र मुसलमान त्यांच्याविरुद्ध उठणार. शिवाय हुकूमशहांचें साम्राज्य एकत्रित असल्यानें त्यांना आपलें सर्व बळ एकवटतां येईल. साम्राज्यवादी राष्ट्रांना जगाच्या पाठीवरून आपलें सर्व बल एकवटण्यास कालावधी लागेल. ही अडचण त्यांना नडवित आहे.

## नैतिक मुखवटा हवा.

लढाई करून जय संपादतां येईल, पण लोकशाहीचा प्रसार करण्यास तो मार्ग इष्ट नव्हे. लोकशाहीच्या बीजारोपणास आणि पुढील वाढीस शांततेची हवा लागते. हुकूमशहांच्या राष्ट्रांवर बॉंबवर्षाव करून त्यांचा प्रांत उध्वस्त करून, त्यांच्यांत लोकशाहीचीं बीजें पेरण्याचा मूर्खपणाचा हट्ट केव्हांही सिद्धीस जाणार नाहीं. त्यासाठीं लोकशाहीनें अनुकूल परिस्थितीची मार्गप्रतीक्षाच करीत राहिलें पाहिजे. हुकूमशहांची राजवट दिवसेंदिवस अप्रिय होत चालली आहे. अधिक राष्ट्रें एकत्रित करून साम्राज्यस्थापनेच्या वेड्या अट्टहासामुळें, अंतर्गत द्वेष व भांडणें मात्र वाढणार आणि या भांडणांचें पर्यवसान म्हणजे त्यांचा अंत.

शिवाय आज कांहीं राष्ट्रें गिळंकृत करितां येतील, पण लोकांचा आत्मा त्यांना केव्हांहि मारतां येणार नाहीं. लोकशाहीच्या मोकळ्या वातावरणास चटावलेला आत्मा किती दिवस बंदिवासांत राहणार? आजला जरी आर्थिक हलाखी, रक्ताचा फाजील अभिमान आणि उत्तान देशभक्तीमुळें बहुजनसमाज बिथरला असला, तथापि केव्हां ना केव्हां तरी तो ताळ्यावर येणारच. कारण कोणत्याही हुकूमशहास आपल्या राष्ट्रांतील लोकांचा उज्ज्वल इतिहास, मनाची ठेवण आणि त्याहिपेक्षां मनुष्याचा आत्मा नष्ट करितां येणार नाहीं. पण नेमकें तेंच करण्याचा विडा त्यांनीं उचललेला आहे. आज जर्मनी–इटलींत तुम्हाला हेंच दिसेल. स्वतंत्र बुद्धीचा नाश करण्याच्या अविचारी प्रयत्नांत ते आहेत. ज्ञानाच्या दीपानें दैदीप्यमान झालेल्या लोकांच्या मनावरून इतिहासाचे, परंपरागत

रूढींचे आणि संस्कृतीचे अवशेष धुवून काढण्यास हुकूमशहांचे हजारों जन्मसुद्धां अपुरे पडतील. म्हणून मी म्हणतों कीं अनैतिक विषारी वायूपासून बचाव करणारा मुखवटा जर्मनीस हवा आहे. अनैतिक वायूमुळें लोकांची बौद्धिक हानी अदृश्यपणें होत आहे, ती फार बाधक आहे. +

दुर्दैवाची गोष्ट कीं आज चोहोंकडे हुकूमशहांचा वाढता जोर दृष्टोत्पत्तीस येत असून, सर्वत्र लोकशाहीची पीछेहाट चाललेली दिसून येत आहे. पण यामुळें घाबरण्याचें मुळींच कारण नाहीं. हुकूमशहांच्या वाढत्या मागण्या आणि आकांक्षा अखेर अनिष्ट ठरणार.

### लोकशाहीचा सवाष्णपणा.

लोकशाहीचें कुंकू लावून सवाष्णपणा मिरविणाऱ्या प्रातिनिधिक राजवटीची वर्तणूक तितकीशी चांगली आणि एकनिष्ठपणाची नाहीं. भांडवलशाहीनें तिच्यावर आपला पगडा बसवून, लोकशाहीचीं खरीं तत्त्वें दाबून ठेविलीं. प्रातिनिधिक राजवटींनीं आपले दोष धुवून काढले पाहिजेत, अंतःशुद्धि केली पाहिजे. ती राजवट लोकांना अधिक सुखावह होऊन त्यांचें कल्याण करण्यास समर्थ ठरली पाहिजे. खऱ्या लोकशाहीच्या अमदानींत पाशवी विचार मूळ धरूं शकणार नाहींत. क्रूरतेचा धिक्कार आणि सत्याचा शोध हे उच्च संस्कृतिचे मुख्य गुणधर्म. कारण सौंदर्य आणि कला यांच्या शोधांत सुसंस्कृत माणसाचें मन गुंतलेलें असतें. सौंदर्य आणि प्रतिभा जगांतल्या कोनाकोपऱ्यांत धूळ खात पडलेली असो, आणि कोणतीही जात, रक्त आणि कातडी यांनीं युक्त अशा माणसांच्या ठिकाणीं असो, त्यांचा उदार अंतःकरणानें स्वीकार करण्यास संस्कृतिनिष्ठ माणसानें शिकलें पाहिजे. म्हणजेच द्वेष, क्रूरता यांचा धुमाकूळ बंद पडेल.

राजकारणांत दाखवावयाचे दांत निराळे आणि खाण्याचे दांत निराळे असा कांहीं थोडासा प्रकार आहे. रोम–बर्लिन झेंड्याचा आश्रय छोट्या राष्ट्रांना सद्यःस्थितींत आपल्या आयुष्याचा विमा उतरण्यास

---

+What Germany wants is a moral gas-mask to protect the population against invisible and odourless gas of intellectual disintegration.

सुरक्षित वाटला, तरी पण त्याचे दुष्परिणाम त्यांच्या लवकरच प्रत्ययास येतील. कारण तो झेंडा त्यांच्या देशाचें आणि लोकांचें स्वातंत्र्य संपुष्टांत आणील. अर्थात या वेळीं आंतून प्रचंड विरोधी वादळ निर्माण होईल. आणि नेमकें यावेळीं हुकूमशहावर बाहेरून दडपण पडल्यास, त्या राष्ट्रांची काय अवस्था होईल याची कल्पनादेखील करवत नाहीं.

## सर्वभक्षक काल

म्हणून लोकशाहीचीं पुरस्कर्तीं राष्ट्रें वेळ मारून नेत आहेत. आजला हुकूमशहा प्रबळ व डोईजड वाटले, तरी निव्वळ त्यांना नेस्तनाबूद करण्यासाठीं, त्यांच्या राष्ट्रावर झडप घालून जागतिक महायुद्ध पेटविणें, केव्हांही अविचारीपणाचें ठरेल. कारण हुकूमशहांची सत्ता चटकन केव्हां गडगडेल तें कोणासच सांगतां यावयाचें नाहीं. डोळ्याचें पातें हलतें ना हलतें तोंच तुम्हांला विलक्षण चमत्कार दिसतील. हुकूमशहांच्या हकालपट्टीस महायुद्धाशिवाय अन्य मार्ग म्हणजे सर्वभक्षक एक काल. सध्यांच्या परिस्थितींत एक कालच बदल पाडूं शकेल, असा लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांना आत्मविश्वास वाटत आहे. पण हा झाला दुबळ्या माणसांचा दैवावर हवाला टाकण्याचा मार्ग. अंगी भरपूर सामर्थ्य येतांच, लोकशाहीचीं पुरस्कर्तीं राष्ट्रें हुकूमशहांची खोड काढल्याशिवाय राहतील असें मात्र वाटत नाहीं. फक्त तोंवर कांहीं काल परिस्थितीस कलाटणी कशी देतां येईल, ही काळजी रात्रंदिवस त्यांच्या मनास लागून राहिली आहे.

पण खऱ्या लोकशाहीचीं तत्त्वें, आणखी एक महायुद्ध पेटवून अंग होरपळून घेतल्याशिवाय मनुष्य शिकणार नाहीं. आणि तो काल फारसा दूरहि पण नाहीं. कम्युनिझमशीं अखेरचा लढा देण्यासाठीं, सध्यांच्या भांडवलशाहीनें हुकूमशाहीचें उग्र स्वरूप धारण केलें आहे. त्या लढ्यांत भांडवलशाही पराभव पावणार हें निःसंशय. म्हणूनच मी म्हणतों कीं, ही हुकूमशहांची राजवट; खऱ्या लोकशाही राजवटीचा प्रास्ताविक भाग आहे. कारण भावी युद्धांत हे हुकूमशहा पराजय पावले, कीं खऱ्या लोकशाहीचा प्रसार सगळ्या जगभर झाल्यावांचून रहाणार नाहीं.

———

# आगामी महायुद्ध आणि हिंदुस्थान

## ब्रिटिश साम्राज्याचा दिमाख

जगांतल्या कोठल्याही साम्राज्याचें ठोकताळ्याचें भविष्य सांगण्यासारखी दुसरी सोपी गोष्ट कोणती नाहीं. पुराणकालापासून ते आजतागायत, हजारों प्रभावशाली साम्राज्यें उगवून लयाला गेल्याचीं उदाहरणें सांपडतील. मनुष्य मरणाधीन आहे असें म्हणण्यापासून ज्याप्रमाणें आपणावर खरोखरी मनुष्याचें वाईट चिंतण्याचा दोषारोप येत नाहीं, उलट खरी तीच गोष्ट आपण बोलतों, त्याप्रमाणें वैभवास चढलेलीं साम्राज्यें एक दिवस रसातळास जावयाचीं हा इतिहापुराण नियम आहे. कालाच्या अतिवेगवान ओघांत साम्राज्यें घसरून, एक दिवस वहाटीस लागावयाचीं. तें भवितव्य जसें मनुष्य चुकवूं शकत नाहीं, तसें कोणतेंही साम्राज्य चुकवूं शकत नाहीं; म्हणून अशा प्रबल कालास "कालाय तस्मै नमः" म्हणतात. पण हा झाला वेदांत.

साम्राज्य उलथून पडण्यास भाग पाडणाऱ्या दोन दृश्य शक्ति आजवर दिसून आलेल्या आहेत. त्यांपैकीं एक म्हणजे अंतर्गत कारभारांत बेबंदशाही, त्यामुळें झालेली क्रांती. अशा बेबंदशाहीनें माजलेल्या धुमाकुळीच्या वेळीं, परचक्राचें आक्रमण झालें कीं मोठालीं साम्राज्यें पार जमीनदोस्त झालेलीं आढळतील.

ब्रिटिश साम्राज्याचा दिमाख आपण लहानपणापासून वाचित आलों. त्यांच्याएवढें साम्राज्य अद्याप जगाच्या पाठीवर दुसरें कोणीही संपादलेलें नाहीं. इंग्लंडसारख्या चिमुकल्या बेटानें भूपृष्ठाचा निदान एक चतुर्थांश तुकडा बळकावला आहे. जगांतील पांचहि खंडांत त्यांचें साम्राज्य पसरलेलें असल्यामुळें, ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधीं मावळत नाहीं, असें मोठ्या

दिमाखानें ते म्हणून घेतात. ज्या साम्राज्यावर सूर्य कधींही मावळत नाहीं, त्यांत न्याय, समता, बंधुत्व इत्यादि असेल. अशी कोणी कल्पना करून घेतली असली, तर ती मात्र साफ चुकीची आहे.

ब्रिटिश साम्राज्याचें क्षेत्रफळ सुमारें एक कोटी, ऐंशी लक्ष चौरस मैलांचें असून, लोकसंख्या सुमारें ५२ कोटी आहे. एक लाख चौरस मैलांचें क्षेत्रफळ व लोकसंख्या फक्त साडेचार कोटी असलेल्या ब्रिटननें, हें एवढें मोठें आपल्या शंभरपट अधिक असें साम्राज्य कमावलें आहे. त्या साम्राज्यामध्यें ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड हे प्रचंड खंडाच्या विस्ताराचे प्रदेश बहुतांशीं रिकामे आहेत. या दोन प्रदेशांत निदान दहा–पांच कोटी लोकांचीं सोय खात्रीनें लावतां येईल. या साम्राज्याच्या अभावीं ब्रिटनला जगाच्या राजकारणांत कोणी काडीचीही किंमत देणार नाहीं. यामुळेंच ब्रिटिश साम्राज्याचें वैषम्य इतरांना फार वाटतें.

## ब्रिटिश साम्राज्याचा डोलारा डळमळला

ब्रिटिश साम्राज्य इतर अनेक साम्राज्यांप्रमाणें अधोगतीस लागून लयाला जाणार, हें सांगण्यास कोणी भविष्यवादी नको. फक्त तें केव्हां एवढाच वादाचा प्रश्न. कित्येक म्हणतात कीं साम्राज्याचा ऱ्हास आणि नाश होण्याचा काळ अद्याप आलेला नाहीं, तर कोणी म्हणतात कीं तो काळ आतां समीप आला. गेल्या महायुद्धामुळें तें साम्राज्य खिळखिळें झालें असून, आणखी एका महायुद्धानें तें पुरें मोडणार. महायुद्ध आज ना उद्यां झाल्याविना रहात नाहीं, आणि त्याच्या धक्क्यानें पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें, ब्रिटिश साम्राज्य कोलमडून पडल्याशिवाय रहात नाहीं. संकुचित पायावर अतिविस्तृत व टोलेजंग उभारलेली इमारत ज्याप्रमाणें एकदिवस कोसळा-वयाची, त्याप्रमाणें आज ब्रिटिश साम्राज्याची अवस्था झालेली आहे. आणि साम्राज्याचा डोलारा आजच डळमळूं लागला आहे; तो युद्धामुळें पुरा कोसळणार.

लाडक्या लेकी डोईवर चढल्या या विचारसरणींत बराच तथ्यांश आपणांस आढळून येईल. महायुद्धापासून, वसाहती उर्फ लाडक्या लेकी ब्रिटिश साम्राज्याच्या डोक्यावर बसून मिरें वाटूं लागल्या आहेत.

विशेषतः १९३१ सालीं पार्लमेंटांत पसार झालेल्या वेस्ट मिनिस्टर कायद्यामुळें साम्राज्याचें मृत्युपत्र निर्माण झालें असून; फक्त त्याची अंमलबजावणी केव्हां होते, एवढाच प्रश्न शिल्लक राहिला आहे. पोलादी सांखळीनें साम्राज्याचे घटक बद्धमूल करण्यांत आले होते, त्यांतील एकेक दुवे तुटत जाऊन, वेस्ट मिनिस्टर कायद्यानें शेवटचाही दुवा तुटला. आतां फक्त भांडवलाची सोनेरी शृंखला आणि बादशहारूपी नाजूक रेशमी धागा, या दोघांनींच ते घटक थोडेफार जोडलेले आढळतील. कारण या वसाहतींना सर्व गोष्टींत संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें आणि त्यांच्या स्वतंत्र राजकारणाची नौका अनिर्बंधितपणें मोठ्या डौलानें विहार करूं लागली. भावी महायुद्धांत साम्राज्यसरकाराला सहाय्य करावयाचें कीं नाहीं, ही गोष्टसुद्धां सर्वस्वीं वसाहतींच्या इच्छाशक्तीवर अवलंबून राहिलेली आहे. अर्थात भांडवलाची सोनेरी शृंखला तोडण्याचा सोपा उपाय हुकूमशहांनीं दाखविला आहेच. बादशहारूपी अदृश्य रेशमी धागा तोडण्यास तर एक क्षणाचा अवधि पुरे. अर्थात आजला ब्रिटिश साम्राज्याची नुसती प्रचंड छाया राहिलेली आहे. मोडकळीस आलेल्या विस्कळित घटकांचें तें एक संयुक्त स्वरूप आहे.

प्रत्येकजण साम्राज्यांतून बाहेर पडण्यासाठीं आज धडपडत आहे. कॅनडा अमेरिकेच्या आहारीं जाऊं इच्छितो. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व ऑफ्रिका स्वतंत्र राष्ट्रं होऊं इच्छितात. आयर्लंडनें वसाहतीचें साम्राज्य केव्हांच मिळविलें. युद्धाच्या गडबडींत तो अल्स्टर लाटणारच. अर्थात महायुद्धाच्या धामधुमींत इंग्लंड गुंतलेलें पाहून, हे वसाहतीचे घटक साम्राज्यांतून फुटणार यांत आतां यत्किंचित्‌हि शंका राहिलेली नाहीं. म्हणूनच ब्रिटन युद्धाची टाळाटाळ करीत आहे. शिवाय ब्रिटनकरितां हे साम्राज्यांतील घटक महायुद्धाच्या यज्ञांत भाग घेतील ही आशा करणें फोल आहे.

सिंहाचें प्रेत पडलें तरी ज्याप्रमाणें कोल्हे त्याच्यावर तुटून पडतात, त्याप्रमाणें या ब्रिटिश साम्राज्याच्या अंतासाठीं जगांतील आधाशी राष्ट्रांचीं गिधाडें टपून बसलेलीं आहेत व जातां जातां आपल्या हातीं काय लागेल या शेख महंमदी विवंचनेंत चूर आहेत.

## बादशाही मुकुटांतील तेजस्वी रत्न

ही झाली ब्रिटिश साम्राज्याची कथा. मग हिंदुस्थानचें काय होणार असें साहजिकच कोणास वाटणार. त्याचें उत्तर हिंदुस्थान भावी युद्धाचे वेळीं काय करणार यावर अवलंबून आहे. हिंदुस्थानचें ब्रिटिश साम्राज्यांतील स्थान फार महत्त्वाचें आहे. हिंदुस्थानचा गौरव नेहमीं " बादशहाच्या मुकुटांतील तेजस्वी रत्न " या शब्दानें केला जातो. एकवेळ ब्रिटनला बाकीचें सर्व साम्राज्य गेलेलें परवडेल; पण हिंदुस्थान गमावून त्यांचें भागणार नाहीं आणि म्हणूनच हिंदुस्थान स्वराज्यहक्काच्या बाबतींत इतका मागासलेला आढळतो.

गेल्या महायुद्धांत साम्राज्यासाठीं अपूर्व स्वार्थत्याग हिंदुस्थाननें केला. सुमारें बारा कोटी पौंडाची मदत पैशाच्या स्वरूपांत केली. सुमारें ५०–५५ हजार हिंदी लोकांचे बळी त्यापायीं दिले. आणि या सर्व साम्राज्यसेवेबद्दल ब्रिटननें काय देणगी दिली? तर १९१९ चा अपुरा, निराशाजनक आणि असमाधानकारक कायदा. त्यानंतरच्या सर्व हिंदी चळवळींना प्रायश्चित म्हणून १९३५ चा सुधारणांचा कायदा बहाल केला. थोडीफार प्रांतिक स्वायत्तता आणि मध्यवर्ती सत्तेचा आभास, या गोष्टी हिंदी जनतेस लाभल्या. अभूतपूर्व संयुक्त घटनेची नवी कल्पना काढून, हिंदुस्थानवरील आपली सत्ता निरंकुश ठेवण्याचें कौशल्य त्यांनीं दाखविलें. पण आतां हिंदी लोकमताच्या प्रतिदिनीं वाढत्या असंतोषाच्या धुमींत, ओलें वाळलें सर्वच जळण्याची पाळी आली आहे.

## साम्राज्य रक्षण कसें करणार ?

ब्रिटिश साम्राज्याचें संरक्षण करण्याच्या जबाबदारींतून अद्यापही ब्रिटन मुक्त झालेलें नाहीं. इतकें दिवस समुद्रावरील स्वामित्वाच्या जोरावर जगावर राज्य करणें सोपें होतें. पण आतां आलें विमानांचें युग. ह्या-दृष्टीनें विमानें येण्यापूर्वी जग बरें होतें असें म्हणावें लागतें. या युगांत समुद्रावरील निव्वळ स्वामित्व उपयोगीं पडणार नाहीं. कारण पांखराप्रमाणें घिरट्या घालून बॉंब–वर्षाव करणाऱ्या या नवीन ब्रह्मास्त्रापुढें, सर्वांना खरोखरीच हात टेकण्याची पाळी आलेली आहे. आणि विमानांच्या बाबतींत इंग्लंड अगदींच मागासलेलें आहे.

एकंदरींत १९१४ च्या महायुद्धापूर्वी असलेली इंग्लंडची तयारी व ताकद आजच्या घटकेला खास नाहीं. यामुळेंच इंग्लंड वाटेल तो अपमान सहन करून महायुद्धाचा दिवस दूर ढकलीत आहे.

शिवाय इतके दिवस एके ठिकाणींच युद्ध करावें लागल्यामुळें साम्राज्यांतील सर्व सैन्य व राजकारणाचे धागे जुळवितां आले. एकत्रित व संघटित असा लढा देतां आला. आतां युद्धास तोंड फुटणार दोन ठिकाणीं. दोन्ही ठिकाणीं युद्ध खेळण्याचें अवघड शास्त्र, इंग्लंडला कितपत परवडणार हा एक महत्वाचा प्रश्न आहे. शिवाय ब्रिटन युद्धाच्या कचाटींत आहे हें पाहून पारतंत्र्यांत खिचपत पडलेलीं राष्ट्रें स्वातंत्र्यप्राप्तीस्तव बंड करणार हें उघड आहे. अर्थात ही बंडाळी आटोक्यांत ठेवण्यांत त्याला त्या देशांतच बरेंच सैन्य ठेवावें लागणार. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांत हिंदी व आफ्रिकेंत आफ्रिडी सैन्य. तेथील परिस्थिती कह्यांत ठेवण्यास पुष्कळसें सैन्य तेथें ठेवावें लागणार. खडें सैन्य आजला जर्मनीचें बरेंच मोठें आहे. इंग्लंड त्याही गोष्टींत मागें आहे. मग महायुद्धाच्या काळीं साम्राज्य कसें टिकणार, हिंदुस्थान कसा राखणार आणि स्वतःचें राष्ट्र कसें जिवंत ठेवणार, हे जिव्हाळ्याचे प्रश्न सध्यां ब्रिटिश मुत्सद्यांना सोडवावयाचे आहेत.

## हिंदुस्थान कोठें आहे ?

हिंदुस्थान कोठें आहे ? या दृष्टीनें हिंदुस्थानास लष्करी विद्येंत मागासलेला ठेवण्यांत इंग्लंडनें आपला स्वार्थी हेतू साधला असेल; पण साम्राज्यरक्षणाच्या दृष्टीनें ही मोठी घोडचूक झाली आहे असें म्हणणें भाग पडतें. एवढें मोठें मनुष्यबळ आपल्या बाजूस असतांना, तें युद्धाच्य दृष्टीनें कुचकामाचें ठेवण्यांत इंग्लंडनें काय साधलें ? आजच्या घटकेला थोडाबहुत पश्चात्ताप ब्रिटिश मुत्सद्यांना होऊं लागला आहे हें खरें; पण त्याचें पुरें प्रायश्चित लाभल्याविना त्यांना ही पटलेली गोष्ट अंमलांत आणाविशी वाटणार नाहीं.

हिंदुस्थानचें एकुण लष्कर पावणेदोन लक्षावर आहे. त्यांत आडोशाचें सैन्य, युद्ध करणारें सैन्य व अंतर्गत संरक्षण करणारें सैन्य असे विभाग आहेत. शिवाय रिसाला, तोफखाना, विमानें, रणगाड्या इत्यादि.

या सर्वांत इंग्रजांचें संख्याबल अधिक आहे. त्या सर्व इंग्रजांच्या बदली, तेवढ्या खर्चांत त्यांच्या चौपट हिंदी सैन्य हिंदुस्थानास पोसतां येईल. हिंदी सैनिक कर्तबगारींत इंग्रज सैनिकांबरोबर नाहींत, हा डंका किती दिवस सरकार वाजविणार ? शरीरसौष्ठवांत, हुषारींत, कल्पकतेंत आणि मर्दुमकींत हिंदी सैनिक जगांतील कोठल्याहि सैनिकाइतकाच ठरेल. पण हिंदी लष्करावर आणि पर्यायानें हिंदी लोकांवर असलेला अविश्वास ब्रिटननें सोडला पाहिजे. पण तो अविश्वास सोडण्यास भाग पाडल्याविना इंग्लंड तो सोडील, असें मात्र वाटत नाहीं. हिंदुस्थानास एक दोन जहाजां-व्यतिरिक्त स्वतःच्या मालकीचें आरमार नाहीं. वैमानिक दलांत तीच कहाणी. आधुनिक शस्त्रास्त्रांवर आधारलेल्या जगांत मागसलेले राहण्यांत काय तोटा होतो याचीं उदाहरणें म्हणून चीन, ॲबिसिनिया हीं दाखवावयासच हवींत काय ? चालू युगांत वैमानिक व आरमारी दलांत मागें पडलेल्यांच्या नशिबीं पारतंत्र्यच लिहिलेलें आहे. लष्कराच्या हालचालीस जरूर अशी कार्यक्षमता हिंदुस्थानांतील रेल्वेंतसुद्धां नाहीं.

आतां कोठें थोडेसें ब्रिटिश साम्राज्य जागें झालें असून, साम्राज्य-रक्षणाच्या तयारीस लागलें आहे. हिंदुस्थानच्या लष्करी खर्चांतील थोडा-बहुत हिस्सा त्या लष्कराच्या साम्राज्याच्या सेवेबद्दल देण्याचें साम्राज्य सरकारनें ठरविलें आहे. पण त्याहिपेक्षां हिंदुस्थानांतील लष्कराचें हिंदी-करण आतां जलद रीतीनें करून, त्यास पूर्ण कार्यक्षम बनविणें अगत्याचें नाहीं कां ?

## हिंदुस्थानचा विश्वास संपादन करा.

साम्राज्यसंरक्षणार्थ वसाहतीप्रमाणें हिंदुस्थानांतील जनता एकदिलानें पाठिंबा मागील युद्धाप्रमाणें देईल अशी आशा करणेंही इतःतर चुकीचें ठरेल. पण साम्राज्यरक्षणार्थ नसलें तरी पण स्वरक्षणार्थ इंग्लंडनें हिंदुस्थानावर विश्वास टाकून, त्याचा परत विश्वास संपादन करण्याची वेळ खास आली आहे. आधुनिक कालांत शेंदोनशें वर्षांपेक्षां अधिक काळ साम्राज्य टिकून राहील ही आशा निरर्थक आहे. त्यांत हिंदुस्थान इंग्लंडच्या अंकित झाल्यापासून, आर्थिक शोषणाच्या चरकांत पूर्णपणें पिळून निघालेला आहे. ब्रिटिशांच्याबद्दल हिंदी लोकांच्या मनांत असलेली अढी काढून टाकण्यास

एकच मार्ग आहे. आणि तो हिंदी लोकांना संपूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याची संधी देऊन, त्यांचें सहकार्य मिळविणें हा. हिंदी लोकांना सुशिक्षित करून ज्याप्रमाणें त्यांना मनुष्यधर्माच्या हक्कांची आणि जबाबदारीची जाणीव करून दिली, त्याप्रमाणें त्यांना गुलामगिरीच्या पाशांतून मुक्त करून मनुष्यांत आणणें हेंच श्रेयस्कर. अशा रीतीनें हिंदी लोकांची सहानुभूती इंग्लंडनें मिळविली, तर ती इंग्लंडच्या उपयोगी पडल्याविना खातीनें राहणार नाहीं. हिंदी लोक परमेश्वराला भिऊन वागणारे आहेत, दैवावर हवाला ठेवून असलेल्या स्थितींत समाधान मानणारे आहेत. त्याहीपेक्षां त्यांना माणुसकीची खरी चाड आहे. ज्या इंग्लिशांनीं त्यांना सुशिक्षित करून स्वतंत्र केलें, त्यांचें ऋण फेडण्यासाठीं, इंग्लंडच्या सहाय्यार्थ ते धांवल्याशिवाय राहतील काय ? या कामीं इंग्लंडला जो स्वार्थत्याग करावा लागेल त्याचा मोबदला, हिंदी लोक पुरेपुर दिल्याशिवाय खातीनें राहणार नाहींत. इंग्लंडच्या एवढ्या मोठ्या स्वार्थत्यागचा मोबदला, हिंदी लोक कृतघ्नतेनें देतील काय ?

गोऱ्या वसाहती या बोलून चालून इंग्लंडच्या लाडक्या लेकी. त्या डोकीवर चढल्या, त्यांनीं सवता सुभा व संसार थाटला हें पाहून हिंदुस्थानला आपल्या परिस्थितीबद्दल वैषम्य वाटलें तर त्यांत त्याची चूक नाहीं. इंग्लंड व हिंदुस्थान यांचें नातें सासू–सुनेचें आहे. सून कर्ती सवरती झालेली पाहून तिच्याकडे संसार सोंपविणें साध्या व्यवहारांतही उचित दिसतें. कारण तसें नाहीं केलें, तर एक दिवस ती तो संसार आपल्या हातीं हक्कानें घेणार. चार दिवस सासूचे आणि चार दिवस सुनेचे, हें इंग्लंडनें विसरतां कामा नये. ती वेळ येण्यापूर्वीं हिंदुस्थानला स्वतंत्र करून, आपल्याबरोबरीनें वागवून, त्याच्या सहकार्याचा फायदा घेणें इंग्लंडच्या हिताचें नाहीं काय काय ?

पण इतकी सद्बुद्धि कोठून सुचणार ? "फोडा व झोडा" या राजनीतीचा अवलंब करून आणि हिंदी लोकांना अज्ञानांत ठेवून, राज्य हांकण्याची इंग्लंडची मनीषा अद्याप पुरी झालेली नाहीं. जातीय वादावर स्वतःचें स्थैर्य कायम ठेवण्याचा मोह त्यांना आवरत नाहीं. सदोष संयुक्त

घटनेचें लोढणें हिंदुस्थानच्या गळ्यांत बांधण्याचीं त्यांचीं कारस्थानें अद्यापि चालूच आहेत. हिंदी चलन पद्धतींत गेलीं शेंदीडशें वर्षें लूट मिळवूनही, अद्याप त्यांची तृषा शांत झालेली नाहीं. हिंदी रुपयाचा पाट इंग्लिश पौंडाबरोबर लावल्यामुळें, गेल्या पांच सहा वर्षांत ३००–४०० कोटी रुपयांच्या सोन्यास हिंदुस्थान आंचवला. किंबहुना त्यापायीं सुवर्णाच्या बाबतींत हिंदुस्थान पुरा धुऊन निघाला. संयुक्त घटनेंत स्वतःचें जड बूड स्थिर राखण्यासाठीं, संस्थानिकांना व मुसलमानांना हाताशीं धरून, त्यांच्याकरवीं हिंदुस्थानांतील काँग्रेसच्या प्रचंड सत्तेस शह देण्याची लालसा त्यांना स्वस्थ बसूं देत नाहीं. या सर्वांचा परिणाम हिंदी लोकांतील असंतोष वाढता राहील. असंतोषाच्या प्रखरतेनें प्रांतिक राज्यव्यवस्थेंतील नोकरशाहीची " पोलादी चौकट "सुद्धां आज वितळून मेणासारखी मऊ झाली आहे. त्या असंतोषाचा पारा अधिक चढवून, त्याच्या प्रखरतेचा प्रभाव अधिक पाहण्याचा अदूरदर्शीपणा त्यांना दाखवावयाचा आहे काय?

## म. गांधी विरुद्ध सुभाष बोस

आगामी महायुद्धांत हिंदुस्थानची भूमिका काय असावी याविषयीं पुनः एकवार हिंदुस्थानांत तुमुल युद्ध माजलें आहे. खुद्द काँग्रेसमध्यें त्यापायीं दुफळी पडते कीं काय अशी भीति वाटत आहे. गेल्या महायुद्धाच्या प्रसंगीं ब्रिटिश सरकारनें स्वराज्याचा प्रश्न अगोदर सोडवावा व त्याविषयीं निश्चित अभिवचन ब्रिटिशांकडून घ्यावें, असा त्यावेळीं लो. टिळकांचा आग्रह होता. पण त्यावेळीं ब्रिटिश सरकारला बिनशर्त आणि भरपूर सहाय्य करणें आपलें कर्तव्य आहे, शत्रू अडचणींत सांपडला असतांना त्याचा गैरवाजवी फायदा घेणें योग्य नव्हे, या नेमस्तांच्या विचारसरणीस जोराचा पाठिंबा मिळून, बिनमोल साहाय्य हिंदुस्थाननें इंग्लंडला केलें.

पण त्याचें ऋण इंग्लंडनें १९१९ च्या कायद्याचें पोकळ स्वराज्य देऊन फेडलें हें सर्वांना विदित आहे. त्यावेळीं ही नेमस्तांची तळी उचलण्यास म. गांधी होते. आज पुन्हां तसाच प्रश्न देशाच्या राजकारणांत उपस्थित झाला आहे. म. गांधींची भूमिका तीच कायम आहे. त्यावेळच्या

लो. टिळकांची भूमिका उचलून धरण्यास-पण त्याच्या भरतीस समाजसत्तावादाचें तत्त्वज्ञान घालून-श्री. सुभाषबाबू बोस सिद्ध झाले आहेत.

म० गांधीची भूमिका नैतिक दृष्ट्या श्रेष्ठ दर्जाची आहे हें निःसंशय. पण ती व्यवहार्य नाहीं असें अनुभव सांगतो. त्याची प्रचीति पुन्हां पाहण्यांत काय हंशील ? आंतरराष्ट्रीय राजकारणांतील परिस्थितीचा पुरेपूर फायदा ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानच्या राजकारणांत घेतला. मग त्याच परिस्थितीचा फायदा हिंदुस्थाननें पदरांत पाडून घ्यावयाचें धोरण आंखलें तर त्यांत गैर काय झालें ? किंबहुना तसा अधिकार हिंदुस्थानला आहेच आहे. गेल्या महायुद्धाच्या अडचणीच्या वेळीं लांब रुंद आशाजनक आश्वासनावर हिंदुस्थानास झुलविलें, आणीबाणीच्या परिस्थितींत थोडीशी ढिलाई दिसतांच त्या आश्वासनांस ब्रिटननें हरताळ फांसला. बोलण्याप्रमाणें कांहींतरी करणें भाग म्हणूनच, हिंदुस्थानच्या तोंडावर १९१९ चा सुधारणांचा हत्ता फेकून, हिंदी लोकांच्या तोंडास पानें पुसलीं.

## हिंदुस्थाननें काय करावयास हवें ?

हा वचनभंगाचा इतिहास हिंदी लोक अद्याप विसरलेले नाहींत. तशीच आणीबाणीची परिस्थिति निर्माण होत असतांना, हिंदुस्थाननें स्वस्थ झोंपा काढाव्यात हें तत्त्वज्ञान मुळींच पटण्यासारखें नाहीं. नैतिक दृष्ट्या थोडेसें निकृष्ट वाटलें तरी त्या अडचणीचा फायदा घेण्याची कल्पना, समंजस आणि व्यवहारी स्वरुपाची आहे. अशा आंतरराष्ट्रीय कात्रींत इंग्लंड सांपडलेलें पाहून त्याचा पुरा फायदा घेण्यास, म्हणजे अल्स्टर प्रांत लाटण्यास त्यांचेच जातीबांधव आयरिश लोक डोळ्यांत तेल घालून टपले आहेत कीं नाहीं ! गोऱ्या वसाहती देखील त्या दृष्टीनें विचार करीत आहेत ना ? मग हिंदुस्थाननें ती दृष्टी ठेविली तर त्यांत नांवें ठेवण्यासारखें काय आहे ?

अशावेळीं संयुक्त राज्यघटना हिंदुस्थानावर लादण्याच्या प्रयत्नांत इंग्लंडला केव्हांही माघारच घ्यावी लागणार आहे. संस्थानिकांच्या करवीं परस्पर कॉंग्रेसला चिरडण्याची कल्पना, तर निव्वळ वेडेपणाची आहे. मुसलमानांचा सवतासुभा निर्माण करून देशांत फूट पाडून, आपलें आसन स्थिर करण्याची जुनी विद्या, आतां नवीन युगांत फारशी उपयोगीं पडणार नाहीं.

जगांतील महायुद्धाचें वादळ आणि ब्रिटिश साम्राज्याची दुर्बल अंतःस्थिति या दोहोंचा मेळ घालून, त्यांचा फायदा कुशलतेनें आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीकरितां कसा करून घ्यावयाचा, हा हिंदुस्थानपुढें सध्यां महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. गेली महायुद्धासारखी सुवर्णसंधी व्यर्थ गेली, त्याची पुनरावृत्ती न व्हावी म्हणून काय दक्षता घ्यावी हें समजून घेणें अगत्याचें आहे. ऐक्य, संघटना आणि बळ यांच्या जोरावर स्वातंत्र्य कमावण्याइतका सोपा मार्ग अशा वेळीं दुसरा कोणताच नाहीं. फक्त या कामीं आपसांतील दुहीनें घरभेदेपणा करतां कामा नये. भांबावलेल्या मनःस्थितीनें अनिश्चित धोरण आंखून भागावयाचें नाहीं. आपल्या निश्चित मागण्या बिनधोक आणि खंबीरपणें पुढें मांडणें हें पहिलें कर्तव्य. त्याप्रीत्यर्थ आपणास मिळालेल्या हक्कांचा उपयोग करून घेऊन, सरकारला नडविणें ही दुसरी पायरी. असंतोषाच्या पायीं देशांतील ऐक्य आणि संघटना निर्माण करणें ही तिसरी पायरी. यावेळीं समाजसत्तावादाच्या नसत्या कल्पनेच्या भरीं पडून देशांत वर्गविग्रह उत्पन्न न होईल, अशी दक्षता प्रारंभापासून घेणें अगत्याचें ठरेल.

## हिंदुस्थानचें पारतंत्र्याचें ग्रहण सुटणार !

महायुद्धानंतर हिंदुस्थानची परिस्थिती काय होईल हा आतां काय तो शेवटचा प्रश्न राहिला. मी पक्का आशावादी असल्यामुळें, तें चित्र मला फारच आकर्षक असें वाटतें. मागासलेल्या आणि अंकित राष्ट्रांच्या मोक्षास भावी महायुद्ध कारणीभूत होणार. युरोप बोलून चालून ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेलें आहे. ज्वालामुखीचा स्फोट मोठ्या प्रमाणांत होऊन; पाश्चात्यांचे देश, वैभव, लोक आणि संस्कृति या सर्वांची राखरांगोळी उडणार असा रंग आला आहे. जगाच्या राजकारणाची धुरा वाहणारीं पाश्चात्य राष्ट्रें लयाला जाणार. जर्मनी, इटली, इंग्लंड, फ्रान्स, रशिया इत्यादि देश आपआपसांत लढून, सुंदोपसुंदी होऊन हतबल व निर्वीर्य होणार. अर्थात पौर्वात्य गोलार्धांतील राष्ट्रांना जागतिक राजकारणांत महत्त्वाचें स्थान प्राप्त होणार असें दिसूं लागलें आहे. आणि कदाचित नवीन युगास आवश्यक अशी नवीन समाजरचनेची व

संस्कृतीची कल्पना पाश्चात्त्यांनीं शोधून काढली, तरी ती जगांत प्रस्थापित करून यशस्वी करून दाखविणार पौर्वात्य राष्ट्रेंच. जपाननें चीन सबंध गिळला, तथापि एखाद्या लहान सापानें मोठा उंदीर गिळावा त्याप्रमाणें जपानची अवस्था होणार. पाश्चात्यांचें राजकारण संपलें म्हणजे जपानचेंही राजकारण संपुष्टांत येणार. अर्थात चिनी लोक आपल्या संस्कृतीच्या जोरावर जपानची विद्या हस्तगत, करून जपानलाच पचविणार.

पौर्वात्यांच्या राजकारणांत निश्चित पण महत्त्वाचें स्थान हिंदुस्थान पटकावणार. संस्थानांच्या राजवटींतील परिस्थिती ब्रिटिश हिंदुस्थानच्या बरोबरीनें एका पातळींत येईतोंपर्यंत, ही लोकशाहीची जागृति आणि चळवळ अशीच फोफावणार. भावी महायुद्धांत, हिंदुस्थानला लागलेलें पारतंत्र्याचें ग्रहण सुटणार आणि स्वातंत्र्यरवि उगवणार. काळोखाचा नायनाट करून सूर्योदय झाल्यावर, सुवर्णकिरणांनीं आकाश तेजोमय व्हावें व अखिल प्राणिमात्र आनंदानें बेहोष व्हावा, त्याप्रमाणें महायुद्धाच्या भयानक व भेसूर संकटांतून सुटलेल्या हिंदुस्थानवर; स्वातंत्र्यरुपी सूर्यकिरणांचा वर्षाव होऊन, त्यानंतर संयुक्त, सुसंघटित आणि बलवान हिंदुस्थान, तेजानें तळपत असलेला आढळून येईल.

—समाप्त—

REFBK-0005859